म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १२९८
१९५५

REFBK-0008731
REFBK-0008731

अध्यात्म ग्रंथ माला : ग्रंथांक ५

# एकनाथ वचनामृत

REFBK-0008731

प्रा. रा. द. रानडे, एम्. ए.

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली १९५५

मूल्य चार रुपये

प्रकाशक
सदाशिव कृष्ण पाध्ये
व्हीनस प्रकाशन
४१० शनवार पेठ : पुणें २

मुद्रक
यशवंत गोपाळ जोशी
आनंद मुद्रणालय
१९६।४६ सदाशिव : पुणें २

नुक्रम ९८६७३
दि. २१.०४
१२८६
२५४/५५

# प्रस्तावना

'अध्यात्मग्रंथमाले'च्या पहिल्या आवृत्तींत एकनाथांवर स्वतंत्र पुस्तक नव्हतें. मालेच्या 'संतवचनामृत' या दुसऱ्या भागांत एकनाथांचे कांहीं अभंग तेवढे समाविष्ट केलेले होते. परंतु एकनाथांचें वाङ्मय फार समृद्ध व विविध प्रकारचें असल्यामुळें त्यांतील कांहीं निवडक उतारे काढून त्यांचा संग्रह स्वतंत्र ग्रंथरूपानें करावा असें वाटल्यानें 'अध्यात्मग्रंथमाले'च्या या द्वितीयावृत्तींत 'एकनाथवचनामृत' हा भाग आम्ही निराळा काढीत आहों. या भागांत एकनाथांच्या सर्व प्रमुख ग्रंथांतील, म्हणजे भागवत एकादशस्कंद, भावार्थरामायण, रुक्मिणी-स्वयंवर व स्फुट आध्यात्मिक प्रकरणें यांतील निवडक उताऱ्यांची विषयवार रचना करून त्यावरून एकनाथांची सर्वांगीण पारमार्थिक शिकवण कोणत्या प्रकारची होती हें त्यांच्याच शब्दांत सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या अभंगांचा समावेश मात्र या भागांत केलेला नसून तो पूर्वींच्याच भागांत आढळेल. येथें त्यांचे ओंवीबद्ध ग्रंथ विचारांत घेतले आहेत.

## एकनाथांचें चरित्र

एकनाथांसारख्या अलौकिक संतकवीचा जन्मशक निश्चितपणें सांगतां येऊं नये, अशी आज परिस्थिति आहे. यासंबंधीं दोन मतें असून कै. भावे एकनाथांचा जन्म शके १४७०मध्यें झाला असें म्हणतात, तर कै. पांगारकरांच्या मतें तो शके १४५५ मध्यें झाला. तेव्हां तूर्त परंपरेस अनुसरून एकनाथ शके १४५५ मध्यें पैठणास जन्मले असें आपण धरून चालूं. भानुदास—चक्रपाणि—सूर्यनारायण—एकनाथ याप्रमाणें त्यांची वंशपरंपरा असून सुप्रसिद्ध संत भानुदास यांचे एकनाथ हे पणतू होत. स्वतःच्या जन्मप्रसंगावर त्यांनीं एक अभंग रचिला आहे तो असा

**मुळींच्या मुळीं एका जन्मला । मायबापें थोर धाक घेतला ॥**
**कैसें मूळ नक्षत्र आलें कपाळा । स्वयें लागलों दोहींच्या निर्मूळा ॥**
**शांति करितां अवघ्यांची शांति । मुळीं लागोनियां लाविली ख्याति ॥**
**एका जनार्दनीं मुळींच्या गोष्टी । मायेसगट सगळा बापचि घोंटी ॥**

वरील अभंगाचा आध्यात्मिक अर्थ क्षणभर दूर ठेविला तर एकनाथांचें चरित्र त्यांतून थोडेंफार पाहतां येईल. मूळ नक्षत्रावर जन्मलेल्या नाथांचे आईबाप त्यांच्या बालपणींच वारले व त्यामुळें त्यांचें संगोपन त्यांचे आजे चक्रपाणी यांनीं केलें. पैठण हें तेव्हां संस्कृत विद्येचें माहेरघर होतें. साहजिकच एकनाथांच्या मनावर, बुद्धीवर पैठणच्या संस्कृतीचे संस्कार झाले असणार. त्यांतून ते मोठे बुद्धिमान आणि श्रद्धावान होते. भगवद्भक्ति ही त्यांच्या घराण्यांत अनेक पिढ्यांची होती. तीच एकनाथांत उतरली, आणि वयाच्या बाराव्या वर्षी, आजाची अनुज्ञाहि न घेतां, ते देवगडास येऊन जनार्दन-स्वामींच्या सेवेंत राहिले. प्रपंच साधून परमार्थाचा लाहो कसा करावा हें एकनाथांस जनार्दनस्वामींनीं स्वतःच्या आचरणानें शिकविलें. या गुरुशिष्यांचीं हृदयें किती एकवटलीं होतीं याची साक्ष 'एकाजनार्दन' देत आहे असो. एकनाथांनीं देवगडास गुरुमुखानें ज्ञानेश्वरी ऐकली व याप्रमाणें गुरुसान्निध्यांत सहा वर्षांचा काळ लोटल्यावर त्यांना 'सुलभ' पर्वतावर परमेश्वराचा साक्षात्कार झाला. यानंतर गुरुशिष्यांनीं मिळून कांहीं तीर्थयात्रा आरंभिली. यात्रेच्या प्रारंभींच पंचवटीस एकनाथांनीं गुर्वाज्ञेनें चतुःश्लोकी भागवतावर ओवीबद्ध टीका लिहून आपल्या काव्यमंदिराचा पाया घातला. पुढें कांहीं तीर्थें करून जनार्दनस्वामी देवगडास परतले व पुढील यात्रा एकनाथांनीं मनीं गुरुध्यान धरून एकट्यानेंच केली. यानंतर वयाच्या पंचविसाव्या वर्षीं ते पैठणास परत आले व विजापूर येथील गिरजाबाई या नांवाच्या मुलीशीं विवाह करून त्यांनीं गृहस्थाश्रम स्वीकारला. एकनाथांचे यापुढील बहुतेक सर्व आयुष्य पैठणांत गेलें. बहुतेक सर्व म्हणण्याचें कारण असें कीं, शके १४९२ ते शके १४९५ हीं मधलीं तीन वर्षें त्यांचें वास्तव्य काशीक्षेत्रीं होतें. एकनाथ काशीस जाऊन पोचले तेव्हां त्यांच्या भागवताची पहिली पंचाध्यायी

लिहून पुरी झाली होती, व 'रुक्मिणीस्वयंवरा'ची रचना चालू होती. भागवतासारख्या आध्यात्मिक ग्रंथावर प्राकृत टीका रचूं पाहणाऱ्या या संत-कवीस काशीच्या कर्मठ पंडितांकडून प्रथम प्रथम सपाटून विरोध झाला. परंतु लौकरच एकनाथांचें मोठेंपण त्यांस कळून आलें व ज्या कर्मठांनीं मराठी भाषेचा व त्या भाषेंत आध्यात्मिक रचना करणाऱ्या संतकवींचा छळ मांडला होता, त्यांनींच शके १४९५ मध्यें एकनाथी भागवताची समाप्ति झाली तेव्हां या ग्रंथाची काशीक्षेत्रीं पालखींतून मिरवणूक काढली. याप्रमाणें आपल्या साधुत्वानें काशीकरांस जिंकून, वाटेंत जोगाईचें आंबें येथें दासोपंत कवीस भेटून एकनाथ शके १४९५ चे अखेरीस पैठणास परतले. शके १५०६ मध्यें आळंदीस जाऊन ज्ञानेश्वरांच्या समाधीचें व त्यांच्या ग्रंथाचें म्हणजे ज्ञानेश्वरीचें संशोधन त्यांनीं केलें. या प्रसंगाची हकिगत त्यांनीं स्वतःच पुढील अभंगांत दिली आहे.

**श्रीज्ञानदेवें येउनी स्वप्नांत । सांगितली मात मजलागीं ।**
**दिव्य तेजःपुंज मदनाचा पुतळा । परब्रह्म केवळ बोलतसे ॥**
**अजानवृक्षाची मुळी कंठासि लागली । येऊनि आळंदी काढी वेगीं ।**
**ऐसें स्वप्न होतां आलों अलंकापुरीं । तंव नदीमाझारीं देखिलें द्वार ॥**
**एकाजनार्दनीं पूर्वपुण्य फळलें । श्रीगुरु भेटले ज्ञानेश्वर ॥**

एकनाथांचा स्वतःचा ग्रंथरचनेचा उद्योग अविरत चालूच होता. त्यांच्या प्रपंचाविषयीं बोलावयाचें तर तो केव्हांच परमार्थरूप होऊन गेला होता. त्यांची पत्नी गिरिजाबाई ही परमार्थास अत्यंत अनुकूळ असून तिच्यामुळें नाथांचें घर म्हणजे शांतिसुखाचें आगर व त्यांचा गृहस्थाश्रम म्हणजे जगास कित्ता होऊन बसला. त्यांना एकूण चार अपत्यें झालीं. पैकीं थोरली मुलगी गोदा ही पैठणकर मुद्गलांच्या घराण्यांत दिलेली असून कविवर्य मुक्तेश्वर हा तिचा मुलगा व एकनाथांचा नातू होय. एकनाथांचा मुलगा हरिपंडित हा मोठा कर्मठ आणि संस्कृत भाषेचा अभिमानी असल्यामुळें प्रथम प्रथम त्यानें नाथांच्या धोरणास व विचारसरणीस विरोध केला. परंतु लवकरच हा विरोध मावळला आणि पितृहृदयाची थोरवी पटून हरिपंडित त्याशीं समरस होऊन

गेला. आपलें उर्वरित आयुष्य एकनाथांनीं परमार्थाच्या प्रसारासाठीं वेंचलें. आपल्या वर्तणुकीनें त्यांनीं परमार्थी मनुष्यानें प्रपंचांत कसें वागावें याचा उत्कृष्ट कित्ता घालून दिला. स्वतःच्या अंगावर थुंकणाऱ्या यवनाशीं शांततेनें वागणें; पितरांच्या श्राद्धाच्या वेळीं महारास जेऊं घालणें; गंगेचें पाणी घरीं आणीत असतां तहानेनें तळमळणाऱ्या एका गाढवास तें पाजणें; वेश्या, चोर, व जार यांचा उद्धार करणें; एका महाराच्या मुलाला उचलून कडेवर घेणें; ज्ञानाचा अभिमान चढलेल्या स्वतःच्या मुलाशीं म्हणजे हरिपंडिताशीं शांत रीतीनें वागणें, या व इतर अशा अनेक गोष्टींनीं एकनाथ हे शांति, दया, अक्रोध, समता वगैरे गुणांचे मूर्तिमंत अवतार होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. याप्रमाणें देहानें, मनानें कृतकृत्य होऊन शके १५२१ फाल्गुन वद्य ६ स त्यांनीं पैठण येथें देह ठेविला. वाळुवंटीं कीर्तन करीत असतांना त्यांनीं जलसमाधि घेतली अशी आख्यायिका आहे. खरा प्रकार कांहींहि असो, एकनाथांच्या देह ठेवण्यांत कांहीं योगायोग असावा असें वाटतें. कारण देहान्तसमयीं त्यांचें 'भावार्थ रामायण' रचण्याचें काम चालू होतें व तें तसेंच अर्धवट सोडून त्यांनीं आपली इहलोकची यात्रा संपविली. म्हणून असें वाटतें, कीं त्यांचे गुरु जनार्दनस्वामी यांचा जन्म, आत्मसाक्षात्कार, एकनाथांवरील अनुग्रह आणि देहत्याग इतक्या चार गोष्टी ज्या तिथीस घडल्या त्याच तिथीस म्हणजे फाल्गुन वद्य ६ स नाथांनीं देह ठेवावा यांत कांहीं तरी संकेत दिसतो.

## एकनाथकालीन महाराष्ट्राची स्थिति

ज्ञानेश्वरांच्या कालाकडून एकनाथांच्या कालाकडे वळणें म्हणजे वैभवसंपन्नतेकडून दुःखदारिद्र्याकडे वळण्याप्रमाणें आहे. ज्ञानेश्वरकालीन महाराष्ट्र हें एक सुखसंपन्न व स्वतंत्र राष्ट्र होतें हें आपण पहिल्या भागांत पाहिलेंच आहे. या वैभवाचा मागमूसहि एकनाथकालांत दिसून येत नाहीं. ज्ञानेश्वरांनंतर लौकरच देवगिरीवर यादवांचें राज्य गेलें व महाराष्ट्र मुसलमानी सत्तेखालीं आला. ही सत्ता सतत तीनशें वर्षें म्हणजे शिवाजी महाराजांच्या वेळेपर्यंत टिकली व या अवधींत तिनें महाराष्ट्रास मृतप्राय करून टाकलें. या कालांतील

राजकीय, सामाजिक व धार्मिक दुरवस्थेची थोडीफार कल्पना एकनाथांच्या भारुडांतून व भावार्थ रामायणांतून येऊं शकते. त्यांच्या वेळीं धार्मिक क्षेत्रांत नाना प्रकारचीं सोंगेंढोंगें माजून परमार्थाचा बाजार भरवूं पाहणाऱ्या दांभिकांच्या चेष्टांना ऊत आला होता. समाजांत माजलेल्या या स्वार्थाचा व दंभाचा समाचार घेऊन एकनाथ करुणाबुद्धीनें समाजाच्या उद्धाराकडे वळले, व कथाकीर्तनें आणि वाङ्मयरचना करून हें कार्य त्यांनीं तडीस नेलें. तत्कालीन बहुविध व बहुरंगी समाजास एका भागवतधर्माच्या सूत्रांत गोवून त्याला भक्तिमार्गास लावणें हें एकनाथांचें खरें कार्य होय. यासाठीं त्यांनीं विरोध सोसून सर्वांना समजेल अशा मराठी भाषेची कास धरली व एकाहून एक श्रेष्ठ असे ग्रंथ निर्माण केले. त्यांच्या वेळीं मराठी भाषा ही एकीकडून फारसीचा जुलूम व दुसरीकडून संस्कृत पंडितांचा दुराग्रह अशा दुहेरी कात्रींत सांपडली होती. एकनाथी भागवतावर केवळ त्याची भाषा मराठी म्हणून सारें काशीक्षेत्र कसें तुटून पडलें आणि त्यामुळें एकनाथांनीं या कर्मठ व दुराग्रही पंडितांचें समाधान करीत आपला ग्रंथ मनकर्णिकेच्या तीरीं राहून कसा संपविला ही हकीगत प्रसिद्धच आहे. मराठी भाषेचा गौरव व पुरस्कार करणाऱ्या ओंव्या त्यांच्या प्रत्येक ग्रंथांतून आढळून येतात. भागवत व रामायणा-सारखे सुंदर ग्रंथ मराठी भाषेंत लिहून त्यांनीं आपल्या विरोधकांस एक प्रकारें चांगलें उत्तरच दिलें असें म्हणावयास हरकत नाहीं.

## एकनाथांची ग्रंथरचना

एकनाथांनीं ग्रंथरचना फार मोठ्या प्रमाणावर केली असून तिच्यांत वैचित्र्यहि पुष्कळ आहे. चतुःश्लोकी भागवत, एकादश स्कंदावरील टीका, रुक्मिणीस्वयंवर व भावार्थ रामायण हे त्यांचे मुख्य ग्रंथ होत. पैकीं चतुःश्लोकी भागवत हा त्यांनीं लिहिलेला पहिला ग्रंथ असून तो त्यांनीं आपले गुरु श्रीजनार्दनस्वामी यांच्या बरोबर तीर्थयात्रा करीत असतांना त्यांच्या आज्ञे-वरून त्र्यंबकेश्वर येथें रचिला. हें प्रकरण मूळ भागवताच्या द्वितीय स्कंदापैकीं नवमाध्यायांतील असून त्यांतील एकूण ४५ श्लोकांपैकीं ३२ पासून पुढील चार श्लोकांत ब्रह्मदेवास सृष्टिरचनेची आज्ञा करतांना आदिनारायणानें सांगितलेलें

गुह्य तत्त्वज्ञान आलें आहे. या चार श्लोकांवर एकनाथांनीं सुमारें एक हजार ओव्या रचिल्या असून, ते म्हणतात त्याप्रमाणें ही चतुःश्लोकी म्हणजे संसार-श्रांतांसाठीं उभारलेलें चौखांबी मंदिरच आहे. या ग्रंथांत त्यांनीं भागवतधर्म थोडक्यांत सांगितला असून सृष्टीच्या आदिमध्यावसानीं एक नारायणावांचून दुसरें कांहीं नाहीं हा सिद्धांत प्रतिपादिला आहे. त्यांच्या एकादशस्कंदावरील विस्तृत टीकेचें बीज या चतुःश्लोकींत असून एकनाथी भागवत या नांवानें प्रसिद्ध असलेली ही ओवीबद्ध टीका त्यांनीं शके १४९५ मध्यें लिहून पूर्ण केली. या ग्रंथाच्या रचनेस प्रारंभ पैठण येथें झाला व त्यानंतर तीन वर्षांनीं त्याची समाप्ति वाराणशी क्षेत्रीं मनकर्णिकातीरीं झाली असें दिसतें. या भागवत-टीकेचें स्वरूप अतिशय प्रचंड असून तिची ओवीसंख्या अठरा हजारांचे वर म्हणजे ज्ञानेश्वरीच्या दुप्पट आहे. एकादशस्कंद कृष्णोद्धवसंवादरूप असून एकनाथांनीं त्याला भागवतपंथाच्या धर्मग्रंथाचें स्वरूप प्राप्त करून दिलें आहे. त्यांनीं ही टीका मूळ भागवतग्रंथ व त्यावरील श्रीधरी टीका यांना धरून लिहिलेली असून ‘ सांडूनि पदपदार्था । नाहीं बोलिलों वृथा ’ अशी त्यांची प्रतिज्ञा आहे. एकनाथी भागवत हा भागवतधर्माचा पायाच असून या धर्माची परंपरा, त्याचें स्वरूप, त्याचीं वैशिष्ट्यें, त्याचें साध्य व त्याचीं साधनें असे अनेक विषय या ग्रंथांत आलेले आहेत. रुक्मिणीस्वयंवर हें शके १४९३ मध्यें लिहिलेलें त्यांचें लोकप्रिय काव्य मराठी वाङ्मयांत एका दृष्टीनें अपूर्व आहे कारण या काव्यांत केवळ कृष्णरुक्मिणीची विवाहकथा सांगितलेली नसून जीवाशिवांच्या ऐक्यावर रचिलेलें हें एक सर्वांगसुंदर व विस्तृत रूपक आहे. भावार्थरामायण हा एकनाथांचा अखेरचा ग्रंथ असून त्याचीं पहिलीं पांच कांडें व सहाव्यांतील ४४ अध्याय लिहून झाल्यावर त्यांचा अंतकाळ ओढवला, व त्यामुळें यापुढील रचना त्यांच्या गावबा नांवाच्या एका शिष्यानें करून ग्रंथ पूर्ण केला. म्हणजे भावार्थरामायणांतील एकूण २९७ अध्यायांपैकीं पहिले १७२ एकनाथांचे व उरलेले गावबाच्या हातचे आहेत. या ग्रंथाची एकूण ओवी-संख्या सुमारें चाळीस हजार असून त्यांपैकीं पहिल्या पंचवीस हजार ओव्या एकनाथकृत आहेत. भावार्थरामायण म्हणजे वाल्मीकिरामायणाचा केवळ अनुवाद नाहीं. तर त्यांत एकनाथांनीं रामकथेवर एक विस्तृत असें आध्यात्मिक

रूपक रचिलेलें असून त्यामुळें एकनाथांच्या या ग्रंथास अध्यात्मरामायण हें नांव अधिक शोभून दिसेल. तसेंच या रामायणाची रचना चालू असतांना त्यांच्या-समोर सर्व बाजूंनीं अधःपतित झालेला तत्कालीन समाजहि असावा व त्यास अनुलक्षून त्यांनीं कित्येक प्रसंगांची योजना केली असावी असें वाटतें. कारण, देवांचें बंधविमोचन करून रामराज्याची गुढी उभारावी, स्वधर्माला आलेली ग्लानि दूर करून त्याचें पुनरुत्थापन करावें, दुष्टांचें निर्दलन करून गोब्राह्मणांचें संरक्षण करावें, देवद्रोही, विश्वद्रोही व ब्रह्मद्रोही अशा रावणास निवटून रामराज्य स्थापावें, अशा अर्थाचे विचार भावार्थरामायणांत एकनाथांनीं ठिकठिकाणीं व्यक्त केले आहेत. सारांश, त्यांनीं लावलेला रामकथेचा अर्थ जसा आध्यात्मिक तसाच सामाजिकहि आहे. या दृष्टीनें विचार केल्यास हें भावार्थरामायण म्हणजे एकनाथकालीन महाराष्ट्राचा पारमार्थिक उषःकालच होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. असो. याशिवाय हस्तामलक, स्वात्मसुख, आनंदलहरी, शुकाष्टक, चिरंजीवपद, अशीं अनेक लहानमोठीं ओवीबद्ध प्रकरणें एकनाथांनीं लिहिलेलीं असून त्यांतील कांहींचा समावेश या पुस्तकांत केला आहे. एकनाथी गाथा हा स्वतंत्र विषय असून त्याचा विचार मागें म्हटल्याप्रमाणें अन्य ठिकाणीं होईल. येथून पुढें एकनाथांच्या ग्रंथांतून निवडलेल्या उताऱ्यांच्या आधारें त्यांचें तत्त्वज्ञान व परमार्थविषयक विचार थोडक्यांत पाहूं.

## एकनाथी भागवत

### प्रा स्ता वि क

आपण विष्णुभक्तांच्या कुळांत जन्मलों याबद्दल एकनाथांना धन्यता वाटते (क्र १). परमार्थांत सद्गुरूंचें महत्त्व फार मोठें आहे. सद्गुरु श्री जनार्दन स्वामींनीं त्यांना भक्तीची अवीट गोडी लावून त्यांचें मीपण नाहींसें केलें (क्र. २). गुरुकृपेनें मीं अलक्ष्य पाहिलें व देहींच विदेही झालों, म्हणून सद्गुरु श्रीजनार्दन हे भवगज-पंचानन आहेत असें एकनाथ म्हणतात (क्र. ३) घटाभोंवतीं आकाश चोहोंकडे असतें, त्याप्रमाणें मी जातों तेथें श्रीजनार्दन माझ्याभोंवतीं आहेत (क्र. ४). श्रीरामकृष्णादि अवतारी पुरुषांनीं तृण-तरुवरादिकांचा व व्याघ्रादि हिंस्र पशूंचाही उद्धार केला यांत

काय नवल? श्रीजनार्दनांनीं माझ्यासारख्या अज्ञाकडून एवढा भागवत ग्रंथ वदविला हें त्याहून आश्चर्यकारक होय असें एकनाथ सांगतात (क. ५). अध्यात्मदृष्टया श्रीजनार्दन हेंच मातापिता होऊन त्यांनीं मला चिद्रत्नाचे अलंकार लेवविले (क. ६). पांवा नानाप्रकारचे मधुर सूर काढतो, पण त्याचें सर्व श्रेय पांवा वाजविणाऱ्याकडे असतें. त्याप्रमाणें श्रीजनार्दनच ग्रंथ व ग्रंथकर्ता असल्यावर मी नसता अहंकार कशास बाळगूं? असें एकनाथ नम्रतेनें विचारतात (क. ७). त्यांना मराठी भाषेचा योग्य अभिमान वाटतो. भागवतावर मराठींत टीका लिहिल्यानें त्यांतील आत्मज्ञान कोणत्याही प्रकारें कमी प्रतीचें ठरत नाहीं असे उद्गार त्यांनीं अनेकदां अनेक ठिकाणीं काढले आहेत. संस्कृत वंद्य व प्राकृत निंद्य ही दुरभिमानाची भाषा आहे. ज्या भाषेंत ब्रह्म-कथन केलें ती भाषा हरिचरणीं पवित्रच झाली असें एकनाथांचें मत आहे (क. ८). श्रीएकनाथांनीं भागवतांत ग्रंथरचनेचा स्थलकालनिर्देश केला असून हा ग्रंथ वाराणशीस शके १४९५मध्यें पूर्ण झाला असें म्हटलें आहे (क. ९). ग्रंथपूर्णतेसाठीं त्यांनीं व्यासवाल्मीकादि महाकवींची व निवृत्ति-नामदेवादि संतांची कृपा भाकिली आहे (क. १०). भागवतग्रंथाचें क्षेत्र–रूपकानें एकनाथांनीं केलेलें वर्णन फारच वहारीचें असून तें प्रत्येकानें जरूर वाचावें (क. ११). बालकाचा हात धरून वडिलांनीं स्वतः अक्षरें त्याजकडून लिहवावीं, त्याप्रमाणें श्रीजनार्दनांनीं मजकडून भागवताचा अर्थ वदविला असें ग्रंथाचे शेवटीं एकनाथ म्हणतात. श्रीभागवत म्हणजे ज्ञानगर्भ चिद्रत्न आहे. या ग्रंथाचा जे आदर करतील किंवा निंदा करतील तेहि आम्हांस ब्रह्ममूर्तीच होत. कारण सर्वांभूतीं आत्मरूप पाहण्यास श्रीजनार्दनानींच मला शिकविलें असें एकनाथांनीं म्हटलें आहे (क. १२). या ग्रंथाच्या वाचनानें ज्ञानी सुखी होतील, मुमुक्षू परमार्थ पावतील व साधक भवसिंधु तरून जातील, असा वर जनार्दनांनीं दिला. तसेंच त्याच्या पठणानें निंदाद्वेष उपजणार नाहींत, रामनामीं प्रीति वाढेल व देवाविषयीं नित्य नवी भक्ति वाटूं लागेल अशी या ग्रंथाची फलश्रुति सांगितली आहे (क. १३).

### त त्त्व ज्ञा न

या प्रकरणांत वेदान्ताच्या मूलभूत कल्पना एकनाथांनीं सोप्या भाषेंत

स्पष्टपणें मांडिल्या आहेत. प्रकृति-पुरुषांचें स्वरूप, त्यांचा परस्परसंबंध, त्रिगुण व त्यांचा नाश, ब्रह्म–माया वाद, आत्मानात्मविवेचन, आत्मा–ईश्वर-ब्रह्म यांची एकरूपता, इत्यादि विषयांचा ऊहापोह मूळ ग्रंथास धरून केला आहे. प्रथम प्रकृतिपुरुषासंबंधीं त्यांचे विचार काय आहेत तें पाहूं. पुरुषाचें नुसतें दर्शन घडलें, तर सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व लय करण्याचें सामर्थ्य प्रकृतीच्या अंगीं येतें. प्रकृति व्यक्त, विकारी, गुणमयी व निरानंद; तर पुरुष अव्यक्त, निर्विकारी, निर्गुण व आनंदमय आहे (क. १४). प्रकृति–पुरुषांची सोयरीक फार नवलाईची आहे. ती पतीवीण पतिव्रता, व तो प्रियेवीण भ्रतार आहे. येथें स्त्री मिळवितें व पुरुष खातो (क. १५). बीं वाढतें तेव्हां त्यांत कोंडा व कण जसे एकत्र असतात, त्याप्रमाणें पुरुषाशीं प्रकृति अभिन्नपणें जोडली आहे (क. १६) वैराग्य व अभ्यासरूप वायूंनीं त्रिगुणांचें घर्षण झालें म्हणजे ज्ञानाग्नि पेटतो व तो अविद्यावन जाळून खाक करतो. या अग्नीचें नवल हें, कीं तो सर्वांसह आपणासही जाळून आपल्याच रूपांत आपण शांत होतो (क. १७). या ज्ञानाग्नीसच ब्रह्मविद्या म्हणतात. गुरु आद्य अरणी व शिष्य उत्तर अरणी; या दोहोंचें संवादरूपी रवीनें मंथन झालें म्हणजे ज्ञानाग्नि प्रदीप्त होतो (क. १८). अंतिम तत्त्वें किती याबद्दल ऋषिश्रेष्ठांमध्यें अनेक मतभेद आहेत. कांहींच्या मतें पंचवीस अंतिम तत्त्वें, तर कांहींच्या मतें सात, नऊ, सहा, अकरा, सतरा, सोळा, तेरा, चार किंवा दोनच अंतिम तत्वें आहेत. प्रत्येक तत्त्वज्ञ आपलेंच मत खरें असल्याचा हेका धरतो. वस्तुतः एकच तत्त्व खरें आहे व त्याचा अनेकशः विस्तार झाला आहे (क. १९). आत्म्यास भवबंध नाहीं. देहास आत्मा मानिल्यामुळें पापपुण्यात्मक सर्व फळें जीवात्म्यास भोगावीं लागतात. आत्मा वस्तुतः स्वयंप्रकाशी महावन्हि आहे. तो स्वयंभू आहे. त्यास देहच नाहीं तेव्हां बंधन कोठून येणार? (क. २०). आत्म्याचें खरें स्वरूप कळलें म्हणजे देहेंद्रियांचा मिथ्या भास नाहींसा होतो. घटास शेणानें लिंपिलें तर बिंब–प्रतिबिंबास तें शेण लागत नाहीं, त्याप्रमाणें देहाचें पापाचरण जीव–शिवास लागत नाहीं. आत्मा चिद्रूप, अविनाशी, निर्गुण व स्वयंप्रकाशी आहे. त्याच्या प्रकाशानें चंद्रसूर्यादि प्रकाशतात (क. २१). आत्म्यावेगळी तिळभरहि जागा रिकामी नाहीं. तो द्रष्टा, साक्षी व ज्ञानरूप

आहे ( क. २२ ). आत्म्यामध्यें स्त्री–पुं–भाव नाहीं. तो केवळ, नित्य, निर्दोष व अद्वैत आहे (क. २३). मन जड, तर आत्मा प्रकाशमान् आहे. आत्म्याच्या चित्प्रभेमुळें मन प्रकाशतें ( क. २४ ).

जीव–शिवासंबंधीं मूलभूत विचार एकनाथांनीं तितक्याच सहजतेनें मांडिले आहेत. जीव ईश्वराधीन आहे. उपनिषदांतील पिप्पल वृक्षावरील दोन पक्ष्यांची उपमा देऊन जीव–शिव या दोन पक्ष्यांपैकीं एक फळें चाखतो व दुसरा न चाखतां साक्षीरूपानें पाहात राहतो असें एकनाथांनीं सांगितलें आहे ( क. २५ ). विषयावस्था गेली कीं, ईश्वराचें निजरूप प्रगट होतें. तें सुखरूप असतें, म्हणून सर्व इंद्रियांस सुखप्राप्ति होते ( क. २६ ). जीवेश्वरांची ऐक्यता सहज व स्वयंसिद्ध आहे. तें बिंब–प्रतिबिंबाप्रमाणें असून ईश्वरत्व जीवांत संपूर्णतया प्रतिबिंबित झालें आहे ( क. २७ ). ईश्वरच सर्वरूप व सर्वात्मा आहे ( क. २८ ).

यापुढें मायाब्रह्माचा विचार आला आहे. माया गुणमयी व भासरूप असून मायेनें ब्रह्मादिकांना आपल्या पाशांत गोविलें आहे. ती फार दुस्तर व दारुण आहे ( क. २९ ). माया ही वंध्यापुत्र, मृगजळ वा गंधर्व नगरीप्रमाणें आहे. उपजलाच नाहीं त्याचें श्राद्ध करण्याप्रमाणें मायेविषयीं बोलणें लाजिरवाणें आहे ( क. ३० ). माया ही महादेवाची मोहिनी आहे. तिला सत् म्हणावें तर ती नासते, असत् म्हणावें तर भासते. आपली संपूर्ण कल्पना म्हणजे माया, हेंच मायेचें मुख्य लक्षण होय. एकाकी न रमल्यामुळें ब्रह्मांत जी द्वैताची स्फूर्ति होते तीच माया होय ( क. ३१ ). माया ही ब्रह्माची शक्ति असून ती ब्रह्माशीं अभिन्न असते ( क. ३२ ). माया म्हणजे भगवल्लीला होय असें वेदान्ताचें मत आहे. प्रळयकाळीं माया परब्रह्मांत उपरम पावते (क. ३३ ). मृगजळ खोल का उथळ, गोड का खारट हें सांगण्यास विवेकही असमर्थ ठरतो. त्याप्रमाणें जगांतील सर्व व्यवहार मिथ्या आहेत. प्रपंच सृष्टीपूर्वी नाहीं व प्रळयानंतर उरत नाहीं. मध्येंच जें भासतें तें मिथ्या होय व तीच माया. ब्रह्मांतील स्फुरण म्हणजे प्रपंच होय. हें स्फुरणच प्रकृतिपुरुषांचें जन्मस्थान आहे. डोळ्यांचेंच पाणी गोठून पडळ बनतें, त्याप्रमाणें शुद्ध ब्रह्मांतील शबलत्वच माया बनतें. प्रकृति पुरुषांमुळेंच ब्रह्मांडीं ईश्वरभाव व पिंडीं जीवभाव निर्माण झाला (क. ३४).

ईश्वरीकृपेशिवाय मायेचें खरें स्वरूप कळत नाहीं. ब्रह्म निजवस्तु असून त्याच्या आधारें जग वसतें. तें जगाच्या सबाह्य भरलेलें आहे. जग होतें व जातें, तरी ब्रह्म सदा संचलेलें राहतें. वस्तुतः ईश्वरच जें दिसतें तें सर्व होऊन राहतो. हें सर्व ब्रह्ममय आहे ( क. ३५ ). याप्रमाणें वेदान्तांतील सर्व मूलभूत व दुर्बोध तत्त्वें एकनाथांनीं सोप्या भाषेंत स्पष्टपणें विशद करून सांगितलीं आहेत.

९८५३
दि. ..
९२८८
२५।८।५

## दुर्गुणत्याग

परमार्थमार्गावरील पहिला टप्पा म्हणजे दुर्गुणत्याग होय. अंतःकरण शुद्ध करावयाचें तर प्रथम साधकानें त्यांतील सर्व दुर्गुणरूपी मळ नाहींसा केला पाहिजे. कोणते दुर्गुण विशेष त्याज्य आहेत याचें विवेचन एकनाथांनीं फार सुंदर रीतीनें केलें आहे. आशा किंवा वासना हा सर्वांत मोठा दुर्गुण होय. कारण आशेपाशीं सर्व पापें व दुःखें वसतात; व तिच्याजवळ महादोष व महाशोक उभे असतात. आशेला काळ वेळ नाहीं. ती नीचसेवा करविते व मेल्यासही सोडीत नाहीं ( क. ३६ ). विषय विषप्राय आहेत. विषयतृष्णा हा एक विलक्षण रोग आहे. त्यामुळें गोड परमार्थ कडू लागतो व कडू विषय गोड वाटतात. वैराग्यपथ्य पाळल्यानेंच हा रोग नाहींसा होतो ( क. ३७ ). विषयलंपट लोक अज, श्वान व बोकडासारखे निर्लज्ज असतात. स्त्रीलोभ तर कल्पांतींहि सुटत नाहीं ( क. ३८ ). विषयवासनेनें अनर्थपरंपरा निर्माण होते. विषयी मनुष्य मांजराप्रमाणें सेव्यासेव्याचा विचारच करीत नाहीं. ही उच्छृंखल वृत्ति ताब्यांत ठेवण्यासाठीं वेदानें वर्णाश्रमव्यवस्था निर्माण केली ( क. ३९ ). स्त्रीलंपटता फार भयंकर असते. हिच्यामुळें अनेक दुःखें ओढवतात. स्त्रीलंपटास धर्माची वेळ आठवत नाहीं. स्त्रीआसक्तीमुळें तो जरा–मरणही विसरतो ( क. ४० ). कामिनीसंग फार भयंकर होय. निजकन्येच्या संगतीनें ब्रह्मा भुलला, तेथें इतरांची काय कथा ? मनांत कामवासना भडकली तरी बाह्य इंद्रियें आवरावीं म्हणजे हळूं हळूं मनास शांति लाभते (क. ४१). मयमद व धनमद कांहीं काळानें उतरतो; परंतु स्त्रीमद कदापि जात नाहीं (क. ४२). स्त्रैण सर्वस्वीं स्त्रीच्या आधीन होऊन गारुड्याच्या माकडाप्रमाणें स्त्रियेच्या संगतीनें नाचतो (क. ४३). म्हणून स्त्रीसंगा-

पेक्षां स्त्रैणाची संगत साधकास जास्त बाधक ठरते ( क. ४४ ). स्त्री-देह अति अपवित्र आहे. अशा स्त्रीदेहावर ज्याची आसक्ति असते तो निश्चितपणें विष्ठेंतील कृमीप्रमाणें होय. परमार्थी माणसानें स्त्रैणाची संगत कधींही धरूं नये. कारण तो संग त्यास अनर्थांत पाडल्याशिवाय राहणार नाहीं ( क. ४५ ). उपभोगानें कामासक्ति कधींच कमी होत नाहीं ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. एका नारायणावांचून स्त्री-बंधन सुटणार नाहीं ( क. ४६ ). कृपणत्व हाहि एक मोठा दुर्गुण आहे. कृपणास द्रव्य देणें म्हणजे मरण वाटतें. भिकारी त्याच्या दाराशीं जात नाहींत, त्याचे पितर निराश राहतात, उंदीर घर सोडून जातात व मुंग्या उपाशीं राहतात. मातेचें स्तनपान केलें तेंच काय तें दूध त्याच्या जिभेस माहीत ! तो स्वतःसाठीं किंवा कुटुंबासाठीं द्रव्य खर्च करीत नाहीं. म्हणून त्या द्रव्यास दायाद, चोर, आग, अधर्म व रोग हे पांच भागीदार होतात ( क. ४७ ). परमार्थास अत्यंत विघातक असा दुर्गुण म्हणजे अभिमान होय. तो ज्ञानी व अज्ञानी या दोघांस सारखाच बाधक ठरतो. एकाच पाण्यांतून मीठ व मोतीं तयार होतात हें खरें; पण मोत्याच्या अंगच्या अभिमानामुळें त्यास पाण्यांत विरून जातां येत नाहीं व म्हणून त्यास मुक्ति मिळत नाहीं. उलट तो बायकांच्या नाकांत अडकून राहतो ! अज्ञ जन संतकृपेनें तरतात, तर ज्ञानाभिमानामुळें ब्रह्मादिकहि बद्ध होतात ( क. ४८ ). अभिमान सर्व आमिषांचें व परिग्रहाचें मूळ आहे. आमिषानें कलह माजतो, युद्ध जुंपतें, व अनेक जीव प्राणास मुकतात ( क. ४९ ). तिळभर जरी अभिमान ठेविला तरी विघ्न उत्पन्न होतें. ईश्वरास सर्वस्वीं शरण गेल्यानेंस अभिमान नाहींसा होतो ( क. ५० ). अविश्वास हा तर सर्व दोषांचा राजा आहे. अविश्वासाला अभिमान भेटला, कीं विकल्प वाढतो व जीव बंधनांत अडकून राहतो. अविश्वासाच्या स्वारीनें अनंत अनर्थ घडतात. सद्भाव पळून जातो व परमार्थप्रान्त ओसाड पडतो. अविश्वासाचें परमार्थाशीं हाडवैर असतें. तो अकरावा अनर्थ आहे, कारण तो अकराही इंद्रियांना ग्रासून राहतो ( क. ५१ ).

## स द् गु ण सं शी ल न

मागील प्रकरणांत कोणते दुर्गुण त्याज्य आहेत याचा संक्षेपतः विचार

झाला. परंतु हें विवेचन अभावात्मक झालें. या प्रकरणांत कोणत्या गुणांचें संशीलन व संवर्धन करणें परमार्थास आवश्यक आहे याचें विवरण केलें आहे. मुमुक्षूस प्रथम शास्त्रार्थाची, म्हणजे शास्त्रप्रचीतीची किती जरूरी आहे हें एकनाथांनीं सांगितलें आहे. अति आसक्त मनुष्यास व जीवन्मुक्तास या शास्त्रार्थाची–म्हणजे शास्त्रदृष्ट्या कोणतें कर्म विधियुक्त आहे व कोणतें हेय किंवा त्याज्य आहे हें जाणण्याची–मुळींच जरूरी नसते. फक्त जिज्ञासु किंवा मुमुक्षूस याची आवश्यकता तीव्रपणें भासते. त्यानें विवेकानें विषयवासना आवरावी ( क्र. ५२ ). परमार्थ साधावयाचा झाल्यास विषयाचा पूर्ण त्याग केला पाहिजे. आपला कोणताही व्यवहार विषयाकार होऊं देऊं नये. अर्धघडी वायां जाऊं न देतां मुमुक्षूनें परमार्थ साधावा ( क्र. ५३ ) परमेश्वर माझ्यावर केव्हां कृपा करील व निजबोधाचा परमानंद देऊन मला कृतार्थ करील अशी तळमळ त्यास लागलेली असते. म्हणून इतर ऐहिक ध्येयें व साधनें त्यास क्षुद्र वाटतात ( क्र. ५४ ). खऱ्या परमार्थमार्गांत अलिप्ततेचें फार महत्त्व आहे. दावाग्नीनें किंवा उन्हानें आकाश पोळत नाहीं, त्याप्रमाणें खरा साधक देहतापापासून अलिप्त राहतो. त्याची द्वंद्वसहिष्णुता फार मोठी असते ( क्र. ५५ ). यानंतरचा महत्त्वाचा सद्गुण म्हणजे पावित्र्य हा होय. परमार्थसाधनास हा गुण फार आवश्यक आहे. कारण त्यावांचून निजस्वार्थ हातीं लागणार नाहीं. भावबळानें, गुरुनिष्ठेनें, व गुरुवाक्यानें वासना धुवून मन स्वच्छ व पवित्र करावें. अग्निपुटामुळें सोन्यास तेज चढतें त्याप्रमाणें गुरुसेवेनें नितान्त चित्तशुद्धि होते. बाह्याचरण शास्त्रविधीनें शुद्ध ठेवावें, व अंतःकरण गुरुप्रचीतीनें शुद्ध करावें म्हणजे खरें शुचित्व प्राप्त होईल (क्र. ५६). अहिंसा हा गुण परमार्थास तितकाच महत्त्वाचा आहे. जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तिन्ही अवस्थांमध्यें कोणाही भूतमात्रावर रागावून किंचितही भुवई न चढविणें म्हणजे अहिंसा. काया, वाचा, मनानें कोणत्याही जीवास यत्किंचितहि दुखविलें तर त्या भूतमात्रांमधील भूतेशास दुःख होईल असा ज्याचा दृढविश्वास आहे तेथें मूर्तिमंत अहिंसा येऊन राहते असें एकनाथ सांगतात ( क्र. ५७ ). साधकानें आतिथ्य व श्रद्धा हे दोन गुण जरूर संपादावे. वैश्वदेवानंतर कोणत्याही जातीचा पाहुणा आला तर त्यास ब्रह्मभावानें घरीं

नेऊन आदरानें अन्न द्यावें, म्हणजे सर्वार्थसिद्धी प्राप्त होते. देहाची अहंता टाकून सकळ भोगांचा भोक्ता ईश्वर आहे अशी दृढभावना ठेवावी म्हणजे परमार्थ साधतो ( क्र. ५८ ). भूतमात्रांचें दुःख निवारण करून त्या सर्वांस सुख देणें हेंच खरें व बहुमोल दान होय. जन्म-मरणांचें दुःख निरसून आत्मसुख देणें हें अलौकिक दान आहे. कामवासना टाकून तप करणें हें खरें तप होय. वनांत जाऊन वनितेची चिंता करणें हें तप नव्हे. अंतःकरणांत चित्स्वरूपाचें चिंतन करणें हें सर्वांत श्रेष्ठ तप होय. सतत पाठीं लागलेला अनिवार जीवभाव जिंकणें म्हणजेच परम शौर्य होय. केवळ खरे शब्द उच्चारणें म्हणजे सत्य नव्हे; तर समब्रह्म सर्वांमध्यें सतत पाहणें हेंच परम सत्य होय ( क्र. ५९ ). अंतःकरणाच्या गाभ्यांतील विकल्पाची भूमी खणून शम, दम व विरक्ती अशीं तीन कुंडें तयार करावीं. श्रद्धेचा आवा करावा. मग क्षराक्षर अशा दोन अरणी कुंडांत स्थापून गुरुमंत्रानें मंथन केलें म्हणजे निर्धूम ज्ञानाग्नि पेटतो. वैराग्याच्या पळीनें रजतम द्रव्यांची आहुती द्यावी, लखलखीत ज्ञानशस्त्र घेऊन संकल्पपशूचा वध करावा व या आत्मयज्ञांत जीव-भावाची पूर्णाहुती द्यावी; म्हणजे यज्ञभोक्ता श्रीनारायण तृप्त होतो ( क्र. ६० ), असें आत्मयज्ञाचें फार सुंदर वर्णन एकनाथांनीं केलें आहे. सद्गुरु-वचन ( म्हणजे नाम ) कानीं पडतांच निंदा-स्तुति गिळून स्तब्ध राहणें म्हणजेच मौन होय. जें कांहीं दिसतें तें आत्मरूपानें पूर्ण भरलें आहे, ही गुरूनें सांगितलेली गोष्ट मनांत ठसल्यामुळें त्याच्या तोंडून निंदा-स्तुति बाहेर पडतच नाहींत. रामनामाचें अखंड स्मरण म्हणजे महामौन होय ( क्र.६१ ). भरती-ओहोटी नाहीं अशा अक्षुब्ध महासागराप्रमाणें मनाची स्थिति असणें म्हणजे शांति होय. नाना प्रकारच्या लोकांची विषमता, स्वार्थ व विरोध हीं मनावर सतत आदळत असतांही जेव्हां मन किंचितही प्रक्षुब्ध होत नाहीं ती खरी शांति होय. असा साधक किंवा योगी सर्वांचा आवडता मित्र बनतो व तो सर्व विश्वांत एक देवालाच पाहतो (क्र. ६२). इतकें खोल आणि उदात्त सद्गुण-पृथक्करण व सविस्तर वर्णन इतर वाङ्मयांत क्वचितच सांपडेल. हा मराठी संतवाङ्मयाचा विशेष आहे असें म्हणतां येईल.

## परमार्थाचीं साधनें

मागील दोन प्रकरणांत दुर्गुणत्याग व सद्गुणसंशीलन या दोन मुख्य साधनांचा विचार केला. परमार्थास याशिवाय अनेक साधनांची आवश्यकता असते. नरदेहाचें महत्त्व, कर्माकर्मविचार, वर्णाश्रमधर्म, योगध्यान, नामस्मरण, भजन, भक्ति इत्यादिकांचा या प्रकरणांत थोडक्यांत ऊहापोह केला आहे. प्रथम नरदेहाचें महत्त्व ओळखिलें पाहिजे. त्यासारखें वाईट किंवा त्यासारखें चांगलें त्रैलोक्यांत कांहीं नाहीं असें एकनाथ सांगतात. त्याचा केवळ भोग घेऊं नये किंवा त्यागहि करूं नये; तर त्याचा आत्मज्ञान–प्राप्तीकडे उपयोग करावा ( क. ६३ ). चौऱ्यांशी लक्ष योनींमध्यें कोट्यवधी वेळां फेरे फिरून सुदैवानें अवचित् हा नरदेह प्राप्त होतो. तरी त्याचें सार्थक करावें ( क. ६४ ). शुद्ध कोणतें व अशुद्ध कोणतें याचा पूर्ण विचार करून कोणतेंही कर्म करावें. ज्यायोगें समबुद्धि उत्पन्न होऊन साधक सच्छील बनेल असें कर्म करावें. ( क. ६५ ). कर्माकर्म–विचार फार गहन आहे. अनधिकाऱ्यानें कर्म केलें तर तें दुःखदायक होतें. हत्तीचें ओझें गाढवावर घातलें तर गाढवाचें मरणच ओढवेल ! सकाम कर्म बाधक, तर निष्काम कर्म मोक्षदायक ठरतें ( क. ६६ ). प्रपंचनगराभोंवतीं कर्मनदीचा वेढा आहे. ती ओलांडून परमार्थाकडे जातां येणार नाहीं. कारण कर्मानें ब्रह्मज्ञान कदापि होणार नाहीं. कर्मनदींत सांपडले ते सर्व फलाशेला गुंतून बुडाले. भक्तीनें मात्र कर्मनदीच कोरडी पडते ( क. ६७ ). सर्व कर्में ईश्वरार्पण केल्यानेंच नैष्कर्म्यसिद्धी होते हें कर्मकांडाचें रहस्य आहे ( क. ६८ ). यापुढें वर्णाश्रमधर्माची चर्चा केली आहे. ब्राह्मणांनीं यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, प्रतिग्रहादि षट्कर्में करावीं असें एकनाथांनीं सांगितलें आहे. ब्राह्मणदेह क्षुद्र कर्मासाठीं निर्माण झालेला नाहीं हें लक्षांत ठेऊन हृदयस्थ अनंताचें ध्यान करावें व पुनरावृत्ति न होईल असें स्थान मिळवावें ( क. ६९ ). पृथ्वी गडाडली तरी डगमगत नाहीं तो खरा क्षत्रिय होय. त्यानें रणांगणांत माघार घेऊं नये, शस्त्रांचा व बाणांचा मारा सहन करावा, उदारपणें धनाचें दान करावें, स्वधर्म रक्षावा व प्रजापालन करावें. हे गुण क्षत्रियांनीं संपादावे ( क. ७० ). सर्व वर्णांच्या लोकांनीं धर्म-

मार्गानें धन मिळवावें, परंतु त्याबद्दल आसक्ति बाळगूं नये. परस्त्री मातेसमान मानावी स्वस्त्रीविषयींही लंपट असूं नये. कामामुळें क्रोध येतो व कामाची बोळवण केली कीं, क्रोधही नाहींसा होतो ( क्र. ७१ ). सर्व आश्रमवासीयांच्या कर्तव्यांसंबंधींही एकनाथांनीं फार: उत्तम माहिती दिली आहे. स्त्री पाहतांच ब्रह्मचाऱ्यानें दूर पळून जावें. मग तिच्याशीं बोलण्याची गोष्ट दूरच राहिली. स्वप्नीं देखील स्त्रियेस स्पर्श करूं नये. सर्व भूतें देवाचीं रूपें आहेत असें समजून ज्या योगें कामसंचार होणार नाहीं असें नियमानें वागावें ( क्र. ७२ ) वयास ६६ वर्षें पूर्ण झाल्यावर पुरुषानें भार्येस पुत्राच्या स्वाधीन करून आपण वानप्रस्थाश्रम स्वीकारावा ( क्र. ७३ ). संन्याशानें ' अहमेव नारायण ' याचें सतत अनुसंधान ठेवावें व मन पवित्र राखावें. नामस्मरणानें वाचा, प्राणायामानें देह व मौनानें मन, असे त्रिदंड स्वाधीन ठेवावे. सत्य व मृदु वचन बोलावें. स्वरूपनिश्चयानें विकल्प घालवावे ( क्र. ७४ ). ज्यास स्त्रीकामाची आसक्ति आहे त्यानें गृहस्थाश्रम पतकरावा. जो विवेकी व वैराग्यसंपन्न आहे त्यानें वानप्रस्थाश्रम स्वीकारावा; व ज्याचें अंगीं कडक व धगधगीत वैराग्य आहे, त्यानेंच संन्यास घ्यावा. अनन्य भक्तास मात्र आश्रमाचे नियम लागूं नाहींत ( क्र. ७५ ).

साधकानें योगाभ्यासाच्या योगानें निद्रा व आळस दवडून हळूंहळूं चिद्रूप पहावें. प्रथम आसनजय शिकावा. मग प्राणायामानें पवनजय मिळवावा व षट्चक्रांचा भेद करावा. यानें परमार्थाची भूक वाढते व मन विषयांस सोडतें ( क्र. ७६ ). ध्यानास योग्य आसन कोणतें याची चर्चा उद्बोधक आहे. निरुपद्रव असें स्थान पाहून शुद्ध जागेवर कोंवळें व मृदु आसन रचावें असें एकनाथ सांगतात. त्यावर सहजासन घालून बसावें. मेरुदंड ताठ ठेवावा व काया सम ठेवावी. नाकाच्या टोंकापासून जरा दूर अर्धोन्मीलित डोळ्यांनीं नासिकाग्रीं दृष्टि ठेवावी ( क्र. ७७ ). अशा प्रकारें ध्यान केल्यानें भृंग-कीटकन्यायानें जीव ईश्वररूप होतो असें एकनाथांनीं सांगितलें आहे ( क्र. ७८ ). परमेश्वरप्राप्तीच्या अनेकविध साधनांत नामस्मरणाचें महत्त्व फार मोठें आहे. वस्तुतः त्याच्याइतका सोपा, सहज व सुलभ मार्ग दुसरा कोणताच नाहीं. नामस्मरणानें वैराग्य उपजतें, विघ्नांचा नाश होतो, पिशाच्चबाधा टळते व

आधिव्याधी नाहींशा होतात ( क्र. ७९ ). भक्तजन भगवंतास सर्व विषय अर्पण करतात. हरीचें स्मरण करीत अन्न सेविल्यानें तेंही ब्रह्मार्पण होतें ( क्र. ८०). काया, वाचा, मन, प्राण व बुद्धि हीं सर्व भगवंताकडे लावून नामस्मरण केल्यानें भक्त देवरूपच.होतात (क्र. ८१). एकच नाम भक्तिभावानें उच्चारिल्यानेंहि पापाचे पर्वत छेदून परमानंदाचें सुख मिळतें ( क्र. ८२ ).

सत्संग हें ईश्वरप्राप्तीचें निश्चित साधन आहे. योगयागानें, व्रतवैकल्यानें आत्माराम भेटत नाहीं ( क्र. ८३ ). संतांची सेवा केल्यानें नामस्मरण दृढ होतें व सद्भाव उत्पन्न होतो. सत्संगानें देहाभिमान समूळ नाहींसा होतो ( क्र. ८४ ). अभेदभजनानें ईश्वरप्राप्ति होते यांत मुळींच संशय नाहीं. दुष्ट, दुरात्मा, नष्ट, चांडाळ या सर्वांबद्दल ब्रह्मभाव ठेवणें म्हणजेच मानसिक भजन होय. सर्व भूतमात्रांमध्यें भगवंत पूर्ण भरला आहे हें जाणून प्राण गेला तरी कठिण वचन न बोलणें हेंच वाचिक भजन होय. अपकार करणाऱ्यावरही उपकार करणें याचें नांव कायिक भजन ( क्र. ८५. ) भजनानें सर्व कर्में सहजच ईश्वरार्पण होतात. देवाच्या भजनाचा महिमा अतर्क्य आहे. निश्चळ भक्त जें कर्म करतो ती पूजा, जें बोलतो तो जप, त्याचें चालणें म्हणजे यात्रा, भोजन म्हणजे यज्ञ: व निद्रा म्हणजे समाधि होय ( क्र. ८६ ). पर्वतकोटी न ओलांडतां, गुहेमध्यें न शिरतां, माझी सदा भेट होईल असें भजनस्थान म्हणजे स्वतःचें अंतःकरण होय. हें अगदीं सहज व सोपें असें भक्तांचें विश्राम-धाम आहे. हृदयस्थ भगवंताचें ध्यान केलें असतां खरें आत्मज्ञान प्राप्त होतें ( क्र. ८७ ). भक्तिभावानें माझें भजन केलें असतां विषयवासना समूळ नाहींशी होते. चारी मुक्ति नाकारून जो भक्त माझी भक्तीच करितो तो धन्य होय. ( क्र. ८८ ). सर्व कर्में अहेतुकपणें व ब्रह्मार्पण बुद्धीनें करणें म्हणजेच निर्दोष भजन होय. हेंच शुद्ध आराधन ( क्र. ८९ ). अशा प्रकारचें निष्काम भजन मोक्षाचें श्रेष्ठ साधन आहे ( क्र. ९० ). माझें अनन्यभावानें भजन केलें असतां सर्व वासना विरून जातात व वृत्ति शून्य होते. आपणच सर्व आहों असें ज्ञान झाल्यावर वैरभाव राहत नाहीं. म्हणून देवाचें भजन करणारा निरपेक्ष, मननशील, शांत, समदर्शी व निर्वैर होतो. ‘ या लक्षणांमुळें माझ्या-पेक्षां माझे भक्त जास्त पवित्र होतात ’ असें भगवंतांनीं म्हटलें आहे ( क्र.९१).

भजनाइतकेंच परमार्थाचें श्रेष्ठ साधन म्हणजे कीर्तन होय. याचें महत्त्व किती आहे हें एकनाथांनीं इतर संतांप्रमाणें मुक्तकंठानें सांगितलें आहे. मृगजळानें तहान निवत नाहीं, त्याप्रमाणें विषयसुखानें कोणाची तृप्ति होत नाहीं. नरदेहासारखें निधान लाभलें असतां विषयासक्ति सोडून निःशंकपणें हरिकीर्तन करावें. कीर्तनानें प्रत्यक्ष देव भेटतो (क. ९२). देवाच्या कीर्तनानें तीर्थें पावन होतात. कीर्तनानें पापाचें भस्म होतें, श्रद्धा व भाव वाढतो व सहज अखंड नामस्मरण घडतें (क. ९३). संसारदुःखाचा नाश करून शांतिसुख मिळवावयाचें झाल्यास कीर्तनासारखें या कलियुगांत दुसरें साधन नाहीं. कीर्तन चाललें असेल तेथें देव वैकुंठ सोडून धावून येतो, व परत वैकुंठास जावयाचें विसरतो (क. ९४). कीर्तनांत निर्लज्ज व निःशंकपणें नाचावें, म्हणजे देव आपल्या चक्रानें भक्ताच्या अभिमानाचा चेंदा करितो व आपल्या हातांतील कमलानें भक्ताची पूजा करतो (क. ९५). कीर्तनानें सर्व अवस्थांमध्यें हरिभक्ति दृढपणें ठसावते, प्रेमा वाढूं लागतो व अवचित जीवशिवांची भेट झाली कीं, अष्ट सात्विक भाव प्रगट होतात आणि भक्त आनंदांत डोलूं हसूं लागतो (क ९६).

भक्ति म्हणजे देवावरील नितान्त प्रेम व त्याची सर्व भावें केलेली सेवा होय. भक्ति म्हणजे देवासाठीं तळमळ. गर्भ संभवल्यावर गर्भवती जशी उल्हासानें गर्भाची वाढ करिते, त्याप्रमाणें भक्त माझ्याविषयीं आपल्या पोटीं आवड वाढवितो. अधिकाधिक वीं पेरतांना शेतकऱ्यास जसा आनंद होतो, त्याप्रमाणें मला आपलें सर्वस्व अर्पण करीत असतां भक्ताचा उल्हास वाढत जातो (क. ९७). भक्तीच्या प्रेमळ जलानें चित्तावरील रजतमादि मळ साफ धुवून जातात, व विरक्ति वाढून चित्तवृत्ति निर्मळ होते. ही उदार भक्ति भक्तास स्वरूपानंदानें निर्भर करिते (क. ९८). सर्व सोडून माझी भक्ति केल्यानें मनुष्य मुक्त होतो. सर्व गोष्टीबद्दल अभिमान सोडून देवास शरण गेल्यानें जन्ममरणांचा नाश होतो (क. ९९). सर्वभावानें माझी भक्ति करणें म्हणजेच विज्ञान. सर्व इंद्रियें माझ्या सेवेकडे लावून अर्धक्षणही जो वाया दवडीत नाहीं तो सर्व धर्मांचा राजा होय. सर्वत्र माझें दर्शन म्हणजेच शुद्ध ज्ञान (क. १००). सर्वांतःकरणानें देवाचें ध्यान केल्यानें निर्भयता व

स्वरूपप्राप्ति होते. प्रशस्त, एकान्त व पवित्र स्थळीं सद्भावनेनें सदा माझें अनुसंधान केल्यास साधकास आत्मसुख लाभून अभेद–प्राप्ति होते ( क्र. १०१ ). भक्तीचें महत्त्व इतकें आहे कीं, जीव ब्रह्मलोकांत गेला, व तेथें त्यानें जर भक्ति केली नाहीं, तर त्यास मायेमुळें पुनः इहलोकीं जन्म घ्यावा लागतो. भक्तीशिवाय मुक्तीचा सोस व्यर्थ आहे ( क्र. १०२ ). म्हणून मुक्तीपेक्षां भक्तीच श्रेष्ठ आहे असें एकनाथांचें मत आहे. भक्तीनें अष्ट सात्विक भाव प्रगट होतात, व ते अनुभविल्यावर आणि स्वानंदानें समरस झाल्यावरही पुढें भक्तीची आर्तता कायम राहत नसेल, तर कोरडी जीवन्मुक्ति मला नको असें उद्धवानें श्रीकृष्णास सांगितलें आहे. यावरूनही भक्ती मुक्तीपेक्षां श्रेष्ठ ठरते ( क्र. १०३ ).

## सद्गुरुवर्णन

परमार्थांत सद्गुरूंचें महत्त्व फार मोठें आहे. किंबहुना सद्गुरूंकडून उपदेश घेतल्यावरच खऱ्या परमार्थास सुरवात होते. त्यांच्या कृपेनेंच पुढें अनुभव येतो व जन्माचें सार्थक होतें. म्हणून प्रथम गुरूचा शोध घेतला पाहिजे, असें एकनाथ सांगतात ( क्र. १०४ ). सूर्याशिवाय जगांतील पदार्थ दिसणार नाहींत, त्याप्रमाणें निजरूप सहजसिद्ध असलें तरी त्याचें खरें ज्ञान सद्गुरू-शिवाय होणार नाहीं ( क्र. १०५ ). गुरूवीण बाकी सर्व अज्ञान व भ्रम आहे. म्हणून सद्गुरूंस भावपूर्वक संतोषवून त्यांजकडून अनुग्रह घ्यावा. सद्गुरु हे साधन नसून परमसाध्य आहेत ( क्र. १०६ ). ज्याच्या शिकवणीनें असत् समूळ नाहींसें होतें, जो अतिकृपाळू असून सदा ब्रह्मानंदांत डुलत राहतो तोच खरा सद्गुरु होय. सद्गुरूंची कृपा नाहीं तर देवदर्शनाची भाषा कशाला ? ( क्र. १०७ ). इतर कोट्यवधि साधनें व्यर्थ आहेत. सद्गुरूंची कृपा झाली कीं, गुरुभक्त ब्रह्मदर्शनानें पुष्ट होतो. सद्गुरु हे चालतेबोलते पूर्ण ब्रह्मच होत ( क्र. १०८ ) असें एकनाथ सांगतात. पूर्णानुभवी सद्गुरु तीन प्रकारचे असतात. कांहीं अगदीं पूर्ण मौन स्वीकारतात, कांहीं अचुंबितपणें वागतात, तर कांहीं उग्रता व भयानकपणा मिरवतात ( क्र. १०९ ). प्रसन्न झाले तर

सद्गुरु आपल्या शिष्यास षड्गुणैश्वर्याचें वैभव देतात ( क. ११० ). गुरूंची अनन्य सेवा म्हणजेच परमेश्वराचें परमपूजन होय." मी मांजर होऊन सद्गुरूंचें उच्छिष्ट चटाचट चाटून धन्य होईन " असें एकनाथ म्हणतात ( क. १११ ). प्रत्यक्ष देवास सुद्धां गुरुभक्तांची फार आवड असते. ज्यांच्या तोंडांतून निघालेल्या शब्दानें ब्रह्मसाक्षात्कार होतो त्या गुरूचे चरण सेविले तर कोणाची शुद्धि होणार नाहीं ? माझ्या भक्तांपेक्षां मला गुरुभक्तांची फार आवड आहे असें स्वतः श्रीकृष्ण म्हणतात ( क. ११२ )

यानंतर सच्छिष्याचीं लक्षणें सांगितलीं आहेत. शिष्यानें निंदामत्सरादि दोष टाकावे. सर्व अभिमानांत सोडण्यास कठिण म्हणजे ज्ञानाभिमान होय. तो शिष्यानें धरूं नये. स्वार्थाआड कोणी आलें तरी त्याचा द्वेष करूं नये. दुर्जन टोंचून बोलले किंवा त्यांनीं आपली निंदा केली, तर आपलें पाप धुवून गेलें असें समजून त्यांचा द्वेष करूं नये ( क. ११३ ). सच्छिष्यानें/मौन धरावें. छळणोक्ति, वादविवाद, विनोद करूं नये. दांभिक बोलणें टाकावें. सदा हरि-नामस्मरण करावें. बडबड करूं नये. शब्दज्ञान मिरवूं नये. सदा गुरुस्मरण करावें. ही नवरत्नांची माळ सद्गुरूंच्या कंठीं घालून सायुज्यमुक्ति मिळवावी ( क. ११४ ). बालकास अलंकार घातल्यानें आईस आनंद होतो, त्याप्रमाणें शिष्यास आत्मज्ञान झालें तर गुरूसहि फार आनंद होतो ( क. ११६ ).

सद्गुरु हाच गुणसमुच्चयाचें प्रतीक आहे. म्हणून दत्तात्रेयानें मेरु, पाणी, इत्यादि प्रत्येक वस्तूंत एखादा विशेष गुण पाहून त्यास गुरु केलें. (१) **पर्वत** सर्वांचा भार वाहतो; तेव्हां साधकानें पर्वताप्रमाणें उदार असावें. ( २ ) **पाण्या**प्रमाणें सर्वांशीं मृदुपणें वागावें, व ज्ञानोदकानें सर्वांचें अंतःकरण शुद्ध करावें. ( ३ ) योगी **समुद्रा**प्रमाणें सदा निरहंकार व प्रसन्न असतो. ( ४ ) **वायु** ज्याप्रमाणें ब्रह्मा व सूकर यांच्या देहांमध्यें भेद मानीत नाहीं व आसक्ति ठेवीत नाहीं, त्याप्रमाणें इंद्रियांच्या मेळाव्यांत राहूनही योग्याचें ज्ञान गुणदोषानें अबाधित असावें. ( ५ ) सर्व पदार्थांविषयीं समत्व, असंगत्व व निर्ममत्व या तीन गुणांमुळें **आकाशास** गुरुत्व येतें. ( ६ ) रस देतांना व चाखतांना **सूर्य** जसा अलिप्त राहतो त्याप्रमाणें योगी हा विषय देतांघेतां आसक्ति बाळगत नाहीं. ( ७ ) सर्वांगानें, सर्वभावानें, सर्वांशीं, सर्वकाळीं व सर्वस्थळीं मनुष्यानें लीन

व नम्र व्हावें हें तत्त्व साधकानें **वृक्षा**पासून शिकावें. ( ८ ) **अजगरा**प्रमाणें योगी अयाचित वृत्तीनें राहतात. योग्याच्या अंगीं अजगराप्रमाणें सामर्थ्य पुष्कळ असलें, तरी तो आत्मरूपांत स्वस्थ निजून राहतो ( क. ११७ ).

एकनाथांनीं सद्गुरूंचें वर्णन अनेक रूपकांनीं फारच उत्तम प्रकारें केलें आहे. प्रथम त्यांनीं सद्गुरूस धन्वंतरीची उपमा दिली आहे. हा दुर्धर भवरोग दूर करणारा सद्गुरुशिवाय दुसरा कोणीच समर्थ नाहीं. त्याच्या उपचारानें साधक निरोगी होऊन ब्रह्माहस्मीचीं गोड पक्वान्नें खाऊन स्वानंदानें पुष्ट होतो ( क. ११८ ). सद्गुरु म्हणजे चित्समुद्र व कर्णधार आहेत. हा कृपेचा समुद्र अगाध आहे. त्यास निजबोध–चंद्रानें भरती येते. सद्गुरु हे भक्तांचें तारूं सायुज्यतेच्या बंदरापर्यंत नेणारे कर्णधार आहेत. ( क. ११९ ). सद्गुरु हे न दिसणाऱ्या चिद्ब्रह्माशीं लग्न लावणारे ज्योतिषी आहेत. एकात्मतेची घटी पाहून आपलें आपल्याशीं लग्न लावून अलक्ष्य गति प्राप्त करून देणारे सद्गुरु हे अद्वितीय ज्योतिषी होत ( क. १२० ). श्रीगुरु सत्-चित्-घन आहेत. ते स्वानंद–जीवनाचा वर्षाव करतात. त्यांना पाहून मुमुक्षु–मयूर सोहंभावाचा टाहो फोडून, रोमांच पिसारा पसरून आनंदानें नाचूं लागतात ( क. १२१ ). सद्गुरु क्षीराब्धि आहेत। विश्वासगिरि हा रवि करून व वैराग्यवासुकीचा दोर करून सुरासुरांनीं या गहन समुद्राचें मंथन केलें, तेव्हां त्यांतून अनेक अलौकिक पारमार्थिक रत्नें निघालीं ( क. १२२ ). सद्गुरु स्वानंदस्वर्गाचे अमरपति कसे आहेत याचें जें विस्तृत वर्णन एकनाथांनीं दिलें आहे तें वाचनीय आहे तेथें अनुभव हा ऐरावत, उपदेश हें तीक्ष्ण वज्र, विवेक हा पारिजात, मुमुक्षु हेच भ्रमर, चित्सुख हा आमोद, अष्टसिद्धी या अप्सरा, साम्यरूप हें सिंहासन व त्यावर सच्चिदानंदाची गादी असून तेथें भक्तास चिद्घनपद प्राप्त होतें ( क. १२३ ). सद्गुरु स्वानंद–वैकुंठाचे वैकुंठपति आहेत. त्यांचें ऐश्वर्य अनंत व अव्यय आहे. त्यांचा निजबोधाचा गरुड, तेजःपुंज स्वानुभवचक्र, निःशब्दीं महाशब्द उठविणारा शंख, तेजस्वी गदा इत्यादिकांचें पारमार्थिक वर्णन फार सुंदर आहे. तेथें काळाचा प्रवेश नाहीं, कर्माचें कांहीं चालत नाहीं व जन्ममरणांचें भय नाहीं. तेथें भक्त नित्य तृप्त असतात ( क. १२४ ). सद्गुरु हें केवळ ब्रह्मस्वरूप आहेत. तेच उत्पत्ति, स्थिति व

लय यांचें कारण आहेत. ते विवेकाचे आगर व सच्चिदानंदाचे रत्नाकर आहेत. तेथें कर्मच ब्रह्म होतें, व कर्मामध्येंच मोक्ष मिळतो ( क. १२५ ).

## देव आणि भक्त

या प्रकरणांत खरा भक्त कोण, भक्तांचे प्रकार व त्यांचीं लक्षणें, मुख्य देव व त्याचें ज्ञान आणि देवभक्तांचा परस्परसंबंध या प्रश्नांचा ऊहापोह केला आहे अहंकार निःशेष मावळून सर्व भूतमात्रें सहजस्थितींत आत्मरूपानें दिसणें हीच खरी भक्ति होय. या स्थितींत तारतम्य उत्पन्न झालें, कीं आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी असे भ्रामक भेद भक्तांमध्यें करण्यांत येतात. भगवत्प्राप्तीची अंतःकरणांतील व्यथा म्हणजेच ' आर्तता '. देवासाठीं कडेलोट करूं, का आगींत शिरूं असें वाटणें ही खरी आर्तता. यास आत्महत्या समजून, तसें न करतां, मागील भक्त गेले त्या मार्गानें जीवेंभावें जाऊन देह ब्रह्मप्राप्तीकडे लावतो तो ' जिज्ञासु ' होय. सर्व अर्थांमध्यें देवच खरा अर्थ म्हणजे सार आहे असें जो मानतो, व सर्व दृश्य अर्थाचा उपयोग परमार्थाकडे करतो तो खरा ' अर्थार्थी ' होय. याप्रमाणें हे तीनही प्रकारचे भक्त ज्ञान्यांमध्यें अंतर्भूत होतात ( क. १२६ ). योगी आपलीं इंद्रियें कोंडतो, तर भक्त तीं भगवंताकडे लावतो, व सर्व विषय भगवंतास अर्पण करतो ( क. १२७ ). इंद्रियांचीं सुखदुःखें मिथ्या मानून उत्तम भक्त त्यांकडे दुर्लक्ष करितात हरीचें अखंड स्मरण करीत असतां त्यांना तहानभुकेची आठवणही होत नाहीं. त्यांची देहाची अहंता गळते, व भवभय त्यांच्या मनांत तिळमात्र राहात नाहीं. परमात्माच त्यांच्या सर्व इंद्रियांचा विषय होऊन ते जीवंतपणींच पूर्ण मुक्ति भोगतात ( क. १२८ ). भक्त राहातात तो देश सर्व दृष्टींनीं पावन होतो. ज्यांचें चित्त माझ्या स्वरूपीं अखंड जडलें तेच खरे भक्त, संत व सज्जन होत. ते आंतबाहेर देवालाच पाहतात. या अभेद भक्तीचें महत्त्व फार मोठें आहे ( क. १२९ ) देव व भक्त वस्तुतः सामरस्यानें एकरूपच असतात; फक्त नाममात्र निराळें दिसतात ( क. १३० ). भक्ताची योग्यता इतकी श्रेष्ठ आहे, कीं हरिनामस्मरण न करतां भक्ताचें नामस्मरण केलें तरी साधकाचें भवबंधन तुटतें. देव भक्तांच्या अर्ध्या वचनांत असतो, व संकटकाळीं त्यांच्या

मदतीस धावून येतो ( क. १३१ ). मी सर्व भूतमात्रांत देवाधिदेव असल्या-मुळें भक्तानें कोणत्याही प्रतिमेची पूजा केली तरी ती मलाच पोहोंचते असें श्रीकृष्ण सांगतात ( क. १३२ ). यानंतर एकनाथांनीं केलेलें वायुलोका-पासून लक्षावधि मैलांवर असलेले चंद्र, बुध, शुक्र, भौम, शनि, सप्तर्षी, वैकुंठ, व शेवटीं कैलास इत्यादि लोकांचें ज्योतिष्यशास्त्रदृष्ट्या फार उत्तम वर्णन दिलें आहे ( क. १३३ ). देवाची भक्तावर अनन्य प्रीति असते. तो भक्तांचे सर्व मनोरथ पूर्ण करितो व त्यांचीं सर्व इंद्रियकर्में आपणच होतो. भक्त सांगेल त्याचा देव उद्धार करतो ( क. १३४ ). भक्त माझा पढियंता व ज्ञानतिलक आहे; ज्यास जसा भाव, त्यास मी तसा देव असें श्रीकृष्ण सांगतात ( क. १३५ ). भक्त कोणतेंही इंद्रियकर्म करावयास गेला, कीं त्याआधींच देव स्वतः तें कर्म बनतो ( क. १३६ ). देव भोळ्या भक्तांचा माता-पिता, स्वार्थ, परमार्थ व सर्वस्व होतो ( क. १३७ ). देव भक्तांच्या सुखानें संतोषतो, व त्यांस कोणाची दृष्ट लागेल म्हणून सर्व बाजूंनीं सांभाळतो. ऐक्यभाव प्राप्त झाल्यावरही देव आपणच भक्तांमध्यें स्वानंदानें नांदतो ( क. १३८ ). देवास अनन्य भक्ति आवडते, म्हणून तो भक्तांचा अंकित राहतो. भक्तांमुळें देवाची ख्याति व महंती वाढते ( क. १३९ ) भक्तांची पूजा म्हणजे देवाची पूजा व भक्त म्हणजे देवाची सचेतन प्रतिमा होय. आत्मसुखासाठीं भक्त सर्वस्वाचा त्याग करितात ( क. १४० ). भक्त देवापेक्षां श्रेष्ठ आहेत. कल्पान्त कोसळला तरी ते देवापासून ढळत नाहींत. म्हणून देव त्यांचा दास झाला आहे. देव-भक्तांचें हृदय एक होतें व त्यांचें अभिन्नपण कदापि मोडत नाहीं ( क. १४१ ).

संत, सज्जन, योगी, अवधूत, अथवा संन्यासी हे सर्व श्रेष्ठ व अनुभवी भक्त होत. संतश्रेष्ठ ज्यांच्यावर प्रसन्न होतील त्यांचीं सर्व संकटें व पापें नाहींशी होतात आणि परब्रह्म त्यांच्यापुढें तळपूं लागतें ( क. १४२ ). जो संतचरणीं विनटतो, त्यास आत्मसुख मिळतें. परमात्मा संतरूपानें अवतरतो (क. १४३). विकाररूपी वादळानें प्रक्षुब्ध झालेला भयंकर भवसागर अगस्तीसारख्या मुनिवरांच्या साहाय्यानें सहज तरून जातां येतो ( क. १४४ ). योगी सार-ग्राहक व निश्चलवृत्तीचे असतात ( क. १४५ ). वादविवादानें मन प्रक्षुब्ध होतें म्हणून आत्मज्ञ वादविवाद करीत नाहींत ( क. १४६ ). साधु निरपेक्ष

असतात. त्यांचें मन परमानंदांत लीन असतें. या विषम जगांत साधु सर्वत्र समसाम्यानें पूर्ण ब्रह्मच पाहतो. तो समदर्शी व निरभिमानी असतो ( क्र. १४७ ). तो सर्वांचा श्रेष्ठ सखा व सोयरा असतो व सर्वांचें दुःख नाहींसें करून सुख त्यांना देतो (क्र. १४८). प्राणापानसमतेमुळें प्रदीप्त झालेल्या ज्ञानाग्नींत सर्व कर्में जाळून अवधूत ब्रह्मानंदांत डुलत राहतो ( क्र. १४९ ). जीवन्मुक्त निर्द्वंद्व असून जड, मूक वा पिशाच्चाप्रमाणें वागतात ( क्र. १५० ). मुक्त स्वतः आत्माराम होऊन जगाचें विश्रामधाम बनतो. मुक्त हे इंद्रियांच्या खेळीमेळीं असले तरी विकारानें ते कधींही मळत नाहींत. ते वृत्तिशून्य, परिपूर्ण चिद्ब्रह्मच होतात ( क्र. १५१ ).

## अ नु भ व

या प्रकरणांत आध्यात्मिक अनुभव येण्याच्या आधीं आवश्यक अशा जिज्ञासादि अवस्था व तसेंच प्राथमिक अनुभव, ब्रह्मैक्याचा अनुभव व त्याचे परिणाम इत्यादि विषयांचा थोडक्यांत विचार कर्तव्य आहे. श्री ज्ञानदेवां-प्रमाणें एकनाथांनींहि आपल्या विविध व श्रेष्ठ आध्यात्मिक अनुभवांचें विस्तृत वर्णन आपल्या अभंगांत दिलें आहे. एकनाथी भागवतांत प्राथमिक अनुभवाचे ओझरते उल्लेख कांहीं ठिकाणीं सांपडतात. उच्च अनुभवाचे शरीरा-वर व मनावर काय परिणाम होतात यांविषयीं मात्र थोडी विस्तारानें केलेली चर्चा त्यांत आढळते. परमार्थांत पहिली पायरी म्हणजे आत्म्याचें किंवा देवाचें अव्यय रूप जाणण्याची तीव्र इच्छा होय. पांडित्याचा अभिमान सोडून गुरूवर विश्वास ठेवणें ही दुसरी पायरी. कर्मकांड सोडून ध्यान-निष्ठ होणें ही त्यापुढची तिसरी पायरी होय. नंतर गुरुकृपेनें भ्रमनिरास होऊन सबाह्य कोंदलेल्या ब्रह्माचें ज्ञान होणें ही शेवटची पायरी होय ( क्र. १५२ ). अनाहत नादाचा उल्लेख एकनाथी भागवतांत दोनतीन ठिकाणीं आला आहे. रणांगणांत वैऱ्यांचा पराभव करून सत्रावीचें पाणी प्याल्यावर डोंगरांतून अनाहत नाद उठला (अ. ९. १२९). जेथें जित्यांची एकच गर्दी झाली, तेथें अनाहत निशाण लागलें ( अ. ९. १३७ ). चंद्रसूर्यांच्या ठिकाणीं असलेलें तेज व गगनास नातळणारा शब्द मीच आहें ( अ. १६. २६२ ). श्रीजनार्दनांनीं बोधांजन हाताशिवाय

माझ्या डोळ्यांत घातलें व त्यामुळें सर्वांगीं नयन निघाले व सर्वत्र आत्मरूप श्रीजनार्दन मला दिसूं लागले ( अ. २१. २०–२१ ). हा एकनथांचा अनुभव फार महत्त्वाचा आहे. याप्रमाणें जिकडे जावें तिकडे देवाचें सुंदर रूप दिसूं लागलें. सर्वत्र त्याचे चरण दिसले. त्याशिवाय दुसरें कांहींच दिसेना. अशा चरणांची पूजा मी ठायींच्या ठायीं केली असें एकनाथ सांगतात ( अ. ६. १३७–३८ ). जें मुख निमिषार्ध पाहिल्यानेंहि कोटि जन्माचें दुःख नाहींसें होतें व आनंद त्रैलोक्यांत मावेनासा होतो तें हरीचें " श्रीमुख " पाहून मी धन्य झालों असें एकनाथ म्हणतात ( क. १५३ ). मुगुटकुंडलें घातलेली, कासेस सोन्याची मेखला कसलेली, आपाद रुळणारी घवघवीत वनमाला धारण केलेली अशी घनश्याम सुंदर मूर्ति म्हणजे परिपूर्ण ब्रह्मच होय. कृष्णरूप पाहण्याच्या लालसेनें डोळ्यांस वेड लागलें व ते त्यास अर्धघडीहि विसंबत नाहींत. कृष्णरूपाचें कौतुक पाहण्यांत डोळ्यांस भूक लागली व अंतःकरणांत निबिड सुख दाटलें ( क. १५४ ). घरीं दिवा लागला म्हणजे त्याचा प्रकाश खिडक्यांतून बाहेर पडतो, त्याप्रमाणें मनांत श्रीहरि प्रगटला व त्याचा आनंद इंद्रियद्वारें व्यक्त झाला ( क. १५५ ). श्रीकृष्णाच्या स्पर्शानें सर्वेंद्रियांची कामवासना नष्ट होते, व कर्मे आपोआप निष्कर्म होतात. भक्तीनें कृष्णास आलिंगन देतांच देहपण नाहींसें होतें. झोंपेंतही कृष्ण समीप राहतो व जीव सद्रूपीं संलग्न होतो ( क. १५६ ). आदीं व अंतीं बुद्धि अखंडपणें ब्रह्मार्पण होणें हीच पूर्ण समाधि होय. स्वरूप दृष्टीस पडलें, कीं आश्चर्यानें तटस्थता उत्पन्न होते. ही विस्मयाची वृत्ति जिरवून तिच्यापोटीं जी अवस्था निर्माण होते ती खरी समाधि होय ( क. १५७ ). ब्रह्मानंद आवरणें शक्य नसतें. हा आनंद हृदयांत कोंदाटला कीं, साधक लौकिकाची लाज सांडून अलौकिकपणें गाऊं, नाचूं लागतो. लोक त्यास पिशाच्च समजतात. हा उन्माद जसजसा वाढत जातो त्याप्रमाणें हें सर्व विश्व आनंदकंदानें दुमदुमत असलेलें तो पाहतो. सूर्यचंद्रादि तेजोगोल आत्मतेजानें लखलखीत दिसूं लागतात. हा स्वानंद ओसंडूं लागला, कीं देहपण स्फुरेनासें होतें. सन्मुखपणा व पाठिमोरेपणा नाहींसे होतात. देवभक्तपणाही नाहींसा होतो व सर्व सुखरूप होतें ( क. १५८ ). हृदयस्थ आत्म्याशीं ऐक्य प्राप्त झालें कीं, समरसीं गांठ पडून

जीवास समाधि लागते. उद्धवाची स्थिति अशीच झाली. नूतन व्यालेल्या धेनूच्या वासरास तिचें दूध पिऊन उल्हास वाटावा, तसें श्रीकृष्णाच्या करस्पर्शानें त्यास झालें. तो स्वानंदपरिपूर्ण झाला व त्या भक्तिसुखांत देवभक्तांचें पूर्ण ऐक्य होऊन " उन्मत्त परमानंदाचा धेंडा" नाचूं लागला ( क. १६० ). एकनाथ पुढें म्हणतात कीं, हास्यवदनांतून हास्याचें, हास्यांतून आनंदाचें, व आनंदांतून परमात्म्याचें ध्यान करावें (क. १६१) स्वरूपाचें ज्ञान झाल्यावर अष्ट सात्विक भाव उत्पन्न होतात, श्वासोच्छ्वास क्षीण होतो, कंठ दाटून येतो व आनंदाश्रू वाहूं लागतात. हर्षानें रोमांच उठतात, उन्मीलित दृष्टि पुंजाळते, मन गहिंवरून येतें, अनिवार दीर्घश्वास सोडून साधक स्फुंदस्फुंदून रडूं लागतो, या रुदनाबरोबरच हर्ष प्रगटतो व तो गद्गदून खदखदां हसूं लागतो आणि परमानंदानें डुलूं लागतो ( क. १६२ ). स्वानुभवाचे जे शारीरिक व मानसिक परिणाम होतात त्यांचें वर्णन एकनाथांनीं उत्तम प्रकारें केलें आहे. मी परमात्मा हें ज्ञान झाल्यावर आत्मज्ञ देहभाव विसरतो ( क. १६३ ). त्यास प्रपंचादिकांचें भान राहात नाहीं ( क. १६४ ). आत्मज्ञास आपपर भावहि राहात नाहींत. सर्व भूतमात्रांत एक आत्मा वसत आहे हें ज्ञान झाल्यावर कोण आप्त व कोण वैरी राहणार ? ( क १६५ ). मुक्तांची अविद्या पूर्ण नाहींशी झाली तरी प्रारब्ध कर्मामुळें त्यांचा देहव्यापार चालू राहतो. परंतु त्यामुळें त्यांची निजात्मस्थिति किंचितही भंग पावत नाहीं ( क. १६६ ) असा अधिकारी पुरुष शाब्दे परे च निष्णात असतो. तो निजसुखानें उन्मत्त होतो· त्याच्या देहींचें देहपण जातें, विश्वाचें भान उरत नाहीं, सर्वत्र आनंद कोंदाटतो, परमानंदानें पुष्टि चढते, व वृत्ति तत्पदाला पोहोचते ( क. १६७ ). अशा आत्मज्ञास सर्वत्र समतेचा अनुभव येऊन चिरशांति प्राप्त होते. आत्मज्ञाचें पाऊल पडेल तेथें सुखाची खाण उघडते. तो ज्यास पाहील त्यास परमानंद लाभतो. त्याचे श्वासोच्छ्वास म्हणजे निजसुखाचें माहेरघर होत. तो सर्व सुखांचा मंडप व निजसुखाचा कंदर्प बनतो ( क. १६८ ). अशा प्रकारें आत्मज्ञाच्या श्रेष्ठ स्थितीचें वर्णन एकनाथांनीं केलें आहे.

## स्फुट आध्यात्मिक ग्रंथ

येथपर्यंत आपण एकनाथी भागवताच्या आधारें त्यांच्या पारमार्थिक

विचारांचें समालोचन केलें. यानंतर त्यांच्या स्फुट प्रकरणांतून जी तत्त्वचर्चा आढळते तिचा विचार केला पाहिजे. आपण ही ग्रंथरचना श्रीजनार्दन स्वामींच्या कृपेनें व संतजनांच्या आशीर्वादानें करीत असून गुरुकृपेमुळें आपल्या अंतःकरणांत उठलेले परमानंदाचे कल्लोळच ग्रंथार्थरूपानें प्रकट झाले असल्याची जाणिव एकनाथांत पदोपदीं दिसून येते. उलट, त्यांच्या सखोल निरूपणांत पदपदार्थांचा झाडा देत श्लोकार्थ उघडा केलेला पाहून त्यांचा एकेक बोल ऐकतांना श्रोत्यांनाहि सुखाचे डोल आले आहेत ( क्र. १६९ ). एकनाथांची भक्तीची कल्पना व्यापक असून केवळ देवाचें नामस्मरण व कथाकीर्तनच नव्हे, तर सर्वांभूतीं भगवद्भाव ठेवणें ही त्यांच्या मतें खरी भक्ति होय ( क्र. १७० ). तसेंच तप म्हणजेहि स्नानदान किंवा योगयाग नसून हृदयांत चिद्रूप हरीचें चिंतन करणें ही तपाची खरी स्थितिगति होय असें ते म्हणतात (क्र.१७१). अशा प्रकारचें चोखट तप निजनिष्ठेनें करून प्रत्यक्ष ब्रह्मदेवानें सत्यासत्य वचनांनीं मळलेल्या आपल्या वाचेस रामनामाचें प्रायश्चित्त दिलें व त्यायोगें त्यानें आपलीं ज्ञानकर्मेंद्रियें व अकरावें मन यांवर जय मिळविला असें एकनाथ सांगतात. याप्रमाणें सोहंचा सांगात धरून पश्चिमपंथें चालणाऱ्या ब्रह्मदेवाच्या डोळयास डोळाच देखणा होऊन त्याचें श्रवण अनुहत ध्वनींत लागलें व अशा रीतीनें त्याच्या देहींच विदेही प्रगटला ( क्र. १७२ ). हें आत्मज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं लोक अज्ञानानें नानाप्रकारचीं साधनें करतात. हटयोगी अभिमानास पेटून व्यर्थ देह कष्टावितात व काळवंचना मात्र करतात; कामक्रोधांस न जिंकतांच संन्यासी शिखासूत्रांचा त्याग करून एकाकी होऊन बसतात; आणि मंत्राचीं बीजाक्षरें हीं चित्स्वरूपाकारच होत हें न कळल्यामुळें कोणी जपमाळांच्या द्वारें निद्रेच्या अधीन होतात. तात्पर्य, हे उपाय अपायरूप असून एक भक्तीच परमेश्वराची प्राप्ति करून देईल असें एकनाथांचें म्हणणें आहे ( क्र. १७३ ). ‘ चिरंजीव पद ’ या आपल्या प्रसिद्ध काव्यांत त्यांनीं नीतिमार्गानें गेल्यासच चिरंजीवता प्राप्त होईल असें आग्रहानें प्रतिपादलें आहे. हा नरदेह विषयस्वार्थी लावून हातींचा थिता परमार्थ न गमावतां, मृत्यु नित्य समीप आहे हें ओळखून अनुतापयुक्त सात्विक वैराग्य अंगीं बाणविणें हें परमार्थाचें मुख्य लक्षण होय असें एकनाथ या प्रकरणांत

म्हणतात. तसेंच शुद्ध परमार्थास जनमान अनर्थकारक आहे हें ओळखून कोमल दशेंतील साधकानें शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे आत्मोन्नतीस नाडणारे पांच विषय दूर ठेवून, स्त्रियांचा सांगात सर्वस्वीं टाळून, अंगीं अहंता येईल म्हणून स्वतंत्र फड न मांडतां निस्संग व निरभिमान होऊन अखंड एकांतीं बसणें हें त्यांच्या मतें खरें सात्विक वैराग्य होय ( क्र. १७४ ). एकनाथांचा भर भावार्थावर फार दिसतो. प्रल्हादासारखा भक्त केवळ भावबळावर तरला; तेव्हां ज्याला परमार्थाविषयीं चाड असेल त्यानें आपला भावार्थ मळूं देऊं नये; कारण भाव पालटला म्हणजे परमार्थ बुडाला असें समजावें; मलिन भावार्थास मलिन परमार्थच मिळणार, असें त्यांनीं 'स्वात्मसुख' या नांवाच्या प्रकरणांत म्हटलें आहे ( क्र. १७५ ). एकनाथांची गुरुभक्ति प्रसिद्ध असून तिचे पडसाद त्यांच्या स्फुट काव्यांतून अनेक ठिकाणीं उठलेले दिसतात. गुरुभक्तीपरता परमार्थाचा मार्ग नाहीं, गुरुभक्ति हें सकळ साधनांत सर्वश्रेष्ठ असें साधन असून ज्याला परमार्थाविषयीं खरी चाड असेल त्यानें गुरुनाथास भावबळानें भजावें, ज्याचें मुखीं गुरूचें नाम आहे व गुरुसेवा हेंच ज्याचें नित्यकर्म आहे तो देहासहित परब्रह्मच होय, असें त्यांनीं 'चतुश्लोकी भागवतां'त म्हटलें आहे. मात्र जो ज्ञानाभिमानास पेटून आपल्या शिष्यांकडून सेवेची अपेक्षा करतो व धनासाठीं ज्ञान विकतो असा शिश्नोदरपरायण गुरु हा त्यांच्या मतें गुरुत्वास मुकला असें समजावें. ज्ञानी असून निरभिमानी असणें व सर्वांगीं शांतीचें भूषण घालणें हें एकनाथांच्या दृष्टीनें सद्गुरूचें मुख्य लक्षण होय ( क्र. १७६ ). अशा सद्गुरूचें चरण हें सकळ साधनांचें साधन असून त्याच्या कृपेनें सर्व जगच गुरुरूप होऊन राहील ( क्र. १७७ ). प्रत्यक्ष वेदांना सुद्धां जें कानडेंच राहिलें व कोटि सूर्यांच्या प्रकाशांतहि जें दिसूं शकत नाहीं असें त्रैलोक्यव्यापी वस्तुस्वरूप केवळ गुरुकृपेच्या प्रसादानें निःशब्दरूपानें अनुभवास येईल ( क्र. १७८ ). किंबहुना एका गुरुसेवनानें सर्वार्थसिद्धि लाभून नेत्रश्रवणादि इंद्रियांच्या द्वारां अतींद्रिय अशा आत्मसुखाची अखंड प्राप्ति होईल. कारण गुरुकृपेस असाध्य असें कांहींच नाहीं ( क्र. १७९ ). श्रीजनार्दनस्वामींच्या कृपेनें एकनाथांत उठलेल्या 'आनंदलहरी' याच नांवाच्या त्यांच्या एका

स्फुटकाव्यांत प्रकट झाल्या आहेत. ज्या योगें जन्ममरणाचें खत फाटून काळाचें धरणें उठेल असा उपाय एकच व तो म्हणजे गुरुभक्ति. 'याचि देहीं याचि डोळां ' मुक्तीचा सोहळा भोगणारा व स्वरूपाचा जिव्हाळा असणारा सद्गुरु विरळाच होय. असा सद्गुरु मीं जनार्दनस्वामींच्या रूपानें पाहिला, त्यांस पाहतांच माझा भवभ्रम नाहींसा होऊन मला अनुपम्य सुख झालें, त्यांच्या कृपेनें सृष्टीचा व्यवहार न मोडतां सर्वत्र शून्याकार होऊन तेजानें अंबर दाटून गेलें, असें एकनाथ म्हणतात. त्यांच्यासारखे जे सद्गुरूचे निजदास असतील त्यांनाच ही अनुभवाची खूण कळेल; इतरांस जसे पक्षांना नारळ त्याप्रमाणें ती अगम्यच राहणार ( क्र. १८०. ). श्रीजनार्दनस्वामींच्या कृपेनें आपले वाकुडेतिकुडे आर्ष बोलही ब्रह्मज्ञानानें सखोल होऊन त्यांना नित्य नव्या प्रेमाची ओल आली असल्यानें आपल्या ग्रंथाचा वाच्यवाचक वक्ता जनार्दनच होय असें एकनाथ म्हणतात. किंबहुना सद्गुरु आणि परब्रह्म हीं तत्त्वतः एकच असून येथें शिष्याच्या ठिकाणींही भिन्नपण उरत नसलें तरी परब्रह्मास प्रतिष्ठा गुरुवाक्यानें येत असल्यामुळें गुरुवाक्यच त्याच्या दृष्टीनें सर्वश्रेष्ठ होय ( क्र. १८१ ). सद्गुरूवर मातेचें रूपक रचून एकनाथ पुढें म्हणतात, कीं मी सैराट धांवतांना पदोपदीं कडेवर घेणारी, कोणाची दृष्ट लागेल म्हणून मागेंपुढें सर्वदा तिष्ठत उभी राहणारी, मला अविद्येचा कांटा मोडेल म्हणून चित्प्रकाशाचा दिवटा करून स्वतः बोधरूपी खराट्यानें भूमि झाडणारी, ऋद्धिसिद्धींची कुरवंडी करून माझ्यावरून ओवाळून टाकणारी, निजानुभवाचें ताट मांडून माझ्या तोंडीं स्वानंदाचे घास देणारी व मला समाधीचे पाळण्यांत घालून अनुहताचें गाणें गात निजीं निजविणारी अशी ही आपली जनार्दनजननीच होय. तिच्या समर्थ आज्ञेनें ग्रंथार्थ आपल्या दृष्टींत जणुं खेळूं लागला व ' शब्दापुढें ज्ञान धांवे । ओवीपुढें अर्थ पावे । ' अशी आपली स्थिति झाली. सारांश, एका आणि जनार्दन हे नांवरूपानें भिन्न असले तरी स्वरूपदृष्टीनें अभिन्नच होत यांत संशय नाहीं ( क्र. १८२ ). गुरुकृपेचा परिणाम म्हणून एकनाथ म्हणतात, कीं आत्मसुखाचा आस्वाद घेण्यासाठीं पंचज्ञानेंद्रियांत जणुं विवाद लागतो व तें पाहून हा परमानंद मौनानेंच सेवन करणें बरें अशा

विचारानें शब्द निःशब्द होतो आणि एक हरिनामाचा छंद सर्वांगीं गर्जू लागतो ( क्र. १८३ ). या कळातीत अशा आत्मकळेचें वर्णन करतांना एकनाथ म्हणतात, कीं तिला उपमा सर्वत्र असणाऱ्या पण शून्यत्वरहित आकाशाची, किंवा रविबिंब मावळल्यावर मागें राहणाऱ्या त्याच्या उष्णातीत प्रभेची, किंवा शब्दाक्षरातीत अशा अर्थाचीच देतां येईल ( क्र. १८४ ). अशा प्रकारें सर्वरूपें रूपस असा परमात्मा जोडला असतां डोळस आपले डोळे कां झाकील ? मुक्ताफळाचा स्वयंप्रकाश असा परिस लाभला असतां तो उल्हासानें मुकुटीं धारण करणार नाहीं असा कोण आहे ? त्याप्रमाणेंच आकाशाएवढा दर्पण सन्मुख उभा असतांना स्वरूपाचा विसर पडणें अशक्य असून, जेथें स्वरूपाचें विस्मरण झालें असतांनाहि पुन्हा तेंच दिसेल तेथें पाहात असतांना नित्य स्वरूपदर्शनच होईल यांत नवल तें काय ? ज्या दृष्टीस आत्मरूपी चिद्रत्नाची ही चराचरास व्यापणारी कळा दिसणार नाहीं ती दृष्टि समळ होय असें समजावें ( क्र. १८५ ). ज्ञानोत्तर स्थितीचें वर्णन करून वस्तुप्राप्तीमुळेंच निष्कर्मता कशी लाभते तें एकनाथांनीं फार उत्तम रीतीनें निरूपिलें आहे. वारा वाहून सरल्यावर त्याचा हेलावा वृक्षाच्या ठिकाणीं कांहीं काळ उरावा, किंवा मेघ वर्षून ओसरल्यावर भूमीच्या ठिकाणीं ओल राहावी, त्याप्रमाणें ज्याची अविद्या नासून गेली अशा ज्ञानी पुरुषाचा देह केवळ प्रारब्धयोगानें वर्तत असतो असें एकनाथ म्हणतात. मग प्रारब्ध असेल त्याप्रमाणें तो सकळ जगास गोष्टी सांगेल किंवा दरीदरकुटींत पडून राहील; पण त्यानें कर्में आचरिलीं काय किंवा तो तटस्थ राहिला काय, त्याची निष्कर्मता कदापि मोडत नाहीं ( क्र. १८६ ). समाधीविषयीं एकनाथ एका ठिकाणीं म्हणतात, कीं ताटस्थ्य किंवा पराकाष्ठा ही खरी समाधि नसून अभिमान समूळ तुटून चिन्मात्रपहांट फुटणें हीच खरी समाधिअवस्था होय ( क्र. १८७ ). अन्य ठिकाणीं, सर्वत्र समबुद्धि असणें यांस त्यांनीं परमसमाधि असें म्हटलें आहे. नाडींत ज्वर असतांना आरोग्यस्नान हें जसें अपायकारक होय, त्याप्रमाणें अंतःकरणांत वृत्ति असतांना बळेंच समाधिस्थ होणें म्हणजे निश्चितपणें आत्मघात आहे. म्हणून सर्वांभूतीं निजात्मता ठेवून सर्वत्र समता होणें ही खरी बोलतीचालती समाधि होय असें एकनाथ म्हणतात

(क्र.१८८). हें समाधिसुख ज्यास प्राप्त झालें असा योगी जें पाहील तें परब्रह्म व जें बोलेल तो महामंत्र होईल यांत नवल काय ? एकनाथ म्हणतात, कीं त्याच्या श्वासोच्छ्वासांत आनंदाचें माहेर व निमिषोन्मिषांत निजसुखाचें घर होऊन राहील. तो एकदेशी दिसला तरी खरोखर सर्वदेशनिवासीच म्हटला पाहिजे. त्याचा देह दिगंतापर्यंत हिंडत असला तरी तत्त्वतः तो अचलच होय. जगाचा जो ईश्वर तो त्याचा आज्ञाधारक होऊन आनंद हा त्याचा अष्टौप्रहर सेवक होईल; शिणलेली लेक माहेरीं विसाव्यास यावी त्याप्रमाणें त्याच्या निद्रेपाशीं समाधि विश्रांतीस येईल; इतकेंच नव्हे,तर प्रत्यक्ष वैकुंठींचे मुक्तवासी अशा योगी पुरुषाची भेट होईल काय म्हणून रात्रंदिवस नवस करीत राहतील ( क्र. १८९ ). अशा जीवन्मुक्ताची आत्मस्थिति एकनाथांनीं शंकराचार्यांच्या, " निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः ' या प्रसिद्ध अष्टकाच्या आधारें वर्णिली आहे. चंद्रोदय झाला असतां सागरास भरती येणें सोमकांत द्रवणें, कुमुदें विकसणें, किंवा संतप्तास विश्रांति मिळणें हें सर्व घडत असलें तरी स्वतः चंद्र अकर्ताच राहतो. त्याप्रमाणें जीवन्मुक्तास आत्मप्रतीतीहून निराळी अशी कर्मस्थितीच उरत नसल्यानें व तो स्वदेहींच गोविंदस्वरूप झाल्यानें निस्त्रैगुण्याच्या किंवा ब्रह्मराणीवेच्या राजपथावर विचरत असतांना त्यास विधिनिषेध असा भेदच उरत नाहीं ( क्र. १९० ).

## रुक्मिणीस्वयंवर

एकनाथांच्या आख्यानक काव्यांत रुक्मिणीस्वयंवराचें स्थान फार श्रेष्ठ आहे. भागवताच्या दशमस्कंधांतील सुमारें दीडशें श्लोकांच्या या प्रसंगावर नाथांनीं सतराशेंच्या वर ओव्या लिहिल्या आहेत. या काव्याची रचना ' वाराणसी महापुरीं । मनकर्णिकेच्या तीरीं ' शके १४९३ च्या रामजयंतीस पूर्ण झाली असें दिसतें. या कथेचें एकूण अठरा प्रसंग असून पहिल्या सातांत रुक्मिणीहरण, पुढील सहांत युद्धवर्णन, आणि शेवटील पांच प्रकरणांत विवाह-समारंभ अशी स्थूलमानानें योजना आहे. एकनाथांची रूपकात्मक वर्णनपद्धति या ठिकाणीं उत्कृष्टपणें दिसून येते. ही सर्व कथा मिळून जीवाशिवविवाहाचें एक सविस्तर असें आध्यात्मिक रूपक तर सिद्ध होतेंच; पण याशिवाय प्रत्येक

प्रसंगांत स्वतंत्रपणें अध्यात्मतंतु गोवलेला दिसतो. इतकें व्यापक आणि सर्वांगसुंदर रूपक इतर वाङ्मयांत क्वचितच आढळेल. रुक्मिणीनें सुदेव ब्राह्मणाबरोबर कृष्णाकडे धाडलेल्या पत्रिकेंत अशीच रूपकयोजनेची वहार आहे. कृष्णानें स्वरूपतेच्या मदगजावर आरूढ होऊन, वासनाजयाचे रथ सिद्ध करून, द्वैताचा मोड करणारी आपली यादवसेना घेऊन यावें व काळरूपी शिशुपाळापासून आपलें संरक्षण करावें असें रुक्मिणी या पत्रिकेंत कृष्णास लिहिते ( क्र. १९१ ). श्रीकृष्णाची वरपूजा आणि कृष्णरुक्मिणीचा लग्नसोहळा या प्रसंगांच्या वर्णनांतहि हीच रूपकदृष्टि ठेवलेली दिसून येते ( क्र. १९२, १९३ ). तसेंच रुक्मिणीस कृष्णाच्या समचरणदर्शनाची तळमळ कशी लागली व उद्धवाच्या सांगण्याप्रमाणें तिनें मन निर्विकल्प व वृत्ति सावध करतांच तिला समचरणांचें दर्शन कसें झालें हा प्रसंगहि एकनाथांनीं एक आध्यात्मिक रूपक योजून मोठ्या बहारीनें सांगितला आहे. कृष्णाच्या समचरणांचें दर्शन होतांच रुक्मिणीच्या अहंसोहंच्या गांठी सुटल्या, शब्द खुंटला, मौनहि तुटलें, विषयदृष्टि उपरमली, सर्व सृष्टि निजानंदानें कोंदाटून गेली आणि विवाहसोहळ्याचा संपूर्ण विसर पडून अर्थ, स्वार्थ व परमार्थ हे एकवटले, असें एकनाथ म्हणतात ( क्र. १९४ ). शेवटीं ही कृष्णरुक्मिणीची विवाहकथा नसून हें जीवशिवांच्या लग्नाचें निरूपण आहे व विवेकी वक्ता आणि सावधान श्रोता यांच्यातील हा कथासंवाद म्हणजे अनुभवकसवटीच होय असें सांगून व ग्रंथरचनेचा स्थलकालनिर्देश करून एकनाथांनीं हें काव्य संपविलें आहे ( क्र. १९५ ).

## भावार्थरामायण

एकनाथांच्या भावार्थरामायणाचा विचार करतां आपल्या इतर ग्रंथांच्याप्रमाणें या ग्रंथाचें कर्तृत्वहि त्यांनीं स्वतःकडे घेतलेलें दिसत नाहीं. मूर्खपण ही आपली मिरासी असून प्रत्यक्ष श्रीरामानें प्रेरणा केल्यामुळें आपण रामायणरचनेस प्रवृत्त झालों व या ग्रंथाचा कर्ता-करविता श्रीरामच होय असें एकनाथांस वाटतें. म्हणून ग्रंथकर्तृत्वाचें दूषण किंवा भूषण आपल्या अंगीं लागत नसून ग्रंथाची निंदा किंवा स्तुति करणारे दोघेहि आपणांस ब्रह्ममूर्तीच होत असें त्यांनीं म्हटलें आहे ( क्र. १९६ ). सुंदरकांडांतील हनुमंतकृत सीता-

शुद्धीच्या निमित्तानें एकनाथांनीं स्वकालीन लोकस्थितीचें वर्णन अप्रत्यक्षपणें, पण तपशीलवार केलेलें आढळतें. त्यांत सर्वांभूतीं भगवंत न पाहतां मुद्रि-मंत्रांची व्यर्थ दीक्षा घेणारे कर्मठ ब्राह्मण, स्वतःच्या मोठेपणाचा गर्व वाहून पोटांत मरणभय बाळगणारे नपुंसक क्षत्रिय, उदीमांत चित्त ठेवून द्रव्याच्या ठायीं लोलुप असणारे वैश्य, व अठरापगड जातींनीं विस्कळीत होऊन गेलेले शूद्र याप्रमाणें चौवर्णियांचा उल्लेख येतो. तसेंच रात्रंदिवस ठकठक करीत लटिकें तुकून समूळ विश्वासघात करणारे सोनार, व्याजाच्या आशेनें मुदलास फांसा घालणारे व दुसऱ्याकडून काळा कागद लिहून घेऊन स्वतः काळमुखे होणारे व्यवहारी म्हणजे सावकार, नित्य नवे फेरे खाणारे तेली, मुळींचा तंतु तुटल्यामुळें अहर्निश धोटे हाणूनहि स्वरूपाचें सणंग काढतां न येणारे साळी, लोभाच्या कातरीनें अखंडाची गुप्तपणें चोरी करणारे शिपी, नामरूपाच्या ठशावर काळेंबेरें करणारे रंगारी, उदात्त–अनुदात्त स्वरोच्चारांत शब्दांची कोरडी खणखण करणारे वेदपाठक, शास्त्रव्युत्पत्तींत व ज्ञातेपणाच्या अभिमानांत अडकलेले विद्वान आणि ग्रहगतींत गुंतून पडलेले ज्योतिषी याप्रमाणें समाजांतील निरनिराळ्या व्यावसायिकांचें वर्णन एकनाथांनीं त्या त्या व्यवसायावरील रूपकें योजून केलें आहे ( क्र. १९७ ). सोंवळयाओंवळयाच्या भ्रांत कल्पना उराशीं बाळगल्यामुळें कर्मठ ब्राह्मण भक्तीस व परमार्थास कसे मुकतात तें त्यांनीं सीतास्वयंवराच्या प्रसंगानें एक वेश्या व संन्यासी यांच्यातील संवादरूपानें दाखविलें आहे. स्वयंवर आटोपून रामचंद्र अयोध्येस परतले तेव्हां त्यांच्या दर्शनासाठीं पुरजनांनीं एकच गर्दी केली. कर्माहंकारीं गुंतलेले कर्मठ ब्राह्मण मात्र त्यांत नव्हते. आणि कां, तर रामदर्शनदोषाच्या भयानें! उलट एक वेश्या श्रीरामाचें मुख पाहत असतांना तहानभूक विसरली होती. या वेश्येनें संन्याशाच्या मनांतील सोंवळयाओंवळयाच्या कल्पनेचा केलेला उपहास अर्थपूर्ण व सूचक आहे ( क्र. १९८ ). स्त्रीरति, मद्यप्राशन व धनलोभ यांपैकीं एकेकसुद्धां अधःपातास नेण्याला समर्थ असतांना लोक या तिन्ही व्यसनांच्या मागें लागून आत्महितास मुकतात हें त्यांचें आंधळेपण पाहून एकनाथांस त्यांची करुणा आली व परोपकारबुद्धीनें त्यांनीं भक्तीचा मार्ग त्यांस दाखविला ( क्र. १९९ ). सर्वजण ‘ करूं करूं ’ असें म्हणतात;

पण प्रत्यक्ष करणें तसेंच राहतें; म्हणून कृषीवल जसा घरांतील मढें झांकून आधीं पेरणी करतो, त्याप्रमाणें मनुष्यानें या नरदेहाची प्राप्ति झाली असतां हातोहातीं परमार्थ साधावा असें एकनाथांचें म्हणणें आहे ( क. २०० ). श्रवण, साधन, नित्यानित्यविवेक, मनन, निदिध्यासन, वैराग्य व साक्षात्कार याप्रमाणें राजभवनाचे सात दरवाजे ओलांडून जावें तेव्हांच रामदर्शन होणार ( क. २०१ ). रामप्राप्तीच्या मार्गांत अनेक विघ्नें आहेत. विशेषतः विषयासक्ति ही रामप्राप्तीच्या आड फार येते. किंबहुना विषय हा विषाहूनहि भयंकर होय. कारण विषानें एकदांच मृत्यु येतो, परंतु विषयसेवनानें जन्ममरणाची पंक्तीच मागें लागते ( क. २०२ ). म्हणून या नरदेहासारखें कांहीं गोमटेंहि नाहीं व वोखटेंहि नाहीं हें ओळखून तो भोगूंहि नये व त्यागूंहि नये; तर तो भगवन्मार्गीं लावावा. चित्तास परमार्थाचें सतत अनुसंधान लावून द्यावें, दांत खाऊन मनोजयाच्या पाठीं लागावें, अहोरात्र सावधानपणें चिन्मात्रावर लक्ष असूं द्यावें; सारांश, मनानें मनाला सावध करून मनानें मनाचें अनुसंधान राखणें हें एकनाथांच्या मतें परमार्थमार्गाचें मुख्य सूत्र आहे ( क. २०३ ). रजतमांचा निरास करून शिजलेल्या अन्नाची वाफ त्यांतच जिरवावी त्याप्रमाणें सत्वगुणहि अंगीं जिरवून टाकून निःत्रैगुण व्हावें तेव्हां रामदर्शन होणार असें ते म्हणतात ( क. २०५ ). हें घडून येण्यास रामाची अनन्यभक्ति किंवा त्याशीं दृढवैरहि चालेल असें एकनाथांचें म्हणणें आहे. स्वतःस अपकार करणारावरहि उपकार करणें हा रामाचा स्वभावधर्म असून त्याच्या शांतीची थोरवी खरोखर अगाध आहे ( क. २०६ ). परमार्थमार्गांत सत्संगाचें महत्त्व फार असून सत्पुरुषांचा सहवास हेंहि एक मोठेंच साधन होय असें एकनाथांस वाटतें ( क. २०७ ). इतकेंच नव्हे, तर तीर्थोतीर्थीं फिरणें, अधोमुख होऊन धूम्रसेवन करणें, पर्वतावरून देहपात करणें किंवा देह करवतीं घालणें यांसारखीं साधनें व्यर्थ असून प्रत्यक्ष देवाच्या संगतीहूनहि त्याच्या दासांची संगति अधिक गहन म्हणजे फलदायी आहे असें ते म्हणतात ( क. २०८ ). आत्मज्ञान होण्यास गुरुकृपेची आवश्यकता असून गुरुवाक्यावांचून स्वयंबुद्धीच्या बळावर होणारें ज्ञान हें क्षयरोगी बालकाप्रमाणें विकल्पमात्रानें क्षीण होणार असें समजावें ( क. २०९ ). परंतु असा

सत्पुरुष अथवा सद्गुरु तरी कोणास म्हणावें ? तर स्वस्वरूपीं अवधान ठेवणें हें सत्पुरुषाचें मुख्य लक्षण असून अशा सद्गुरूचें सेवन करणें यापरतें परमार्थाचें दुसरें साधन नसल्यामुळें ज्याला; हें संसारधरणें उठावें असें वाटत असेल त्यानें मुखीं गुरुनामस्मरण, मनीं गुरुमूर्तीचें ध्यान व श्रवणीं गुरुचरित्रश्रवण याप्रमाणें दृढ गुरुदास्य करावें असें एकनाथ म्हणतात ( क्र.२१० ). भक्तीचा आणि भक्तांचा महिमा त्यांनीं मुक्तकंठानें गायिला असून ज्या कुळांत हरिभक्त निपजेल तें सकल कुळ पावन होऊन जाईल असें त्यांनीं म्हटलें आहे. मोल देऊन घेतलेल्या मद्यानेंहि जेथें देहभावाचा विसर पडतो, तेथें भक्तानें ब्रह्मरसाचें सेवन केलें असतां त्याचा संसारभाव नाहींसा होऊन नामबळाच्या जोरावर तो जगाचा उद्धार करील यांत आश्चर्य कोणतें? ( क्र. २११ ). हें ध्येय प्राप्त करून घेण्यासाठीं एकनाथांनीं भागवतधर्माचें प्रतिपादन केलें असून नामसंकीर्तन हें या मार्गांतील मुख्य साधन होय असें त्यांनीं म्हटलें आहे. कारण स्त्रियादि अंत्यजांचा उद्धार करणारें हरिनाम हें एकच साधन असून आसनीं, भोजनीं, शयनीं हरिनामाचें चिंतन केल्यास चित्रगुप्ताच्या वहींतील पानें कोरीं राहून त्याची अवघी वही उघडी होते ( क्र. २१२ ). नामस्मरणाची महति थोर असून त्यास योगयाग, शास्त्रव्युत्पत्ति, पुरश्चरण इत्यादिकांची जरूर नसून केवळ द्व्यक्षरी रामनामाच्या चिंतनानें कल्मषाचा महाकंद खणून निघेल; रामनामाच्या कडकडाटानें भवसमुद्रांत पायवाट निर्माण होऊन कीर्तिकल्याणांची जोड होईल; रामहरिगोविंद या नामांचें स्मरण करण्यांत परमानंद असून ज्याच्या मुखीं हरिनामाचा नित्य गजर आहे त्याच्या अधीन चक्रधर आहे असें समजावें; नामस्मरणानें देवाभक्तांतील अंतर नाहींसें होऊन देव भक्तापाशीं निरंतर येऊन राहतो; नामास अनध्ययन किंवा विधिविधान यासारखें कोणतेंहि कर्मबंधन नसून अनुतापभरानें रामनामाचें चिंतन केल्यास प्रत्यक्ष दुराचारीसुद्धां साधु होऊं शकतो, अशा अर्थाचे उद्गार एकनाथांनीं काढले आहेत ( क्र. २१३ ). रामनाम हेंच खरें औषध, हीच खरी अमृतसंजीवनी होय असें सांगून ( क्र. २१४ ), नाथ पुढें म्हणतात कीं, कृष्णमणियुक्त गळसरी हें जसें स्त्रियांचें सौभाग्याचिन्ह होय, त्याप्रमाणें नामस्मरणी हें पुरुषांचें खरें भूषण म्हटलें

पाहिजे. ही नामस्मरणीं तुटेल तर त्यास वैधव्य आलें असें समजावें(क्र २१५). भक्तांविषयीं लिहितांना जानकी ही सर्व रामसेवकांमध्यें आचार्य होय असें एकनाथांनीं म्हटलें आहे. कारण श्रीरामाची प्राप्ति परक्याच्या पायांनीं होणारी नसून त्यासाठीं स्वतः साधक होऊन शिणलें पाहिजे याची स्पष्ट जाणीव तिच्या ठिकाणीं दिसते (क्र. २१६). तसेंच वेळअवेळ किंवा दिवसरात्र न म्हणतां आपलीं पांचीं ज्ञानेंद्रियें व पांचीं कर्मेंद्रियें एका रामभजनीं लावून श्रीरामाची अंतर्बाह्य सेवा करणाऱ्या हनुमंताची भक्तीहि अपूर्वच म्हटली पाहिजे (क्र. २१७) या देवाभक्तांचें ऐक्य वर्णितांना एकनाथ म्हणतात कीं रघुनाथास आपल्या स्वामित्वाचा व हनुमंतास आपल्या दासत्वाचा विसर पडून भक्तानें देव व नामानें देवभक्त गिळून टाकले. एकनाथांच्या मतें ही अवस्था प्राप्त होणें हाच मुख्य परमार्थ होय (क्र. २१८) खरें पूजन, खरा भक्त, खरी समाधि व खरा परमार्थ यांविषयीं कांहीं महत्त्वाचे विचार त्यांनीं भावार्थरामायणांत व्यक्त केले आहेत. जेवढी देवाची व्याप्ति तेवढी व्यापक आपली चित्तवृत्ति करून कायावाचामनें पण अभेद भावानें देवास भजणें हें खरें पूजन असून असे देवभक्त सबाह्याभ्यंतरीं परस्परांत एकवटून जातात असें एकनाथ म्हणतात (क्र. २१९). जो केव्हांहि ध्यानच्युत होत नाहीं, प्रत्यक्ष त्रैलोक्याचें राज्य जरी महासिद्धींच्या समवेत पुढें येऊन उभें राहिलें तरी सुद्धां ज्या निष्टंक दादुल्याचें मन ध्यानापासून क्षणभरहि ढळत नाहीं, व हृदयीं ध्यान आणि मुखीं नाम धरून जो निष्कर्माचें मुकुटभूषण घालतो तो एकनाथांच्या मतें खरा भक्त होय (क्र. २२०). मात्र केवळ निष्कर्मपण किंवा तटस्थपणा हें अपक्व अशा मुग्धावस्थेचें लक्षण असून भूतमात्राच्या गुणागुणांमुळें किंवा जगाच्या दोषदर्शनामुळें ब्रह्मपणाची अवस्था न मोडणें व भूतांचे सकळ मळ निर्मळ होऊन जाणें हें परिपक्व समाधि अवस्थेचें खरें चिन्ह होय असें नाथ म्हणतात (क्र. २२१). तसेंच सर्वभूतीं भगवंत पाहाणें हा त्यांच्या मतें गाळीव भावाचा भावार्थ असून हाच मुख्य परमार्थ होय (क्र. २२२). या मार्गानें जाऊन अव्यय, अविनाश, सदोदित व परमात्मस्वरूप अशा चिन्मात्र-वस्तूचा अनुभव घ्यावा; व उभेंआडवें सूत विणून जसें त्याचें वस्त्र तयार होतें

त्याप्रमाणें अहोरात्र चराचर व्यापून असणारी ही वस्तु म्हणजेच व्यापक भगवंत असल्यानें प्रपंचांत परमार्थ पाहावा असें एकनाथ म्हणतात (क्र. २२३). मारुतीनें मागितलेलें व रामानें त्यास दिलेलें वरदान सांगून भावार्थ-रामायणाचा हा विभाग संपविला आहे. रामकथा हेंच आपलें जिणें असून जोंवर रामकथा पृथ्वीवर आहे तोंवर आपले प्राण शरीरांत असावे; आब्राह्मण-शूद्र सर्वांनीं श्रीरामाचें निरंतर स्मरण करावें; ज्यांच्या मुखीं रामनाम आहे त्यांनीं स्वानंदमग्न व सुखसंपन्न असावें; अधर्माचें दौरात्म्य व दुष्टांची दुष्ट वृत्ति नाहींशी होऊन अवघें विश्व सुखी व्हावें असें वरदान मारुतीनें रामापाशीं मागितलें आहे ( क्र २२४ ). तें पाहून ज्ञानेश्वरांनीं विश्वात्मक देवापाशीं मागितलेल्या पसायदानाची आठवण कोणासहि होईल. असो. रामनामाच्या बळावर आपण जगाचा उद्धार करूं हें हनुमंताचें मागणें जसें अचाट, तसेंच श्रीरामाचें देणेंहि अचाट होय असें एकनाथ पुढें म्हणतात. तुझ्यामुळें रामकथा सनाथ होईल, रामभक्तीमुळें तूं चिरंजीवियांत सर्वश्रेष्ठ होऊन राहशील, इतकेंच नव्हे, तर तुझी भक्ति पाहून तुझ्या केवळ नामानें नास्तिकांचे शून्यवाद आणि कुतर्क्यांचे कुतर्क भस्म होतील असें वरदान रामानें मारुतीस दिलें. तें ऐकून रामनामानें चराचर मुक्त व्हावें असें आपण मागितलें असतां रामानें भक्ताच्या म्हणजे आपल्याच नामाचा बडिवार सांगितला, ही विपरीत वरदोक्ति पाहून मारुति अस्वस्थ झाला. त्यावर आपण आणि हनुमान यांत अणुप्रमाण इतकाहि भेद नसून ‘ स्वरूप एक, नामें भिन्न ’ अशी आपली स्थिति आहे, किंबहुना आपण हनुमंताचे कृतोपकारी असून लेकराचें कोडकौतुक केल्यानें जशी त्याची माता सुखी होते, त्याप्रमाणें मद्भक्तपूजा ही आपणांस अपार तोषदायक होत असल्यानें भगवद्भक्तांची संगति ही सुद्धां मोक्षदायकच होय असें आश्वासन श्रीरामानें मारुतीस दिलें ( क्र. २२५ ).

## समारोप

असो. महाराष्ट्रांतील संतवाङ्मयाच्या माझ्या अभ्यासाला इ. १९०८ सालीं दासबोधाच्या वाचनानें प्रारंभ झाला. नंतर इ. १९०९–१० सालीं तुकारामाची

गाथा वाचली. पुढें इ. १९११–१२ पर्यंत एकनाथी भागवताचें अध्ययन केलें व इ.स. १९१३ ते १९१७ पर्यंत ज्ञानेश्वरीचा अभ्यास केला. पुढें जेव्हां इ. १९१८चे सुमारास हिंदी तत्त्वज्ञानाचा इतिहास लिहावयाची योजना डॉ. बेलवलकर यांच्या सहकार्यानें ठरविली तेव्हां त्या योजनेंत 'मिस्टिसिझम् इन् महाराष्ट्र' हा ग्रंथ ओघानेंच आला. या ग्रंथाचीं साधनें किंवा Source-books म्हणून इ. १९१८ ते १९२४ पर्यंत मधून मधून संतवाङ्मयाचा अभ्यास होऊन ज्ञानेश्वर, संत, तुकाराम व रामदास हीं चार वचनामृतें छापूनहि निघालीं. मुख्य ग्रंथ म्हणजे 'महाराष्ट्र मिस्टिसिझम्' हा इ. १९३२ मध्यें पूर्ण होऊन प्रसिद्ध झाला. या ग्रंथांतील एकनाथांवरील प्रकरण लिहिण्याचें कामीं प्रो. सोनोपंत दांडेकर यांची फार मदत झाली होती. परंतु त्या वेळीं एकनाथ-वचनामृताची तयारी पूर्ण झालेली नसल्यानें एकनाथांवर स्वतंत्र पुस्तक न काढतां संतवचनामृतांत त्यांचे कांहीं अभंग तेवढे समाविष्ट करण्यांत आले होते. सुमारें पांचसहा वर्षांपूर्वी सर्व वचनामृतांची द्वितीयावृत्ति काढण्याचें योजिलें तेव्हां 'एकनाथवचनामृत' या नांवाचें एक स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध करावें असें श्री. गणेश गोविंद कारखानीस, प्रो. कृ. वें. गजेंद्रगडकर व डॉ. शं. गो. तुळपुळे यांच्या सल्ल्यानें ठरलें. त्यानंतर थोडयाच दिवसांत पैठण येथील 'श्रीएकनाथ संशोधन मंडळा'नें 'श्रीएकनाथदर्शन' या नांवाचा एक लेखसंग्रह प्रसिद्ध केला व त्यास त्या मंडळाचे अध्यक्ष न्या. श्री. बळवंतराव घाटे यांनीं सुचविल्यावरून मीं एक लहानशी प्रस्तावना लिहिली. त्याचप्रमाणें मागील वर्षी औरंगाबाद येथील सरकारी विद्यालयाचे व्हाइस प्रिन्सिपल श्री. जगमोहनलाल चतुर्वेदी यांनीं लिहिलेल्या 'श्रीएकनाथ और तुलसीदास' या हिंदी पुस्तकासहि एक प्रस्तावना हिंदी भाषेंत प्रो. सी. ज. जोशी यांच्या साहाय्यानें लिहिण्यांत आली. या सर्व कारणांमुळें 'एकनाथ-वचनामृता'कडे लक्ष वेधणें साहजिकच होतें व श्रीएकनाथमहाराजांच्या कृपेनें आणि वरील सर्व मंडळींच्या साहाय्यानें आज हा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे.

या पुस्तकाची सर्व जबाबदारी पुणें येथील व्हीनस प्रकाशन संस्थेनें उचलली ही गोष्ट त्या संस्थेचे चालक श्री. लिमये व श्री. पाध्ये यांना भूषणावह आहे. इतर चार वचनामृतांप्रमाणें हें पांचवें वचनामृतहि परमार्थाच्या अभ्यासाकरितां उपयोगी पडावें अशी ईशचरणीं प्रार्थना आहे.

निंबाळ ( जि. विजापूर )<br>श्रीएकनाथषष्ठी, शके १८७६

**रा. द. रानडे.**

# अनुक्रमणिका


**१ प्रास्ताविक** पृ.

१ भानुदासवंदन १
२ श्रीजनार्दनांनीं मला भागवताची अवीट गोडी लाविली. १
३ श्रीजनार्दन भवगजपंचानन आहेत. २
४ एकनाथांस सर्वत्र श्रीजनार्दनांचा अनुभव २
५ श्रीजनार्दनांनीं रामकृष्णादि अवतार घेऊन माझा उद्धार केला. ३
६ श्रीजनार्दनच मातापिता होत. ४
७ श्रीजनार्दनच ग्रंथ व श्रीजनार्दनच ग्रंथकर्ता ५
८ भागवत प्राकृत झालें तरी तें निजज्ञानाचा ठेवाच आहे. ७
९ ग्रंथरचनेचा स्थलकालनिर्देश १०
१० व्यासश्रीधरादिकांस वंदन १०
११ भागवतक्षेत्राचें रूपकात्मक वर्णन ११
१२ ग्रंथसमाप्ति १२
१३ फलश्रुति १४

**२ तत्त्वज्ञान**

१४ पुरुष अव्यक्त, तर प्रकृति व्यक्त आहे. १६
१५ प्रकृति–पुरुषांची अनन्यप्रीति व एकात्मता १६
१६ बीज व कोंब्याप्रमाणें पुरुष व प्रकृति अभिन्नपणें जोडलेलीं आहेत. १७
१७ ज्ञानाग्नीनें त्रिगुणांची होळी होते. १८
१८ गुरुशिष्यांच्या संवादाचें मंथन म्हणजेच ब्रह्मविद्या १९
१९ तत्त्वें अनेक कीं एक ? २०
१९–अ. देहच नाहीं तर बंध कोठला ? २१
२० आत्म्यास जन्म व भवबंध नाहींत. २२
२१ आत्मा पापपुण्यातीत आहे. २३
२२ आत्मा व परमात्मा एकरूपच होत. २५
२३ स्त्री–पुं–भाव आत्म्यामध्यें नाहीं. २६
२४ मन जड, आत्मा प्रकाशमान २६
२५ जीव–शिव–संबंध २७
२६ ईश्वराचें निजरूप २८
२७ जीवेश्वरांची ऐक्यता २९
२८ मीच सर्वरूप व सर्वात्मा आहे. ३०
२९ माया गुणमयी व आभासरूप असली तरी ती दुस्तर व दारुण आहे. ३०
३० मायेचें अनेक रूपकांनीं वर्णन ३१

३१ मूळमाया सतहि नाहीं, व असतहि नाहीं; ती केवळ कल्पनारूप आहे. ३२
३२ माया ही ब्रह्माची शक्ति आहे. ३३
३३ माया म्हणजे भगवल्लीला ३४
३४ प्रपंच व त्यांतील व्यवहार मिथ्या आहेत. ३४
३५ मायेचा ईश्वरी कृपेनें नाश ३७

## ३ दुर्गुणत्याग

३६ आशेपाशीं सर्व पापें व दुःखें वसतात. ३९
३७ विषय विषप्राय आहेत. ३९
३८ विषयी लोक अज, श्वान व खरासारखे निर्लज्ज असतात. ४१
३९ विषयवासनेमुळें अनर्थपरंपरा ४२
४० स्त्रीलंपटता सर्व दुःखांचें मूळ आहे. ४३
४१ कामासक्ति अतिदारुण आहे. ४४
४२ " वेश्येचें आज्ञेवरी । श्वानाचे परी वर्तलों " ४५
४३ स्त्रैणत्व ४५
४४ साधकास स्त्री–संगापेक्षां स्त्रैणांचा संग बाधक होतो. ४६
४५ परमार्थी पुरुषानें स्त्रैणाची संगत टाळावी. ४७
४६ एक नारायणावांचून स्त्रीकाम-बंधन सुटत नाहीं. ४७
४७ कृपणास द्रव्य खर्चणें मरणच वाटतें. ४८
४८ अभिमान ज्ञानी, अज्ञानी व सुरनरांस सारखाच घातक आहे. ५०
४९ अभिमान सर्व आमिषांचें मूळ आहे ५१
५० अभिमानानें देव दुरावतो. ५२
५१ अविश्वास सर्व दोषांचा मुकुट-मणी आहे. ५२

## ४ सद्गुण–संशीलन

५२ मुमुक्षूस शास्त्रार्थाची आवश्य-कता. ५४
५३ " स्वयें परमार्थ साधिती । विषयासक्ति थुंकोनी " ५४
५४ निजबोधाची तळमळ ५५
५५ अलिप्तता ५६
५६ शुचिता ५७
५७ अहिंसा ५७
५८ आतिथ्य व श्रद्धा ५८
५९ दान, तप व सत्य ५९
६० आत्मयज्ञ ६०
६१ मौन ६१
६२ शान्ति ६१

## ५ परमार्थाचीं साधनें

६३ " यालागीं मुख्य गुरु नर-देहो " ६३
६४ नरदेहाचा परमार्थाकडे उप-योग ६३
६५ शुद्धाशुद्ध कर्म कोणतें ? ६४
६६ निष्काम कर्म मोक्षदायी ६५

६७ कर्मानें नव्हे, तर भक्तीनें ब्रह्मज्ञान प्राप्त होतें. ६६
६८ कर्मे ईश्वरार्पण केल्यानेंच नैष्कर्म्य-सिद्धि ६८
६९ ब्राह्मणांची वृत्ति व कर्मे ६९
७० क्षत्रियांचे मुख्य सात गुण ७०
७१ सार्ववर्णिक धर्म ७१
७२ ब्रह्मचाऱ्याचें वर्तन ७२
७३ वानप्रस्थाश्रम-वर्णन ७३
७४ संन्याशाचें कर्तव्य ७४
७५ अनन्यभक्त आश्रमातीत असतो. ७५
७६ योगाभ्यासानें कामवासना नाहींशी होते. ७६
७७ ध्यानास योग्य आसन कोणतें ? ७७
७८ ध्यानानें जीव भगवद्रूप होतो. ७८
७९ नाममंत्रानें विघ्नांचा नाश ७९
८० नामाच्या गजरानें पातकांचा संहार ८०
८१ सर्वांतःकरणानें नामस्मरण करावें. ८१
८२ नामघोषानें कळिमळ नासतात. ८२
८३ परमेश्वरप्राप्तीचें सर्वांत श्रेष्ठ साधन म्हणजे सत्संग ८३
८४ " मुखीं नामनिर्वाह व्हावा। यालागीं करावी साधुसेवा " ८५
८५ कायिक, वाचिक व मानसिक भजन ८६
८६ भजनानें सर्व कर्मे सहजच ईश्वरार्पण होतात. ८७
८७ अंतःकरण हें अतिसुगम भजन-स्थान आहे. ८८
८८ भजनानें देहाभिमानाचा नाश ८९
८९ अहेतुक कर्म म्हणजेच निर्दोष भजन ९०
९० निष्काम भजनच मोक्षाचें श्रेष्ठ साधन होय. ९१
९१ अनन्य भजनाचे परिणाम ९२
९२ विषयासक्ति सांडून कीर्तन करावें. ९२
९३ कीर्तन पापाचें भस्म करतें. ९३
९४ हरिकीर्तनापाशीं चारी मुक्ती दासी ९४
९५ कीर्तनांत निःशंकपणें नाच-ल्यानें आनंदप्राप्ति ९५
९६ नामसंकीर्तनानें श्रेष्ठ अनुभव-प्राप्ति ९६
९७ भक्तीचा कळवळा व उल्हास ९७
९८ भगवद्भक्तीनें चित्तवृत्ति निर्मळ होते. ९७
९९ सर्व सांडून माझी भक्ति केल्यानें जीव मुक्त होतो. ९९
१०० सर्वभावें माझी भक्ति किंवा सेवा म्हणजेच विज्ञान ९९
१०१ अनन्यभावानें देवाचें ध्यान केल्यानें निर्भयता व स्वरूपप्राप्ति १००

१०२ भक्तीवीण मुक्तीचा सोस व्यर्थ आहे. १०१
१०३ भक्ति मुक्तीपेक्षां श्रेष्ठ १०२

## ६ सद्गुरुवर्णन

१०४ गुरु-गवेषण १०४
१०५ " सद्गुरुवीण ब्रह्मज्ञान। सर्वथा नव्हे नव्हे जाण " १०५
१०६ गुरूपासून अनुग्रहप्राप्ति १०६
१०७ सद्गुरुचीं लक्षणें १०६
१०८ सद्गुरु हें चालतेंबोलतें ब्रह्म आहे. १०७
१०९ पूर्णानुभवी गुरूचे तीन प्रकार १०८
११० श्रीगुरु शिष्यास षड्गुणैश्वर्य देतात. १०९
१११ गुरुसेवा म्हणजेच परमपूजन. ११०
११२ देवास गुरुभक्तांची अतिशय आवड १११
११३ शिष्यानें मत्सरादि दोष त्यागावे. ११२
११४ सच्छिष्यानें नऊ गुण संपादावे. ११३
११५ खरा शिष्य सन्मान टाळतो. ११३
११६ शिष्याच्या स्वानंदानें गुरूस आनंद. ११४
११७ सद्गुरु हाच गुणसमुच्चयाचें प्रतीक आहे. ११५
(१) पर्वत; (२) पाणी; (३) समुद्र; (४) वारा; (५) आकाश (६) सूर्य; (७) वृक्ष; (८) अजगर
११८ सद्गुरु भवरोग—वैद्य आहेत. १२१
११९ सद्गुरु हे चित्समुद्र व कर्णधार आहेत. १२३
१२० सद्गुरु हे न दिसणाऱ्या चिद्ब्रह्माशीं लग्न लावणारे ज्योतिषी आहेत. १२४
१२१ सद्गुरु सच्चिद्घन आहेत. १२५
१२२ सद्गुरु क्षीराब्धी आहेत. १२६
१२३ सद्गुरु अमरपाते आहेत. १२७
१२४ सद्गुरु स्वानंद—वैकुंठ—पति आहेत. १२७
१२५ गुरु हा ब्रह्मस्वरूप आहे. १२८

## ७. देव आणि भक्त

१२६ आर्त, जिज्ञासू व अर्थार्थी हे ज्ञान्यामध्यें अंतर्भूत होतात. १३०
१२७ भक्त आपलीं सर्व इंद्रियें भगवंताच्या भक्तीकडे लावतात. १३१
१२८ उत्तम भक्ताचीं लक्षणें. १३२
१२९ भक्त राहतात तो देश पावन. १३५
१३० भक्त देवाचा प्राण. १३६

१३१ "भक्ताचें नाम घेतां। तुटती बंधनव्यथा ॥" १३७
१३२ "मी सर्वांभूतीं देवाधिदेवो" १३७
१३३ वायुलोकापासून कैलासापर्यंतच्या लोकांचें वर्णन. १३८
१३४ देवाची भक्तावर अनन्य प्रीति. १४१
१३५ देव भक्तांचा कैवारी. १४१
१३६ माझ्या भक्ताचे सर्वही व्यापार मदाकार होतात. १४३
१३७ मी भोळया भक्तांचें सर्वस्व आहें. १४४
१३८ "देव निजभक्ताच्या पांगें भुलला असे." १४४
१३९ देव भक्ताच्या आधीन आहे. १४५
१४० भक्तांची पूजा म्हणजे माझी पूजा होय. १४६
१४१ भक्त देवापेक्षां श्रेष्ठ. १४७
१४२ संत-सज्जन आपल्या सहजस्थितींत वर्ततात. १४९
१४३ "संतचरणीं जो विनटला। तो निजप्राप्तीसीं पावला" १५०
१४४ मुनिवर भवनदीपार उतरवितात. १५१
१४५ योगी सारग्राहक व निश्चल वृत्तीचे असतात. १५१
१४६ आत्मज्ञ वादाविवाद करीत नाहींत. १५३
१४७ साधूंचीं लक्षणें. १५४
१४८ साधू सर्वांचा सखा व सोयरा. १५५
१४९ अवधूत ब्रह्मानंदांत डुलत राहतो. १५५
१५० जीवन्मुक्त हे जडमूक पिशाचाप्रमाणें वागतात. १५६
१५१ मुक्त स्वतः आत्माराम होऊन जगाचें विश्रामधाम बनतो. १५८

## ८ अनुभव

१५२ अनुभव-सोपान. १६०
१५३ अनुभवाचे कांहीं प्रकार. १६१
१५४ घनश्याम कृष्णाचें वर्णन १६२
१५५ सर्व कर्में ईश्वररूप होतात. १६३
१५६ श्रीकृष्णस्पर्शानें कर्मेंच निष्काम होतात. १६३
१५७ परमनिर्विकल्प समाधि. १६४
१५८ ब्रह्मानंद आवरणें शक्य नाहीं. १६५
१५९ ऐक्यानुभव. १६६
१६० देव-भक्तांचें ऐक्य. १६७
१६१ हास्यवदनांतून हास्याचें, हास्यांतून आनंदाचें, व आनंदांतून परमात्म्याचें ध्यान करावें. १६७
१६२ अष्टसात्विक भाव. १६८

१६३ अनुभवानें देहाभिमानाचा नाश. १६९
१६४ अनुभवानंतर प्रपंचादिकांचें भान राहत नाहीं. १७०
१६५ आत्मज्ञास आपपर भाव नाहीं. १७१
१६६ मुक्तांची स्थिति. १७१
१६७ निजबोधाचा आनंद. १७२
१६८ निजसुख भोगणाऱ्याची स्थिति. १७३

## भाग २ : स्फुट आध्यात्मिक ग्रंथ

१६९ जनार्दनस्वामींच्या कृपेनें एकनाथ ग्रंथरचना करतात. १७५
१७० भक्ति म्हणजे काय ? १७६
१७१ तप म्हणजे काय ? १७७
१७२ ब्रह्मदेवानें केलेली तपश्चर्या. १७८
१७३ उपाय हेच अपाय ! १८०
१७४ नीतिमार्गानें मिळणारी चिरंजीवता. १८१
१७५ परमार्थाविषयीं चाड असेल तर भावार्थ मळूं देऊं नये. १८५
१७६ गुरुभक्तीवांचून परमार्थाचा मार्ग नाहीं. १८६
१७७ सद्गुरूचे चरण हें सकळ साधनामध्यें साधन होय. १८७
१७८ त्रैलोक्यव्यापिनी वस्तूची गुरुकृपेनें प्राप्ति. १८८
१७९ गुरुसेवनानें सर्वार्थसिद्धि. १९०
१८० जनार्दनकृपेनें एकनाथांत उठलेल्या आनंदलहरी. १९१
१८१ "गुरुब्रह्म अभिन्नत्वें पूर्ण । तेथें शिष्यासि नुरे भिन्नपण" १९३
१८२ "एका आणि जनार्दन । नांवें भिन्न, स्वरूपें अभिन्न" १९४
१८३ गुरुकृपेचे परिणाम. १९६
१८४ कळातीत आत्मकळेचें वर्णन. १९७
१८५ "परमात्मापरेश । जोडलिया कां डोळस । डोळे झांकी?" १९८
१८६ वस्तुप्राप्तीमुळें निष्कर्मता. १९९
१८७ अभिमान समूळ तुटून चिन्मात्रपहाट फुटणें हीच समाधि. २०१
१८८ "सर्वत्र समबुद्धि । या नांव परमसमाधि" २०२
१८९ मुक्ताच्या आत्मस्थितीचें वर्णन. २०३
१९० निःस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः ? २०५

## भाग ३ : रुक्मिणीस्वयंवर

१९१ रुक्मिणीचें कृष्णास पत्र. २०८
१९२ श्रीकृष्ण-वरपूजा. २०९
१९३ जीवशिवांचा लग्नसोहळा. २११
१९४ रुक्मिणीस समचरण-दर्शन. २१२
१९५ ग्रंथसमाप्ति व फलश्रुति. २१४

## भाग ४ : भावार्थरामायण


१९६ राम हाच भावार्थरामायणाचा कर्ता. २१६

१९७ एकनाथकालीन लोकस्थितीचें दर्शन. २१७

१९८ "श्रोत्री स्वयंपाकी संन्यासी। हे निजमाहेर विटाळासी ॥" २१९

१९९ आंधळे हे जन ! २२०

२०० कृषीवल मढें झाकून पेरणी करतो, त्याप्रमाणें मनुष्यानें हातोहातीं परमार्थ साधावा. २२२

२०१ "राजभवना"चे सात दरवाजे ओलांडून रामदर्शन घेणें हाच परमार्थ. २२३

२०२ रामप्राप्तीच्या मार्गांतील विघ्नें. २२४

२०३ नरदेह भोगूंहि नये व त्यागूंहि नये; तो भगवन्मार्गीं लावावा. २२४

२०४ भक्तियुक्त काम हींच निष्कामता. २२५

२०५ रामदर्शन केव्हां होईल ? २२६

२०६ रामकृपा होण्यास अनन्यभक्ति किंवा दृढवैरहि चालेल. २२७

२०७ साधूंची संगति हेंच मुख्य साधन ! २२८

२०८ "तुझे संगतीहूनि जाण। संगति गहन दासांची" २२९

२०९ "गुरुवाक्येंवीण जें ज्ञान। तें क्षयरोगी जन्मलें जाण" २३०

२१० सद्गुरु कोणास म्हणावें ? २३०

२११ भक्तलक्षणें व भक्तिमहिमा २३१

२१२ भागवतसंप्रदायाचा साधनमार्ग. २३३

२१३ नामस्मरणाची महति २३४

२१४ रामनाम हेंच खरें औषध. २३८

२१५ "स्त्रियांसि गळसरी कृष्णमणी। पुरुषां गळसरी नामस्मरणी" २३९

२१६ जानकी हीच रामसेवकांमध्यें आचार्य होय. २४१

२१७ हनुमंताची रामभक्ति २४२

२१८ "स्वामित्व विसरे रघुनाथ। दासत्व विसरे हनुमंत" २४४

२१९ खरें पूजन. २४५

२२० खरा भक्त. २४६

२२१ खरी समाधि. २४८

२२२ "सर्वभूतीं श्रीभगवंत। हाचि मुख्यत्वें परमार्थ" २४९

२२३ अविनाशी वस्तूचें स्वरूप. २५०

२२४ मारुतीनें मागितलेलें वरदान. २५१

२२५ –आणि रामानें दिलेलें वरदान. २५३

ग्रा. क्र. ८८०३९

# श्रीएकनाथ-वचनामृत

भाग : १
प्रकरण : १

## प्रास्ताविक

अनुक्र ९८७३९
वि. दा. १०५
क्रां. ७२
नों. दि. २०/८/५४
ग्रंथालय शाखा

### १. भानुदास-वंदन.

वंदूं भानुदास आतां । जो कां पितामहाचा पिता ।
ज्याचेनि वंश भगवंता । जाला सर्वथा प्रियकर ॥ १३१ ॥
तया भानुदासाचा चक्रपाणी । तयाचाहि सुत सुलक्षणी ।
तया सूर्यनाम ठेवुनी । निजीं निज होऊनि भानुदास ठेला ॥१३३॥
तया सूर्यप्रभाप्रतापकिरणीं । मातें प्रसवली रुक्मिणी ।
म्हणौनि रखुमाई जननी । आम्हांलागुनी साचाचि ॥ १३४ ॥
हे ग्रंथारंभकळा । वंदिली पूर्वजमाळा ।
धन्य निजभाग्याची लीळा । आलों वैष्णवकुळां जन्मोनि ॥१३६॥

भा. १. १३१–१३६

### २. श्रीजनार्दनांनीं मला भागवताची अवीट गोडी लाविली.

बाळकाहातीं दिधल्या फळा । खावें हें न कळे त्या अबळा ।
त्याचें मुखीं घालूनि गळाळा । गोडीचा जिव्हाळा जनक दावी ॥
गोडी लागल्या बाळकासी । तेंचि फळ खाय अहर्निशीं ।
तेवि जनार्दनें आम्हांसीं । गोडी श्रीभागवतासीं लाविली ॥ २१ ॥

ऐशी लाविली गोडी चढोवडी । तेणें झाली नवलपरवडी ।
मज सांडितांहि ते गोडी । गोडी न सोडी मजलागीं ॥ २२ ॥
ते गोडीनें गिळिलें मातें । मीपण गेलें गोडीआंतौतें ।
ते गोडीचें उथळलें भरितें । सबाह्य रितें उरों नेदी ॥ २३ ॥
हें शुकमुखींचें श्रेष्ठ फळ । गोडीपणें अति रसाळ ।
त्वचा आंठोळीवीण केवळ । गोडीच सकळ फळरूपें ॥ २४ ॥

भा. १५. २०-२४

## ३. श्रीजनार्दन भवगजपंचानन आहेत.

आतां वंदूं जनार्दनु । जो भवगजपंचाननु ।
जनीं विजनीं समानु । सदा संपूर्ण समत्वें ॥ ७९ ॥
जयाचेनि कृपाकटाक्षें । अलक्ष्य लक्ष्येंवीण लक्षे ।
साक्षी विसरली साक्षे । निजपक्षें गुरुत्वें ॥ ८० ॥
तेणें जीवेंवीण जीवविलें । मृत्यूवीण मरणाचि मारिलें ।
दृष्टि घेऊनि दाखविलें । देखणें केलें सर्वांग ॥ ८१ ॥
देहीं देह विदेह केलें । शेखीं विदेहपण तेंहि नेलें ।
नेलेंपणहि हारपलें । उरीं उरलें उर्वरित ॥ ८२ ॥
अभावो भांवेंसीं गेला । संदेह निःसंदेहेंसीं निमाला ।
विस्मयो विस्मयीं बुडाला । वेडावला स्वानंदु ॥ ८३ ॥

भा. १. ७९-८३

## ४. एकनाथांस सर्वत्र श्रीजनार्दनांचा अनुभव.

मी जरी नाठवीं जनार्दनासी । परी तो विसरों नेदीच आपणासी ।
हटें देतुसे आठवणेंसी । अहर्निशीं सर्वदा ॥ ४५० ॥
जिकडे जिकडे मी पाहें । तिकडे तिकडे तोचि होऊनि राहे ।
मी जरी त्याकडे न पाहें । तें न पहाणेंहि होय तो माझें ॥५१॥

जिकडे मी विसरों जाये । तिकडेचि तो येऊनि राहे ।
मी जरी त्याकडे न पाहे । तें न पहाणें होय तो माझें ।। ५२ ।।
घट्ट सांडूं पाहे आकाशासी । तंव आकाश न सांडी घटासी ।
तेवि जनार्दनु आम्हांसी । अहर्निशीं लागला ।। ५३ ।।
मी न करीं त्याची कथा । तंव तोचि होये मुखीं वक्ता ।
ऐसेनि बलात्कारें बोलविता । काय म्यां आतां करावें ।। ५४ ।।
दृश्य मी देखावया वैसें । तंव दृश्या सबाह्य जनार्दनु दिसे ।
श्रवणीं ऐकतां सौरसें । शब्दीं प्रवेशे जनार्दनु ।। ५५ ।।
आतां नाइकें न पाहें । म्हणौनि मी उगा राहे ।
तंव उगेपणाचेनि अन्वयें । जनार्दनु पाहों लागला ।। ५६ ।।

भा. ९. ४५०–५६

## ५. श्रीजनार्दनांनीं रामकृष्णादि अवतार घेऊन माझा उद्धार केला.

स्वयें खेळोनि त्यांचिया खेळा । उद्धरिलें बाळगोपाळां ।
हें नवल नव्हे त्याची कळा । उदार लीळा ते ऐका ।। ३३० ।।
पर्वत पाषाण तृण तरुवर । भृंग मत्स्य मृग मगर ।
व्याघ्र वनचर विखार । पारावत मयूर आदिकरून ।। ३१ ।।
येणेंसीं समवेत । गोकुळींचे जीव समस्त ।
स्वयें उद्धरी श्रीकृष्णनाथ । कृपाळू समर्थ स्वलीला ।। ३२ ।।
कां पितृवचन पुढारां । सीतेचिया वियोगद्वारां ।
रिसां आणि वानरां । उद्धरी निशाचरां रघुनाथ ।। ३३ ।।
सेवेनें तारिले रीसवानर । युद्धें तारिले निशाचर ।
हें नवल कांहीं नव्हे थोर । ऐक उदार लीला त्याची ।। ३४ ।।

अयोध्येपासून लंकेपर्यंत । मार्गी वृक्षवल्ली पाषाण पर्वत ।
तृणादि जीव समस्त । उद्धरी रघुनाथ स्वलीला ॥ ३५ ॥
एवं नानावतारी जनार्दन । यापरी उद्धरी सकळ जन ।
तेणें एका एकु केला पावन । हें नवल कोण मानावें ॥ ३६ ॥
परी नवल एक केलें मोटें । मज मूर्खाचे मुखावाटे ।
श्रीभागवतबोल केले मऱ्हाटे । हें आश्चर्य वाटे माझेंचि मज॥३७॥
यालागीं एका जनार्दना शरण । ज्याची कृपा ऐशी परिपूर्ण ।
त्याचे स्मरोनि श्रीचरण । केला संपूर्ण सोळावा ॥ ३८ ॥

भा. १६.३३०-३३८.

## ६. श्रीजनार्दनच मातापिता होत.

यालागीं तूं निजात्ममाये । या हेतु जंव पाहों जायें ।
तंव बापपण तुजमाजीं आहे । अभिनव काय सांगावें ॥ ४ ॥
येथ मातापिता दोन्हीं । वेगळीं असती जनीं ।
ते दोन्हीं एक करोनि । एका जनार्दनीं निजतान्हें ॥ ५ ॥
बाळका लेवविजे लेणें । तयाचें सुख तें काय जाणे ।
तो सोहळा मातेनें भोगणें । तेंवि जनार्दनें भोगिजे सुख ॥ ९ ॥
आपुल्या चिद्रत्नांच्या गांठीं । आवडीं घालिशी माझ्या कंठीं ।
यालागीं मज पाठोवाठीं । निजात्मदृष्टि सवें धांवे ॥ १० ॥
समर्थ जयाचा जनकु । त्यास मानिती सकळ लोकु ।
एका जनार्दनीं एकु । अमान्य अधिकु मान्य कीजे ॥ ११ ॥
तेणें नवल केलें येथ । मूर्खाहातीं श्रीभागवत ।
शब्दीं बोलविलें प्राकृत । एकादशार्थ देशभाषा ॥ १३ ॥

भा. २. ४-५; ९-११; १३

### ७. श्रीजनार्दनच ग्रंथ व श्रीजनार्दनच ग्रंथकर्ता.

त्या प्रश्नाचें गुह्य ज्ञान । श्रवणीं पाववीन संपूर्ण ।
वदनीं वक्ता श्रीजनार्दन । यथार्थें पूर्ण अर्थवी ॥ ७९८ ॥
पाद्य नाना मधुर ध्वनीं वाजे । परी तो वाजवी त्याचेनि वाजे ।
तेवि एका जनार्दनीं साजे । ग्रंथार्थ वोजें कविकर्ता ॥ ९९ ॥

भा. २. ७९३-७९४

जेवि चंद्रकरें साचा । मुखबंध सुटे चकोरांचा ।
तेवि एका जनार्दनाचा । संतकृपा वाचा फुटली त्यासी ॥२८९॥
जेवि सूर्यकिरणस्पर्शें । कमळकळी स्वयें विकासे ।
तेवि संतकृपासौरसें । ग्रंथु विकासे अर्थावबोधें ॥ ९० ॥
तें उत्तमोत्तम निरूपण । भरीत संतांचे श्रवण ।
जनार्दनकृपा पूर्ण । एका जनार्दन सांगेल ॥ ९४ ॥
अंगीं वारियाचेन संचरणें । घुमारा घुमों लागे तेणें ।
तेवि एका जनार्दनें । कविता करणें निजांगें ॥ ९५ ॥

भा. ४. २८९-२९०; २९४-२९५.

लेतां सिद्ध अळंकारा । कवण सांकडें लेणहारा ।
ताल राखतां खांबसूत्रा । लेपाच्या करा प्रयास काय ॥ १४ ॥
बापाचीं पक्वान्नें घेउनी । बाळ घाली बापाचें वदनीं ।
तेणें साचचि तो संतोषोनि । होय मनीं सुखाचा ॥ १५ ॥
तैशीच हेहि कथा । तूंचि ग्रंथु तूंचि कविता ।
तेथ कोणीं घ्यावी अहंता । मी कर्ता म्हणोनी ॥ १६ ॥
सूचितां अहंकाराचा झाडा । सूचनाचि होय त्याचा जोडा ।
जो आपणियातें म्हणवी वेडा । तोचि गाढा अति चतुर ॥ १८ ॥

भा. ६. १४, १५, १६, १८.

झालियां वसंताचें रिगवणें । वृक्ष सपुष्प सफळ तेणें ।
तेवि जनार्दनकृपागुणें । सार्थक वचनें कवित्वाचीं ।। ७१ ।।
गगनीं उगवला अंशुमाळी । जेवि विकासिजे नवकमळीं ।
तेवि जनार्दन कृपामेळीं । कवित्वनवाळी विकासे ।। ७२ ।।
वेणु घेऊनि हातें । विश्वा मोहिलें कृष्णनाथें ।
तेवि कवीश्वर करोनि मातें । वक्ता येथें जनार्दन ।। ७३ ।।
तो जनार्दन कृपाक्षीराब्धी । ज्याचे कृपेसी नाहीं अवधी ।
तेणें उत्तरार्धीं प्रवेशे बुद्धी । अर्थसिद्धिसमवेत ।। ७४ ।।

भा. १६. ७१–७४

स्वयें बावडी करूनि पूर्ण । तिसी उडविजे जेवि आपण ।
मग उडालेंपणें जाण । आपल्या आपण संतोषिजे ।। ५७१ ।।
तेवि मजनांवें कविता । करूनि स्वयें सद्गुरु वक्ता ।
एवं वदवूनियां ग्रंथार्था । श्रोतेरूपें सर्वथा संतोषे स्वयें ।। ७२ ।।
एका जनार्दन नांवें देख । दों नावीं स्वरूप एक ।
हें जाणें तो आवश्यक । परम सुख स्वयें पावे ।। ७५ ।।

भा. ५. ५७१–७२; ५७५

जीं हंसमुखींचीं चिद्रत्नें । जीं सनकादिकां झालीं भूषणें ।
उद्धव अळंकारिला श्रीकृष्णें । तें शेष जनार्दनें मज दीधलें ।।७५५।।
सनकादिक उद्धवाचें शेष । हातां आलें हा बोल वोस ।
ते गोष्टीसी जाहले बहुदिवस । म्हणाल वायस हा जल्पु ।। ५६ ।।
कृतयुगीं शंखासुरासी । देवें मार्दिलें होतें त्यासी ।
ते ठायीं अद्यापि सभाग्यासी । अव्हा शंखासी पावती ।। ५७ ।।

रामें पूर्वीं अयोध्येसी । केलें होतें महायागासी ।
तेथें हविःशेष लोकांसी । अद्याप हातांसी येतसे ।। ५८ ।।
तैसेंचि येथें भागवतीं । जनार्दनकृपापद्धती ।
सनकादिकांची शेषप्राप्ती । एकादशार्थी आम्हां झाली ।। ५९ ।।
मागें पुढें अवघें एक । हा एकादशाचा विवेक ।
तेणें सनकादिक उद्धवशेष । आम्हांहि देख प्राप्त झालें ।। ६० ।।
करूं नेदितां गयावर्जनीं । न रिघवे समर्थजनीं ।
ते पदीं माशीलागुनी । निवारण कोणी करीना ।। ६१ ।।
तेवि नाना शास्त्रार्थयुक्तींसी । शिणतां समर्थ साधकांसी ।
प्राप्ति नव्हे ज्ञानशेषासी । ते झाली आम्हासि एकादशें ।। ६२ ।।
हंस कृष्ण जनार्दन । स्वरूप एक नामें भिन्न ।
तेणें घालून वोधांजन । जुना ठेवा जाण दाखविला ।। ६३ ।।
तेथ मी एका एकु देखता । आणि तो एकु मातें दाखविता ।
हेंहि नुरेचि वोध्यबोधकता । पाहता पाहाविता तोचि तो ।।६४।।

भा. १३. ७५५–७६४

## ८. भागवत प्राकृत झालें तरी तें निजज्ञानाचा ठेवाच आहे.

जरी सोन्याचें पेंडकें केलें । परि तें दगडमोला नाहीं आलें ।
तैसें भागवत प्राकृत जालें । परि नाहीं चुकलें निजज्ञाना ।।४१५।।
मुक्ताफळालागीं सागरीं । बुड्या देती नानापरी ।
तें सांपडलिया घरींच्या विहिरीं । जो अव्हेरी तो मूर्ख ।। १६ ।।
धनवंतु रत्नपारखी पुरा । तेणें धुळीमाजीं देखिल्या हिरा ।
गांठीं वांधोनि आणी घरा । पारखी खरा निजज्ञानें ।। १८ ।।

तैसे ज्ञाते विद्वज्जन । ग्रंथु मराठी देखोन ।
उपेक्षा न करितां करावा यत्न । पारखोनि चिद्रत्न साधावया ॥९९॥

भा. ९. ४९५–९६; ४९८–४९९

तें श्रीधराचें श्रीव्याख्यान । भावार्थदीपिका जाण ।
त्या भावार्थाची सद्भाव खूण । केलें निरूपण देशभाषा ॥१२२॥
मुळीं बीज श्रीनारायण । ब्रह्मयाचे ठायीं पेरिलें जाण ।
तें नारदक्षेत्रीं संपूर्ण । पीक परिपूर्ण निडारलें ॥ २४ ॥
त्याचीं व्यासें दशलक्षण । संपूर्ण केलें संवगण ।
शुकें परीक्षितीच्या खळां जाण । मळूनि निजकण काढिले ॥२५॥
तेंचि शास्त्रार्थें जाण । श्रीधरें निजबुद्धी पाखडून ।
काढिले निडाराचे कण । अतिसघन सुटंक ॥ २६ ॥

भा. १६. २२, २६

संस्कृत वंद्य प्राकृत निंद्य । हे बोल काय होती शुद्ध ।
हाहि अभिमानवाद । अहंता अशुद्ध परमार्थी ॥ १०२५ ॥
मोलें भूमी खणितां वैरागरी । अवचटें अनर्घ्यरत्न लाभे करीं ।
तें रत्न सांपडल्या केरीं । काय चतुरीं सांडावें ॥ २६ ॥
तेवि संस्कृत आटाटी । सहसा परमार्थी नव्हे भेटी ।
तेचि जोडल्या मराठीसाठीं । तेथ घालिती मिठी सज्ञान ॥२७॥
जो जो भाषाअभिमान । तो तो वक्त्यासी बाधक पूर्ण ।
ज्या भाषां केलें ब्रह्मकथन । तें होय पावन हरिचरणीं ॥३२॥
महारायाच्या ताटापाशीं । रिगमु नाहीं समर्थांसी ।
तेथें सुखेंसीं बैसे माशी । तेवि हा आम्हांसि प्राकृत ग्रंथ ॥१०३८॥

भा. २९. १०२५–१०३८

जेवि सूर्याचेनि प्रकाशें । सूर्येंचि कीं सूर्यो दिसे ।
तेवि माझेनि निजप्रकाशें । मज मीचि असें देखत ॥ ७६९ ॥
ऐसियाहि ठायीं जाण । कैंचें नवें जुनें ज्ञान ।
बहुकाळ ठेविलें सुवर्ण । त्यासी म्हणे कोण कुहिजकु ॥ ७० ॥
कालचाचि आजि उगवला । तो सूर्य काय म्हणावा शिळा ।
कीं आजिचा अग्नि सोंवळा । कालिचा काय वोंवळा म्हणों ये ॥
तेवि सनकादिकांचें जें ज्ञान । तेंचि मराठी भाषेमाजीं जाण ।
येथें ठेवूं जातां दूषण । दोषी आपण होइजे ॥ ७२ ॥
कां सुवर्णाचें केलें सुणें । परि तें मोलें नव्होचि उणें ।
तेवि सनकादिकांचीं ज्ञानें । देशभाषा हीनें नव्हतीच ॥ ७३ ॥
जेवि कां गुळाचें कारलें केलें। परी तें कडूपणा नाहीं आलें ।
तेवि हंसगीत मराठें झालें । नाहीं पालटलें चिन्मात्र ॥ ७४ ॥
जें मोल मुकुटींच्या हेमासी । तेंचि मोल सुवर्णश्वानासी ।
जो कां ग्राहिक सुवर्णासी । दोघे दोघांसी समत्वें ॥ ७५ ॥
तैसें आत्मानुभवी जे येथें । ते मानितील या ग्रंथातें ।
येर ते हेळसितील यातें । निजभावार्थें न घेती ॥ ७६ ॥
जे वंदिती कां निंदिती । ते दोघे आम्हां ब्रह्ममूर्ती ।
हे निजात्मभावाची प्रतीती । केली निश्चितीं जनार्दनें ॥ ७७ ॥
तेथें एका आणि जनार्दन । एक झाले हें म्हणे कोण ।
जेवि डोळ्यांचें देखणेपण । डोळाचि आपण स्वयें जाणे ॥ ७९ ॥
डोळ्यांनीं आरिसा प्रकाशिजे । तेथें डोळेनि डोळा पाहिजे ।
तेवि हें ज्ञान जाणिजे । देखणें देखिजे देखणेनि ॥ ७८० ॥

भा. १३. ७६९–७७७; ७७९–७८०

## ९. ग्रंथरचनेचा स्थलकालनिर्देश.

वाराणसी महामुक्तिक्षेत्र । विक्रमशक वृष संवत्सर ।
शके सोळाशें तिसोत्तर । टीका एकाकार जनार्दनकृपा ॥५५२॥
महामंगळ कार्तिकमासीं । शुक्लपक्ष पूर्णिमेसीं ।
सोमवार शिवयोगेसीं । टीका एकादशी समाप्त जाहली ॥५३॥
स्वदेशींचा शक संवत्सर । दंडकारण्य श्रीरामक्षेत्र ।
प्रतिष्ठान गोदावरीतीर । तेथील उच्चार तो ऐका ॥ ५४ ॥
शालिवाहन शक वैभव । संख्या चौदाशें पंचाणव ।
श्रीमुख संवत्सराचें नांव । टीका अपूर्व तैं जाहली ॥ ५५ ॥

भा. ३१. ५५२–५५५

## १०. व्यासश्रीधरादिकांस वंदन.

आतां वंदूं महाकवी । व्यास वाल्मिक भार्गवी ।
जयातें उशना कवी । पुराणगौरवीं बोलिजे ॥ ११५ ॥
तिहीं आपुलिये व्युत्पत्ती । वाढवावी माझी मती ।
हेचि करीतसें विनंती । ग्रंथ समाप्ती न्यावया ॥ १६ ॥
वंदूं आचार्या शंकरु । जो कां ग्रंथार्थविवेकचतुरु ।
सारूनि कर्मठतेचा विचारु । प्रबोधदिनकरु प्रकाशिला ॥ १७ ॥
इतरही टीकाकार । काव्यकर्ते विवेकचतुर ।
त्यांचे चरणीं नमस्कार । ग्रंथा सादर तिहीं होआवें ॥ १८ ॥
आतां वंदूं श्रीधर । जो भागवतव्याख्याता सधर ।
जयाची टीका पाहतां अपार । अर्थ साचार पैं असे ॥ १९ ॥
वंदूं प्राकृत कवीश्वर । निवृत्तिप्रमुख ज्ञानेश्वर ।
नामदेव चांगदेव वटेश्वर । ज्यांचें भाग्य थोर गुरुकृपा ॥ २० ॥

जयांचे ग्रंथ पाहतां । ज्ञान होय प्राकृतां ।
तयांचे चरणीं माथा । निजात्मता निजभावें ॥ २१ ॥
भा. १. ११

अनुक्रम ...

## ११. भागवतक्षेत्राचें रूपकात्मक वर्णन.

श्रीभागवत महाक्षेत्र । तेथ ब्रह्मा मुख्य बीजधर ।
नारद तेथ मिरासीकर । पेरणी विचित्र तेणें केली ॥ ४३ ॥
तेथ श्रीव्यासें अति शुद्ध । बांधारे घातले दशविध ।
पीक पिकलें अगाध । स्वानंदबोध निडारे ॥ ४४ ॥
तेथ शुक बैसला सोंकारा । तेणें फोडिला हरिकथापागोरा ।
पापपक्ष्यांचा थारा । उडविला पुरा निःशेष ॥ ४५ ॥
त्याची एकादशी जाण । उद्धवें केली संवगण ।
काढिले निडाराचे कण । आंत सघन कृष्णोक्ती ॥ ४६ ॥
तेथ नानायुक्ती पडिपाडी । उत्तमोत्तम प्रश्न परवडी ।
केलीं पक्कान्नें चोखडीं । त्यांची नीचनवी गोडी अविनाशी ॥४७॥
ते अविनाशी निजगोडी । पदोपदीं अति चोखडी ।
एकादशामाजीं रोकडी । उद्धवाचिये जोडी उपकार जगा ॥४८॥
त्या उद्धवाचे मागले पंक्ती । त्यक्तोदक श्रवणार्थी ।
शुकमुखें परीक्षिती । निजात्मतृप्ती निवाला ॥ ४९ ॥
त्या समर्थाचिये पंक्ती । भावार्थदीपिका धरोनि हातीं ।
श्रीधरें दावितां पदपदार्थी । निजात्मस्थितीं निवाला ॥ ४५० ॥
तेथ देशभाषापदपक्षेंसीं । एका जनार्दनकृपेची माशी ।
तृप्ति होय अवघ्यांसरशीं । निषेध तिसी असेना ॥ ५१ ॥
एका जनार्दनीं मांजर वेडें । भावार्थदीपिका उजियाडे ।
हे रस देखोनि चोखडे । ताटापुढें पैं आलें ॥ ५२ ॥

मीयों मीयों करितां स्मरण । कृपेनें तुष्टले सज्जन ।
शेषप्रसाद देऊनि जाण । संतप्त तृप्त पैं केले ॥ ५३ ॥
एका जनार्दनाचें पोसणें । मी मांजर झालों नीचपणें ।
चाटितां संताचें शेषभाणें । म्यां तृप्ति पावणें परिपूर्ण ॥ ५४ ॥
हो कां त्या समर्थांच्या ताटीं । पूर्ण ब्रह्मरसें भरली वाटी ।
ते मी अत्यंत प्रेमें चाटी । स्वानंदपुष्टी संतोषे ॥ ५५ ॥
जो काया मनें आणि वाचा । सद्भावें विनीत होय नीचा ।
तो अधिकारी एकादशाचा । हा जनार्दनाचा उपदेश ॥ ५६ ॥

भा. ३१. ४४३-४५६

## १२. ग्रंथसमाप्ति

धरोनि बाळकाचा हात । बाप अक्षरें स्वयें लिहवित ।
तैसा एकादशाचा अर्थ । बोलविला परमार्थ जनार्दनें ॥ ४९७ ॥
कैसा चालवावा ग्रंथ । केवि राखावा पदपदार्थ ।
ये व्युत्पत्तीची नेणे मी मात । बोलवी समर्थ जनार्दन ॥ ९८ ॥
जनार्दनें ऐसें केलें । माझें मीपण निशे:ष गेलें ।
मग परमार्थी अर्थविले । बोलवूनि बोले निजसत्ता ॥ ५०१ ॥
खांबसूत्रीं बाहुली । सूत्रधार नाचवी भली ।
तेवि ग्रंथार्थाची बोली । बोलविली श्रीजनार्दनें ॥ २ ॥
अवघा जनार्दनाचि देखा । तोचि आडनांवें झाला एका ।
तेणें नामें ग्रंथ नेटका । अर्थी सात्विका तत्वार्थ दावी ॥ ३ ॥
एका जनार्दनाचा वृत्तान्त । एक म्हणती भक्तियुक्त ।
एक म्हणती जीवन्मुक्त । प्रपंची निश्चितीं मानिती एक ॥ ६ ॥
अहो हा एका जनार्दन । नाहीं आसन न देखे ध्यान ।
नेम मुद्रा माळा जाण । उपासनलक्षण या नाहीं ॥ ७ ॥

कोण मंत्र असे यासी । काय उपदेशी शिष्यांसी ।
मंत्र न दे कोणासी । भुललीं भाविकें त्यांसी या भावार्थें ॥ ८ ॥
नुसत्या हरिनामाचा घोख । लावूनि भुलविले येणें लोक ।
ऐसे नाना विकल्प जनार्दन देख । उपजवी स्वयें ॥ ९ ॥
मी जेथ झाडा देऊं जाये । तें बोलणें जनार्दन होये ।
युक्तिप्रयुक्तीचें पाहे । मीपण न राहे मजमाजीं ॥ ५१० ॥
एवं माझें मीपण समूळीं । जनार्दन स्वयें निर्दळी ।
माझी जे हाले अंगुळी । ते क्रिया चाळी जनार्दन ॥ ११ ॥
निमेषोन्मेषांचे संचार । श्वासोच्छ्वासांचे परिचार ।
सकळ इंद्रियांचा व्यापार । चाळिता साचार जनार्दन ॥ १२ ॥
जेथ मी म्हणों जाय कविता । ते जनार्दनचि होय तत्वता ।
माझें मीपण धरावया पुरता । ठाव रिता नुरेचि ॥ १३ ॥
माझें जें कां मीपण । जनार्दन जाहला आपण ।
एका जनार्दना शरण । ग्रंथ संपूर्ण तेणें केला ॥ १४ ॥
या ग्रंथा आदर करिती । अथवा जे कां उपेक्षिती ।
केवळ जे कोणी निंदिती । तेहि आम्हां ब्रह्ममूर्ती सद्गुरुरूपें॥१९॥
हेंहि शिकविलें जनार्दनें । सर्वभूतीं मजाचि पहाणें ।
प्रकृतिगुणांचीं लक्षणें । सर्वथा आपणें न मानावीं ॥५२०॥
ऐसें देवोनि वरदान । हृदयीं आलिंगी जनार्दन ।
म्हणे या ग्रंथीं ज्याचें भजन । त्याचें भवबंधन मी छेदीं ॥४६॥
हेहि अलंकारपदवी । स्वयें जनार्दन बोलवी ।
एवं कृपा केली जनार्दनदेवीं । हें ठेवाठेवी मी नेणें ॥४७॥
शालिवाहन शक वैभव । संख्या चौदाशें पंचाणव ।
श्रीमुख संवत्सराचें नांव । टीका अपूर्व तें जाहली ॥५५॥

एकादश म्हणिजे एक एक । तेथें दुजेपणाचा न रिघे अंक ।
तोचि एकादश इंद्रियीं सुख । एकत्वें अलौकिक निडारलें पूर्ण ॥५८॥
त्या एकादशाची टीका । एकरसें करी एका ।
ते एकत्वाच्या निजसुखा । फळेल साधकां निजकृपा ॥५९॥
हा ज्ञानगर्भ चिद्रत्न । यथार्थ अर्थविला संपूर्ण ।
माझेनि नांवें श्रीजनार्दन । ग्रंथकर्ता आपण स्वयें जाहला ॥५६०॥
एका जनार्दना शरण । जनार्दना पढिये एकपण ।
जेवि कां सूर्याचे किरण । सूर्यतेजें पूर्ण निरसी तम ॥ ६१ ॥
तेवि जनार्दनतेजें जाण । प्रकाशलें एकपण ।
तेणें प्रकाशें ग्रंथ संपूर्ण । जनार्दनार्पण एकपणेंसीं ॥६२॥
जनीं जनार्दन एक । जाणे तो सुटला निःशेख ।
हेंचि नेणोनिया लोक । गुंतले अनेक भवचक्रीं ॥ ५६३ ॥

भा. ३१. ४९७–५६३

## १३. फलश्रुति

ग्रंथारंभ प्रतिष्ठानीं । तेथ पंचाध्यायी संपादूनि ।
इतर ग्रंथाची करणी । आनंदवनीं विस्तारिली ॥ ५२७ ॥
अविमुक्त महाश्मशान । वाराणसी आनंदवन ।
एकासचि नांवें जाण । ऐका लक्षण त्याचेंहि ॥२८॥
अतिशयें जेथ मुक्ती । अधमोत्तमां एकी गती ।
पुढती नाहीं पुनरावृत्ती । अविमुक्त म्हणती या हेतु ॥२९॥
जे श्मशानीं सांडिल्या प्राण । प्राणी पुनः न देखे मसण ।
या लागीं हें महाश्मशान । अंतीं ब्रह्मज्ञान शिव सांगे ॥५३०॥
तया वाराणसीं मुक्तिक्षेत्रीं । मणिकर्णिका महातीरीं ।
पंचमुद्रापीठामाझारीं । एकादशावरी टीका केली ॥३५॥

ऐकतां संतोषले सज्जन । स्वानंदें तुष्टला जनार्दन ।
पंचाध्यायी संपतां जाण । स्वमुखें आपण वरद वदला ॥३६॥
ग्रंथ सिद्धि पावेल यथार्थी । येणें सज्ञानहि सुखी होती ।
मुमुक्षु परमार्थ पावती । साधक तरती भवसिंधु ॥३७॥
भाळे भोळे विषयी जन । याचें करितां श्रवण पठण ।
हरिभक्त होती जाण । सन्मार्गी पूर्ण बहुत होती ॥३८॥
हे टीका तरी मराठी । परि ज्ञानदानें होईल लाठी ।
ऐसें निजमुखीं बोलोनि गोठी । कृपादृष्टी पाहिलें ॥ ३९ ॥
तेथ म्यांहि केली विनंती । जे ये ग्रंथीं अर्थार्थी होती ।
त्यांसी ब्रह्मभावें ब्राह्मणभक्ती । नामीं प्रीती अखंड द्यावी ॥५४०॥
ते न व्हावे ब्रह्मद्वेषी । निंदा नातळावी तयांसी ।
समूळ क्षय ब्रह्मद्वेषेंसीं । निंदेपासीं सकळ पापें ॥ ४१ ॥
ऐसी ऐकतां विनवण । कृपेनें तुष्टला जनार्दन ।
जें जें माझें वरदान । वरद आपण स्वयें वदला ॥ ४२ ॥
ये ग्रंथीं ज्या अनन्यभक्ती । निंदा द्वेष नुपजे चित्तीं ।
रामनामीं अतिप्रीती । सुनिश्चितीं वाढेल ॥ ४३ ॥
अविद्य सुविद्य व्युत्पत्ती । न करितां ब्राह्मणजाती ।
ब्रह्मत्वें होईल ब्राह्मणभक्ती । तेणें ब्रह्मप्राप्ती अचुक ॥४४॥
नामापरता साधनसद्भावो । नाहीं ब्राह्मणापरता आन देवो ।
तो ये ग्रंथीं भजनभावो । नीचनवा पहा हो वाढेल ॥ ४५ ॥

भा. ३१. ५२७–४५.

## प्रकरण : २

# तत्त्वज्ञान

### १४. पुरुष अव्यक्त, तर प्रकृति व्यक्त आहे.

तेवि पुरुषाचें ईक्षण । प्रकृति लाहोनि आपण ।
उत्पत्ति स्थिति निर्दळण । करावया पूर्ण सामर्थ्य पावे ॥१७८॥
छायामंडपींचें विचित्र सैन्य । दिसावया दीपाचि कारण ।
तेवि प्रकृतिकार्यासी जाण । केवळ ईक्षण पुरुषाचें ॥ ७९ ॥
जगाचें आदिकारण । प्रकृति होय गा आपण ।
प्रकृति प्रकाशी पुरुष जाण । तो महाकारण या हेतु ॥ १८० ॥
प्रकृति व्यक्त पुरुष अव्यक्त । हे विकारी तो विकाररहित ।
हे गुणमयी गुणभरित । तो गुणातीत निजांगें ॥ ८१ ॥
प्रकृति स्वभावें चंचळ । पुरुष अव्ययत्वें अचळ ।
प्रकृति बद्धत्वें सबळ । पुरुष केवळ बंधातीत ॥ ८२ ॥
प्रकृति स्वभावें सदा शून्य । पुरुष केवळ चैतन्यघन ।
प्रकृतीसि होय अवसान । पुरुष तो जाण अनन्त ॥ ८३ ॥
प्रकृति केवळ निरानंद । यालागीं तेथ विषयछंद ।
पुरुष पूर्ण परमानंद । विषयकंदछेदक ॥ १८४ ॥

भा. २२. १७८–१८४

### १५. प्रकृतिपुरुषांची अनन्यप्रीति व एकात्मता.

तो पुरुष ते पतिव्रता । दोघां अनन्यप्रीति एकात्मता ।
येरयेरां वेगळीकता । पाऊल सर्वथा न घालिती ॥ ११ ॥

दोघां एकत्र सदा असणें । दोघांसी एकाचि नेसणें ।
दोघां एका सत्ता बैसणें । दोघें एकाचि प्राणें वर्तती ॥ १२ ॥
नवल बाइलेचें करणें । नपुंसका पुरुषत्व इनें देणें ।
मग तिचेनि आधीनपणें । पुरुषें नाचणें सर्वदा ॥ १५ ॥
मग हा तिचेनि डोळां देखे । मग हा तिचेनि बोले मुखें ।
तिचेनि भोगी हा सुखदुःखें । बंधमोक्ष चाखे तिचेनि ॥ १६ ॥
नवल दोघांची सोयरिकी । दोघीं भावंडें होतीं सखीं ।
तो बाप ती त्याची लेकी । पाहतां विवेकीं तो पुत्र तिचा ॥२०॥
यापरी अगम्या गमन । तिहीं दोघीं करोनि जाण ।
वाढविले अनेक जन । तिसरेंपण नातळतां ॥ २१ ॥
दोघांची अति प्रीति ऐशी । अनन्य मिळणी अनन्याशीं ।
दोघे अणूमाजीं सावकाशी । निजरहिवासी नांदत ॥ २९ ॥
पतिविण ते पतिव्रता । सगळी विरे ते सर्वथा ।
प्रियेविण असतीच नसतां । होय कांहीं नव्हता भर्तारु ॥ ३० ॥
नवल तें मीं सांगावें काये । स्त्री जोडी तें पुरुष खाये ।
तियेविण तो पाहे । कहीं न लाहे कवडाहि ॥ ३४ ॥

भा. २४. ११-३४

## १६. बीज व कोंड्याप्रमाणें पुरुष व प्रकृति अभिन्नपणें जोडलेलीं आहेत.

वस्तुता विकाराच्या ठायीं । ज्ञात्यासी बोलावया विशेष नाहीं ।
विकार ते प्रकृतीच्या ठायीं । आत्मा शुद्ध पाहीं अविकारी ॥२२७॥
प्रकृतिहूनि वेगळेपण । पुरुषाचें जाणावया आपण ।
यालागीं उद्धवा जाण । तत्त्वविवंचन साधावें ॥ २२९ ॥

ए. व. २

हें ऐकोनि कृष्णवचन । उद्धव चमत्कारला जाण ।
प्रकृतिपुरुषांचें भिन्नपण । देवासी आपण पुसों पां ॥ २३० ॥
जैसा तप्त लोहाचा गोळ । दिसे अग्नीचि केवळ ।
तेवि प्रकृतिपुरुषांचा मेळ । दिसे सबळ एकत्वें ॥ २३५ ॥
जेवि बीज धरोनियां पोटेंसीं । निकणु कोंडा वाढे कणेंसीं ।
तेवि प्रकृति जाण पुरुषेंसीं । अभिन्नतेसीं जडलीसे ॥ २३६ ॥
कां नारळ चोख धरोनि पोटीं । नीरस कठिण वाढे नरोटी ।
तेवि पुरुषयोगें प्रकृति लाठी । झाली सृष्टि अनिवार ॥ २३७ ॥
कणावेगळा कोंडा न वाढे । तेवि पुरुषावेगळी प्रकृति नातुडे ।
हें प्रकृतिपुरुषांचें बिरडें । तुज वेगळें निवाडें निवडेना ॥ २३८ ॥
जेवि कां शिंपीचे अंगीं । जडलीं रुपेपणाची झगी ।
तेवि पुरुषाच्या संयोगीं । प्रकृति जगीं भासत ॥ २३९ ॥
तीक्ष्ण रविकरसंबंधीं । भासे मृगजळाची महानदी ।
तेवि पुरुषाच्या संबंधीं । प्रकृति त्रिशुद्धी आभासे ॥ २४० ॥

भा. २२. २२७–२४०

## १७. ज्ञानाग्नीनें त्रिगुणांची होळी होते.

दैवें वायूच्या कल्लोळीं । परस्परें वेळू जाळी ।
स्वजातिकांचणीं इंगळी । पेटली ते होळी वनाची करी ॥१८९॥
अग्नि उपजला जें कांडीं । तेंहि कांडें जाळूनि सांडी ।
वनीं नुरवूनियां काडी । स्वयें राखोंडी होऊनि विझे ॥ १९० ॥
तेवि वैराग्याभ्यासवायूंनीं । होतां त्रिगुणांची कांचणी ।
तेथें प्रकटला ज्ञानाग्नि । अविद्यावनीं दाहकू ॥ ९१ ॥
तो हरिगुरुकृपा खवळला । वृत्तिरूपें प्रज्वळला ।
देहद्वयेंसीं लागला । प्रवर्तला गुणांतें जाळूं ॥ ९२ ॥

जळाल्या आशातृष्णेच्या पाळी । जळालीं कामलोभांचीं कोल्हीं ।
क्रोधव्याघ्राची होळी झाली । आगी लागली मद्गजा ॥ ९३ ॥
जाळिली स्नेहाची आरांटी । जाळिली असत्याची बोरांटी ।
जाळिला मोह अजगरु उठाउठीं । जाळिला शेवटीं काळविट काळु ॥
उठिला अहंकाराचा सोरू । धरितां न धरे अनिवारू ।
तोहि जाळिला दुर्धरू । वणवा चौफेरू कोंडला ॥ ९५ ॥
पळूनि जावया पुरता । अणुभरी ठावो नुरेचि रिता ।
एवं जळाला तो पळतपळतां । अहंसोरू सर्वथा निमाला ॥९६॥
नवल अग्नीचें विंदाण । आपणिया जाळी आपण ।
दाहक शक्तीतें जाळून । स्वस्वरूपीं जाण उपरमे ॥ १९७ ॥

भा. १३. १८९-१९७

## १८. गुरुशिष्यांच्या संवादाचें मंथन म्हणजेच ब्रह्मविद्या.

तैसी ब्रह्मविद्या जाण । गुरुशिष्यसंवादमंथन ।
त्या मंथनाचें निरोपण । सावधान परियेसीं ॥ २४० ॥
येथ आचार्या आद्य अरणी । शिष्य तो जाला उत्तरारणी ।
उपदेश तो मंथास्थानीं । संवादमंथनीं मंथावें ॥ ४१ ॥
ये मथनीं जरी आळसु केला । तरी ज्ञानाग्नीचा आविर्भाव गेला ।
आपणिया आपण वंचला । थित्या मुकला साधना ॥ ४२ ॥
धरितां आळसाची मागी । येव्हडा अनर्थु वाजे अंगीं ।
आठही प्रहर शिणताति योगी । या योगालागीं साधावया ॥४३॥
निजस्वार्थालागीं सावधान । गुरुवचनाचें अनुसंधान ।
अविश्रम करितां मंथन । ब्रह्मज्ञान तैं प्रकटे ॥ ४४ ॥

प्रकटलें ब्रह्मज्ञान । उरों नेदी देहाचें भान ।
दृश्य द्रष्टा दर्शन । करी प्राशन तत्काळ ॥ ४५ ॥
ऐसा मुमुक्षु अधिकारवंतु । त्यासी शाब्दपरानिष्णातु ।
गुरूंनीं माथां ठेविला हातु । निजबोध प्राप्तु तत्काळें ॥ ३४९ ॥

भा. १०. ३४०-३४९

## १९. तत्त्वें अनेक कीं एक?

येथ तत्वसंख्या मतवाद । ऋषीश्वरांमाजीं विवाद ।
त्या विवादाचे शब्द । ऐक विशद सांगेन ॥ ४० ॥
एक म्हणे तत्त्वें सव्वीस । दुजा म्हणें उगा वैस ।
वहु बोलावया नाहीं पैस । तत्त्वें पंचवीस नेमस्त ॥ ४१ ॥
तिजा म्हणें तुम्हीं येथ । कैसेनि वाढविलें स्वमत ।
तत्वें नेमस्ताचि सात । कैचीं बहुत बोलतां ॥ ४२ ॥
एक म्हणे हें अभिनव । बोलतां न लाजती मानव ।
वृथा बोलाची लवलव । तत्त्वें नव नेमस्त ॥ ४३ ॥
तंव हांसोनि बोलें एक । सांपें सज्ञान झाले लोक ।
मिथ्या बहुतत्वजल्पक । तत्वषट्क नेमस्त ॥ ४४ ॥
एक म्हणती परते सरा । नेणा तत्वसंख्या विचारा ।
तत्वें नेमिलीं अकरा । वडबड सैरा न करावी ॥ ४५ ॥
दुजा म्हणे तत्वविचारा । नेणोनि धरिसी अहंकारा ।
पुसोनियां थोरथोरां । तत्वे सतरा नेमस्त ॥ ४६ ॥
एक म्हणे व्युत्पत्तीबळा । कां व्यर्थ पिटाल कपाळा ।
न कळे भगवंताची लीळा । तत्वें सोळा नेमस्त ॥ ४७ ॥
एक म्हणे या गर्वितां पोरां । कोण पुसे तत्वविचारा ।
तत्वें नेमस्ताचि तेरा । निजनिर्धारा म्यां केलें ॥ ४८ ॥

एक म्हणे सांडा चातुरी । तत्वें नेमस्तचि चारी ।
दुजा म्हणे या कायशी कुसरी । तत्वें निर्धारीं दोनाचि ॥ ४९ ॥
तिजा म्हणे वाचाट लोक । कोणें धरावें यांचें मुख ।
निजनिर्धारीं तत्व एक । एकाचे अनेक विस्तार ॥ ५० ॥

भा. २२. ४० ते ५०

## १९ (अ) देहच नाहीं तर बंध कोठला?

जैं डोंगरासी तरळ भरे । मृत्तिका नाहाणालागीं झुरे ।
कोळशानें काळें होय अंधारें । तैं भवबंधभारें देह दाटे ॥१३३॥
म्हणसी देहात्मसंगतीं । घडे भवबंधाची प्राप्ती ।
विचारितां तेही अर्थीं । न घडे श्रीपति तें ऐक ॥ ३४ ॥
आत्मा स्वप्रकाश महावन्ही । देह तो जडमूढ काष्ठस्थानीं ।
तो मिळतां आत्ममिळणीं । सांडी जाळूनि तत्काळ ॥ ३५ ॥
जैं अग्निमाजीं संवादें । कापूर आठ प्रहर नांदे ।
तैं देहात्मनिजसंबंधें । देह भवबंधें नांदता ॥ ३६ ॥
म्हणती काष्ठामाजीं अग्नि असे । परी तो काष्ठचि होऊनि नसे ।
मथूनि काढिल्या निजप्रकाशें । जाळी अनायासें काष्ठातें ॥३७॥
तेवि आत्मा देहामाजीं असे । परी तो देह होऊनि नसे ।
देहप्रकाशक चिदंशें । भवबंधपिसें त्या न घडे ॥३८॥
(आशंका)म्हणसी आत्म्याचे निजसंगतीं । जैं जळोनि जाय भूतव्यक्ती ।
तैं भूतांची वर्तती स्थिती । कैशा रीतीं तें ऐक ॥३९॥
छायामंडपीं दीप प्रकाशी । नाचवी कागदांच्या बाहुल्यांसीं ।
तेंच लावितां दीपासी । जाळी अनायासीं त्या व्यक्ति ॥१४०॥
तेवि आत्म्याचे स्वसत्ताशक्ती । भूतें दैवयोगें वर्तती ।
स्वयंभू झाल्या आत्मस्थिती । भूतव्यक्ती उरेना ॥४१॥

करितां आत्म्याचें अनुसंधान । संसाराचें नुरे भान ।
तेथ भूताकृती भिन्न भिन्न । कैंच्या जाण अतिवद्ध ॥४२॥
यापरी भवबंधन । मज पाहतां मिथ्या जाण ।
भवबंधालागीं स्थान । नेमस्त जाण असेना ॥१४३॥

भा. २८. १३३-१४३

## २०. आत्म्यास जन्म व भवबंध नाहींत.

आत्म्याच्या ठायीं ना देहीं । उभयसंबंधींही नाहीं ।
भवबंध मिथ्या पाहीं । यासी ठावो कोठेंही असेना ॥ १४४ ॥
कोपों नको श्रीकृष्णनाथा । माझेनि निजनिर्धारें पाहतां ।
भवबंध मिथ्या तत्वतां । निश्चयें चित्ता मानले ॥ ४५ ॥
ऐकोनि उद्धवाचें वचन । हरिखें वोसंडला श्रीकृष्ण ।
माझा उद्धव झाला सज्ञान । निजात्मखूण पावला ॥ ४६ ॥
सत्य मिथ्या भवबंधन । ऐकोनि उद्धवाचें वचन ।
परमानंदें डोले श्रीकृष्ण । जीवें निंबलोण करूं पाहे ॥ ४७ ॥
आत्म्यास भवबंध नाहीं । शेखीं न दिसे देहाच्या ठायीं ।
हा विवेक नेणिजे जिहीं । त्यांसी भवबंध पाहीं हरि सांगे ॥४८॥
देहासी येतां मरण। मी मेलों म्हणे तो आपण ।
देहासी जन्म होतां जाण । जन्मलेंपण स्वयें मानी ॥ ५३ ॥
इंद्रियें विषयो सेविती । ते म्यां सेविले मानी निश्चितीं ।
स्वर्गनरक भोगप्राप्ती । सत्य मानिती देहात्मता ॥ ५४ ॥
अन्न आकांक्षी प्राण । त्यातें भक्षी हुताशन ।
तत्साक्षी चिदात्मा आपण । तो म्हणे म्यां अन्न भक्षिलें ॥ ५५ ॥
हे अवघे माझे धर्म । ऐसा आत्म्यासी जंव दृढ भ्रम ।
तंव मिथ्याचि अति दुर्गम । संसारविषय भ्रमें भोगी ॥ ५६ ॥

त्या भोगाचें फळ गहन । अविश्रम जन्ममरण ।
स्वर्गनरक पापपुण्य । असें आपण सत्य मानी ॥ १५७ ॥

भा. २८. १४४ ते १५७

## २१. आत्मा पापपुण्यातीत आहे.

दोराचा साप खिळोनि मंत्रीं । मंत्रवादी निःशंक धरी ।
न खिळितां जो धरी करीं । त्यासीही बाधा न करी तो ॥३२४॥
जो मृगजळीं पोहोनि निघाला । तो दैवाच्या कडे पाहिला ।
पोहेचिना तो नाहीं बुडाला । कोरडा आला ऐलतीरा ॥२५॥
तेवि देहेन्द्रियाचें मिथ्या भान । जाणोनि झाले जे सज्ञान ।
त्यांसी इंद्रियांचें बंधन । सर्वथा जाण असेना ॥२६॥
जयासी माझें अपरोक्ष ज्ञान । तेणें घालोनियां आसन ।
अखंड करितां ध्यान । अधिक उपेग जाण असेना ॥ २८ ॥
अथवा तो इंद्रियासंगतीं । दैवें अनेक विषयप्राप्ती ।
भोगितांही अहोरातीं । ब्रह्मस्थिती भंगेना ॥ २९ ॥
परि सूर्य आणि आभाळासी । भेटी नाहीं कल्पान्तेंसीं ।
तेंवि इंद्रियकर्म सज्ञानासी । कदा काळेंसीं स्पर्शेना ॥३५॥
अभ्र आच्छादी जगाचे डोळे । जग म्हणे सूर्य आच्छादिला आभाळें ।
ऐसेंचि विपरीत ज्ञान कळे । मायामेळें भ्रान्तासी ॥३६॥
घटीं चंद्रबिम्ब दिसे । तें घटासी स्पर्शिलें नसे ।
ओलें नव्हे जळरसें । देहीं जीव असे अलिप्त तैसा ॥३५०॥
ते घटीं कालविल्या शेण । बिंब प्रतिबिंबा नातळे जाण ।
तेंवि देहींचें पापाचरण । जीवशिवस्थान ठाकीना ॥ ५१ ॥
घटीं कालविल्या कस्तुरी । बिंब प्रतिबिंब सुवास न धरी ।
तेंवि देहींच्या पुण्याची थोरी । जीवशिवावरी पावेना ॥५२॥

ते निवारावया वद्धता । त्यजावी विषयलोलुपता ।
विषयत्यागेंवीण सर्वथा । नित्यमुक्तता घडेना ॥५९॥
न जोडतां नित्यमुक्तता । साधक जरी झाला ज्ञाता ।
तेणें ज्ञातेपणें सर्वथा । विषयासक्तता न करावी ॥३६०॥

भा॰ २८. ३२४ ते ३६०

जग प्रत्यक्ष डोळां दिसें । तें तूं निर्मूळ म्हणसी कैसें ।
हे आशंका मानिसी मानसें । ऐक अनायासें तो वोध ॥१०३॥
सूर्य संमुख पूर्वेच्यांसी । तोचि विमुख पश्चिमेच्यांसी ।
मी सर्वत्र (संमुख) सर्वांसी । विमुखता मजसी असेना ॥०९॥
वडील निमाले देखती । पुत्र पौत्र स्वयें संस्कारिती ।
तरी स्वमृत्यूची चिंता न करिती । पडली भ्रान्ती देहलोभें ॥१९॥
पुत्र पितरा पिंडदान देती । उत्तम गती त्यांची चिंतिती ।
आपुली गति न विचारिती । नश्वर आसक्ती देहलोभें ॥२०॥
आत्मा चिद्रूप अविनाशी । गुण निर्गुण नातळे ज्यासी ।
कर्माकर्म पापपुण्यांसी । ठाव ज्यापाशीं असेना ॥ २५ ॥
परादिवाचा नव्हे उच्चार । यालागीं म्हणिपे परात्पर ।
प्रकृति गुणीं अनिवार । प्रकृतिपर परमात्मा ॥ २६ ॥
जयाच्या स्वप्रकाशदीप्तीं । रविचंद्रादि प्रकाशती ।
प्रकाशें प्रकाशे त्रिजगती । तेजोमूर्ती परमात्मा ॥ २७ ॥
ऐशिया आत्म्याच्या ठायीं । भवबंध न लगे कांहीं ।
सूर्य वुडे मृगजळाच्या डोहीं । तैं आत्म्यासी पाही भवबंध ॥२८॥
खद्योततेजें सूर्य जळे । वागुलाभेणें काळ पळे ।
मुंगीचेनि पांखवळें । जैं उडे सगळें आकाश ॥ २९ ॥

वारा आडखुळिला आडीं पडे । जैं थिल्लरामाजीं मेरु बुडे ।
तरी भवबंध आत्म्याकडे । सर्वथा न घडे गोविंदा ॥ ३० ॥
देहाकडे भवबंधन । मूर्खही न मानिती जाण ।
देह जड मूढ अज्ञान । त्यासी भवबंधन कदा न घडे ॥ ३१ ॥
जैं दगडाचें पोट दुखे । कोरडें काष्ठ चरफडी भुकें ।
तैं देहाकडे यथासुखें । भवबंध हरिखें लागत ॥ १३२ ॥

भा. २८. १०३ ते १३२

## २२. आत्मा व परमात्मा एकरूपच होत.

आत्म्यावेगळा कांहीं । तिळभरी ठावो रिता नाहीं ।
यापरी पूर्णत्वें पाहीं । जन्म ते ठायीं स्पर्शेना ॥ ७०९ ॥
जन्मापूर्वी बाळाचें नास्तिक्य । जन्मापाठीं मानिती आस्तिक्य ।
या अस्तिनास्तीची भाष । आत्म्यासी देख असेना ॥ १० ॥
आतां आहे पूर्वी नाहीं । ऐसें आस्तिक्य आत्म्याचे ठायीं ।
कदाकाळीं न रिघे कांहीं । तो नित्य पाहीं निरंतर ॥ ११ ॥
देहीं जन्मल्या बाळकासी । वाढी दिसे दिवसदिवसीं ।
तो बाळजन्म नाहीं आत्म्यासी । यालागीं वृद्धि त्यासी घडेना ॥ १२ ॥
ज्यासी वृद्धि नाहीं तत्वता । त्यासी न ये विपरिणमता ।
बाल्य तारुण्य वृद्धावस्था । आत्म्यासी सर्वथा असेना ॥ १३ ॥
जो मी बाळत्वें होतों धाकुटा । तोचि मी तारुण्यें जालों मोठा ।
तो मी वृद्ध जालों कटकटा । ऐसा त्रिकाळद्रष्टा परमात्मा ॥ १४ ॥
द्रष्टा साक्षी जो अवस्थातीत । तो कदा नव्हे अवस्थाभूत ।
देहीं असोनि अवस्थारहित । जाण तो निश्चित परमात्मा ॥ १५ ॥
निरवस्थ आत्मा अविकारी पूर्ण । त्यासी कदा न ये क्षीणपण ।
ज्यासी जन्मचि नाहीं जाण । त्यासी मरण असेना ॥ १६ ॥

जो अविकारी निरवस्थ पूर्ण । ज्यासी नाहीं जन्ममरण ।
ऐसा तूं आत्मा म्हणशील कोण । तरी जाण सर्वज्ञ ज्ञानस्वरूप॥ १७॥
म्हणसी ज्ञानही क्षणिक असे । घटज्ञानें पटज्ञान निरसे ।
तेथ इंद्रियार्थवृत्तीचि नासे । ज्ञान जैसें तैसें अविनाशी ॥७१८॥

भा. ३. ७०९–७१८

## २३. स्त्री–पुं–भाव आत्म्यामध्यें नाहीं.

पाहें पां स्त्रीपुरुषदेहीं । आत्मा आत्मी हें तंव नाहीं ।
आत्मसुख आपुल्या ठायीं । असे पाहीं स्वतःसिद्ध ॥ २४४ ॥
सुखाचिलागीं सर्वथा । झोंबती प्रपंचपदार्था ।
ज्यासी गुरुवाक्यें आलें हाता । अद्वैतता निजसुख ॥ ४५ ॥
एकपणीं निजात्मसुख । हातां आलें नित्य निर्दोख ।
आतां द्वैत वांछी तो अति मूर्ख । थितें सुख नासावया ॥ ४६ ॥
प्रपंचामाजीं असतें सुख । तरी कां त्यजते सनकादिक ।
द्वैत तितुकें केवळ दुःख । परमसुख अद्वैतीं ॥ ४७ ॥
उद्धवा येथ आशंका धरिसी । जे देहावेगळें कोणे वस्तूसी ।
देखोनि पावला निजसुखासी । विदेहत्यासी अनुभवु ॥ ५३ ॥
देहीं असोनि विदेहता । प्रपंचीं असोनि अद्वैतता ।
आली शिष्याचिया हाता । तेही कथा परियेसीं ॥ २५४ ॥

भा. १०. २४४–२५४

## २४. मन जड, आत्मा प्रकाशमान.

लोहाचा लोहगोळ । अग्निसंगें जाला इंगळ ।
घडघडां निघती ज्याळ । तें नव्हे वळ लोहाचें ॥ २६५ ॥

त्या लोखंडाऐसें जड मन । त्यासी चित्प्रभा प्रकाशून ।
प्रवृत्तिमार्गीं प्रवर्तन । करवी जाण श्रेष्ठत्वें ॥ ६६ ॥
पाव्यामार्जीं रागज्ञान । केल्या अति मधुर गायन ।
तो पाव्याचा नव्हे गुण । कला जाण गात्याची ॥ ६७ ॥
तैसा मनाचा जो व्यापार । तो जाण पां परतंत्र ।
नव्हे त्याचा तो स्वतंत्र । जड विचार मनाचा ॥ ६८ ॥
सूर्याचेनि किरणसंगें । सूर्यकांतीं अग्नि निघे ।
तैसें आत्म्याचेनि प्रकाशयोगें । मन सवेग वर्तत ॥ ६९ ॥
मन जडत्वें जड जाण । आत्मा स्वप्रकाशें प्रकाशघन ।
मन तें आत्म्या स्वाधीन । आत्मा स्वाधीन आत्मत्वें ॥ २७० ॥
प्रत्यक्ष म्हणे माझें मन । परी मीचि मन न म्हणे जाण ।
यालागीं मनाहूनि आत्मा भिन्न । वेगळेपणें साक्षित्वें ॥ ७१ ॥
देहद्वयाहूनि भिन्न । दृढ साधूनि आत्मज्ञान ।
देहात्मबुद्धीचें छेदन । केलें जाण शिष्याचें ॥ २७२ ॥

भा. १०. २६५-२७२

## २५. जीव-शिव-संबंध.

जीवु इच्छी जें जें कांहीं । तें तें वासनेसारिसें पाही ।
ईश्वर पुरवी सर्वही । विमुख कांहींही नेणे ॥ १६७ ॥
अंतकाळीं जें जीव मागे । तें अलोट ईश्वर देवों लागे ।
आणि ईश्वरआज्ञेचेनि योगें । जीवु सर्वांगें वर्तत ॥ ६८ ॥
जीव ईश्वराआधीन । हें दृढ केलें संस्थापन ।
अनीश्वरवादाचें खंडण । प्रसंगें जाण जाणविलें ॥ ७५ ॥...
ते दोनी मिळोनियां पक्षी । नीड केलें देहवृक्षीं ।
वृक्ष म्हणिजे कोणें पक्षीं । तीं हीं लक्षीं लक्षणें ॥ ८६ ॥...

ऐशिया वृक्षामाजीं जाण । अतिगूढ गुप्त गहन ।
नीड केलें हृदयस्थान । जीवशिव आपण बैसावया ॥९३॥
तया वृक्षाचीं फळें । तुरटें तिखटें तोंडाळें ।
पक्कें अपक्कें सकळें । ज्यांसी पिप्पलें म्हणताती ॥ ९९ ॥
त्या दों पक्ष्यांमाजीं तत्वता । जो जीवपणें बोलिजेता ।
तो या कर्मफळांचा भोक्ता । जीं नाना व्यथादायकें ॥ २०० ॥
जीं फळें खातां पोट न भरे । खादल्या दारुण दुर्जरें ।
जेणें भवचक्रीं पडोनि फिरे । तरी अत्यादरें सेवितु ॥ १ ॥
दुजा फळें खातां खुणा वारी । जीवासी त्या फळाची गोडी भारी ।
अखंड जाहला फळहारी । वारिलें न करी शिवाचें ॥ २ ॥
फळें सेवितां अहर्निशीं । तिळभरी शक्ति नाहीं जीवासी ।
अशक्त देखोनियां त्याशीं । काळ पाशीं बांधितु ॥ ३ ॥
जो इयें सेवी कर्मफळें । तो तत्काळ बांधिजे ।
दुजा कर्मफळा नातळे । त्यातें देखोनि पळे काळिकाळु ॥ ४ ॥
जो कर्मफळातें न सेवितु । तो ज्ञानशक्तीनें अधिक अनंतु ।
सदा परमानंदें तृप्तु । असे डुल्लतु स्वानंदें ॥ ५ ॥
उद्धवासी होय निजबोधु । यालागीं जीवशिवांचा भेदु ।
अत्यादरें सांगे गोविंदु । निजात्मबोधु प्रांजळु ॥ २०६ ॥

भा. ११. १९७–२०६

## २६. ईश्वराचें निजरूप

मी प्रकटलों हें ऐसें । बोलणें तें आहाच दिसे ।
सदा मीं हृदयींचि वसें । प्रकटलों दिसे निर्विकल्पें ॥ ८९ ॥
आभाळ गेलिया सविता । सहजेंचि दिसे आंतौता ।
तेवि गेलिया विषयावस्था । मी स्वभावतां प्रकटचि । ॥ ९० ॥

ते काळीं सहजसुख । भक्तांसी जें होय देख ।
त्यासी तुकावया तुक । कैंचें आणिक कांटाळें ॥ ९४ ॥
भक्तीं भोगितां माझें सुख । विसरले देहादि जन्मदुःख ।
विसरले ते तहानभूक । निजात्मसुख कोंदलें ॥ ९६ ॥
ऐशिया निजसुखाची गोडी । विषयी काय जाणती बापुडीं ।
वेंचितां लक्षालक्षकोडी । त्या सुखाची कवडी लाभेना ॥ ९७ ॥
मज निजात्म्याचे सुखप्राप्ती । सकळ इंद्रियें सुखरूप होती ।
त्या सुखाची सुखस्थिती । लोकांतरप्राप्ती कोट्यंशीं न तुके ॥१००॥

भा. १४. ८९–१००

## २७. जीवेश्वरांची ऐक्यता

जीवेश्वरांची ऐक्यता । सहजचि असे स्वभावतां ।
तेथ अणुमात्र भेदवार्ता । न रिगे सर्वथा निश्चित ॥ १११ ॥
स्वभावें पाहतां दर्पण । एकाचें देखिजे दुजेपण ।
परी द्विधा नव्हेचि आपण । यापरी जाण जीव शिव ॥ ११२ ।
अज्ञानप्रतिबिंबित जीव । त्याचा द्रष्टा तो सदाशिव ।
तरी ऐक्यतेचें जें वैभव । तो निजस्वभाव मोडेना ॥ ११३ ॥
जेवि दर्पणामाजीं आपण । तेवि जीवरूपें शिवचि जाण ।
दोनी चेतनत्वें समान । तेंही लक्षण अवधारीं ॥ ११४ ॥
जैशी चेष्टा कीजे आपण । तेचि प्रतिबिंबीं दिसे जाण ।
तेवि ईश्वरसत्ता सचेतन । गमनागमन जीवासी ॥ ११५ ॥
जेणें स्वरूपें असे आपण । तद्रूप प्रतिबिंबीं दिसे जाण ।
तेवि ईश्वरत्व संपूर्ण । असे अविच्छिन्न जीवामाजीं ॥ ११६ ॥

जैसा अग्नि राखां झांकोळिला । तरी अग्निपणें असे संचला ।
तेवि शिवासी जीवभावो आला । परी नाहीं मुकला निजत्वा ॥११७॥

भा. २२. १११–११७

## २८. मीच सर्वरूप व सर्वात्मा आहे.

मीच डोळा मीच देखता । दृश्य द्रष्टा मीचि तत्त्वता ।
मज वेगळी देखणी अवस्था । नाहीं सर्वथा तिहीं लोकीं ॥ ३४२ ॥
मीच डोळियांचा निजडोळा । मी सर्वांगदेखणा सोज्वळा ।
मजवेगळी देखणी कळा । नाहीं जिव्हाळा आणिकांचा ॥३४३॥
मीचि शब्दातें शब्दविता । मीचि श्रवणांमाजीं श्रोता ।
ऐशिया एकात्मता पाहतां । शब्द निःशब्दता परब्रह्म ॥ ३४४ ॥
कान वचन मीचि श्रोता । मीचि जाणता शब्दार्था ।
ऐकणाही मजपरता । नाहीं तत्वता श्रवणाचा ॥ ३४५ ॥
मीचि घ्राण मीचि वास । मीचि जाणता सुवास ।
मजवेगळा रहिवास । परिमळास असेना ॥ ३४६ ॥
मीचि रसु मीचि रसना । स्वादु सेविता मीचि जाणा ।
मजवेगळा चवीचाखणा । रसज्ञपणा आन नाहीं ॥ ३४८ ॥
इतर इंद्रियप्रवृत्ती । त्याही मद्रूप जाण निश्चितीं ।
मी सर्वात्मा आत्ममूर्ती । क्रियाशक्ती तेहि मीचि ॥ ३४९ ॥

भा. १३. ३४२–३४९

## २९. माया गुणमयी व आभासरूप असली तरी ती दुस्तर व दारुण आहे.

जेवि कुकडीचीं पिलीं । कुकडी पाखांतळीं घाली ।
मग ते स्वयें दिसे एकली । तेवि माया उरली कल्पांतीं ॥१९१॥

एवं उत्पत्तिस्थितिप्रळयांत । त्रिविध भागें दाविली येथ ।
ते गुणमयी माया निश्चित । मिथ्याभूतें आभासे ॥ २०० ॥
माया दुस्तर दारुण । ऐकूनि ऋत्विज ब्राह्मण ।
थरारले सभाजन । राजाही पूर्ण विस्मित जाहला ॥ १९ ॥
नवल मायेचें रूपक । नाशूं न शकतीच ज्ञाते लोक ।
जिया गोंविले ब्रह्मादिक । इतरांचा देख पाड कोण ॥ २२० ॥
माया आक्रमूनि शिवासी । तोही आणिला जीवत्वासी ।
ते माया तरवे दीनासी । तो उपावो यासी पुसों पां ॥ २१ ॥
सुखोपायें दीन जन । दुस्तर माया तरती पूर्ण ।
तदर्थी राजा आपण । अत्यादरें प्रश्न श्रद्धेनें पुसे ॥ २२२ ॥

भा. ३. १९९--२२२

### ३०. मायेचें अनेक रूपकांनीं वर्णन.

वंध्यापुत्रा जन्मकाल । रायें आणाविला तत्काल ।
राशि नक्षत्र जाति कुल । सांगों जातां विकल योग्यता होय ॥ ३३ ॥
मृगजळाची पव्हे बरवी । गंधर्वनगरीं घालावी ।
वारा वळूनि सूत्रस्वभावीं । वाती लावावी खद्योततेजें ॥ ३४ ॥
निजछायेचें शिर फोडा । आकाशाची त्वचा काढा ।
शिंपीं आंधारू खरवडा । बागुलाचा रांडवडा निजशस्त्रें कीजे ॥ ३५ ॥
वांझेचे सुने पुत्रु झाला । तेथ भीष्मास्त्रिये पान्हा आला ।
तेणें पयःपानें तो मातला । घरभंगु केला दिगंबराचा ॥ ३६ ॥
जातीं लहान दळावा वारा । अश्वशृंगें आकाश चिरा ।
नपुंसकाचीं नातोंडें धरा । सूर्योदयीं अंधारा लपों आलीं ॥ ३७ ॥
गुंजेचें निजतेजें दिवी । हनुमंतलक्ष्मी लावावी ।
या सोहळियालागीं विकावी । वोसेगांवीं निजछाया ॥ ३८ ॥

आकाशाचीं सुमनें । सुवासें कीं वासहीनें ।
हें विवंचिती जे देखणे । ते मायेचें सांगणें सांगोत सुखें ॥३९॥
एवं मायेचें जें बोलणें । तें सांगतांचि लाजिरवाणें ।
नुपजे त्याचें श्राद्ध करणें । तैशी सांगणें महामाया ॥ ४० ॥

भा. ३. ३३–४०

### ३१. मूळमाया सत् हि नाहीं व असत् हि नाहीं; ती केवळ कल्पनारूप आहे.

जे सज्ञाना छळी लवलाह्या । जीतें श्रुति म्हणती अजया ।
ते हरीची दुर्धर माया । विवंचूनियां मज सांगा ॥ २३ ॥
म्हणाल दुर्धर मायेची बाधकता । ते बाधूं न शके अनन्य भक्तां
तुम्हांही भजावें भगवंता । मिथ्या मायेची कथा कां पुसशी ॥२४॥
मृगजळींच्या मुक्ताफळीं । मस्तकीं बाणली जाळी ।
गगनाच्या चांपेकळीं । मिरवे वेल्हाळी अति सौंदर्यें ॥ ४५ ॥
रज्जुसर्पमाथ्याचा मणी । काढूनि लेइली ते लेणीं ।
शुक्तिकारजपैंजणीं । चाले रुणझुणीं खळखळत ॥ ४६ ॥
संत म्हणों तरी नासे । असंत म्हणों तरी आभासे ।
आधीं असे पाठीं नासे । ऐसीही नसे निजांगें ॥ ९२ ॥
माया पाहों जातां हर्षें । सज्ञानही जाले पिसे ।
नांवरूपांचिये भडसें । कल्पनावशें माया वाढे ॥ ६६ ॥
मायेचें मुख्य लक्षण । राया तुज मी सांगेन खूण ।
आपुली कल्पना संपूर्ण । ते माया जाण नृपवर्या ॥ ६७ ॥
जेवि सूर्यासी संकल्पु नसे । तरी नसतां त्याच्या ठायीं दिसे ।
जेव्हां कां निजकिरणवशें । अग्नि प्रकाशे सूर्यकांतीं ॥ ७० ॥

तेवि शुद्धस्वरूपीं पाहीं । संकल्पमात्र कांहीं नाहीं ।
नसताचि दिसे ते ठायीं । ते जाण विदेही मूळमाया ॥ ७१ ॥
स्वरूप निर्विकल्प पूर्ण । तेथ मी म्हणावया म्हणतें कोण ।
ऐसेही ठायीं स्फुरे मीपण । ते मुख्यत्वें जाण मूळमाया ॥ ७२ ॥
तया मीपणाच्या पोटीं । म्हणे मजाचि म्यां पहावें दिठीं ।
मजसी म्यां सांगाव्या गोठी । अत्यादरें भेटी माझी मज होआवी ॥७३
राया जाण येचि अर्थीं । बोलिलें उपनिषदांप्रती ।
'एकाकी न रमते' या श्रुती । द्वैताची स्फूर्ति भगवंतीं स्फुरली॥८१॥

## ३२. माया ही ब्रह्माची शक्ति आहे.

माया ब्रह्मींची शक्ति जाण । तेही ब्रह्मेंसीं असे अभिन्न ।
वेगळी नव्हे अर्धक्षण । सदा सुलीन ब्रह्मेंसीं ॥ ४८० ॥
जेवि शूरांची शौर्यशक्ति पूर्ण । शूरांहोनि नव्हे भिन्न ।
तेवि ब्रह्मीं मायाशक्ति जाण । असे सुलीन सर्वदा ॥ ४८१ ॥
माया ब्रह्मीं असतां जाण । क्षोभेंविण नव्हे सर्जन ।
माया क्षोभकु काळ पूर्ण । काळास्तव जन जन्मती ॥ ४८२ ॥
ब्रह्मींची सत्ता तो काळ जाण । प्रकृति क्षोभवूनि आपण ।
दावी उत्पत्ति स्थिति निदान । तो काळही अभिन्न ब्रह्मेंसीं ॥४८३॥
ब्रह्ममायाकाळसंबंध । हे तिन्ही सुळींचि अभेद ।
दिसे जो व्यावहारिक भेद । तोही अबद्ध मिथ्यात्वें ॥ ४८६ ॥

भा. २४. ४८०–४८६

### ३३. माया म्हणजे भगवल्लीला.

सगुण साक्षात्कार जो येथ । तें पंचरात्रागममत ।
वैकुंठचि मुख्य म्हणत । तें मत निश्चित तयांचें ॥ ४३२ ॥
सप्तावरणांबाहेरी । मायावरणाभीतरीं ।
वैकुंठ रचिलें श्रीहरी । हें बोलिजेलें धीरीं वेदांतीं ॥ ३३ ॥
तेथ आगमाचें मनोगत । माया ते भगवल्लीला म्हणत ।
स्वलीला वैकुंठ रची भगवंत । क्षयो तेथ असेना ॥ ३४ ॥
जेथ लीलाविग्रही मेघश्याम । स्वयें वसे पुरुषोत्तम ।
तेथ नाहीं गुण काळ कर्म । मायादि भ्रम रिघेना ॥ ३५ ॥
मंत्रें आराध्यदैवतें प्रसन्नें । हें वेदार्थियाचें बोलणें ।
तें म्यां तुजप्रती अनुसंधानें । बोलिलों जाणें उद्धवा ॥ ३७ ॥
ये अर्थी वेदांती म्हणत । अत्यंत प्रलयींचा जो आघात ।
तो वैकुंठकैलासादि समस्त । आकारवंत निर्दाळी ॥ ३९ ॥
ते काळींचें उर्वरित । केवळ जें गुणातीत ।
तें पूर्ण ब्रह्म सदोदित । जाण निश्चित उद्धवा ॥ ४४० ॥
जेथ काळ ना कर्म । जेथ गुण ना धर्म ।
जेथ माया पावे उपरम । तें परब्रह्म उद्धवा ॥ ४१ ॥
आणिके मार्गीं जातां जाण । कामलोभादि उठे विघ्न ।
कां बुडवी ज्ञानाभिमान । ये नागवण प्रत्यवायाची ॥ ४४ ॥

भा. २०. ४३२–४४

### ३४. प्रपंच व त्यांतील व्यवहार मिथ्या आहेत.

जें जन्मलेंचि नाहीं । तें काळें गोरें सांगूं कायी ।
ग्रहणेंवीण कांहीं । खग्रास पाहीं दिसेना ॥ ७४ ॥

उखरीं भासलें मृगजळ । तें खोल किंवा उथळ ।
मधुर कीं क्षार केवळ । सांगतां विकळ विवेक ॥ ७५ ॥
तेवि मिथ्या प्रपंचाचें भान । तेथील दोष आणि गुण ।
निवडिती ते सज्ञान । अज्ञान जाण त्यामाजीं ॥ ७६ ॥
जेवि आंवसेचिये रातीं । आंधारा जोखूं आंधळे येती ।
त्यांसी जोखितां दोहीं हातीं । एकही रती तुकेना ॥ ७७ ॥
तेवि प्रपंच मिथ्यापणें । तेथ कानीं जें ऐकणें ।
कां डोळां जें देखणें । रसना जें चाखणें स्पर्शणें अंगें ॥ ७८ ॥
हातांचें घेणें देणें । पायांचें जें चालणें ।
वाचेचें जें बोलणें । कल्पणें मनें ॥ ७९ ॥
अहंकाराचा बडिवार । चित्ताचा चिंतनप्रकार ।
बुद्धीचा विवेक विचार । हा समूळ व्यवहार मिथ्या तेथ ॥८०॥

भा. २८. ७४–८०.

जागृतीमाजीं जें जें दिसे । तें तें जागृतीवशें नासे ।
स्वप्नीं जें जें आभासें । तें स्वप्नासरिसें मावळे ॥ २८१ ॥
जागृती स्वप्न निजकार्येंसीं । दोनी हारपती सुषुप्तीपाशीं ।
सुषुप्ती हारपे जागृतीसीं । यापरी प्रपंचासी सत्यत्व नाहीं ॥८२॥
प्रपंच सृष्टीपूर्वी नाहीं । प्रळयानंतर नुरेचि कांहीं ।
मध्येंचि आभासे जें कांहीं । तें मिथ्या पाहीं असंत ॥ ८३ ॥
प्रपंच ज्यापासूनि झाला । जेणें सर्वार्थी प्रकाशिला ।
अंतीं ज्यामाजीं सामावला । तो तद्रूप संचला निजात्मा ॥ ८८ ॥
शुक्तिकारजतन्यायें जाण । प्रपंच ब्रह्मेंसीं अभिन्न ।
जें प्रपंचाचें स्फुरे स्फुरण । तें ब्रह्मचि पूर्ण उद्धवा ॥ ८९ ॥
यापरी नित्य निष्काम । साधक झाले आत्माराम ।
परमानंदीं निमग्न परम । पावले उपरम येणें योगें ॥ ३०९ ॥

देहेंद्रियें असतां प्राण । कैसेनि गेला देहाभिमान ।
उद्धवा ऐसें कल्पील मन । तेंचि निरूपण हरि सांगे ॥ ३१० ॥

भा. २८. २८१-३१०

तेथ मी ब्रह्म स्फुरे जें स्फुरण । तेंचि मायेचें मुख्य लक्षण ।
तेंचि प्रकृतिपुरुषांचें जन्मस्थान । जावळीं फळें जाण जन्मलीं ॥७५॥
धरूनि गोडपणाचा सांठा । फणसाअंगीं वाढे कांटा ।
तेवीं पुरुषयोगें ताठा । चढला मोठा प्रकृतीसी ॥ ७७ ॥
जेवीं कां डोळींचेंचि जळ । गोठोनि डोळां होय पडळ ।
तेवीं ब्रह्मीं मायामळ । करी शबळ शुद्धासी ॥ ७८ ॥
आकारउकारमकारेंसीं । वेदु उपजे प्रकृतिपुरुषीं ।
जेवीं उकलल्या बीजासी । प्रथम ये त्यासी तिवणा डिरु ॥८१॥
तें वेदींचा अभिप्रावो । ब्रह्म सत्य माया वावो ।
आपुलेनि अभेदें ब्रह्मभावो । विवेकनिपुण पहा हो जाणती ॥८२॥
ऐसें वेदविवेकें अभेदयोगीं । ते कृतादि होत कलियुगीं ।
वर्ततां ते सदा अयुगी । युग त्यांलागीं असेना ॥ ८३ ॥
ब्रह्मांडीं ईश्वर स्वभावो । पिंडीं त्यासीच जीवभावो ।
ऐसा प्रकृतिपुरुषनिर्वाहो । मायेनि पहा हो द्विधा केला ॥ ८९ ॥
ब्रह्म अच्छेद्य वेदु बोले । तें फाडूनि द्विधा कैसें केलें ।
जेवीं आरिसां आपण आपुलें । मुख देखिलें संमुख ॥ ९० ॥
आपण पूर्वामुख आहे । प्रतिबिंब पूर्वेकडे न होये ।
आपुलें आपणा संमुख होये । हें लाघव पहा मायेचें ॥ ९१ ॥
प्रतिबिंब दिसतां संमुख । संमुख म्हणतां अति विमुख ।
पुरुष पूर्वेकडे देख । प्रतिबिंबाचें मुख पश्चिमेकडे ॥ ९२ ॥

भा. २४. ७५-९२

## ३५. मायेचा ईश्वरी कृपेनें नाश

तुझी माया पाहों जातां । तोचि मायेनें ग्राशिला तत्वतां ।
असो तुजचि पाहों म्हणतां । तेही सत्वावस्था मायेची ॥ १२ ॥
ऐसें तुझें खांबसूत्र । अकळ न कळे गा तुझें चारित्र ।
देखों नेदितां निजसूत्र । भूतें विचित्र नाचाविशी ॥ १३ ॥
यापरी खेळ वाढविशीं । सर्वांचि विकल्पोनि मोडिशीं ।
विकारमहत्तत्वीं सांठविशीं। हेंही कर्तृत्व अंगासी न लगत गेलें ॥ १५॥
याचें मुख्यत्वें मूळ लक्षण । तुझे कृपेवीण न कळे जाण ।
तुझी कृपा झालिया पूर्ण । जनीं जनार्दन प्रकटे पैं ॥ १६ ॥

भा. २२. १२–१६

तेंचि संतत्व गा ऐसें । ज्याचेनि आधारें जग वसे ।
जें जगा सबाह्य भरलें असे । जग प्रकाशे ज्याचेनि ॥ १९१ ॥
हें जगचि होय जाये । परी तें संचलेंचि राहे ।
ऐशी जे निजवस्तु आहे । तें तूं पाहें संतत्वें ॥ १९२ ॥
जेवीं अलंकारापूर्वी सोनें । अलंकारीं सोनेंपणें ।
अलंकारनाशीं नाश नेणे । जेवीं कां सोनें निजस्थिती ॥ १९४ ॥
तेवीं आकळोनि चराचर । वस्तु असे अखंडाकार ।
होतां जातां आकार विकार । वस्तु अणुमात्र विकारेना ॥ १९५ ॥

भा. १९. १९१–१९५

माया व्यापूनि अपार । यालागीं बोलिजे परमेश्वर ।
मायानियंता साचार । यालागीं ईश्वर म्हणिपे तो ॥ १९४ ॥
तोचि अविद्येमाजीं प्रतिबिंबला । यालागीं जीव हें नाम पावला ।
तोचि देहाध्यासें प्रबळला । अहंकार झाला या हेतु ॥ १९५ ॥

तो संकल्पविकल्पउपाधीन । स्वयें होऊनि ठेला मन ।
त्या मनासी करावया गमन । दशेंद्रियें जाण तोचि झाला ॥ १९६ ॥
त्यासी इंद्रियांचा आधार । सुखदुःखभोगांचा निकर ।
पापपुण्यांचा चमत्कार । देहाचा आकार तोचि झाला ॥ १९७ ॥
त्या देहाचें जें कारण । सत्व रज तमोगुण ।
ते तीन्ही गुण जाण । तोचि आपण स्वयें झाला ॥ १९८ ॥
गुणक्षोभाचें निजवर्म । झाला पंचविषय परम ।
विषयभोगादि क्रिया कर्म । स्वयें स्वधर्म होऊनि ठेला ॥ १९९॥
तिनी गुणांचें जन्मकारण । झाला महत्तत्व सूत्र प्रधान ।
एवं संसार अवघा जाण । ईश्वर आपण स्वयें झाला ॥ २०० ॥
यालागीं जो जो पदार्थ दिसे । तेणें तेणें रूपें आत्मा भासे ।
मजवेगळा पदार्थ नसे । हें मानी विश्वासें तो धन्य ॥ २०४ ॥
मीचि एक बहुधा व्यक्ती । वेदही साक्षी येचि अर्थी ।
विश्वतश्चक्षु या वेदोक्तीं । श्रुती मज गाती सर्वदा ॥ २०५ ॥
ऐसें असतां नवल कैसें । जीव भुलला कल्पनावशें ।
अहंता वाढवी देहाध्यासें । तो म्हणे देव न दिसे तिहीं लोकीं ॥२०६॥
सत्य मानूनि भेदभाव । जीव झाला अति अज्ञान ।
भुलला आपण्या आपण । देहाभिमान दृढ झाला ॥ २०७ ॥

भा. २८. १९४–२०७

## प्रकरण : ३

# दुर्गुणत्याग

### ३६. आशेपाशीं सर्व पापें व दुःखें वसतात.

आशा हि परमं दुःखं नैराश्यं परमं सुखम् ।
यथा संछिद्य कान्ताशां सुखं सुष्वाप पिङ्गला ॥
आशेपाशीं महाशोक । आशा करवी महादोख ।
आशेपाशीं पाप अशेख । असे देख तिष्ठत ॥ ३०८ ॥
आशेपाशीं अधर्म सकळ । आशा मानीना विटाळ ।
आशा नेणे काळवेळ । कर्म सकळ उच्छेदी ॥ ०९ ॥
आशा अंत्यजातें उपासी । नीचसेवन आशेपाशीं ।
आशा न सांडी मेल्यासी । प्रेतापाशीं नेतसे ॥ ३१० ॥
आशा उपजली अनंतासी । नीच वामनत्व आलें त्यासी ।
आशा दीन केलें देवांसी । कथा कायसी इतरांची ॥ ११ ॥
जगाचा जो नित्य दाता । तो आशेनें केला भिकेसवता ।
वैऱ्याचें द्वारीं झाला मागता । द्वारपाळता तेणें त्यासी ॥१२॥
आशा तेथ नाहीं सुख । आशेपाशीं परम दुःख ।
आशा सर्वांसी बाधक । मुख्य दोष ते आशा ॥ १३ ॥
ज्याची आशा निःशेष जाये । तोचि परम सुख लाहे ।
ब्रह्मादिक वंदिती पाये । अष्टमा सिद्धि राहे दासीत्वें ॥ ३१४ ॥
भा. ८. ३०८–३१४

### ३७. विषय विषप्राय आहेत

उभें न राहती ऐक्यवृत्ती । क्षीण जाली ज्ञानशक्ति ।
पडलीं जडत्वें लोळती । पाणी मागती विषयाचें ॥ १० ॥

अल्प अल्प तें देतां जळ । कडकडूनि झोंबती प्रबळ ।
आम्हांसि फार द्या गा जळ । तृषा केवळ बोळेना ॥ ११ ॥
कुपथ्य करितां निरंतर । तंव तो झाला जीर्णज्वर ।
क्षयो लागला जी थोर । क्षीण शरीर पडियेलें ॥ १२ ॥
नवल रोगाचा पडिपाडु । गोड परमार्थ तो जाला कडू ।
विषप्राय विषय कडू । तोचि गोडु पैं झाला ॥ १४ ॥
ते व्याधीचिया उफाडा । देतां सत्कथा काढा ।
श्रवणमुखींच्या भावार्थदाढा । पाडी पुढां दांतखिळी ॥ १५ ॥
देतां तुळसीमकरंदनासु । वरता जावों नेदी श्वासु ।
मस्तक झाडी मानी त्रासु । रोगें बहुवसु व्यापिला ॥ १६ ॥
ऐसा रोग देखोनियां गाढा । वैद्य आचार्य धडफुडा ।
कृपा पाहे जया कडा । तो रोकडा वांचवी ॥ १७ ॥
निधडा वैद्य तो सुबुद्धि । जीवु गेलिया मरों नेदी ।
जीवेंवीण वांचवी त्रिशुद्धि । अगाध सिद्धि तयाची ॥ १८ ॥
शुद्धभाग्येंकरूनि जाण । तो करी कृपाकूर्मावलोकन ।
तेंचि रोगियां अमृतपान । होय सावधान तत्काळ ॥ १९ ॥
एवं जालिया सावधान । रोगी आपणिया आपण ।
नित्यानित्याचें पाचन । करी सेवन साक्षेपें ॥ २० ॥
दारुण चुकवावया कुपथ्य । वैराग्य राखण ठेविलें नित्य ।
लावूनि अनुसंधानाचें पथ्य । निर्दाळिला तेथ भवरोगु ॥ २३ ॥
रोगी उपचारिल्यावरी । प्रबळ क्षुधा-खवळे भारी ।
चित्त चिंतेच्या लाह्या करी । क्षणामाझारीं खादल्या ॥ २४ ॥
काळे गोरे चतुर्वर्णचणे । आश्रमेंसीं भाजिले फुटाणे ।
अहंसोहंगुळेंसीं तेणें । निःशेष खाणें तत्काळ ॥ २५ ॥

भा. १०. १०–२५

## ३८. विषयी लोक अज, श्वान, व खरासारखे निर्लज्ज असतात.

जैसें कां श्वान आणि खर अज । तैसे विषयांसी लोक निर्लज्ज ।
सांडूनि स्वहिताचें काज । कां विषयांचें भोजें नाचती ॥ २०४ ॥
शुनी सक्रोधें वसवसी । तें गोड लागे श्वानासी ।
जीवित बांधलें तिच्या पुच्छीं । तीमागमागेंसीं हिंडतु ॥ २०७ ॥
अंगीं अंगा होतां भेटी । सक्रोध शुनी लागे पाठीं ।
तरी न सोडी पुसांटी । कुंकात उठी कामासी ॥ २०८ ॥
ऐशा संकटीं जें भोगूं चढे । तें भोगासवेंचि आडकोनि पडे ।
हड हड करिती चहूंकडे । जगापुढें फजीती ॥ २०९ ॥
श्वानाचें हेंड तत्काळ सुटे । मनुष्याचें आकल्प न सुटे ।
स्त्री लोभाळु अति लोभिष्टें। तीलागीं संकटें नाना सोशी ॥२११॥
ना तरी गाढवाच्या परी । दूरीं देखोनियां खरी ।
भुंकत धांवे तीवरी । लाज न धरी सर्वथा ॥ २१२ ॥
खरी पळे पुढें पुढें । खरू धांवे वाडेंकोडें ।
लाता होणोनि फोडी जाभाडें । तरी पुढें पुढें धसों लागे ॥२१३॥
ना तरी बोकडाची गति जैसी । तैशी दशा दिसे पुरुषासी ।
मारूं आणिल्या पशुहत्याऱ्यापाशीं । तरी शेळ्यांसी सेविता ॥२१५॥
स्वयाती मारितां देखे । अनुताप नेघे तेणें दुःखें ।
मृत्युसमीपही अभिलाखें । कामसुखें वांछिती ॥ २१६ ॥
मेष मारूं आणिला घातकें । निजसख्यांतें मारितां देखे ।
तें न मनूनियां यथासुखें । अजीसीं हरिखें रमों धांवे ॥ २१८ ॥
मेष श्वान आणि खर । हे ऋतुकाळींचि विषयतत्पर ।
त्याहूनि विशेषेंसीं नर । कामी दुर्धर सर्वदा ॥ २१९ ॥

गर्भ संभवल्यापाठीं । श्वानही स्त्रीभोगासी नुठी ।
पुरुषाची अभिनव गोठी । गुरोदर गोमटी भोगिती ॥ २२० ॥
गाढवगाढवीसी बुंथड । न करी अलंकारमोतड ।
मनुष्यासी स्त्रियेचें कोड । तिचें वालभ वाड वाढवी ॥ २२१ ॥
दांडा गोंडा मूद वेणी । टिळकुवरी रत्नखेवणी ।
नाकींचें हालों दे सुपाणी । हें मनुष्यपणीं वालभ ॥ २२२ ॥
जरी प्रसूतिकाळु निकट । गाड्याएवढें वाढलें पोट ॥
तरी कामचारी विवेकनष्ट । रमताती दुष्ट स्त्रियांसीं ॥ २२३ ॥

भा. १३. २०४–२२३.

## २९. विषयवासनेमुळें अनर्थपरंपरा

वेदें न करितां प्रेरणा । विषयांवरी सहज वासना ।
स्वभावें सकळ जनां । सदा जाण सर्वांसी ॥ २०८ ॥
तेथें सेव्यासेव्यपरवडी । विवंचना कोण निवडी ।
लागली विषयांची गोडी । ते अनर्थकोडी करितील ॥ २१० ॥
आगी लागलिया कापुसा । विझवितां न विझे जैसा ।
तेवि विषयवंता मानसा । विवेकु सहसा उपजेना ॥ २११ ॥
झाल्या लोलिंगता बडिशा । निजमरण विसरे मासा ।
कां मुठी चणियांच्या आशा। नळीमाजीं आपैसा वानरु अडके॥ २१२॥
दूध मिळालिया मांजर । न म्हणे द्विजअंत्यजघर ।
तेवि विषयउन्मत्त नर । न करिती विचार सेव्यासेव्य ॥२१३॥
कां खवळल्या विषयचाडें । योनिसंकरु घडेल पुढें ।
यालागीं वेदें चोखडें । वर्णाश्रमपाडें विभाग केले ॥ २१४ ॥
कां अनावृत्त मेघजळा । धरणें धरूनि घालिजे तळां ।
मग नेमेंचि ढाळेंढाळां । पिकालागीं जळा काढिजे पाट ॥२१६॥

तैसें उच्छृंखळां विषयासी । वेदें नेमिलें नेमेंसीं ।
तेचि वेदाज्ञा ऐसी । ऐक तुजपाशीं सांगेन ॥ २१८ ॥

भा ५. २०८–२१८

### ४०. स्त्री लंपटता सर्व दुःखांचें मूळ आहे.

संसारदुःखाचें मूळ । स्त्रीआसक्तीच जाण केवळ ।
स्त्रीलोभाचें जेथ प्रबळ बळ । दुःख सकळ त्यापासीं ॥ ५४७ ॥
आसक्ति आणि स्नेहसूत्र । या दोन्हींपासाव दुःख विचित्र ।
पदोपदीं भोगिती नर । अस्वतंत्र होउनी ॥ ५४९ ॥
यालागीं भलतेनि भलते ठायीं । आसक्ति स्नेहो न करावा पाहीं ।
अति स्नेहो मांडिजे जिहीं । दुःख तिहीं भोगिजे ॥ ५५० ॥
सेवितां ज्याची अति गोडी । तें घालिती येरयेरांच्या तोंडीं ।
जीवेंप्राणें शिणोनि जोडी । तें दे आवडीं स्त्रियेसी ॥ ५५७ ॥
स्त्रियेसी सांडूनि दुरी । पाऊल न घाली बाहेरी ।
हात धरोनि परस्परीं । आंतबाहेरी हिंडती ॥ ५५८ ॥
सदा एकान्तीं बैसती । एके स्थानीं दोघे असती ।
दोघे क्रीडा विहार करती । खेळ खेळती विनोदें ॥ ५५९ ॥
मैथुनसुखाचेनि वैभवें । विश्वासोनि जीवेंभावें ।
हिताहित कांहीं नाठवे । गृहिणीगौरवें नाचतु ॥ ५६२ ॥
धर्माची वेळ नाठवणें । दीनावरी दया नेणें ।
कृपा स्त्रियेवरी करणें । जीवेंप्राणें सर्वस्वें ॥ ५६३ ॥
बैसली साकरेवरी माशी । मारितांहि नुडे जैशी ।
तैसा भोगितां विषयांसी । जरामरणांसी नाठवी ॥ ५६७ ॥
जैसी आत्मउपासकासी । एकात्मता होये त्यासी ।
तैसें स्त्रीवांचोनि दृष्टीसी । जगीं आणिकासि न देखे ॥ ५६९ ॥

भा. ७. ५४७–५६९

## ४१. कामासक्ति अतिदारुण आहे.

विषय इंद्रियांचे संगतीं । अवश्य क्षोभे चित्तवृत्ती ।
तेथ सज्ञानहि बाधिजती । मा कोण गति अज्ञाना ॥ २५७ ॥
जें देखिलें ऐकिलें नाहीं । ऐशिया विषयांचे ठायीं ।
पुरुषांचें मन पाहीं । सर्वथा कहीं क्षोभेना ॥ ५९ ॥
एवं पूर्वापार विषयासक्ती । पुरुषासी बाधक निश्चितीं ।
तो बैसल्याहि एकांतीं । वासनासंस्कारें वृत्ति सकामें क्षोभे॥२६१॥
तेंवि वासनासंस्थित काम । पुरुषास करी सकाम ।
कामक्षोभें पाडी भ्रम । कर्माकर्म स्मरेना ॥ ६३ ॥
मनीं क्षोभल्या कामासक्ती । साधकीं तेथें करावी युक्ती ।
आवराव्या बाह्य इंद्रियवृत्ती । तैं मनासी शांति हळूंहळूं होय॥६५॥
कर्मेंद्रियीं राखण । दृढ वैराग्य ठेविलिया जाण ।
मनीं क्षोभल्या काम पूर्ण । आपल्या आपण उपशमे ॥ ६६ ॥
जेथ सज्ञाना उठी छळ । सकाम भुलवी तत्काळ ।
ऐसा स्त्रीसंग अनर्थशीळ । त्याहूनि प्रबळ स्त्रैणाचा ॥ ६८ ॥
जरी विषयीं क्षोभेल मन । तरी इंद्रियें आवरावीं आपण ।
तरी मनींचा विषयो जाण । मनींचि आपण स्वयें विरे ॥२७०॥
निजकन्येचिया संगतीं । ब्रह्मा भुलला कामासक्तीं ।
इतरांची कोण गति । संग अनर्थी स्त्रियांचा ॥ ७४ ॥
कामिनीसंग अति दारुण । शिवासि झालें लिंग-पतन ।
प्रमदासंगें सज्ञान । ठकले जाण महायोगी ॥ ७५ ॥
अनुतापआगिटीं अभंग । वैराग्यपुटें देऊनि चांग ।
विवेकें दमितां सांग । काममोहाचे डाग क्षाळिले तेणें ॥ २८६ ॥

भा. २६. २५७--२८६

## ४२. "वेश्येचे आज्ञेवरी। श्वानाचे परी वर्तलों॥"

मद्यमदु उतरे दिनांतीं। धनमदु जाय निधनस्थितीं।
तारुण्यमद जाये क्षीण शक्ती। स्त्रीमदप्राप्ती कदा नुतरे॥ १२५॥
राजे मुकुटांचे प्रतापी पूर्ण। माझ्या चरणा येती शरण।
तो मी वेश्येचे धरी चरण। हें निर्लज्जपण मीं केलें॥ १३१॥
मज पुरूरव्याचे आज्ञेवरी। राजे नाचती चराचरीं।
तो मी वेश्येचे आज्ञेवरी। श्वानाचे परी वर्तलों॥ ३२॥
धर्मपत्नीसीं भोगितां काम। सहसा नासेना स्वधर्म।
मज वोढवलेंसे दुष्ट कर्म। वेश्येसी परम भुललों॥ १४१॥
परदारा अभिलाषिती। ते अवश्य नरका जाती।
मा स्वदाराकामासक्ती। तेथहि अधोगति सोडीना॥ ४२॥
ऐसें स्त्रीकाम ज्याचें मन। त्याचे योगयाग अनुष्ठान।
अवघेचि वृथा जाण। तेंचि निरूपण निरूपी॥ १५५॥

भा. २६-१२५-१५५

## ४३. स्त्रैणत्व

धड गोड उत्तम पदार्था। आपण भोगीना सर्वथा।
तें देऊन स्त्रियेच्या हाता। आपुली सत्ता निवर्तवी॥ ३८३॥
इसी जैं विरुद्ध वाटेल। तैं हें ब्रह्मांड पालथेल।
इचा उल्लंघितां बोल। क्षीराब्धि सुकेल सुखाचा॥ ३८४॥
नाहीं देवो कुलदेवां पूजणें। मायबापांतें वंचणें।
शेखीं गुरूतेंहि ठकणें। परी सर्वस्व देणें स्त्रियेसी॥ ३८५॥
एवं माकड जैसें गारुड्याचें। तैसा स्त्रियेचेनि छंदें नाचे।
ऐशिया स्त्रैणाचे संगतीचें। तेथ सुख कैंचें साधका॥ ३८६॥

ज्याच्या ऐकतां स्त्रियेच्या गोठी । सज्ञानासहि काम उठी ।
जो लावी योषिता पाठीं । उठाउठीं सकामत्वें ॥ ३८७ ॥
त्याची न घ्यावी भेटी । त्यासी न करावी गोठी ।
तो न पहावा दिठीं । न लागावें पाठीं स्त्रैणाचिये ॥ ३९० ॥
स्त्रैण पुढें वाटे जाये । त्याच्या मार्गीं मागु उरला राहे ।
तेहि आपण चुकवावी भोये । येथवरी पाहें त्यागावा ॥ ३९१ ॥

भा. १४. ३८३–३९१

### ४४. साधकास स्त्रीसंगापेक्षां स्त्रैणांचा संग बाधक होतो.

जे मातृस्नेहातें तोडवी । जे बंधुस्नेहातें विघडवी ।
जे सदा गोंवी हावभावीं । अधर्मअडवीं जे पाडी ॥ ३७२ ॥
जिचे कटाक्ष अति तिख । जिव्हारीं रुतले देख ।
जे जीवाची व्यामोहक । जिचें चढलें विख उतरेना ॥ ३७३ ॥
एवढी बाधा जाण स्त्रीसंगतीं । जो वांछूं पाहे माझी प्राप्ती ।
तेणें सांडावी स्त्रियेची आसक्ती । हृदयीं प्रीति न राखावी ॥ ३७४ ॥
स्त्री आठवितांचि चित्ता । उच्छेदी ज्ञानध्यानअवस्था ।
एवढी स्त्रीसंगबाधकता । त्याहूनि अधिकता स्त्रैणसंगें ॥ ३७५ ॥
स्त्रीसंगाच्या मोहमदा । सुटका आहे यदाकदा ।
परी स्त्रैणसंगतीची बाधा । ते आपदा अनिवार ॥ ३७६ ॥
चूडाला स्त्रियेचे संगतीं । तरला शिखिध्वज भूपती ।
नातरी मदालसेचे संगतीं । तरला नृपती कुवलयाश्वु ॥ ३७७ ॥
हो कां लीलेनें करोनि भक्ती । प्रसन्न केली सरस्वती ।
तिया उद्धारिला निपजती । हें बोलिलें ग्रंथीं वसिष्ठें ॥ ३७८ ॥

भा. १४. ३७२–३७८

४५. परमार्थी पुरुषानें स्त्रैणाची संगत टाळावी.

स्त्रीपुरुषीं आत्मा एक । स्त्रीरूप तेथें आविद्यक ।
मिथ्या स्त्रीकामीं भुलले लोक । बाप कवतिक मायेचें ॥ २१२ ॥
आत्मा भोक्ता म्हणावा स्त्रीसंभोगीं । तंव ते नित्यमुक्त असंगी ।
देह भोक्ता म्हणावा स्त्रीसंयोगीं । तंव देहाचें अंगीं जडत्व ॥१३॥
यापरी देहाचे जाण । विभागी असती आठजण ।
तेथ मी भोक्ता हा अभिमान । तो केवळ जाण मूर्खत्वें ॥ २२३ ॥
देहो तितुका अशौचकर । त्यांत स्त्रीदेह अति अपवित्र ।
केवळ विटाळाचें पात्र । निरंतर द्रवरूपें ॥ २४ ॥
विष्ठेमाजीं कृमि चरती । तैसी स्त्रीदेहीं ज्यां आसक्ती ।
तेही कृमिप्राय निश्चिती । संदेह ये अर्थी असेना ॥ २३४ ॥
जरी स्त्रियेची विरक्त स्थिती । तरी साधकीं न धरावी संगती ।
अग्निसंगें घृतें द्रवती । तेंवि विकारे वृत्ति स्त्रीसंगें ॥ २४१ ॥
घृत वेंचल्या वर्षे झालीं साठी । तरी अग्निसंगें द्रव उपजे घटीं ।
तेंवि प्रमदासंगपरिपाठीं । वार्धक्यींहि उठी अति कामु ॥ ४४ ॥
यालागीं जो परमार्थी । तेणें स्त्रैणाची संगति ।
सर्वथा न धरावी हातीं । पाडी अनर्थी तो संग ॥ २५१ ॥
म्हणशी विवेकें जो आहे । त्यासि संग करी काये ।
स्त्रीसंगास्तव अपायें । सोशिले पाहे सूज्ञांनीं ॥ २५४ ॥

भा. २६. २१२–२५४

४६. एक नारायणावांचून स्त्रीकामबंधन सुटत नाहीं.

कामभोगान्तीं विरक्ती । ऐसें मूर्ख विवेकी बोलती ।
ते अधःपातीं घालिती । हे मज प्रतीति स्वयें झाली ॥ १६६ ॥

सकामासि विषय त्यागितां । वासना न त्यागे सर्वथा ।
कां आदरें विषय भोगितां । विरक्ती सर्वथा उपजेना ॥ १७३ ॥
पुंश्चलीचे कटाक्षगुण । तेचि पुरुषासी दृढ बंधन ।
स्त्रीकामबंधन सोडवी कोण । एका नारायणावांचुनी ॥ ७६ ॥
जो भोग भोगूनि अभोक्ता । त्या शरण रिघाल्या अनंता ।
बाधूं न शके विषयावस्था । स्त्रीसंगीं सोडितां तो एक ॥१८०॥
इंद्रादि देव कामासक्तीं । विटंबले नेणों किती ।
त्यांचेनि भजनें कामनिवृत्ती । जे म्हणती ते अति मूर्ख ॥८६॥
भावें हरीसी रिघाल्या शरण । हृदयीं प्रकटे नारायण ।
तेव्हां सर्व काम सहजें जाण । जाती पळोन हृदयस्थ ॥ १९१ ॥
मूढमतीचा प्रबोध । मानी उर्वशीचा अपराध ।
विवेकें पाहतां शुद्ध । मीच मतिमंद सकाम ॥ ९४ ॥
अंगनावदनाची निजस्थिती । निखळ शेंबुडाची तेथ वस्ती ।
तें मुख चंद्रेंसीं उपमिती । जेवि अमृत म्हणती विखातें ॥२१०॥
वनिताअधरीं झरे लाळ । तें म्हणती अधरामृत केवळ ।
बाप अविद्येचें बळ । भुलले सकळ सुरासुर ॥ २११ ॥

भा. २६. १६६-२११

## ४७. कृपणास द्रव्य खर्चणें मरणच वाटतें.

धनकामासाठीं देख । न मनीं पाप महादोख ।
कवडीच्या लोभें केला मूर्ख । नाठवे नरक महापातु ॥ ८३ ॥
ऐसें धन सांचिलें फाडोवाडें । त्याचाहि व्यय जैं करणें पडे ।
तैं प्राणान्तचि येऊनि घडे । विचार पुढें असेना ॥ ८७ ॥
वानराचे गालीचे चणे । हातां न येती जितां प्राणें ।
तैसा द्रव्याचा व्ययो करणें । तेंचि मरणें कदर्या ॥ ८८ ॥

अतिथि आलिया जाण । ऐसे बोल बोले आपण ।
जें वचनमात्रें जाती प्राण । त्यासि मागे कोण अन्नोदक ॥ ९० ॥
भिकारीं सांडिलें त्याचें द्वार । अतिथीं डावलिलें निरंतर ।
पाहुणा दूरीं पाहे विढार । निराशी पितर सर्वदा ॥ ९२ ॥
दारा न ये कोरान्नकर । घर सांडूनि गेले उंदीर ।
काउळीं ओसंडिलें तें घर । चिडिया साचार न मिळे दाणा ॥९३॥
मुंग्यांसि पडे नित्य लंघन । तिहीं धरिलें विढार आन ।
पोटें ना खाय जो आपण । तेथ कथा कोण इतरांची ॥ ९४ ॥
ऋतुकाळें फळें येतीं पूर्ण । त्यांसि दृष्टी भेदी हाटीं जाण ।
परी जिव्हेसि आलिंगण । प्राणांतीं आपण हों नेदी ॥ ९८ ॥
मातेचें स्तनपान सेविलें । तेंचि क्षीर रसना चाखिलें ।
पुढें दूधचि वर्जिलें । व्रत धरिलें धनलोभें ॥ ९९ ॥
गांठीं असोनि अमित धन । न करी माहेरसण बोळवण ।
कन्या क्षोभोनिया जाण । शाप दारुण त्या देती ॥ १०८ ॥
गोत्रज सदा चिंतित । हा मरे तैं जेवूं दूधभात ।
आप्त जे झाले अनाप्त । अवघे अनहित वांछिती ॥ ११९ ॥
जयाचिया द्रव्यासि जाण । नाहीं धर्माचें संरक्षण ।
तें काळेंचि होय क्षीण । तेंचि लक्षण हरि सांगे ॥ ११० ॥
जो सुखी न करी कुटुंबालागीं । जो निजात्मा निववीना नाना भोगीं ।
जो द्रव्य न वेंची धर्मालागीं । त्यासि पंचविभागी उठती ॥१२०॥
दायाद राजा चोर आगी । अधर्में रोग संचरे अंगीं ।
हे पांचजण विभागीं । द्रव्य नाशालागीं पावती ॥ १२१ ॥
भिकेलागीं जेथ जेथ गेला । म्हणती काळमुखा येथ कां आला ।
होता धनलोभें भुलला । भला नागविला ईश्वरें ॥ १४५ ॥

भा. २३. ८३–१४५

## ४८. अभिमान ज्ञानी, अज्ञानी व सुरनरांस सारखाच घातक आहे.

खैराचा शूळ तत्वतां मारी । मा चंदनाचा काय आन करी ।
तेवि अभिमान दोहींवरी । बाधकता धरी ज्ञानाज्ञानें ॥ ६०५ ॥
लोखंडाची बेडी तोडी । मा आवडी सोनियाची जडी ।
चालतां तेहि तैशीच आडी । बाधा रोकडी जैशी तैशी ॥ ६ ॥
ब्रह्माहमस्मि हा अभिमान । शुद्ध ब्रह्म नव्हे जाण ।
अहंपणें तेंहि कठिण । तेंहि लक्षण अवधारीं ॥ ७ ॥
जळापासोनि लवण होये । तें जळींचें जळीं विरोनि जाये ।
मोतीं झालें तें कठिण पाहे । उदकीं न जाये विरोनी ॥ ८ ॥
मुक्तपणें मोला चढलें । तें वनिताअधरीं सुवर्णफांसां पाडिलें ।
मुक्तांचि परी नासा आलें । कठिण केलें अभिमानें ॥ ६०९ ॥

भा. १२. ६०५-६०९

एवं विचारितां नेटेंपाटें । अहंतेचें बंधन मोठें ।
अभिमानाऐसें खोटें । नाहीं वोखटें त्रिलोकीं ॥ ७० ॥
अभिमानु ईश्वरा बाधी । तोहि सबळ कीजे सोपाधीं ।
अभिमानें देहबुद्धि । बाधक त्रिशुद्धी सुरनरांसी ॥ ७१ ॥
यालागीं जे अज्ञान जन । ज्यांसी नाहीं ज्ञानाभिमान ।
तेहीं विश्वासल्या संपूर्ण । साधु सज्जन अनुग्रहो करिती ॥७२॥
ज्यासी म्हणती नीच वर्ण । स्त्रीशूद्रादि हीन जन ।
ज्यासी कां दूरीं शास्त्रश्रवण । ज्यासी दूरी स्मरण वेदोक्त ॥७३॥
त्यांसी जालिया सद्भाव संपूर्ण । ते होतु कां हीन जन ।
परी संतकृपेसीं आयतन । विश्वासें पूर्ण अधिकार झाला ॥७४॥

८०३९५१

ऐसे पूर्ण भावार्थी । त्यांसी तुह्मांऐशां साधुसंतीं ।
अनुग्रहोनि तारिती । कृपामूर्ती कृपाळुवा ॥ ७५ ॥
अज्ञानी यापरी तरती । परी ज्ञानाभिमान ज्यांच्या मतीं ।
ते ब्रह्मादिकां न तरती । त्यांचीहि स्थिति मुनि सांगे ॥ ७६ ॥

भा. ५. ७०–७६

४१. अभिमान सर्व आमिषांचें मूळ आहे.

आमिषकवळें गुंतलें मुख । मारितां देऊं न शके हाक ।
खस्तावेस्त करितां देख । बोलावया मुख त्या नाहीं ॥४५॥
हे माझे स्वजाती पहा हो । सांडोनियां सुहृदभावो ।
मज कां करूं आले अपावो । तो अभिप्रावो विवंची ॥ ४६ ॥
म्हणे माझिया दुःखासी मूळ । मजपाशील आमिषकवळ ।
तो त्यजोनियां तत्काळ । सुखी सुनिश्चळ बैसला ॥ ४७ ॥
जेथ आमिषकवळु पडे । तेथ कलहाचा गोंधळ मांडे ।
परस्परें फुटती मुंडें । ठेंचिती तोंडें येरयेरां ॥ ४८ ॥
आमिष त्यजोनि बैसला देख । तो पाहे कलहाचें कौतुक ।
मूळ परिग्रहो तेथें दुःख । परम सुख त्यागितां ॥ ४९ ॥
माड्या गोपुरें धवळारा । धन धान्य नाना अंबरा ।
रत्नें प्रवाल धनपुत्रदारा । हा समुदायो खरा परिग्रहो ॥ ५० ॥
या समस्त परिग्रहाचें मूळ । देहबुद्धि गा केवळ ।
तेही अभिमानें सबळ । एवं सर्वांसी मूळ अभिमानु ॥ ५१ ॥
अभिमानसहित सकळ सांडे । तैं पडती सुखाचे पायमांडे ।
तें सुख न वोलवे तोंडें । शब्द मुरडे लाजोनी ॥ ५६ ॥

भा. ९. ४५–५६

## ५०. अभिमानानें देव दुरावतो.

म्हणसी शरण रिघावें कवणें ठायीं । तरी मी असें तुझ्या हृदयीं ।
त्या हृदयस्थासि लवलाहीं । शरण पाहीं रिघावें ।। २४४ ।।
तिळभरी राखोनि अभिमान । जरी मज रिघशी शरण ।
तरी माझी प्राप्ती नव्हे जाण । अभिमान विघ्न प्राप्तीसी ।। ४६ ।।
रजस्वलेची ऐकोनि वाणी । दूर पळिजे पुरश्चरणीं ।
तेवि अहंकाराच्या साधनीं । थिता जवळूनि मी जायें ।। ४८ ।।
पत्नी विचरतां परपुरुषीं । देखोनि निजपती त्यागी तिसी ।
तेवि अभिमानरत भक्तांसी । मी हृषीकेशी नातळें ।। ५२ ।।
यालागीं सांडूनि अभिमान । मज हृदयस्था रिघालिया शरण ।
तुज मी उद्धरीन जाण । देवकीची आण उद्धवा ।। ५३ ।।
पातेजूनि तुझिया बोलासी । थितें सांडावें स्वधर्मासि ।
लटकें जाहलिया आणेसी । कोणें समर्थासीं भांडावें ।। ५६ ।।
उद्धवा तूं आत्मा परिपूर्ण । मज तुज नाहीं मीतूंपण ।
त्या तुझी म्यां वाहिली आण । परम प्रमाण परमात्मता ।। ५८ ।।
शरण रिघतांचि तत्काळ । तूं लाहासी माझें बळ ।
तेव्हां भवभय पळे सकळ । तुज कळिकाळ कांपती ।। २६१ ।।

भा. १२. २४४–२६१

## ५१. अविश्वास सर्व दोषांचा मुकुटमणी आहे.

सकळ दोषां मुकुटमणी । अविश्वास बोलिला पुराणीं ।
जो प्रगटतां अर्धक्षणीं । करी धुळधाणी वृत्तीची ।। ३०८ ।।
अविश्वासें कवळिल्या चित्ता । अभिमानें मी म्हणे ज्ञाता ।
तेव्हां उभउभ्यां पळे आस्तिकता । देखे नास्तिकता सर्वत्र।।३१०।।

अविश्वास येतां पहा हो । सकुटुंब पळे सद्भावो ।
मग लोकत्रयीं अभावो । नांदवी निर्वाहो विकल्पें करुनी ॥११॥
वाडेंकोडें अविश्वासों । विकल्पु नांदे अहर्निशीं ।
जेथ रिगावा अविश्वासासी । विकल्प त्यासी नागवी ॥ १२ ॥
गांवोगांवीं अविश्वास । परमार्थराष्ट्र पाडी वोस ।
सद्गुरूचेंही दावी दोष । न मानी विश्वास ब्रह्मयाचा ॥ १३ ॥
यालागीं सकळ दोषांचा राजा । अविश्वासाहूनि नाहीं दुजा ।
तो रिगोनिया निज पैजा । विभांडी वोजा महासिद्ध ॥ १४ ॥
जिकडे अविश्वासें चाली केली । तिकडे परमार्थी पळणी झाली ।
विकल्पाची धाडी आली । ते संधीं नागवलीं बहुतेकें ॥ १५ ॥
सिद्धांचें गेलें सिद्धीभूषण । साधकें सपाई नागवलीं जाण ।
रानभरी झाले साधारण । श्रद्धेचें उद्यान छेदिलें ॥ १६ ॥
यमनियमांचीं नगरें जाळी । क्रोधु तापसा करी होळी ।
मोक्षफळें सफाळिता केळीं । समूळ उन्मळी मोहगजु ॥ १७ ॥
शमदमाचें घरटें । खाणोनि सांडिलें आव्हाटें ।
वोस विवेकाचे चोहटे । कोणी ते वाटे वागेना ॥ १८ ॥
व्रतोपवास यांचीं साजिरीं । निष्काम उपवनें चौफेरीं ।
तीं जाळिलीं उपराउपरीं । नानापरी विकल्पें ॥ १९ ॥
पोटांतूनि जो अविश्वासी । तो सदा देखे गुणदोषांसी ।
अखंड द्वेषी परमार्थासी । हा त्यापाशीं स्वभावो ॥ ३२२ ॥
सकळ दोषांमाजीं समर्थ । सकळ दोषांचें राजत्व प्राप्त ।
तो हा अकरावा अनर्थ । असे अनर्थ धनामाजीं ॥ २४ ॥
अकराहि इंद्रियांसी । पूर्ण करी अविश्वासी ।
या लागीं अकरावें स्थान यासी।वसित अविश्वासी मनामाजीं॥३२५॥

भा. २३. ३०८–३२५

## प्रकरण : ४

# सद्‌गुणसंशीलन

### ५२. मुमुक्षूस शास्त्रार्थाची आवश्यकता

जो कां केवळ विषयासक्त । तो कदा न मनी शास्त्रार्थ ।
कां जो जाला जीवन्मुक्त । तोही शास्त्रार्थ मानूनि न मनी ॥५१०॥
जैशी मृगजळाची भासे स्थिति । तैसे विषय मुक्तांप्रती ।
त्या विषयांचिये निवृत्ती । कोणते शास्त्रार्थी मानावा नेमु ॥ ११ ॥
एवं अत्यासक्त अति विरक्त । त्यांसी नेमु न चले येथ ।
मुमुक्षूसींच शास्त्रार्थ । नेमा निश्चित निजनेमें ॥ १२ ॥
विषयकामगज दारुण । अहंमहामदें उन्मत्त पूर्ण ।
देहतारुण्यें अतिपूर्ण । तोडी बंधन विधीचें ॥ १८ ॥
त्यासी विवेकमहावंत जाण । माथां चढों जाणे आपण ।
शास्त्रविधि अंकुशें पूर्ण । धरिला आवरून करकरितु ॥ १९ ॥
त्यासी उपशमाचें संरक्षण । वैराग्ययुक्त ठेवूनि जाण ।
दमाचे शृंखळीं आकळून । सत्याचे स्तंभीं पूर्ण विवेकु बांधे ॥ ५२० ॥

भा. ३. ५१०–५२०

### ५३. "स्वयें परमार्थ साधिती । विषयासक्ति थुंकोनी"

हरीशीं जाहले जे अनन्यशरण । ते हरीचे लडिवाळ पूर्ण ।
त्यांचें हरि करी प्रतिपाळण । जेवि जननी जाण तानुलेया ॥५५६॥
यालागीं जें जें जीविकावर्तन । तेंही करावें कृष्णार्पण ।
हें माझें म्हणोनि अभिमान । भक्त सज्ञान न धरिती कदा ॥ ५७ ॥

ज्याची आवडी अतिशयें चित्तीं । ज्याची आपणिया अति प्रीती ।
तें तें कृष्णार्पण करिती । गुरुवाक्यास्थिति विश्वासें ॥
यालागीं आठौ प्रहर । सेवेसीं वेंचिती निजशरीर ।
निमिषार्धेंही व्यापार । विषयाकार करिती ना ॥ ५९ ॥
अन्नालागीं होऊनि वेडें । सधनांच्या पायां न पडे ।
आयुष्याचे तिनी कवडे । विषयांचे चाडे कदा न करी ॥ ५६० ॥
आयुष्याची अर्ध घडी । वेंचितां न मिळे लक्ष कोडी ।
तेणें आयुष्यें परमार्थ जोडी । विषयांच्या कोडी थुंकोनि सांडी ॥ ६१ ॥
त्यागोनिया राजसंपत्ती । राजे जाऊनि वनाप्रती ।
स्वयें परमार्थ साधिती । विषयासक्ति थुंकोनि ॥ ६२ ॥
कैशी भक्तीची गोडी संपूर्ण । रिता जावों नेदी अर्ध क्षण ।
अवघें जीवितचि जाण । करी कृष्णार्पण सर्वस्वें ॥ ६३ ॥
आणि पुत्रदारादिक जें जें घरी । तें तें भगवत्सेवेवारी ।
स्वयें कृष्णार्पण करी । माझीं म्हणोनि न धरी ममता जीवीं ॥ ६४ ॥
दारा पुत्र देह गेह प्राण । यांसी आत्मा सबाह्य पूर्ण ।
तेथें संकल्पेंविण जाण । ब्रह्मार्पण सहजचि ॥ ५६५ ॥

भा. ३. ५५६-५६५.

## ५४. निजबोधाची तळमळ

जें कर्म करितों मी देहीं । तेणें तरेन कीं नाहीं ।
हें ज्याचे त्याचे ठायीं । स्फुरद्रूप पाहीं कळतसें ॥ २१८ ॥
कैं कृपा करील गोविंद । कैं तुटेल भवबंध ।
कैं देखेन तो निजबोध । परमानंद जेणें होय ॥ २२९ ॥

धांव पाव गा श्रीहरी । कृपा करीं दीनावरी ।
मज उद्धरीं भवसागरीं । भक्तकैवारी श्रीकृष्णा ॥ २३० ॥
जैसी जीवनावेगळी मासोळी । तैसा बोधालागीं तळमळी ।
प्रेमपडिभराच्या मेळीं । देह न सांभाळी सर्वथा ॥ ३१ ॥
एक नेणोनि नरदेहा मुकले । एकीं नव्हे म्हणोनि उपेक्षिले ।
एक ज्ञानगर्वें गिळिले । एक भुलले विषयार्थी ॥ ३२ ॥
एक साधनाभिमानें ठकिले । एक करूं करूं म्हणतां गेले ।
एक करितां अव्हाटां भरले । करणें ठेलें तैसेचि ॥ ३३ ॥
जरी विवेक कळला मना । तरी न तुटती विषयवासना ।
तेणें संतप्त होऊनि जाणा । नारायणा चिंतितु ॥ २३४ ॥

भा. ७. २१८-२३४

## ५५. अलिप्तता

सुखदुःख उभय भोग । दोंमाजीं अखंड आपुलें अंग ।
जेवि चित्रींची वाघीण आणि वाघ । दोहींमाजीं सांग निजत्वें भिंती ॥ ४०४ ॥
जेवि दावाग्नि का उन्हाळें । आकाश जैसें न पोळे ।
असोनि त्यांचेनि मेळें । त्यांवेगळें अलिप्त ॥ ४०५ ॥
शीतळ जळ कां हींव पडे । पृथ्वी निजक्षमा न कांकुडे ।
तेवि निजस्वरूप सुरवाडें । द्वंद्वा नातुडे निजसाधु ॥ ४०६ ॥
शरीर जरी हिंवें कांपे । तेणें देह कांपे साधू न कांपे ।
शरीर अति उष्णें तापे । परी साधू न तापे देहतापामाजीं ॥४०७॥
सुखें देखोनि दिठी । ज्या गोंडिया घाली मिठी ।
दुःखही त्या आवडीं घोंटी। द्वंद्वसहिष्णुता मोठी या नांव राया॥४०८॥

भा. ३. ४०४-४०८

## ५६. शुचिता

मुख्य साधावया परमार्था । अवश्य पाहिजे गा शुचिता ।
शुचित्वावांचोनि तत्वतां । न लभे हाता निजस्वार्थु ॥ ३८० ॥
मन मळिण वासनामळें । तें न करितां सोंविळें ।
बाह्य पवित्रता अहंबळें । तें जाण आंधळें न्याहाळी जैसें ॥३८२॥
मन मळिण वासनामळें । तें प्रक्षाळूनि सोंविळें ।
करावें गा भावबळें । गुरुवाक्यमेळें निजनिष्ठा ॥ ३८३ ॥
सोनें जेवीं पुटीं पडे । मळ तुटे वानी चढे ।
तेवीं गुरुसेवा जडत्व मोडे । चित्तशुद्धी जोडे निर्दुष्ट ॥ ३८४ ॥
अल्प जळ शौचाप्रती । तेणें हात करकटले ठाती ।
शेवटीं गिरबिडे बुहली । तेवीं विकल्पीं होती अपवित्र ॥ ३८९॥
तेवीं अंतरीं विकल्पु असतां । बाह्य जे जे पवित्रता ।
ते ते क्रिया नृपनाथा । जाण तत्वता अति भंडिमा ॥ ३९५ ॥
अंतर क्षाळिलें गुरुप्रतीतीं । बाह्य क्षाळिलें शास्त्रयुक्तीं ।
ऐसें शुचित्व निजनिश्चितीं । अद्वैतस्थिती तेथें नांदे ॥ ३९६ ॥

भा. ३. ३८०–३९६

## ५७. अहिंसा

आतां अहिंसेची स्थिति । ऐकें राया चक्रवर्ती ।
भंवई उचलणें नाहीं भूतीं । स्वप्न सुषुप्ती जागतां ॥ ४४९ ॥
पावो आदळतां देख । झणीं पृथ्वी पावेल दुःख ।
या काकुलती आवश्यक । पाउलें अलौलिक हळुवार ठेवी॥४५०॥
आकाश दचकेल देख । यालागीं नेदी सैरा हांक ।
वाचा परिपक पीयूख । वचनें परम सुख सर्वांसी देतु ॥४५१॥

त्याचा शब्द जैं गगनीं भरे । तेणें शब्दानंदचमत्कारें ।
गगनचि निजसुखीं सुभरे । येणें सुखोद्गारें वचनोक्ती ॥ ४५२ ॥
जळामाजीं घालितां उडी । झणीं उदक दडपे बुडीं ।
तरंगन्यायें देणें बुडी । जीवनाची दुथडी न हेलावतां ॥४५३॥
झणीं दुःख पावेल वारा । म्हणौनि श्वास न घाली सैरा ।
नेमुनी प्राणसंचारा । निजशरीरा वागवी ॥ ४५५ ॥
निजदेहा करावया घातु । सर्वथा जेवीं नुचले हातु ।
तेवीं भूतांवरी निघातु । ज्याच्या पोटांतु उपजेना ॥ ४५६ ॥
भूतां देतां दुःखलेशु । भूतीं दुखवेल भूतेशु ।
ऐसा ज्याचा दृढविश्वासु । तेथ रहिवासु अहिंसेचा ॥ ४५९ ॥
कायिक वाचिक मानसिक । भूतां उपजे त्रिविध दुःख ।
तें जेथें निमालें निःशेख । अहिंसा देख ते ठायीं ॥ ४६० ॥

भा. ३. ४४९–४६०

## ५८. आतिथ्य व श्रद्धा

आलिया वैश्वदेवाचे अंतीं । तो भलता हो भलते याती ।
त्यासी जे भगवद्भावें पूजिती । त्यांचें घरा पूर्णप्राप्ती वोरसोनि ये ॥
पूर्वीं अनोळखु निश्चितीं । आलियां वैश्वदेवाचे अंतीं ।
त्यातें ब्रह्मभावें जे पूजिती । त्यांसी भुक्तिमुक्ती आंदणी ॥८५०॥
अतिथीच्या ठायीं मूर्तिध्यान । सर्वथा करणें न लगे जाण ।
तो स्वरूपें स्वयें नारायण । पूजितां संपूर्ण सर्वार्थसिद्धी ॥ ५३ ॥
एवं अतिथीसी जें अर्पे । तें भगवंतमुखीं समर्पे ।
यालागीं अति साक्षेपें । अतिथी ब्रह्मरूपें पूजिजे सदा ॥ ५४ ॥
जें जें बोलिलें पूजास्थान । तेथें निजश्रद्धाचि प्रमाण ।
श्रद्धेवेगळें राया जाण । प्राप्ति संपूर्ण कदा न लभे ॥ ५५ ॥

निजश्रद्धेचें हृदय स्थान । तें हृदयीं विध्युक्त पूजन ।
करितां श्रद्धेनें आपण । प्राप्ति संपूर्ण उद्बोधे स्वयें ॥ ५६ ॥
येऱ्हवीं तरी आपुल्या देहीं । चालक ईश्वरु आहे हृदयीं ।
श्रद्धेनें भजतां त्याचे ठायीं । निजप्राप्ति पाहीं सहजें लाभे ॥ ५७ ॥
जें जें आपण सेविजे । तें तें भगवन्मुखीं पाविजे ।
येणें निजभजनें पाविजे । जाण सहजें परमात्मा ॥ ५८ ॥
सांडोनि देहींची अहंता । सकळ भोग ईश्वरु भोक्ता ।
ऐशी दृढ भावना भावितां । पाविजे परमार्था अपरोक्षसिद्धी॥५९
ते:सांडूनि देहअहंता । हृदयस्था शरण जातां ।
पाविजे पूर्ण परमार्था । जाण तत्वता नृपवर्या ॥ ८६१ ॥
निःशेष सांडिजे मीपण । याचि नांव हृदयस्था शरण ।
तूं सहजें परब्रह्म परिपूर्ण । मिथ्या देहाभिमान धरूं नको ॥८६२॥

भा. ३, ८४९–८६२.

## ५९. दान, तप व सत्य

दुःख निरसूनि भूतांसी । सुख देणें गा सर्वांसी ।
हेंचि उत्तम दान पृथ्वीसीं । अनायासीं तुकेना ॥ ४४८ ॥
जन्ममरणांचें दुःख । निरसूनि द्यावें निजसुख ।
याचि नांवें दान देख । अलौकिक उद्धवा ॥ ४४९ ॥
करूनियां कामाचा त्याग । तप करणें तें अति चांग ।
हृदयीं असतां कामदांग । तपाचें लिंग शोभेना ॥ ४५१ ॥
सकाम वना जाय तपासी । तो वनींही चिंती वनितेसी ।
तें तपचि बाधक होय त्यासी । काम आंगेंसीं वर्ततां ॥ ४५२ ।
माझ्या ठायीं अनुताप । त्या नांव गा शुद्ध तप ।
कां हृदयीं चिंतितां चित्स्वरूप । हें परम तप तपामाजीं ॥४५४॥

प्रवाहरूपें अनिवार । जीवभाव लागला थोर ।
त्यातें जिंके जो महावीर । तो परम शूर बोलिजे ।। ४५९ ।।
ज्या नांव बोलिजे निजसत्य । तें मी सांगेन निश्चित ।
सम ब्रह्म देखणें संतत । तें परम सत्य उद्धवा ।। ४६० ।।
वस्तु न देखतां सर्वसम । जें जें देखणें गा विषम ।
तेंचि असत्य अति दुर्गम । सत्य तें ब्रह्म समसाम्यें ।। ४६१ ।।
केवळ जें सत्य भाषण । तें निजसत्य नव्हे जाण ।
तेंचि विखींचें निरूपण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ।। ४६२ ।।

भा. १९. ४४८–४६२

## ६०. आत्मयज्ञ

हृदयाच्या निजभुवनीं । विकल्पाची भूमी खणोनि ।
शमदमविरक्ती कुंडें तिन्ही । केलीं आवो साधुनी श्रद्धेचा ।।७३।।
तेथ क्षराक्षर अरणी दोन्ही । गुरुमंत्रें दृढ मंथुनी ।
काढिला सूक्ष्म निर्धूमाग्नी । कुंडीं स्थापोनि पेटविला ।। ७४ ।।
शुद्ध सत्वाचें घृत तेथ । रजतमद्रव्येंसीं मिश्रित ।
वैराग्यस्रुवेनें आहुती देत । मंत्र तेथ युक्तीचे ।। ७५ ।।
घेऊनि विद्याशस्त्र लखलखित । संकल्पपशूचा करूनि घात ।
तेणें यज्ञपती श्रीअनंत । केला तृप्त निजबोधें ।। ७६ ।।
तेथ पूर्णाहुतीस कारण । घालितां जीवभावाचें अवदान ।
यज्ञभोक्ता श्रीनारायण । परमात्मा जाण सुखी जाला ।। ७७ ।।
यापरी माझें यजन । करूनियां मुनिगण ।
निवारूनि जन्ममरण । माझी सिद्धी जाण पावले ।। ७८ ।।

भा. १९. ७३–७८.

## ६१. मौन

सद्‌गुरुवचन पडतां कानीं । स्तुति निंदा गिळोनि दोन्हीं ।
बोल बोलणें निरखुनी । हृदयभुवनीं परिपक्कले ॥ ४१६ ॥
जेव्हां ज्याचे बोलावे अवगुण । तेथें तेथें दिसे आपण ।
यालागीं बोलतां पैशून्य । पडे मौन गुरुवाक्यें ॥ ४१७ ॥
गुण देखोनियां स्तवन । करितां पडे दृढ मौन ।
मीचि स्तव्य स्तविता स्तवन । मज म्यां वानितां पूर्ण मूर्खत्व माझें ।
निजात्मा निःशेष नसे । ऐसा रिता ठाव न दिसे ।
तेथें जें जें कांहीं दिसे । तें आत्मप्रकाशें सदोदित ॥ ४१९ ॥
ऐशी सद्‌गुरूंनीं दाखविली युक्ती । ती विश्वासें स्थिरावली चित्तीं ।
यालागीं निंदा आणि स्तुती । वाचेप्रती बोलेना ॥ ४२० ॥
अथवा अतिशयें दृढ मौन । श्रीरामकृष्णनामस्मरण ।
अखंड नामें गर्जतां पूर्ण । वेदार्थ जाण तिष्ठती पुढें ॥ ४२४ ॥
नित्य रामनाम गर्जे वाणी । त्या तीर्थें येती लोटांगणीं ।
सुरवर लागती चरणीं । यम पायवणी स्वयें वंदी ॥ ४२५ ॥
रामनामाचें जें स्मरण । या नांव गा महामौन ।
वेदें नाम स्तविलें पूर्ण । शुद्ध अध्ययन हरिनाम ॥ ४२६ ॥

भा. ३. ४१६-४२६.

## ६२. शांति

शांति म्हणिजे ते ऐशी । सागरीं अक्षोभ्यता जैसी ।
चढ वोहट नाहीं तिसी । सर्वदेशी सर्वदा ॥ १३६ ॥
नाना सरितांचे खळाळ । आणूनि घालिती समळ जळ ।
तो तिळभरी नव्हे डहुळ । अति निर्मळ निजांगें ॥ १३७ ॥

तैशी नानाभूतविषमता । स्वार्थविरोधें अंगीं आदळतां ।
पालटु नव्हे ज्याच्या चित्ता । ते जाण सर्वथा निजशांति ॥१३८॥
ऐशी शांति ज्यासी देखा । तोचि सर्वभूतांचा सखा ।
आवडता सर्व लोकां । सुहृद तो कां सर्वांचा ॥ १३९ ॥
नवल सख्यत्वाची परी । सर्वस्व दे निजमैत्री ।
स्वार्थी वंचनार्थु न करी । कृपापात्रीं उपदेशु ॥ १४० ॥
अतर्क्य त्याची पाहती दिठी । मद्रूपें देखे सकळ सृष्टि ।
जगासीं मज अभिन्न गांठी । निजदृष्टीं बांधली ॥ १४१ ॥
मग तो जेउतें पाहे । तेउता मीचि तया आहे ।
तो जरी मातें न पाहे । तें न पाहणेंहि होये मीचि त्याचें ॥१४२॥
त्याची पाहती जे दिठी । ते मीचि होये जगजेठी ।
ऐशी तया मज एक गांठी । सकळ सृष्टीसमवेत ॥ १४३ ॥
अवघें जगचि मी होये । तेव्हां तो मी हे भाष जाये ।
ऐसा तो मजमाजीं सामाये । समसाम्यसमत्वें ॥ १४४ ॥

भा. ७. १३६--१४४

प्रकरण : ५

# परमार्थाचीं साधनें

## ६३. यालागीं मुख्य गुरु नरदेहो

चोवीस गुरूंचाही हा गुरु । विवेक वैराग्य विचारू ।
हा नरदेहीं लाधे सधरू । यालागीं मुख्य गुरु नरदेहो ॥ २४९ ॥
देहासी जें गुरुत्व जाणा । तें दों प्रकारीं विचक्षणा ।
सांगेन त्याच्या लक्षणा । संरक्षणा परमार्था ॥ २५० ॥
देहा ऐसें वोखटें । पृथ्वीमाजीं नाहीं कोठें ।
देहा ऐसें वोखटें । पाहतां न भेटे त्रिलोकीं ॥ ५१ ॥
वोखटें ह्मणोनि त्यागावें । तैं मोक्षसुखासी नागवावें ।
हो कां गोमटें म्हणोनि भोगावें । तैं अवश्य जावें नरकासी ॥५२॥
तरी हें त्यागावें ना भोगावें । मध्यभागें विभागावें ।
आत्मसाधनीं राखावें । निजस्वभावें हितालागीं ॥ ५३ ॥
जैसें भाडियाचें घोडें । आसक्ति सांडोनि पुढें ।
येणेंवरी नेणें घडे । स्वार्थ चाडेलागुनी ॥ ५४ ॥
हेतु ठेवूनि परमार्थी । गेहीं वस्तीकरू जेवीं उखिता ।
देहआसक्तीची कथा । बुद्धीच्या पंथा येवों नेदी ॥ २५५ ॥

भा. ९. २४९–२५५

## ६४. नरदेहाचा परमार्थाकडे उपयोग

चौऱ्यांशी लक्ष योनींप्रती । जैं कोटिकोटि फेरे होती ।
तैं नरदेहाची प्राप्ती । अवचटें लाहती निजभाग्यें ॥ ३३२ ॥

जो मनुष्यदेहीं जन्मला । तो परमार्थासी लिगटला ।
एवढा अलभ्य लाभ जाला । पितरीं मांडिला उत्साहो ॥ ३३ ॥
झालिया मनुष्यदेहप्राप्ती । परमार्थ साधूं भोगाअंतीं ।
एवढी येथ नाहीं निश्चिती । मृत्युप्राप्ति अनिवार ॥ ३४ ॥
मृत्यु न विचारी गुणदोष । न म्हणे देशविदेश ।
न पाहे रात्रदिवस । करीत नाश तत्काळ ॥ ३५ ॥
देह जेंपासोनि जाला । तेंपासूनि मृत्यु लागला ।
जेवीं सापें बेडूक धरिला । गिळूं लागला लवनिमिषें ॥ ३६ ॥
साप बेडुकातें गिळी । बेडूक मुखें माशातें कवळी ।
तैशीं मृत्युमुखीं पडलीं । विषयभुलीं झोंबती ॥ ३३७ ॥

भा. ९. ३३२-३३७

## ६५. शुद्धाशुद्ध कर्म कोणतें ?

जेथ केलिया मंत्रग्रहण । अंगीं चढता वाढे अभिमान ।
कां जेथ जारण मारण उच्चाटण । ते मंत्र जाण अपवित्र ॥१५९॥
जेणें कर्में कर्माचा निरास । तें शुद्ध कर्म सावकाश ।
जेथ समबुद्धि सदा अविनाश । तो पुण्यदेश उद्धवा ॥ १६२ ॥
जेथ उपजे साम्यशीळ । तो देश जाणावा निर्मळ ।
चित्त सुप्रसन्न जे वेळ । तो पुण्यकाळ साधका ॥ ६५ ॥
स्वभावें शुद्ध ब्राह्म मुहूर्त । तेथही क्षोभल्या चित्त ।
तोही काल अपुनीत । जाण निश्चित वेदार्थ ॥ ६६ ॥
कर्मी मुख्यत्वें गा आचमन । हें कर्मशुद्धीचें निजकारण ।
तोचि दक्षिणाभिमुख केल्या जाण । दोष दारुण उपजवी ॥१७२॥
आचमनी माषमात्र जीवन । घेतल्या होइजे पावन ।
तेंचि अधिक घेतां जाण । सुरापानासम दोष ॥ ७४ ॥

फणस खातां लागे गोड । तें जैं अधिक खाय तोंड ।
तैं शूल उठे प्रचंड । फुटे ब्रह्मांड अतिव्यथा ॥ ७५ ॥
सूर्यपूजनीं पुण्य घडे । तेथ जैं बेलपत्र चढे ।
तैं पुण्य राहे मागिलीकडे । दोष रोकडे पूजका ॥ ७६ ॥
सर्पगरळेचें जीवन । ब्राह्मणें करितां प्राशन ।
तें पात्र घेतां हिरोन । दोष तो परी गुण गंभीर होय ॥ ७९ ॥
निर्जीवा दीधलें विख । तेणें कोणासी द्यावें दुःख ।
तेंवि पतितासी पातक । नव्हे बाधक सर्वथा ॥ १८७ ॥
ज्यासी चढला विखाचा वासटा । त्यासी पाजावी सूकरविष्ठा ।
तेवीं अति कामी पापिष्ठा । म्यां स्वदारानिष्ठा नेमिली ॥ १९२ ॥
वेदें निरोपु दिधला आपण । तें दिवारातीं स्वदारारमण ।
तेंही वेदें नेमिलें जाण । स्वदारागमन ऋतुकाळीं ॥ ९५ ॥
तेथ जन्मलिया पुत्रासी । आत्मा वै पुत्रनामासि ।
येणें वेदवचनें पुरुषासी । स्त्रीकामासी निवर्तवी ॥ ९६ ॥
निःशेष विष उतरल्यावरी । तो सूकरविष्ठा हातीं न धरी ।
तेवीं विरक्ति उपजल्या अंतरीं । स्वदारा दूरी त्यागिती ॥ १९७ ॥

भा. २१. १५९–१९७

## ६६. निष्काम कर्म मोक्षदायी

काम्य आणि नित्यकर्म । आचरतां दिसे सम ।
तरी फळीं कां पां विषम । सुगम दुर्गम परिपाकु ॥ ३३ ॥
तें कर्मवैचित्र्यविंदान । संकल्पास्तव घडे जाण ।
तेचि अर्थीचें निरूपण । जाणोनि श्रीकृष्ण सांगत ॥ ३४ ॥

मुखाचा व्यापार भोजन । तो नाकें करूं जातां जाण ।
सुख बुडवूनि दारुण । दुःख आपण स्वयें भोगी ।। ३६ ।।
कां पायांचें जें चालणें । पडे जें डोईं करणें ।
तें मार्ग न कंठे तेणें । परी कष्टणें अनिवार ।। ३७ ।।
गजाचें आभरण । गाढवासी नव्हे भूषण ।
परी भारें आणी मरण । तेवीं कर्म जाण अनाधिकारी ।। ३९ ।।
मेघ वर्षे निर्मळ जळ । परी जैसें बीज तैसें फळ ।
एका भागीं पिकें सबळ । एका प्रबळ साळी केळें ।। ४० ।।
पाहें पां जैसें दुग्ध चोख । ज्वरितामुखीं कडू विख ।
तेंचि निरुजां गोड देख । पुष्टिदायक सेवनीं ।। ४१ ।।
तेवि सकामीं कर्म घडे । तें बाधक होय गाढें ।
तेंचि गा निष्कामाकडे । मोक्ष सुरवाडें सुखावी ।। ४२ ।।

भा. २१. ३३–४२.

६७. कर्मानें नव्हे, तर भक्तीनें ब्रह्मज्ञान प्राप्त होतें.

प्रपंचनगरा सभोंवतीं । कर्मनदीची महाख्याती ।
तिचेनि जळें जीव वर्तती । उत्पत्ति स्थिति अरतीरीं ।। १०५३ ।।
ते नदीचेनि जीवनमेळें । कर्मासी येती कर्मफळें ।
स्वर्गनरकादि सोहळे । तेणें जळबळें भोगिती ।। १०५४ ।।
प्रपंचनगरींहूनि निघतां । वेगें परमार्थासी येतां ।
जो तो कर्मनदीआंतौतां । बुडे सर्वथा निर्बुजला ।। १०५५ ।।
एक तरलों ऐसें ज्ञाते म्हणती । तेहि कर्मी कर्मगुचाकिया खाती ।
स्वयें बुडोनि आणिकां बुडविती । तरलों म्हणती तोंडाळ ।। १०५६ ।।

ऐसे बुडाले नेणों किती । बुडतां शिकवण तेचि देती ।
कर्मीचि उपावो तरणोपाय प्राप्ती। म्हणोनि बुडविती सर्वांतें।।१०५७।।
' न कर्मणा ' हें वेदवचन । कर्म नव्हे ब्रह्मज्ञान ।
तें न मानिती कर्मठ जन । त्यांसि कर्माभिमान कर्मीचा।।१०५८।।

भा. ११. १०५३–१०५८.

ये कर्मनदीतें तरला । ऐसा न देखों दादुला ।
बुडाल्या धुराची मुदला । पाडु केतुला इतरांचा ।। १०६१ ।।
ये कर्मनदीची उत्पत्ती । मजाचिपासोनि निश्चितीं ।
तेही सांगेन तुजप्रती । यथानिगुतीं निजबोधें ।। ६२ ।।
मदाज्ञा मेघ गंभीरा । निःश्वसित पवनद्वारां ।
चतुर्वेदविधीच्या धारा । अति अनिवारा वर्षले ।। ६४ ।।
तेणें कर्मनदीआंतौतें । अनिवार उधळलें भरतें ।
पूर दाटला जेथिंचा तेथें । उतार कोणातें कळेना ।। ६५ ।।
एका न वचवेचि परतटीं । माझारींच फळें गोमटीं ।
देखोनि धांविन्नले अव्हाटीं । ते स्वर्गसंकटीं गुंतलें ।। १०७३ ।।
एकीं वेदत्रयाची पेटी । दीक्षेची दोरी बांधली पोटीं ।
ते स्वर्गांगनाकुचकपाटीं । गुंतोनि शेवटीं बुडाले ।। ७५ ।।
मंत्रतंत्रादि दीक्षितें । गुंतोनि बुडालीं जेथिंच्या तेथें ।
कर्मनदीच्या परपारातें । कोणी पावतें दिसेना ।। ७६ ।।
विरुळा कोणी एक सभाग्य येथें । हे सकळ उपाय सांडूनि परतें ।
जो अनन्य प्रीतीं मातें । कर्मनदी त्यातें कोरडी ।। १०७७ ।।

भा. ११. १०६१–१०७७

## ६८. कर्में ईश्वरार्पण केल्यानेंच नैष्कर्म्यसिद्धि

कोणें कर्में कर्म तुटे । नैष्कर्म्यसिद्धि स्वयें प्रगटे ।
पुरुषा पुरुषोत्तम भेटे । हें मज गोमटें वर्म सांगा ॥ ७५६ ॥
कर्म अकर्मयोगें चळे । ऐसें विकर्मी ज्यासी विवळे ।
त्यास निष्कर्मता आकळे । गुरुकृपाबळें तत्काळ ॥ ६९ ॥
कर्मावरी कर्म विशेष वाढे । विकर्म त्यातें म्हणणें घडे ।
जेथें कर्म रिघों न शके पुढें । अकर्म चोखडें या नांव ॥ ७७० ॥
ऐशी कर्मविवंचना अटक । हा प्रश्न केला तैं तूं बालक ।
त्याचिलागीं गा राया देख । सनकादिक न सांगतीचि ॥ ७१ ॥
कर्माकर्मविवंचना । अधिकारेंवीण कोणा ।
सांगों नये नृपनंदना । कर्म सज्ञाना अति दुर्बोध ॥ ७७२ ॥

भा. ३. ७५६–७७२

मी एकु कर्मकर्ता । ऐशी उठों नेदी अहंता ।
तें कर्मचि स्वभावतां । अर्पी श्रीअनंता ईश्वरातें ॥ ७९२ ॥
एवं ईश्वरीं जें अर्पे कर्म । तें कर्म होय निर्धर्म ।
याचि नांव परम । नैष्कर्म्यनिजसिद्धी ॥ ९३ ॥
हातीं आंतुडावया मासा । गळीं लाविजे अल्प आमिषा ।
तेवीं निष्काम करावया मानसा । वेदु फळाशा प्रलोभी ॥ ९७ ॥
हो कां फळाचिये चाडें । स्वधर्मकर्मी प्रवृत्ती घडे ।
तेणें नैष्कर्म्यसिद्धी आंतुडे । हें वेदांचें फुडें निजगुह्य ॥ ७९९ ॥

भा. ३. ७९२–७९९

## ६९. ब्राह्मणांची वृत्ति व कर्में

ब्राह्मणाचें षट्कर्म जाण । यजन याजन अध्ययन ।
अध्यापन प्रतिग्रहो दान । नेमस्त जाण हीं सहा ॥ ४०१ ॥
हो कां द्विजन्मे तिन्ही वर्ण । त्यांत क्षत्रिय वैश्य दोघे जण ।
त्यांस तीं कर्मीं अधिकारपण । यजन दान अध्ययन ॥ ४०२ ॥
जो प्रतिग्रहा पराङ्मुख ब्राह्मण । तेणें याजन अध्यापन जाण ।
स्वधर्मं करूनि द्रव्यार्जन । जीविकावर्तन करावें ॥ ४१२ ॥
धरोनि द्रव्याशा मानसीं । न करवावे यागांत कर्मासी ।
कां सांगोनि वेदाक्षरासी । द्रव्य त्यापाशीं इच्छूं नये ॥ ४१३ ॥
शेत संवगूनि नेल्या जाण । तें शेतीं प्राप्त कणिसें कां कण ।
ते शीलवृत्ति संपूर्ण । ऐक लक्षण उंछवृत्ती ॥ ४१६ ॥
स्वामी नसतां सांपडले जाण । ऐसें हाटवाटीं पडिले कण ।
ते वेंचूनि घेणें आपण । जीविकावर्तन यावरी ॥ ४१७ ॥
वर्णांमाजीं उत्तम वर्ण । त्या ब्राह्मणाचा देहो जाण ।
क्षुद्रकामार्थ निर्माण । देवें आपण नाहीं केला ॥ ४१९ ॥
पशुपक्ष्यादि योनींच्या ठायीं । कामावांचूनि आन नाहीं ।
तेचि ब्राह्मणाचे देहीं । तैं विशेष कोण उत्तमत्वें ॥ ४२० ॥
ब्राह्मणाचे देहीं जाण । करावें स्वधर्में अनुष्ठान ।
माझेनि उद्देशें संपूर्ण । तपसाधन कृच्छ्रादिकें ॥ ४२१ ॥
मी हृदयीं धरोनि अनंत । जो पूर्ण वैराग्ययुक्त ।
तपादि साधनीं सतत । सदा शिणत ब्राह्मण जे ॥ ४२२ ॥
त्यांसी देहपाताच्या अंतीं । माझ्या अनंत सुखाची प्राप्ती ।
तेथ स्वर्गसुखादि संपत्ती । मावळती तत्काळ ॥ ४२३ ॥

ज्या सुखाचे सुखस्थितीं । स्फुरेना संसारस्फूर्ति ।
जेथूनि नाहीं पुनरावृत्ती । ते सुखप्राप्ती त्या ब्राह्मणा ।। ४२४ ।।

भा. १७. ४०१-४२४

## ७०. क्षत्रियांचे सात मुख्य गुण

आकाश पडावया गडाडी । पृथ्वी उलथावया हडवडी ।
तरी ज्याचे धृतीची रोकडी । नव्हे वाकुडी रोमावळी ।। १४३ ।।
वोडवलियाही कल्पांता । धाक रिघों नेणे ज्याच्या चित्ता ।
ऐसें निजधैर्य स्वभावतां । धृति तत्त्वतां ती नांव ।। १४४ ।।
संमुख आलिया रणांगणीं । मागें पावो न ठेवी रणीं ।
एकला विभांडी वीरक्षोणी । हें स्वधर्मकरणी निजशौर्य ।।१४८।।
मृत्यूएवढा महावैरी । जो निःशेष नाहीं करी ।
त्याच्या शौर्याची थोरी । सुरासुरीं वानिजे ।। १४९ ।।
शस्त्रांचे घाव वाजतां माथां । कां सपिच्छ बाण खडतरतां ।
रणांगणीं न सरे मागुता । हे सहिष्णुता क्षत्रियांची ।। १५१ ।।
आलिया गजदळाचे थाट । महावीरांचे घडघडाट ।
तो यावा साहे सुभट । सहिष्णुता चोखट ती नांव ।। १५२ ।।
समुद्रलहरीच्या संपाता । कुलाचल न सरे परता ।
तेवीं परसैन्याच्या आघाता । न सरे मागुता रणांगणीं ।। १५३ ।।
क्षत्रियांच्या प्रकृतीस जाण । द्रव्य तें तृणासमान ।
याचकांचें निवे मन । तें देणें दान सर्वस्वें ।। १५६ ।।
चंद्र चकोरातें पाही । सदा देतां नुबगे कांहीं ।
तेवीं हा याचकाचे ठायीं । पराङ्मुखता नाहीं क्षत्रिया ।।१५८।।
ऐसें स्वाभाविक जें दान । हा क्षत्रियांचा प्रकृतिगुण ।
या नांव गा उदाहरण । सहावें लक्षण क्षत्रियांचें ।। १५९ ।।

वेंचूनिया निजप्राण । गोब्राह्मणांचें संरक्षण ।
स्वधर्में प्रजापालन । पृथ्वीरक्षण निरुपद्रवें ॥ १६१ ॥
या नांव गा उद्यम जाण । क्षत्रियांचें सातवें लक्षण ।
आतां स्वधर्मस्थैर्य गुण । तेंही निरूपण अवधारीं ॥ १६२ ॥
न करितां ब्राह्मणभजन । अंगीं ऐश्वर्य न ये जाण ।
मी जाहलों षड्गुणैश्वर्यसंपन्न । सदा द्विजचरण हृदयीं दृढ
वाहतां ॥ १७१ ॥

भा. १७. १४३–१७१

## ७१. सार्ववर्णिक धर्म

स्वधर्में धन यावें हाता । हेही नसे धनकामता ।
कामिनीकामाची नेणे वार्ता । परस्त्री ते माता नेमस्त ॥ २४३॥
हो कां स्वदाराभिगमन । तेथेंही आसक्त नसे मन ।
आश्रमधर्मार्थ जाण । प्रतिपालन स्त्रियेचें । २४४ ॥
या नांव गा अकामता । उद्धवा जाण तत्त्वतां ।
हे चौथी लक्षणता । ऐक आतां अक्रोधु ॥ २४५ ॥
जरी बीज जाहलें गोमटें । तरी भूमीवीण अंकुर न फुटे ।
तैसें कामावांचूनि कोठें । क्रोध उद्भट न वाढे ॥२४७॥
एवं कामाची जी बोळवण । तेचि क्रोधाचीही जाण ।
जैसें गरोदरीचें मरण । वारी निर्दळण गर्भाचें ॥ २४८ ॥
शिर तुटलिया पाठीं । हस्तपादादि क्रिया तुटी ।
काम निमालिया पाठीं । निमाली गोष्टी क्रोधाची ॥ २४९ ॥
जैशी शक्ति आपणासी । तैसें प्रिय करावें भूतांसी ।
अगत्य विंचंबु ज्याचा ज्यासी । तें तें त्यासी अर्पावें ॥ २५९ ॥

ऐसें प्रिय करावें भूतां । जें परिपाकीं ये त्याच्या हिता ।
जेणें प्रियत्वा उपजे बाधकता । तें सर्वथा न करावें ॥ २६१ ॥
भूतप्रिय हितकारी । ऐसा जो पुरुष संसारीं ।
मी भगवंत त्याच्या घरीं । सर्वहित करीं सर्वदा ॥ २६२ ॥

भा. १७. २४३–२६२

## ७२. ब्रह्मचाऱ्याचें वर्तन

स्त्री देखतांचि दिठी । सांडूनियां पर्णकुटी ।
पळावें गा उठाउठी । मा कराव्या गोठी घडे केंवि ॥ ३४० ॥
स्वप्नींहि स्त्रियेच्या स्पर्शासी । करूं नये ह्या तिघांशीं ।
करितां मदनु त्यासी । वीर्यपातासी उपजवी ॥ ४१ ॥
त्या स्त्रियांसी क्रीडाविनोद । करितां विध्वंसे धर्मकंद ।
यालागीं स्त्रीगुणानुवाद । न करिती शुद्ध सज्ञान ॥४२॥
स्त्रियांचें हावभाव–दर्शन । एकांत गुप्त संभाषण ।
नाना विनोद अंगस्पर्शन । परिहासन मदनोक्ती ॥४३॥
स्त्री ते अग्निकुंडासमान । पुरुष तो घृतकुंभ जाण ।
तेथ द्रवतां अंतःकरण । अर्ध क्षण लागेना ॥४४॥
तेवि वार्धक्यवयसेंसीं । एकांत जाहालिया स्त्रियेशीं ।
गोष्टीमात विनोदेंसीं । कामाचा त्यासी घाला पडे ॥४८॥
मैथुनभूत जे प्राणी । पशुपक्षी आदिकरुनी ।
सादर न पहावें नयनीं । पाहतां कडकडूनि काम खवळे ॥३५१॥
मत्स्यमैथुन देखिल्यासाठीं । खवळल्या कामाच्या परिपाटी ।
सौभर ऋषीश्वरें तपकोटी । मैथुनासाठीं नाशिल्या ॥५२॥

हृदयीं नव्हे कामसंचार । तैसा करावा सदाचार ।
भूतें पहावीं मदाकार । हा मुख्य प्रकार हरि बोले ॥३५४॥

भा. १७. ३४०–३५४

## ७३. वानप्रस्थाश्रमवर्णन

शतायुः पुरुषमर्यादा श्रुती । त्याच्या तृतीयभागाची स्थिती ।
सासष्ठी क्रमिल्या अंतीं । वनाप्रती निघावें ॥ ११ ॥
निघावया वनाप्रती । भार्या देऊनि पुत्राचे हातीं ।
आपण निघावें शीघ्रगती । वानप्रस्थीं वनवासा ॥ १२ ॥
भार्या साध्वी पतिव्रता सती । ईश्वरस्वरूप मानी पती ।
भ्रतार निघतां वानप्रस्थीं । जे पुत्राप्रती राहेना ॥ १३ ॥
सांडितां भ्रतारसेवेसी । कल्पांत हों पाहे जिसी ।
जे भ्रतारचरणांची दासी । ते सवें वनासी आणावी ॥ १४ ॥
मस्तकीं न करावें वपन । न करावें श्मश्रुकर्म जाण ।
न करावें लोमनखच्छेदन । दंतधावन न करावें ॥ २१ ॥
स्नान मुसलवत् केवळ । अवश्य करावें त्रिकाळ ।
प्रक्षाळावें ना शरीळमळ । व्रत प्रवळ वनस्था ॥ २२ ॥
केवळ भूमीवरी शयन । सदासर्वदा करावें जाण ।
तळीं घालावें ना तृण । मग वस्त्रास्तरण तें कैंचें ॥ २३ ॥
यापरी वानप्रस्थें जाण । दृढ धरूनि व्रतधारण ।
करावें तपाचरण । तें तपलक्षण अवधारीं ॥ २४ ॥
उष्णकाळीं पंचाग्नी । अग्निकुंडें चहूं कोणीं ।
पांचवा रवि माध्यान्हीं । ऐसा पंचाग्नी साधावा ॥ २५ ॥

माळा करोनि उच्च प्रदेशीं । घन वर्षतां धारावर्त्तेंसीं ।
तेथ व्हावें आकाशवासी । वर्षाकाळीं ऐसी तपप्राप्ती ॥ २६ ॥
आलिया हेमंतऋतूसी । आकंठमग्न जळवासी ।
जळवास करावा अहर्निशीं । हे वानप्रस्थासी तपक्रिया ॥ २७ ॥
पूर्वदिवसीं फळें आणिलीं । अपरदिवसीं जरी उरलीं ।
तीं अवश्य पाहिजे त्यागिलीं । नाहीं बोलिलीं आहारार्थ ॥ ३३ ॥
प्रत्यहीं आहारार्थ जाण । फळें आणावीं नूतन ।
जीर्ण फळांचें भक्षण । निषिद्ध जाण वानप्रस्था ॥ ३४ ॥
आणिकें फळें जीं आणिलीं । तीं अंगीकारा निषिद्ध झालीं ।
जीं स्वकष्टें अर्जिलीं । तीं वहिलीं आहारार्थ ॥ ३५ ॥
शुष्क शरीरपंजरा । त्वचेनें झांकिलिया शिरा ।
परी सामर्थ्य अति खरा । न सरे माघारा तपोनिष्ठें ॥ ४५ ॥
परी फळाशा पोटीं नाहीं । ऐसेनि निमाला जो देही ।
तो पावोनि ऋषिलोकाच्या ठायीं । तेथोनि पाहीं मज पावे ॥४८॥
जो ऋषिलोकांतें पावला । तो क्रमें मुक्तीच्या मार्गा आला ।
तेथूनि क्रमेंचि मज पावला । यापरी उद्धरला वनस्थ ॥ ४९ ॥
पन्नास वर्षें गार्हस्थ । दोनी द्वादशें वानप्रस्थ ।
झाला तरी जो अप्राप्त । वैराग्ययुक्त निजज्ञान ॥ ५७ ॥

भा. १८. ११–५७

## ७४. संन्याशाचें कर्तव्य

जेथ जीवसंपदा दृष्टीं पडे । तें प्राण गेल्या न चले पुढें ।
जीविता काढूनि कडे । पाऊल पडे अति शुद्ध ॥८७॥

आर्धींच पवित्र गंगाजळ । त्याचें निर्मळ वस्त्रें निरसोनि मळ
यापरी करोनियां निर्मळ । गंगाजळ सेविती ॥ ८८ ॥
जें श्रवणीं अति गोड । पुरवी श्रोतयांचें कोड ।
निववी जीवाची चाड । सत्य सुरवाड हा वाचेचा ॥९१॥
हें सहजें संन्याशाचें ध्यान । अहमेव नारायण ।
तें दृढ धरोनि अनुसंधान । पवित्र मन करावें ॥ ९२ ॥
मौन अथवा सत्य भाषण । कां श्रीरामनामाचें स्मरण ॥
हो कां ओंकाराचें उच्चारण । वाग्दंड जाण या नांव ॥९६॥
शरीरींचें जितुकें चळण । तें प्राणाचेनि बळें जाण ॥
त्या प्राणाचें प्राणरोधन । करावें आपण प्राणायामें ॥९७॥
प्राणायामें निजप्राण । जिणोनि करावा स्वाधीन ॥
या नांव देहदंड जाण । ऐक लक्षण मनोदंडाचें ॥९८॥
मनाचें चपळपण । संकल्प विकल्प जाण ।
त्याचें करावया छेदन । ब्रह्मानुसंधान करावें ॥९९॥
माझें स्वरूप सर्वगत । तेथ निश्चयें ठेवितां चित्त ॥
मन संकल्पविकल्पें जाय जेथ । तेथ तेथ तें स्वरूप ॥१००॥
देह वाचा आणि मन । या त्रिदंडांचें लक्षण ॥
तुज म्यां सांगितलें संपूर्ण । संन्यासत्व जाण येणें सत्य ॥१०२॥
हे तिन्ही दंड नसतां जाण । केवळ वेणुदंडग्रहण ॥
तेणें संन्यास न घडे जाण । देहविटंबन दंभार्थ ॥१०३॥

भा. १८. ८७–१०३

## ७५. अनन्य भक्त आश्रमातीत असतो.

ज्यासी वैराग्य नाहीं सर्वथा । हृदयीं स्त्रीकामाची आस्था ।
तेणें द्वितीयाश्रमसंस्था । गार्हस्थ्या करावें ॥३७५॥

स्त्रीकामु तरी नावडे । विवेक वैराग्य ज्यासी थोडें ॥
तेणें वानप्रस्थाश्रमाकडे । रिघावें रोकडें तात्काळ ॥३७६॥
जो विवेकतेजें दीप्तिमंत । ज्यासी सदा वैराग्य धडधडीत ।
जो सर्वार्थीं दिसे विरक्त । त्यासीच निश्चित चतुर्थाश्रम ॥३७८॥
बैसतां भार्येच्या पाटीं । बाहुल्यावरी वैराग्य उठी ॥
त्यासी संन्यासग्रहणीं गोठी । अधिकारु श्रेष्ठीं बोलिला ॥३८१॥
प्रथम ब्रह्मचर्ययुक्त । वैराग्या न चढेचि हात ॥
तरी होऊनि गृहस्थ । स्वधर्मयुक्त वर्तावें ॥३८५॥
तेथें स्वधर्में विषय सेवितां । दृढ साधावी विरक्तता ॥
तेथ ही वैराग्य न ये हाता । तरी वानप्रस्थाश्रमी व्हावें ॥३८६॥
कां मत्पर जो भक्त । त्यासी आश्रमनेम नाहीं तेथ ॥
तो माझेनि भजनें कृतकृत्य । जाण निश्चित उद्धवा ॥३८९॥
सद्भावें माझी भक्ति करितां । विवेक वैराग्य योग्यता ।
पावोनि माझी पूर्ण सत्ता । सायुज्यता नेघती ॥३९०॥
ऐसे जे माझे भक्तोत्तम । त्यासी न लगे आश्रमनेम ।
त्यांचा सर्वही मी स्वधर्म । ऐसें पुरुषोत्तम बोलिला ॥३९१॥

भा. १७. ३७५–३९१

## ७६. योगाभ्यासानें कामवासना नाहींशी होते.

आळस निद्रेसी दवडूनि दूरी । जो सावधान निजवृत्ती धरी ।
माझें चिद्रूप निर्धारीं । शनैः शनैः करी प्रथम अभ्यासु ॥२५४॥
अभ्यासीं प्रथम भूमिका । शिकावी आसन गाढिका ।
मूळबंध अति नेटका । आसनजयो देखा शिकावा ॥५५॥

आसनजयो आल्या हाता । सहजें चढे योगपंथा ।
तेथें प्राणापानसमता । अभ्यासितां हों लागे ॥५६॥

विषय ते मनाआधीन । मन पवनासी वश्य जाण ।
अभ्यासें वश केला पवन । सहजें मन स्थिरावे ॥५७॥

यापरी जो हळूहळू । अभ्यासें सार्थक करी काळू ।
अविरक्त परी प्रवळू । होय मुकाळू परमार्थी ॥५८॥

हरिचिंतनीं एकाग्र मन । तैं एक होती प्राणापान ।
हाचि पवनजयो पूर्ण । योगसाधन सहजेंचि ॥५९॥

तंव प्राणापान सम जोडी । षट्चक्रांचे पदर फोडी ।
तैं विषयांतें चित्त सांडी । विषयो वोसंडी चित्ताते ॥२६०॥

यापरी या अभ्यासवाटे । सकाम कामाचा तटका तुटे ।
सनकादिक येणें परिपाठें । म्यां आत्मनिष्ठे लाविले ॥२६१॥

भा. १३. २५४–२६१

## ७७ ध्यानास योग्य आसन कोणतें ?

ऐक आसनाचें लक्षण । पाषाणीं व्याधि संभवे जाण ।
केवळ धरणीचें आसन । तें अति कठिण दुःखरूप ॥४०२॥

दारुकासनें निर्दय मन । कोरडया काष्ठा ऐसें होय जाण ।
तृणासनीं विकल्प गहन । जैसें कां तृण विचित्रांकुरें ॥४०३॥

वृक्षपल्लवांवरी आसन । तेणें चित्त सदा दोलायमान ।
जारण मारण स्तंभन । तेथ काळें आसन साधकां ॥४०४॥

ज्ञानोपलब्धि मृगाजिनीं । मोक्षसिद्धि व्याघ्राजिनीं ।
मोक्षादि सर्व सिद्धींची श्रेणी । श्वेतकंबलासनीं साधका ॥४०५॥

भूमिका शुद्ध आणि समान । पाहोनि निरुपद्रव स्थान ।
तेथ रचावें आसन । सुलक्षण अनुक्रमें ॥४०६॥
कुश वस्त्र कंबलाजिन । इहीं युक्त घालावें आसन ।
उंच नीच न व्हावें जाण । समसमान समभागें ॥४०७॥
उंच झालिया आसन डोले । नीचीं भूमिदोष आदळे ।
यालागीं समत्वें प्रांजळें । रचावें कोवळें मृदु आसन ॥४०८॥
तेथ शुद्ध मुद्रा वज्रासन । कां अंबुजासनही जाण ।
अथवा घालावें सहजासन । जें आसनीं मन सुखावे ॥४०९॥
तेणें मेरुदंड अवक्र शुद्ध । समकाया राखोनि प्रसिद्ध
मूळाधारादि तिनी बंध । अति सुबद्ध पैं द्यावे ॥४१०॥
ऐसें आसन लागतां । आसनावरी स्वभावतां ।
करांबुजाची विकसता । उत्संगता शोभती ॥४११॥
नाकाचें अग्र सांडूनि दूरी । दृष्टि ठेवावी नासिकाग्रीं ।
ते ठायीं बैसे अग्निचक्रीं । योगगंभीरीं योग्यता ॥४१२॥
ते अभ्यासीं निजनिश्चळें । योगाभ्यासें योगबळें ।
अर्धोन्मीलित होती डोळे । धारणामेळें ते काळीं ॥४१३॥

भा. १४. ४०२-४१३

### ७८ ध्यानानें जीव भगवद्रूप होतो.

भिंगुरटी कीटकीतें धरी । कोंडी भिंतीमाजिलें घरीं ।
ते मरणभयें ध्यान करी । निरंतरीं भ्रमरीचें ॥२३९॥
तेणें तीव्र ध्यानें ती कीटी । होऊनि ठाके भिंगुरटी ।
गगना चढे उठाउठी । प्रत्यक्ष दृष्टीं देखिजे ॥२४०॥

भिंगुरटी जड असंत । मूढ कीडी तिचें ध्यान करीत ।
तेणें तद्रूपता प्राप्त । तैसा भगवंत तंव नव्हे ? ॥२४१॥
तो अजड चिद्रूप सुखदाता । ज्ञाता अधिकारी ध्यान करिता ।
तेथ तद्रूपता पावतां । विलंबू सर्वथा पैं नाहीं ॥२४२॥
कीटकीस भ्रमरत्व जोडे । हें तीव्र ध्यानें न घडतें घडे ।
विचारितां दोन्हीं मूढें । जड जडें वेधिलें ॥२४३॥
भगवद्ध्यान नव्हे तैसें । ध्याता भगवद्रूपचि असे ।
ध्यानें भ्रम मात्र नासे । अनायासें तद्रूप ॥२४४॥
येणें देहें याचि वृत्तीं । आपुली आपण न जाणे मुक्ती ।
न घेपे भगवत्पदप्राप्ती । तैं वृथा व्युत्पत्ती नरदेहीं ॥२४५॥
वृथा त्याचें ज्ञान ध्यान । वृथा त्याचें यजन याजन ।
वृथा त्याचें धर्माचरण । चैतन्यघन जरी नोहे ॥२४६॥

भा. ९. २३९–२४६

## ७९ नाममंत्रानें विघ्नांचा नाश

भावें करितां मंत्रानुष्ठान । तेणें वैराग्य उपजे जाण ।
वैराग्यें विषयनिर्दळण । सहजें जाण साधकां ॥६०७॥
शुद्ध मंत्राचें पुरश्चरण । करी विघ्नांचें निर्दळण ।
तेथ पिशाचबाधासंचरण । घेऊनि प्राण स्वयें पळे ॥६०८॥
तेथ साधल्या योगासिद्धी । समूळ निर्दळी अधिव्याधी ।
सकळ विघ्नांतेंही छेदी । जाण त्रिशुद्धी उद्धवा ॥६१०॥
माझिया ध्यानाचे परिपाठीं । उपसर्ग पळती उठाउठी ।
शोधितां विघ्न न पडे दृष्टीं । निर्द्वंद्व सृष्टी साधकां ॥६१२॥

म्हणशी घालोनि आसन । एकाग्र करोनियां मन ।
कैं टसावेल तुझें ध्यान । तें साधकां विघ्न बाधीना ॥६१५॥
असो न टके माझें ध्यान । तें सोपा उपाव आहे आन ।
माझें करितां नामकीर्तन । विघ्ननिर्दळण हरिनामें ॥६१६॥
जेथ नामाचा घडघडाट । तेथ उपसर्गा न चले वाट
महाविघ्नांचा कडकडाट । करी सपाट हरिनामें ॥६१७॥
माझ्या नामाचा निजगजर । पळवी महापापसंभार ।
उपसर्गा नुरवी थार । नाम सधर हरीचें ॥६१९॥
अवचा हें घेतां माझें नाम । सकळ पातकां करी भस्म ।
जेथ अखंड माझें गुणनामकर्म। तेथ विघ्नसंभ्रम स्पर्शेना ॥६२०॥
माझे नामकीर्तीवीण येथें । ज्याचें तोंड न राहे रितें ।
तो नागवे महाविघ्नांतें । जेवीं पतंगातें हुताशु ॥६२२॥
नामकीर्ती दाटुगी होये । हें विश्वासें मानलें आहे ।
तें नाम मुखीं केवि राहे । करावें काये म्हणशील ॥६२३॥

भा. २८. ६०७–६२३

## ८०. नामाच्या गजरानें पातकांचा संहार

म्हणशीं पाप असतां शरीरीं । तुझें भजन घडे कैशापरी ।
सकळ पापांची बोहरी । माझें नाम करी निमिषार्धें ॥३८७॥
ऐकोनि नामाचा गजर । पळे पातकांचा संभार ।
नामापाशीं पापास थार । अणुमात्र असेना ॥३८८॥
माझें नाम ब्रह्मास्त्र जगीं । महापाप वापुडें मुंगी ।
नामापुढें उरावयालागीं । कस त्याचें अंगीं असेना ॥३९१॥

भगवद्भाव सर्वांभूतीं । या नांव गा अभेदभक्ती ।
हे आकळल्या भजनस्थिती । अहंकृती उरेना ॥३९५॥
माझें नाम ज्याचे वदनीं । माझी कीर्ति ज्याचे श्रवणीं ।
माझा भाव ज्याचे मनीं । ज्याचे करादि चरणीं क्रिया माझी ॥३९६॥
जो जागृतीमाजीं पाहे मातें । जो स्वप्नीं देखे मज एकातें ।
जो मजवेगळें चित्त रितें । न राखे निश्चितें निजनिष्ठा ॥३९७॥
भक्तांसी विषयसेवन । सर्वथा बाधक नव्हे जाण ।
तो विषय करी मदर्पण । तेणें बाधकपण नव्हे त्यासी ॥३९९॥
नाना साधनें विषयो त्यागिती । त्यागितां परम दुःखी होती ।
भक्त विषयो भगवंतीं अर्पिती । तेणें होती नित्यमुक्त ॥४००॥
ग्रासोग्रासीं हरिस्मरण । तें अन्नाचि होय परब्रह्म पूर्ण ।
त्यासी नाहीं बाधकपण । ब्रह्मार्पण सहजेंचि ॥४०१॥
जरी विषय मिथ्या मायिक । तरी साधकां अति बाधक ।
येचि अर्थी यदुनायक । विशदार्थें देख सांगत ॥४०६॥

भा. २८. ३८७–४०६

## ८१. सर्वांतःकरणानें नामस्मरण करावें.

वाचा नेमावी माझेनि नामें । मन नेमावें ध्यानसंभ्रमें ।
प्राण नेमावा प्राणायामें । इंद्रियें दमनें नेमावीं ॥२९८॥
बुद्धि नेमावी आत्मविवेकें । जीव नेमावा परमात्मसुखें ।
इतकेन तूं आवश्यकें । होसीं कौतुकें मद्रूप ॥२९९॥
मद्रूप झालिया पाठीं । मग संसार न पडे दिठीं ।
खुटल्या जन्ममरणांचिया गोठी । गमनागमन आटाटी निमाली

म्यां सांगीतल्या नेमपरिपाठीं । हा नेम करणें नाहीं ज्याच्या पोटीं।
तो भोगी दुःखांचिया कोटी । ऐक ते गोठी सांगेन ॥३०१॥

भा. ५. २९८–३०१

त्या नामाच्या पाठा । तेणें देवासी संतोष मोठा ।
वेगीं सांडोनि वैकुंठा । धांवे अवचटा कीर्तनामाजीं ॥३४०॥
अंतरशुद्धीचें कारण । मुख्यत्वें हरिकीर्तन ।
नामापरतें साधन । सर्वथा आन असेना ॥३५३॥
कीर्तनीं हरीची आवडी कैशी । वत्सालागीं धेनु जैशी ।
कां न विसंबे जेवीं माशी । मोहळासी क्षणार्धें ॥५४॥
तेवीं नाम स्मरतया भक्ता । अतिशयें आवडी अच्युता ।
दासांची अणुमात्र अवस्था । निजांगें सर्वथा निवारी स्वयें॥५५॥
यालागीं हरिकीर्तनीं गोडी । जयासी लागली धडफुडी ।
त्यासी नाना साधनांच्या ओढी । सोसावया सांकडीं कारण नाहीं
ज्यासी कीर्तनीं कथाकथनीं । चौगुण आल्हाद उपजे मनीं ।
तो उद्धरला सर्व साधनीं । पवित्र अवनी त्याचेनि ॥५७॥
एकाचि जरी नाम वाचे । सदा वसे श्रीरामाचें ।
तरी पर्वत छेदोनि पापाचे । परमानंदाचें निजसुख पावे ॥५८॥
आवडीं करितां हरिकीर्तन । हृदयीं प्रगटे श्रीजनार्दन ।
त्याहोनि श्रेष्ठ साधन । सर्वथा आन असेना ॥३५९॥

भा. ५. ३४०–३५९

## ८२. नामघोषानें कलिमळ नासतात.

जो अवताराचें मूळपीठ । जो वीरवृत्ती अति उद्भट ।
तो अवतारांमाजीं श्रेष्ठ । अति वरिष्ठ श्रीराम ॥ २४४ ॥

पापें पळती रामनामें । नामांकित वंदिजे यमें ।
गणिकेचीं कर्माकर्मै । श्रीरामनामें निर्दळिलीं ॥ ४५ ॥
नामें कळिकाळासी धाक । यमदूतां न मिळे भीक ।
रामनामगजरें देख । पळे निःशेख जन्ममरण ॥ ४६ ॥
जो देवांचे बंद सोडी । नवग्रहांची बेडी तोडी ।
जेणें रामराज्याची रोकडी । उभविली गुढी तिहीं लोकीं ॥ ४७ ॥
ज्याचेनि शिळा तरती सागरीं । असुर मारिले वानरीं ।
जेणें सुवर्णाची नगरी । वोपिली पुरी शरणागतासी ॥ ४८ ॥
जो प्रतापाचा मरगळा । जेणें सेतु बांधिला अवलीळा ।
चरणीं उद्धारिली शिळा । जो निजजिव्हाळा निजभक्तां ॥ ४९ ॥
तो अवतार मूर्तिमंत । राया अद्यापि असे वर्तत ।
हा संवाद त्रेतायुगांत । द्रुमिळ सांगत विदेहासी ॥ २५० ॥
यालागीं श्रीराम श्रीजयराम । नित्य जपे जो हें नाम ।
तो पुरुषांमाजीं पुरुषोत्तम । कर्माकर्माअतीत तो ॥ ५१ ॥
तें रामनाम अवचटें । भीतरीं रिघे कर्णपुटें ।
तैं कळिमळांचीं मळकटें । नामोद्धारें नासती ॥ ५२ ॥
ऐशी रामनामाची ख्याती । जगदुद्धारें केली कीर्ती ।
धन्य धन्य जे परिसती । धन्य जे गाती रामचरित ॥ २५३ ॥

भा. ४. २४४–२५३

## ८३. परमेश्वरप्राप्तीचें सर्वांत श्रेष्ठ साधन म्हणजे सत्संग.

मज वश करावयालागीं । सामर्थ्य नाहीं अष्टांगयोगीं ।
नित्यानित्यविवेक जगीं । आंगोवांगीं मज न पवे ॥ २४ ॥

प्रकृतिपुरुषविवंचना । अखंड आलोडितां मना ।
पावावया माझिया स्थाना । सामर्थ्य जाण त्या नाहीं ॥ २५ ॥

धर्मे अहिंसादिसहित सत्य । त्याचेनि मी नव्हे प्राप्त ।
मुख्य वेदाध्ययनेंही मी अप्राप्त । सांग समस्त जरी पढिले ॥ २६ ॥

तेथ तपें कायसीं बापुडीं । पंचाग्नी असार परवडी ।
कृच्छ्रचांद्रायणें झालीं वेडीं । त्यांचे जोडी मी न जडें ॥ २७ ॥

देहगेह सांडूनि उदास । विरजा होमीं हवी सर्वस्व ।
साधनीं अति श्रेष्ठ संन्यास । त्यासी मी परेश नातुडे ॥ २८ ॥

अश्वमेध राजसूय याग । सर्वस्व वेंचूनि करितां सांग ।
माझे प्राप्तीसी नव्हतीचि चांग । तेणें मी श्रीरंग नाटोपे ॥ ३२ ॥

हो कां वापी कूप आराम । वृक्षारोपणें वनविश्राम ।
आचरतां स्मार्तकर्म । मी आत्माराम न भेटे ॥ ३३ ॥

तें गेलियां संतांच्या दारा । धरूनि साधूच्या आधारा ।
अवघीं आलीं माझ्या घरा । एवं परंपरा मत्प्राप्ती ॥ ३९ ॥

तैशी नव्हे सत्संगती । संगें सकळ संगातें छेदिती ।
ठाकठोक माझी प्राप्ती । पंगिस्त नव्हती आणिकां ॥ ४० ॥

किडी भिंगुरटीच्या संगतीं । पालटली स्वदेहस्थिती ।
तेवि धरिलियां संतांची संगती । भक्त पालटती मद्रूपें ॥ ४१ ॥

केवळ पाहें पां जडमूढें । चंदनासभोंवतीं झाडें ।
ते सुगंध होऊनि लांकडें । मोल गाढें पावलीं ॥ ४२ ॥

भा. १२. २४–४२

## ८४. मुखीं नाम-निर्वाह व्हावा ।
## यालागीं करावी साधुसेवा ॥

मुखीं नामनिर्वाह व्हावा । यालागीं करावी साधुसेवा ।
संतसेवनीं सद्भावो जीवा । तेथ नव्हे रिघावा विघ्नांसी ॥६२४॥

सद्‌भावें धरिल्या सत्संगती । त्या संगाचिये निजस्थिती ।
मुखीं ठसावें नामकीर्ती । विकल्प चित्तीं स्फुरेना ॥६२५॥

साधकांसी पाठिराखा । संत झालिया निजसखा ।
तें महाविघ्नांचिया मुखा । विभांडी देखा क्षणार्धें ॥६२७॥

निजभाग्यगती अवचितां । संतचरणरेणु पडल्या माथां ।
तो कळिकाळातें हाणे लाथा । तेथ विघ्नांची कथा ते कोण ॥

कीर्ति भक्ति सत्संगति । हे त्रिवेणी लागे ज्याप्रती ।
त्यासी उपसर्ग नातळती । पावन त्रिजगती त्याचेनि ॥६३४॥

माझी भक्ति आणि नामकीर्ती । यांची जननी सत्संगती ।
तो सत्संग जोडल्या हातीं । विघ्नें न बाधिती साधकां ॥६३५॥

योग याग आसन ध्यान । तप मंत्र औषधी जाण ।
साधितां न तुटे देहाभिमान । तो सत्संग जाण निर्दळी ॥६३६॥

योगादि सर्व उपायीं जाण । निवारिती अल्प विघ्न ।
विघ्नांचा राजा देहाभिमान । तो त्यांचेनि जाण ढळेना ॥६३७॥

दुर्धर देहाभिमान । ज्ञातेपणीं अति दारुण ।
त्याचें समूळ निर्दळण । सत्संग जाण स्वयें करी ॥६३८॥

भा. २८. ६२४–६३८

## ८५. कायिक, वाचिक व मानसिक भजन.

नाना साधनांचिया कोटी । साधकीं साधितां आटाटी ।
माझ्या प्रेमाची नातुडे गोठी । मद्भक्तभेटीवांचुनी ॥३७३॥
माझिया भक्तांचिये संगतीं । साधकां लाभे माझी भक्ती ।
अभेदभजनें माझी प्राप्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥३७४॥
दुष्ट दुरात्मा अनोळख । नष्ट चांडाळ अनामिक ।
तेथही ब्रह्मभाव चोख । हें मानसिक निजभजन ॥३७६॥
भूतीं भगवंत परिपूर्ण । ऐसें जाणोनि आपण ।
भूतांसी लागे अति दारुण । तें कठिण वचन बोलेना ॥३७७॥
तेथें जातांही निजप्राण । भूतांचे न बोलवे दोष गुण ।
या नांव गा वाचिक भजन । उद्धवा जाण निश्चित ॥३७८॥
जेणें भूतांसी होय उपकार । ते ते करी देहव्यापार ।
भेदितां निजजिव्हार । अपकारियां कर उचलीना ॥३७९॥
स्वयें साहूनि अपकार । जो अपकारियां करी उपकार ।
ऐसा ज्याचा शरीरव्यापार । तें भजन साचार कायिक ॥३८०॥
निष्काम जे माझी भक्ति । तेथ विघ्नांची न पडे गुंती ।
परब्रह्माची ब्रह्मस्थिती । सुलभत्वें प्राप्ती साधकां ॥३९०॥

भा. २९. ३७३–३९०

भावें करितां भगवद्भजन । यापरी इंद्र करी विघ्न ।
नारायण चैतन्यघन । तेणें विघ्नें संपूर्ण पराभाविलीं ॥२०१॥
मा भाळ्याभोळ्यां करितां भक्ती । ऐशीं विघ्नें जैं छळूं येती ।
तैं कदा नव्हे भगवत्प्राप्ती । ऐसा विकल्प चित्तीं झणीं धरिशी ॥
ब्रह्मादिकां सर्व भूतां । भ्रुकुटिमात्रें जो नियंता ।
त्या भगवंतातें भजतां । विघ्नें सर्वथा बाधूं न शकती ॥३॥

ज्याचेनि इंद्रा इंद्रपण । जो भावें भजतां श्रीनारायण ।
भक्तांसी विघ्न करी कोण । हरि रक्षण निजभक्तां ॥४॥
इंद्रमुख कामादिक । विघ्नें छळिती सकळ लोक ।
त्यांचाही नारायण चालक । तो भक्तांसी देख स्पर्शों नेदी ॥५॥
विघ्नांसी भुलविलें जेणें संपूर्ण । तो नित्य स्मरतां नारायण ।
अपधाकें विघ्नें पळती जाण । भक्तसंरक्षण हरिनामें ॥६॥
करावया निजभक्तकैवार । देवो धरी नानावतार ।
त्याच्या अवतारांचें चरित्र । अति विचित्र अवधारीं ॥७॥
शाळिग्राम पूजितां ऋषीश्वरीं । नळ वानरू ते अवसरीं ।
देवपूजा टाकी सागरीं । चेष्टा वानरी स्वभावें ॥२१०॥
तें देखोनि ऋषीश्वरीं । शिळा न बुडोत तुझ्या करीं ।
ऐसा शाप ते अवसरीं । क्षोभेंकरीं दिधला ॥२२१॥
तैं शाळिग्राम सागरोदरीं । तरतां देखिले ऋषीश्वरीं ।
काढावया रिघतां भीतरीं । लहरीकरीं निर्बुजले ॥२२२॥

भा. ४. २०१–२२२

## ८६. भजनानें सर्व कर्मे सहजच ईश्वरार्पण होतात.

वेंचूनियां नाना अर्थ । संग्रहीं करिती परमार्थ ।
नश्वर अर्थ जें वित्त । तें माझे भक्त न संचिती ॥ ७५० ॥
ध्रुवाचे परी अढळ । जे माझ्या ठायीं भजनशीळ ।
ते माझी भक्ति अचंचळ । अतिनिश्चळ पावती ॥ ७६४ ॥
जया भक्तीमाजीं वाडेंकोडें । मीच मी चहूंकडे ।
जेथिंच्या तेथें सांपडे । हें भजनें जोडे तयासी ॥ ६८ ॥

संकल्प केलियावीण । सहजें होतसे मदर्पण ।
हें चवथे भक्तीचें लक्षण । अतर्क्यभजन पैं माझें ॥ ६९ ॥
तेथ जें करणें तेचि पूजा । जें बोलणें तो जपु माझा ।
जें देखणें तें अधोक्षजा । दर्शन वोजा होतसे ॥ ७७० ॥
तेथ चालणें ते यात्रा माझी । जें भक्षी तें मजचि यजी ।
त्याची निद्रा ते समाधि माझी । ऐसा मजमाजीं भजतसे ॥७१॥
यापरी अनायासें जाण । सहजें होतसे मदर्पण ।
हे चौथी भक्ति सनातन । उद्धवा संपूर्ण तो लाभे ॥ ७७२ ॥

भा. ११. ७५०–७७२

## ८७. अंतःकरण हें अति सुगम भजनस्थान आहे.

सद्भावें जें माझें भजन । करितां एवढें होय ज्ञान ।
येथ आशंका करील मन । कोठें भजन करावें ॥ ५३० ॥
तुझें स्वरूप अतर्क्य जाण । अतिसूक्ष्म आणि निर्गुण ।
तुज भजावया कवण स्थान । आम्हासी जाण कळेना ॥ ३१ ॥
ऐसें कल्पील जरी मन । तरी ऐक सावधान ।
अति सुगम भजनस्थान । मी सांगेन तें ऐक ॥ ३२ ॥
नुलंघितां पर्वतकोटी । न रिघतां गिरिकपाटीं ।
दूरी न करितां आटाटी । जें स्थानीं भेटी सदा माझी ॥ ३३ ॥
भजनस्थान निरुपम । जेथ मी वसें पुरुषोत्तम ।
प्राप्तीलागीं अति सुगम । विश्रामधाम भक्तांचें ॥ ३४ ॥
सर्व सुखांचा आराम । निजहृदयीं आत्माराम ।
सर्वदा असे सम । भजावें सप्रेम ते ठायीं ॥ ३५ ॥

आदि ब्रह्मा अंतीं मशक । सर्वांचे हृदयीं मीचि एक ।
ऐसें पाहे तो सभाग्य देख । हें भजन चोख मत्प्राप्ती ॥ ३६ ॥
ज्या मज हृदयस्थाचे दीप्तीं । मनबुद्धयादिकें वर्तती ।
ज्या माझिये स्फुरणस्फूर्ती । ज्ञानव्युत्पत्ती पायां लागे ॥ ३७ ॥
त्या मज हृदयस्थाच्या ठायीं । भजनशीळ कोणीच नाहीं ।
शिणतां बाह्य उपायीं । जन अपायीं पडताती ॥ ३८ ॥
ऐशांत सदैव कोणी एक । निजभाग्यें अत्यंत चोख ।
मज हृदयस्थाचा विवेक । करूनि निष्टंक मद्भजनीं ॥ ३९ ॥
करितां हृदयस्थाचें भजन । माझें पावे तो निजज्ञान ।
वैराग्ययुक्त संपूर्ण । जें ज्ञानीं पतन रिघेना ॥ ५४० ॥
ज्या ज्ञानाभेणें जाण । धाकेंचि पळे अभिमान ।
तें मी आपुलें त्यासी दे ज्ञान । जे हृदयस्थाचें भजन करिती सदा ॥
ज्या ज्ञानाचिये ज्ञानसिद्धी । अखिल जाती अधिव्याधी ।
संशय पळती त्रिशुद्धी । भक्त निजपदीं पावती ॥ ५४२ ॥

भा. १३. ५३०–५४२

## ८८. भजनानें देहाभिमानाचा नाश

आसन उडविती योगबळें । दाविती नानासिद्धींचे सोहळे ।
त्यासही विषयांचे भोगलळे । होती निजबळें बाधक ॥३६५॥
इतरांची कोण कथा । मंत्रमूर्ती प्रसन्न असतां ।
त्यासीहि विषयावस्था । जाण सर्वथा बाधक ॥६६॥
किंचित झाल्या स्वरूपप्राप्ती । मी मुक्त हे स्फुरे स्फूर्ति ।
तथापि विषयाची संगती । त्यासीही निश्चिती बाधक ॥६७॥

व्रत तप तीर्थ दान । करितां योग याग यजन ।
वेदशास्त्रार्थ पुराणश्रवण । तेणें देहाभिमान टळेना ॥३७२॥
भावें करितां माझें भजन । समूळ सुटे देहाभिमान ।
भक्ति उत्तमोत्तम साधन । भक्ताधीन परब्रह्म ॥७३॥
माझें स्वरूप अनंत अपार । तो मी भक्तीनें आकळलों साचार ।
यालागीं निजभक्ताचें द्वार । मी निरंतर सेवीतसें ॥७६॥
भक्तीनें आकळलों जाण । यालागीं भक्तांअधीन ।
माझिये भक्तीचें महिमान । मजही संपूर्ण कळेना ॥७७॥
बहुतीं करूनि माझी भक्ती । मज ते मोक्षचि मागती ।
उपेक्षूनि चारी मुक्ती । करी मद्भक्ती तो धन्य ॥७८॥
ऐशी जेथ माझी भक्ती । तेथ पायां लागती चारी मुक्ती ।
त्यासी सर्वस्वें मी श्रीपती । विकलों निश्चितीं भावार्थी ॥७९॥
एका अंबऋषीकारणें । दहा जन्म मी सोसणें ।
अजत्वाचा भंग साहणें । परी भक्तांसी उणें येऊं नेदी ॥३८२॥
द्रौपदी नग्न करितां तांतडी । तिळभरी हों नेदींच उघडी ।
झालों नेसविता वस्त्रें कोडी । भक्तसांकडीं मी निवारीं ॥३८३॥

भा. २८. ३६५-३८३

## ८९. अहेतुक कर्म म्हणजेच निर्दोष भजन.

परिसाचे कसवटीवरी । जें जें लागे तें तें साडेपंधरें ।
तेवि निपजे जें जें शरीरें । तें तें खरें परब्रह्म ॥ ४४७ ॥
त्याचा खेळु तोचि महापूजन । त्याची बडबड तोचि प्रियस्तवन ।
त्याचे स्वभावीं स्वानंदपूर्ण । श्रीनारायण सुखावे ॥ ४८ ॥

तो जेउती वास पाहे । आवडीं देवो तेउता राहे ।
मग पाहे अथवा न पाहे । तरी देवोचि स्वयें स्वभावें दिसे ॥४९॥
तयासी चालतां मार्गें । तो मार्गु होइजे श्रीरंगें ।
तो देवाचिया दोंदावरी वेगें । चाले सर्वांगें डुल्लत ॥४५०॥
जें जें कर्म स्वाभाविक । तें तें ब्रह्मार्पण अहेतुक ।
या नांव भजन निर्दोष । भागवतधर्म या नांव शुद्ध ॥५१॥
स्वाभाविक जें वर्तन । तें सहजें होय ब्रह्मार्पण ।
या नांव शुद्ध आराधन । भागवतधर्म पूर्ण जाण राया ॥४५२॥

भा. २. ४४७–४५२

१०. निष्काम भजनच मोक्षाचें श्रेष्ठ साधन होय.

देवो सांगे भजनेंचि मुक्ती । आणिका ज्ञात्यांची व्युत्पत्ती ।
आणिकें साधनें मोक्षाप्रती । सांगताती आनआनें ॥ २८ ॥
एवं या दोहीं पक्षीं जाण । मोक्षीं श्रेष्ठ साधन कोण ।
तेंचि आशंकेचा प्रश्न । उद्धवें आपण मांडिला ॥ २९ ॥
माझ्या स्वरूपीं ठेवूनि मन । फळाशेवीण माझें भजन ।
हेंचि मोक्षाचें मुख्य साधन । देवें आपण बोलिलें ॥ ३२ ॥
ज्याची आसक्ती जिये गुणीं । तो तेंचि साधन सत्य मानी ।
यापरी ज्ञानाभिमानी । नाना साधनीं जल्पती ॥ ३६ ॥
ब्रह्मयाचा प्रळयो होतां । वेदवाणीचा वक्ता ।
कोणी नुरेचि तत्वता । यालागीं सर्वथा बुजाली ॥ ४१ ॥
तेचि वेदवाणी कल्पादीसी । म्यांचि प्रकाशिली ब्रह्मासी ।
जिच्या ठायीं मद्भक्तीसी । यथार्थेंसीं बोलिलों ॥ ४२ ॥

भा. १४. २८–४२

## ९१. अनन्य भजनाचे परिणाम

अनन्य करितां माझें भजन । माझ्या स्वरूपीं झगटलें मन ।
सकळ वासना गेल्या विरोन । वृत्तिशून्य अवस्था ॥ १६२ ॥
मत्स्य धरूनिया मनीं । बक निश्चळ राहिला ध्यानीं ।
ते शांति कोण मानी । अंतःकरणीं सकाम ॥ १७१ ॥
विचित्र भूतें विचित्र नाम । विचित्राकारें जग विषम ।
तेथें देखे सर्वीं सर्व सम । परब्रह्म समत्वें ॥ ७४ ॥
जंववरी द्वैताचें भान । तंववरी विरोधाचें कारण ।
अवघा एकाचि आपण । तेथ वैरी कोण कोणाचा ॥ ७७ ॥
गगन गगनासी कैं भांडे । कीं चंद्रा चंद्रेसीं झुंज मांडे ।
कीं वायूचेनि वायु कोंडे । कीं जिव्हेचीं दुखंडें जिव्हा करी ॥७८॥
जें भेदाचें निराकरण । तेंचि निर्वैरतेचें लक्षण ।
उद्धवा हें सत्य जाण । निर्वैरपण या नांव ॥ ७९ ॥
निरपेक्षता, आणि माझें मनन । शांति आणि समदर्शन ।
पांचवें तें निर्वैर जाण । पांच लक्षण हें मुख्यत्वें ॥ १८० ॥
ऐशिया भक्तांचें दर्शन । झाल्या तरती हें नवल कोण ।
त्यांचें करितां नामस्मरण । उद्धरण जड जीवां ॥ ८४ ॥
हें पंचलक्षण आल्या हातां । मजहोनि अधिक पवित्रता ।
जोडली माझ्या निजभक्तां । मीहि वंदीं माथां चरणरेणु ॥१८५॥

भा. १४. १६२–१८५

## ९२. विषयासक्ति सांडून कीर्तन करावें.

नवल नरदेहाची ख्याती । रामनामाच्या आवृत्ती ।
चारी मुक्ती दासी होती । तो देहो वेंचिती विषयांसी ॥ ६४१ ॥

विषयसुखाचिये आसक्ती । कोणा नाहीं झाली तृप्ती ।
मृगजळाचिये प्राप्ती । केवि निवती तृषार्त ॥ ४२ ॥
यालागीं जाणतेनि मनुष्यें । नरदेहींचेनि आयुष्यें ।
विषयांचेनि सायासें । व्यर्थ कां पिसे कष्टती ॥ ४३ ॥
नरदेहा ऐसें निधान । अनायासें लाधलें जाण ।
सांडीं सांडीं अभिमान । तेणें समाधान पावसी ॥ ४४ ॥
पुढती नरदेहाची प्राप्ती । होईल येथ नाहीं युक्ती ।
यालागीं सांडूनि विषयासक्ती । भावें श्रीपति भजावा ॥ ४५ ॥
कलियुगीं सुगम साधन । नलगे योग याग त्याग दान ।
करितां निर्लज्ज हरिकीर्तन । चारी मुक्ति चरण वंदिती ॥ ४६ ॥
इटेसाठीं परीस पालटे । येतां कां मानिती वोखटें ।
तैसा कीर्तनाचेनि नेटेंपाटें । देवो भेटे प्रत्यक्ष ॥ ६४७ ॥

भा. ७. ६४१–६४७

## ९२. कीर्तन पापाचें भस्म करतें.

जेथ माझी निजकथा गाती । तीर्थें तेथें पवित्र होती ।
ऐशिया भगवत्कथाकीर्ती । साधु गर्जती सर्वदा ॥ ३५७ ॥
स्वयें आपण भागीरथी । सर्वदा ऐसें जीवीं चिंती ।
कोणी साधु ये जैं मजप्रती । तैं माझीं पापें जातीं निःशेष ॥ ३५८ ॥
ऐसी संतांची संगती । सदा वांछी भागीरथी ।
अवचटें गेलिया संतांप्रती । पापें पळती प्राण्यांचीं ॥ ३६१ ॥
माझी कथा माझें नाम । सकळ पातकां करी भस्म ।
हेंचि चित्तशुद्धीचें वर्म । अति सुगम उद्धवा ॥ ३६४ ॥
ऐसा लाभ कथाश्रवणीं । तरी कां नाइकिजे सकळ जनीं ।
तें भाग्य भगवत्कृपेवांचुनी । सर्वथा कोणी लाहेना ॥ ३६८ ॥

भगवत्कृपा पावले सांग । त्यांसी कथाकीर्तनीं अनुराग ।
तेचि निजभाग्यें महाभाग । स्वमुखें श्रीरंग बोलिला ॥ ३६९ ॥
कृष्णकीर्तिकथनाक्षरें । रिघतांचि कर्णद्वारें ।
भीतरील पाप एकसरें । निघे बाहिरें गजबजोनी ॥ ३७३ ॥
जेवि पंचाननाची आरोळी । करी मदगजा रांगोळी ।
तेवि हरिकथेच्या मेळीं । करी खंदळी महापापा ॥ ३७४ ॥
ऐसा निघाल्या पापाचा केरु । कथेसी उपजे अत्यादरु ।
कथावधानीं धरितां धीरु । हर्षें निर्भरु मन होय ॥ ३७५ ॥
फेडूनि लोकलाजेचें बिरडें । गातां हरिकीर्तिगुणपवाडे ।
न पाहे तो कर्माकडे । तें सांकडें सुहृदांसी ॥ ३७७ ॥
जंव जंव कथा सांगे निवाडें । तंव तंव श्रद्धा अधिक वाढे ।
प्रेमाचा पूर चढे । त्यामाजीं बुडे निजश्रद्धा ॥ ३७९ ॥
तेथ न करितां आठवण । अखंड होय हरीचें स्मरण ।
क्रियामात्र भगवद्भजन । सहजें जाण सर्वदा ॥ ३८५ ॥
जें जें दृष्टी देखे आपण । थोर अथवा सूक्ष्मसान ।
तें तें हरीचें निजदर्शन । सहजें भजन अहेतुक ॥ ३८६ ॥

भा. २६. ३५७-३८६

## १४. हरिकीर्तनापाशीं चारी मुक्ती दासी.

कलियुगीं कीर्तनासाठीं । संसाराची काढूनि कांटी ।
परमशांतिसुखसंतुष्टीं । पडे मिठी परमानंदीं ॥ ४२३ ॥
ऐसा कीर्तनीं परम लाभु । शिणतां सुरनरां दुर्लभु ।
तो कलियुगीं झाला सुलभु । यालागीं सभाग्यां लोभु हरिकीर्तनीं ॥
कीर्तनीं हरिनामाचा पाठा । तेणें देवासी संतोष मोठा ।
वेगीं सांडोनि वैकुंठा । धांवे अवचटा कीर्तनामाजीं ॥४२६॥

हरिकीर्तना लोभला देवो । विसरला वैकुंठा जावों ।
तोचि आवडला ठावो । भक्तभावो देखोनी ॥ ४२७ ॥
जेथ राहिला यदुनायक । तेथचि ये वैकुंठलोक ।
यापरी मुक्ति सलोक । कीर्तनें देख पावती भक्त ॥ ४२८ ॥
नामकीर्तन निजगजरीं । भक्तां निकट धांवे श्रीहरी ।
तेचि समीपता मुक्ति खरी । भक्तांच्या करीं हरिकीर्तनें ॥४२९॥
भक्तु कीर्तन करी जेणें ध्यानें । तें ध्यान दृढ ठसावे मनें ।
तेव्हां देवाचीं निजचिन्हें । भक्तें पावणें संपूर्ण ॥ ४३१ ॥
भावें करितां हरिकीर्तन । तेणें संतोषे जनार्दन ।
उभयतां पडे आलिंगन । मिठी परतोन सुटेना ॥ ४३५ ॥
वृत्ति स्वानंदीं निमग्न । परतोनि कदा नव्हे भिन्न ।
सायुज्यमुक्ति यास जाण । जेणें दुजेपण असेना ॥४३७॥
यापरी हरिकीर्तनापासीं । चारी मुक्ती होती दासी ।
भक्त लोधले हरिभजनासी । सर्वथा मुक्तीसी न घेती ॥ ४३९ ॥

भा. ५. ४२३–४३९

९५. कीर्तनांत निःशंकपणें नाचल्यानें आनंद प्राप्ति.

साधावया निजकाज । सांडूनि लौकिकाची लाज ।
कीर्तनीं नाचती भोज । अति निर्लज्ज निःशंक ॥५३८॥
चक्र घेऊनि भक्तांचे ठायीं । म्हणे तुझें कार्य कायी ।
मज जगीं वैरीचि नाहीं । भक्तद्वेषी पाहीं निजशस्त्रें नाशीं ॥५४३॥
चक्रें अभिमानाचा करी चेंदा । मोहममता छेदी गदा ।
शंखें उद्बोधी निजबोधा । निजकमळें सदा निजभक्त पूजी ॥५४४॥
जेथें चक्रपाणी राक्षिता । तेथें न रिघे भयाची कथा ।
वार्ता यापरी कीर्तिवंता । हरि सर्वथा स्वयें रक्षी ॥५४५॥

ज्यांसी न करवे कथाश्रवण । अथवा न टके हरिकीर्तन ।
तिहीं करावें नामस्मरण । रामकृष्ण गोविंद ॥५४६॥
बाप नामाचें निजतेज । यम वंदी चरणरज ।
नामापाशीं अधोक्षज । चतुर्भुज स्वयें तिष्ठे ॥५४९॥
जेवढी नामाची शक्ती । तेवढें पाप नाहीं त्रिजगतीं ।
नामापाशीं चारी मुक्ती । जाण निश्चितीं विदेहा ॥५५१॥

भा. २. ५३८-५५१

## १६. नामसंकीर्तनानें श्रेष्ठ अनुभवप्राप्ति.

हरिनामगुणकीर्तनकीर्तीं । अखंड आवडे जागृतीं ।
स्वप्नींही तेचि स्थिती । दृढ हरिभक्ति ठसावे ॥५५६॥
ऐशियापरी भक्तियुक्त । दृढतर जाहलें ज्याचें व्रत ।
तंव तंव होय आर्द्रचित्त । प्रेमा अद्भुत हरिनामकीर्तीं ॥५५७॥
चुकल्या मायपूतां संकटीं । एकाकीं बहुकाळें जाहली भेटी ।
तेणें वोरडें घालोनि मिठी । चाले जेवि पोटीं अनिवार रुदन॥५५९॥
तेवीं जीवशिवां अवचटी । भक्तीचे पेठे जाहली भेटी ।
आत्मसाक्षात्कारें पडे मिठी । ते संधीमाजीं उठी अनिवार रुदन ।५६०
परमात्मयासी आलिंगन । तेणें अनिवार स्फुंदन ।
रोमांचित रुदन । सप्रेम पूर्ण उसासोनि करी ॥५६१॥
मी अखंडत्वें स्वयें संचलों । अभेदपूर्णत्वें अनादि रचलों ।
तो मी अव्ययो म्हणे जाहलों मेलों । येणें आठवें डोलडोलों
हांसोंचि लागे ॥५६३॥

भा. २. ५५६-५६३

## १७. भक्तीचा कळवळा व उल्हास

कृपण जरी दूरि जाये । तो घरींचें ठेवणें जीवीं वाहे ।
तैसें माझें प्रेम पाहें । जो हृदयीं वाहे सर्वदा ॥२४३॥
कां गर्भ संभवल्यापाठीं । उल्हासें वाढवी गोरटी ।
तैशी माझ्या प्रेमाची पोटीं । आवडी मोठी जैं होय ॥२४४॥
जैसे वंध्या गर्भाचे डोहळे । तैसे माझ्या प्रेमाचे सोहळे ।
पोटांतलेनि कळवळे । उल्हासबळें चढोवढी ॥२४५॥
सदैव जांवयी आल्या घरा । जेवि सर्वस्व वेंची सुंदरा ।
तेवि माझा कळवळा पुरा । ज्याच्या जिव्हारा वोसंडे ॥२४६॥
बीज अधिकाधिक पेरितां । उल्हास कृषीवळाचें चित्ता ।
तेवीं सर्वस्व मज अर्पितां । तैशी उल्हासता जैं होये ॥२४७॥
सगुण सुरूप समर्थ भर्ता । निघोन गेलिया तत्वतां ।
त्यालागीं तळमळी जैशी कांता । तैशी कळवळता जैं उठी॥२४८॥
त्या नांव गा माझी भक्ती । उद्धवा जाण निश्चितीं ।
जे भक्तीसी मी भुलोनि श्रीपती । भक्ताहातीं आतुडलों ॥२४९॥

भा. १४. २४३–२४९

## १८. भगवद्भक्तीनें चित्तवृत्ति निर्मळ होते.

त्यजूनि पुत्रवित्तेषणेचें काज । जिणौनि लौकिकाची लाज ।
पद्मनाभभजनभोजें । अतिनिर्लज्ज नाचावें ॥७३८॥
पुत्रवित्तलोकेषणा । त्यजूनि भजतां हरिचरणां ।
तंव तंव चित्ताचे चित्तमळ जाणा । क्षणक्षणां नासती ॥३९॥
रजतमादि कर्मजमळ । चित्तीं बैसले जे सबळ ।
ते प्रक्षाळती सकळ । भक्तिप्रेमजळक्षाळणें ॥७४०॥

जंव जंव थोरावे सप्रेम भक्ती । तंव तंव पायां लागे विरक्ती ।
स्वयें विरमे विषयासक्ती । होय चित्तवृत्ती निर्मळ ॥४१॥
निर्मळ जाहलिया चित्तवृत्ती । परमात्मया सर्व भूतीं ।
भजों लागे अनन्यप्रीतीं । हे चौथी भक्ति उदार ॥४२॥
हे भक्ति अतिशयें उदार । निर्दाळी भक्तांचा अहंकार ।
उद्धरी सुर नर स्त्रिया शूद्र । आनंदनिर्भर करी जीवु ॥४३॥
हे भक्ति जैं लागे हातीं । तैं भवभयाची निःशेष शांती ।
पायां लागती चारी मुक्ती । ऐशी उदार भक्ति हरीची ॥४४॥
जेवि डोळां असतां पडळ । सविता उगवे सर्व काळ ।
तो सन्मुख न देखे रविमंडळ । मा पदार्थ सकळ तें कैंचे ॥४५॥
तोंचि फिटलिया पडळ । दृष्टी होय अति निर्मळ ।
देखों लागे पदार्थ सकळ । रविमंडळसमन्वयें ॥४६॥
तेवि निजात्मा हृदयीं वसे । परी चित्तवृत्ती मळिण असे ।
तंव परब्रह्म न प्रकाशे । चित्त वासनादोषें दूषित ॥४७॥
तेथ करितां भगवद्भक्ती । निर्मळ होय चित्तवृत्ती ।
तेव्हां निर्विकार स्वरूपप्राप्ती । भक्त पावती निजभजनें ॥४८॥
पावावया परमात्मप्राप्ती । जगीं दाटुगी भगवद्भक्ती ।
ते म्यां सांगितली तुजप्रती । यथानिगुती नृपनाथा ॥४९॥
जेवीं डोळ्यांचें पडळ फिटे । तेथ प्रकाशेंसीं सविता भेटे ।
तेवीं कल्पनालोपें प्रगटे । नेटेपाटें परब्रह्म ॥ ७५० ॥
जेथ निर्विकल्पसमान । निश्चयेंसीं जाहलें मन ।
त्यासी देहीं वर्ततांही जाण । भवबंधन स्पर्शेना ॥७५१॥

भा. २. ७३८–७५१

अनुक्रम ९९ २८६३८ २७-८-१९७४ ७२ २४१५

## ९९. सर्व सांडून माझी भक्ति केल्यानें जीव मुक्त होतो.

सांडूनि स्त्रीपुत्रविषयध्यान । सांडूनि योग योग्यता शहाणपण ।
सांडूनि कर्मठता कर्माभिमान । मजलागीं शरण रिघावें ॥२३३॥
सांडूनिया वेदाध्ययन । सांडूनिया शास्त्रश्रवण ।
सांडूनि प्रवृत्ति निवृत्ति जाण । मजलागीं शरण रिघावें ॥३४॥
सांडूनि धनमानचेष्टा । सांडूनि सज्ञानप्रतिष्ठा ।
सांडूनियां नाना निष्ठा । शरण वरिष्ठा मज यावें ॥३५॥
सांडूनियां वैदिक लौकिक । सांडूनि आगम तांत्रिक ।
मज शरण रिघालिया देख । माझें निजसुख पावसी ॥३६॥
सांडूनि कुळाचें उंचपण । सांडूनि जातीचा अभिमान ।
सांडूनि आश्रमाचें श्रेष्ठपण । मजलागीं शरण रिघावें ॥३७॥
सांडूनिया ज्ञान ध्यान । सांडूनियां विधिविधान ।
सांडूनियां देहाभिमान । मजलागीं शरण रिघावें ॥३८॥
सर्वहि सांडोनि अभिमान । मज रिघालिया शरण ।
तुज कैंचें जन्ममरण । माझे प्रतापें जाण तरशील ॥२४१॥

भा. १२. २३३–२४१

## १००. सर्वभावें माझी भक्ति किंवा सेवा म्हणजेच विज्ञान.

हृदयीं नित्य माझें ध्यान । मुखीं माझें नामकीर्तन ।
श्रवणीं माझें कथाश्रवण । करीं मदर्चन सर्वदा ॥३७८॥
नयनीं मम मूर्तिदर्शन । चरणीं मदालया गमन ।
रसनें मम तीर्थप्राशन । मत्प्रसादभोजन अत्यादरें ॥३७९॥

साष्टांगें मजाचि नमन । आल्हादें मद्भक्तां आलिंगन ।
सप्रेम माझे सेवेवीण । रिता अर्धक्षण जाऊं नेदीं ॥३८०
ऐसी सेवा करितां पहा हो । सर्व भूतीं देखे मद्भावो ।
हा सर्व धर्मांमाजीं रावो । तेथें अपावो कदा न रिघे ३८१॥
सर्वभूतीं माझें दर्शन । तेव्हां वैराग्य वोसंडे पूर्ण ।
तेथ सहजें उठे शुद्ध ज्ञान । देहाभिमानच्छेदिक ॥३८२॥
संसार मायिक रचना । सत्यत्वें कळलें ज्याच्या मना ।
तें मनाचि लाजे मनपणा । विज्ञान जाणा त्या नांव ॥३९०॥

भा. ३०. ३७८–३९०.

## १०१. अनन्यभावानें देवाचें ध्यान केल्यानें निर्भयता व स्वरूपप्राप्ति

पवित्र आणि विजन । प्रशस्त आणि एकांतस्थान ।
तेथें माझें अनुसंधान । सद्भावें जाण सर्वदा ॥१३१॥
तेणें सांडून जनपद दुश्चित । सदा एकांतीं व्हावें निरत ।
मद्भावें सुनिश्चित । आत्मसुख प्राप्त साधकां ॥३२॥
ज्यासी निजात्मसुख झालें प्राप्त । तो होय अनन्यशरणागत ।
मीवांचूनि जगाआंत । आणिक अर्थ देखेना ॥३३॥
ऐसें अनन्य करितां माझें ध्यान । साधक विसरे मीतूंपण ।
तेव्हां अभेदें चैतन्यघन । मद्रूप जाण तो होय ॥३४॥
त्या मद्रूपाचे स्वरूपस्थिती । पाहों जातां निजात्मवृत्ती ।
मी ना तो ऐशी होय गती । अभेदप्राप्ती या नांव ॥३५॥
जंव असे द्वैतवार्ता । तंव भयाची बाधकता ।
अभेदत्व आल्या हातां । निर्भयता साधकां ॥३६॥

दा. क्र. ८०३९

अभेदप्राप्तीच्या ठायीं । बंधमोक्षांची वार्ता नाहीं ।
वाउगजें बंधमोक्ष पाहीं । नांदती नवायी हरि बोले ॥१३७॥

भा. १८. १३१–१३७

## १०२. भक्तीवीण मुक्तीचा सोस व्यर्थ आहे.

वैराटाचा वैराट पुरुषु । तो अव्यक्तीं करी प्रवेशु ।
जेवि इंधननाशें हुताशु । करी राहिवासु निजकारणीं ॥१७५॥
जे ब्रह्मलोकनिवासी होती । त्यांसी महाप्रळयाचे अंतीं ।
ब्रह्मासवें सर्वांसी क्रमें मुक्ती । ऐसें श्रुतीचें दृढ वाक्य ॥७६॥
वैराजपुरुष नाम वदंती । हिरण्यगर्भातें म्हणती ।
त्यांसी प्रळयीं प्रवेशु अव्यक्तीं । तैं इतरांची गती श्रुतिवाक्यें कैसी
विदेहें पुशिली मायेची स्थिती । ते मायेची ऐशी दुर्धर शक्ती ।
जे न करितां भगवद्भक्ती । त्यां ब्रह्मासवें मुक्ती घडों नेदी ॥७८॥
जालिया ब्रह्मसदनप्राप्ती । न करितां भगवद्भक्ती ।
अतिशयें दुर्लभ मुक्ती । भक्तीपाशीं मुक्ती दासी जसी ॥७९॥
न करितां भगवद्भजन । ब्रह्मासीही मुक्ति नव्हे जाण ।
मा इतरांचा ज्ञानाभिमान । पुसे कोण परमार्थी ॥१८०॥
ज्यासी जेथ पदाभिमान । त्यासी तेंचि दृढ बंधन ।
यालागीं दुर्लभपण । मोक्षासी जाण तिहीं लोकीं ॥८१॥
सांडोनियां पदाभिमान । अंगें सदाशिवु आपण ।
नित्य वसवी महाश्मशान । भगवद्भजनीं निजनिष्ठा ॥८२॥
यालागीं ज्यांसी ब्रह्मलोकपदप्राप्ती । तेथही जे करिती भगवद्भक्ती
त्यांसीच प्रळयाच्या अंतीं । परममुक्ती नृपवर्या ॥८३॥

ब्रह्मलोकीं ज्यां नाहीं हरिभक्ती । तेही पावती पुनरावृत्ती ।
ऐशी मायेची दुर्धर शक्ती । न करितां भक्ति मुक्ति कैंची॥१८४॥
येचि अर्थीं ब्रह्माचें वचन । दों श्लोकीं बोलिला आपण ।
ज्ञानाभिमानियां पतन । भक्तां भवबंधन कदा न बाधी॥१८५॥
भक्तां सर्वभूतीं भगवद्भावो । तेथ विघ्नांसी नाहीं ठावो ।
तया अपावचि हो उपावो । भावार्थी देवो सदा साह्य ॥१८८॥
भक्तीवीण मुक्तीचा सोसु । करितां प्रयत्न पडे वोसु ।
असो हें वैराजपुरुषु । करी प्रवेशु अव्यक्तीं ॥१८९॥

भा. ३. १७५-१८९

## १०३. भक्ति मुक्तीपेक्षां श्रेष्ठ.

ऐकतां भक्तीचें निरूपण । उद्धवाचें द्रवलें मन ।
नयनीं अश्रू आले पूर्ण । स्वानंदजीवन लोटलें ॥ ६४४ ॥
शरीर जाहलें रोमांचित । चित्त जाहलें हर्षयुक्त ।
तेणें कंठीं बाष्प दाटत । स्वेदकण येत सर्वांगीं ॥ ४५ ॥
प्राण पांगुळला जेथींच्या तेथ । शरीर मंद मंद कांपत ।
नयन पुंजाळले निश्चित । अर्धोन्मीलित ने जाहले ॥ ४६ ॥
औत्सुक्याचे अति प्रीती । स्वानंदीं समरसे चित्तवृत्ती ।
उद्धवदेहाची विरतां स्थिती । प्रारब्धें निश्चितीं तें राखिलें ॥४७॥
जळीं नाव उलथितां पूर्ण । जेवि दोर राखे आवरून ।
तेवि मावळतां उद्धवपण । प्रारब्धें जाण राखिलें ॥४८॥
त्रिभुवनींची संपत्ती चोख । गुरूसी देतां ते मायिक ।
जेणें दिधली वस्तु अमायिक । त्यासी कैसेनि लोक उतराई होती६५५
माझें निमित्त करूनि जाण । उद्धरावया दीन जन ।
त्यांचें निरसावया अज्ञान घन । ज्ञानदीप पूर्ण प्रज्वाळिला ॥६८१॥

जे दिधली स्वरूपस्थिती । ते आच्छादेना कदा कल्पान्तीं ।
यापरी गा श्रीपती । कृपा निश्चिती तुवां केली ॥६९९॥

मज थोर भ्रम होता चित्तीं । गोड असेल जीवन्मुक्ती ।
तेथ न देखे तुझी भक्ती । कोरडी मुक्ती मज न लगे ॥७१६॥

सद्गुरुकृपावचनोक्ती । शिष्य तत्काळ लाहे मुक्ती ।
त्या तुज सद्गुरूची राहे भक्ती । जळो ती मुक्ती मज न लागे॥१७॥

यालागीं तुज शरण । मागुतेन आलों जाण ।
सायुज्याही वरी पूर्ण । तुझें गुरुभजन मज देई ॥१८॥

मागां बहुतीं केली भक्ती । म्हणसी त्यांसी म्यां दिधली मुक्ती ।
परी मुक्तीवरती भक्ती । नाहीं मजप्रती मागीतली ॥१९॥

मागां जिहीं जिहीं केली भक्ती । त्यांसी त्वां ठकविलें देऊनि मुक्ती
तें ठकडेपण श्रीपती । न चले मजप्रती सर्वथा ॥७२०॥

ज्यासी आकळली निजमुक्तता । म्हणसी त्यासी भक्ती नेदवे आतां ।
हे मजसीं बोलों नको कथा ! तुझी समर्थता मी जाणें ॥२३॥

तूं न घडे तें घडविसी । न चले तें चालविसी ।
नव्हे तें तूं होय करिसी । नाहीं सामर्थ्यासी मर्यादा ॥७२४॥

भा. २९. ६४४-७२४

## प्रकरण : ६

# सद्गुरुवर्णन

### १०४. गुरुगवेषण

ऐसी सद्गुरूची स्थिती । ऐकोनि शिष्याच्या चित्तीं ।
वाढली अति प्रीति । गुरुभक्ती लागोनी ॥१२७॥

यालागीं गुरुगवेषणा । उसंतु घेवों नेदी अंतःकरणा ।
अष्टौप्रहर विचक्षणा । गुरुलक्षणा लक्षितु ॥१२८॥

कैं तो स्वामी देखेन ऐसा । कैं हा माझा फिटेल फांसा ।
कैं उपरमु होईल मानसा । सद्गुरुपिसा तो झाला ॥१२९॥

आयुष्य वेंचतां उठाउठी । अझुनि नव्हे सद्गुरूसी भेटी ।
जाल्या मनुष्यदेहासी तुटी । सर्वस्व शेवटीं बुडेल ॥१३०॥

ऐकतां गुरूचें नांव । मनापुढें घेत धांव ।
ते गोठीसीच देतु खेव । येवढी हांव ज्याची ॥१३१॥

सद्गुरु प्रत्यक्ष न भेटतां । मनेंचि पूजी गुरुनाथा ।
परमादरें पूजा करितां । प्रेम तत्वता न संडे ॥१३२॥

सद्गुरु भेटावया कारणें । हिंडे तीर्थं तपोवनें ।
गुरु न विसंबे मनें । नित्य विधानें आचरतां ॥१३३॥

सद्गुरुप्राप्तीचिया काजा । लहानथोरांची करी पूजा ।
अत्यादरें मानी द्विजा । गुरु मज माझा भेटावा ॥१३४॥

अस्खलाचिया परी । गुरुनामाचा जप करी ।
गुरुवांचोनि निरंतरी । चिंता न करी आनाची ॥१३५॥

आसनीं भोजनीं शयनीं । गुरूतें न विसंबे मनीं ।
जागृतीं आणि स्वप्नीं । निदिध्यासनीं गुरु केला ॥१३६॥
गुरुस्मरण करितां देख । स्मरणें विसरे तहानभूक ।
विसरला देहगेहसुख । सदा संमुख परमार्थी ॥१३७॥
ऐसी सद्‌गुरूची आवडी । ज्याची आस्था चढोवढी ।
त्यासी गुरुरूपें तांतडी । भेटी रोकडी मी देता ॥१३८॥
जंव जंव अवस्था आधिक । तंव तंव भेटीची जवळीक ।
साधनांमाजीं हें साधन मुख्य । अवस्थाचि एक विशेष ॥१३९॥

भा. १०. १२७–१३९

## १०५. सद्‌गुरूवीण ब्रह्मज्ञान । सर्वथा नव्हे नव्हे जाण

सद्‌गुरूवीण ब्रह्मज्ञान । सर्वथा नव्हे नव्हे जाण ।
हें उपनिषदर्थें प्रमाण । परम निर्वाण सांगितलें ॥१०७॥
डोळां देखणाचि आहे । त्यासी सूर्य नव्हतां साह्य ।
सिद्ध पदार्थ देखों नलाहे । स्तब्ध राहे अंधारीं ॥१०८॥
नाव तारी हें साचार । माजीं बैसले थोर थोर ।
परी तारकेंवीण परपार । समर्थ नर न पावती ॥१०९॥
पर्जन्यें भूमी मार्दवा आली । बीजें कणिंग असें भरली ।
परी ज्ञातेन पेरणी नाहीं केली । तंव पिकाची बोली पोचट ॥११०॥
रत्न सांपडलें अवचितें । परी खरें खोटें संशय तेथें ।
रत्नपारखी करी मोलातें । अति यत्न त्यातें मग करिती ॥१११॥
तैसें निजस्वरूप आइतें । श्रद्धा सद्‌गुरूचेनि हातें ।
खरें करूनिया ज्ञाते । निजसुखा पावले ॥११२॥

भा. १०. १०७–११२

## १०६. गुरूपासून अनुग्रहप्राप्ति

भोयीं पाय सिद्ध आहेती । भुयाळेंवीण वृथा भ्रमती ।
तेवि गुरूवीण जे जे करिती । ते ते अहंमती भ्रमले ॥८०७॥
गुरु ब्रह्म दोन्ही एक । ऐशिया भावना आवश्यक ।
सेवा करूनि भावपूर्वक । संतोषवूनि देख अनुग्रहो घ्यावा ॥८०८॥
निजाधिकारप्रातें । जे मूर्ति आवडेल आपणियातें ।
तेचि मंत्रविद्या तेथें । श्रद्धासंभरितें अंगिकारावी ॥८०९॥
तेव्हां गुरुमुखें मिश्र वोजा । पुरुषोत्तममहापूजा ।
शिकोनियां निजकाजा । भजावें अधोक्षजा शिक्षिता मतीं ॥८१०॥

भा. ३. ८०७–८१०

म्हणसी साधनें केलीं अनेक । तैसें सद्‌गुरूही साधन एक ।
म्हणतां मुमुक्षु जाला मूर्ख । निजात्मसुख बुडालें ॥११४॥
सद्‌गुरु केला तो साधन । त्याहूनि परतें साध्य आन ।
म्हणतां आली नागवण । नागवला जाण सर्वस्वें ॥११५॥
जो चित्सुखें सदा संपन्न । चिद्रूपें ज्यासी समाधान ।
तो चिन्मात्राहोनि भिन्न । नव्हे जाण सर्वथा ॥११६॥

भा. १०. ११४–११६

## १०७. सद्‌गुरूचीं लक्षणें

ज्याचेनि वाक्यें असंतता । निःशेष मावळे तत्वता ।
त्यासीचि गा सद्‌गुरुता । वेदशास्त्रार्थी प्रतिपाद्य ॥२८७॥
तरी जो कायावाचामनें । अति कृपाळू दीनाकारणें ।
तोडी शिष्याचीं भवबंधनें । उठवी ठाणें अहंकाराचें ॥२९५॥

जो शब्दज्ञानें पारंगतु । ब्रह्मानंदें सदा डुल्लतु ।
शिष्यप्रबोधनीं समर्थु । यथोचितु निजभावें ॥२९८॥
त्याचा जैसा जैसा भावो । तैसा तैसा करी अनुभवो ।
तरी गुरुत्वाचा अहंभावो । अणुमात्र पहा हो धरीना ॥२९९॥
शिष्यापासूनि सेवा घेणें । हें स्वप्नींही न स्मरे मनें ।
शिष्याची सेवा स्वयें करणें । पूज्यत्वें पाहणें निजशिष्या ॥३००॥
आपल्या योगक्षेमाचें सांकडें । स्वप्नींही न घाली शिष्याकडे ।
शिष्यसंकट अतिगाढें । निवारी रोकडें निजांगें जो ॥३०४॥
त्याचें गुरुत्वाची वोळखण । अंगीं निजशांति पूर्ण ।
हेंचि सद्गुरुत्वाचें लक्षण । मुख्य भूषण हेंचि राया ॥३१२॥
जाणोनि वेदशास्त्रनिश्चितीं । जो न मिरवी गा व्युत्पत्ती ।
ज्यासी अपरोक्षें पूर्ण शांती । तो सद्गुरुमूर्ति निश्चयें राया ॥३१५॥

भा. ३. २८७–३१५

## १०८. सद्गुरु हें चालतें बोलतें ब्रह्म आहे.

कारितां साधनांच्या कोटी । साधनीं समाधान नुठी ।
झालिया सद्गुरुकृपादृष्टी । ब्रह्मत्वें पुष्टी गुरुभक्तां ॥९॥
तो तूं सद्गुरु श्रीजनार्दन । सकळ जगाचें अधिष्ठान ।
भूतीं भूतात्मा तूं आपण । सहजें जाण समसाम्यें ॥१०॥
झालिया सद्गुरुकृपा वरिष्ठ । न कारितां व्युत्पत्तीचें कष्ट ।
भागवतार्थी होय प्रविष्ट । भक्त सुभट भावार्थी ॥१२॥
हृदयीं झालिया सद्भावो । भावें प्रगटे देवाधिदेवो ।
तेथें भागवताचा अभिप्रावो । सहजेंचि पहा हो ठसावे ॥१३॥
यालागीं कारितां गुरुभक्ती । प्राप्त होइजे भागवतार्थी ।
तेथ काव्यादि व्युत्पत्ती । नाना युक्ती किमर्थ ॥१४॥

किमर्थ करावें शास्त्रज्ञान । किमर्थ धरावें वृथा ध्यान ।
चालतें बोलतें ब्रह्म पूर्ण । सद्‌गुरुचरण साधकां ॥१५॥

भा. १६. ९–१५

## १०९. पूर्णानुभवी गुरूचे तीन प्रकार

जेवि अमृत म्हणतां । चवी न लगे गा सर्वथा ।
तेवि शाब्दिक ज्ञानयोग्यता । अनुभववार्ता स्वयें नुपजे ॥२८४॥
जेणें स्वयें चाखिली नाहीं चवी । तो दुजयातें गोडी केवि लावी ।
यालागीं जो पूर्णानुभवी । तो तारी सद्भावें सच्छिष्यासी ॥८५॥
एवं गुरुपणाची वदंती । असे बहुपणें नांदती ।
जो करी अपरोक्षप्राप्ती । त्यातें म्हणती सद्‌गुरुस्वामी ॥८६॥
एकाचें शुद्ध ब्रह्मज्ञान । वस्तु देखोनि विरालें मन ।
मावळलें द्वैताचें भान । पडिलें मौन चहूं वाचां ॥८९॥
इंद्रियें टवकारिलीं समस्त । प्राण पांगुळला जेथिंचा तेथ ।
वस्तु देखोनियां परमाद्‌भुत । पडलें ताटस्थ्य देहभावा ॥२९०॥
ऐसा जो आत्मानुभवी । त्यातें सद्भावें शिष्यु विनवी ।
तंव तो पुसे ना समजावी । ताटस्थ्यस्वभावीं अबोलणा ॥९१॥
एका अनुभवा आलें ब्रह्म । फिटला बोध्यबोधकतेचा भ्रम ।
मोडलें द्वैतभावाचें कर्म । जगीं विषम असेना ॥९२॥
परी अचुंबित वर्तणें । अघटमान कर्म करणें ।
अत्यंत उग्रता मिरवणें । दुर्धरपणें भयानकु ॥९३॥
आपण आपणियामाजीं हंसत । ध्वनितें बोले परमार्थ ।
तेथ बोधेना शिष्याचें चित्त । पडे दुश्चित्त ते ठायीं ॥९४॥

ऐसा जो वर्ते ब्रह्मज्ञानी । त्याची ब्रह्मस्थिती न मने जनीं ।
मा कोण जाईल भाव धरोनी । बोधालागोनि त्यापाशीं ॥२९५॥

भा. ३. २८४–२९५

## ११०. श्रीगुरु शिष्यास षड्गुणैश्वर्य देतात.

अणुमात्र तुझी प्राप्ती । अवचटें चढे ज्याचे हातीं ।
त्याचिये संसारसंपत्ती । सर्वस्वें निश्चितीं नाडिसी तूं ॥४॥
मैंदाचा विडा घेतां । तो प्रवर्ते आपुले घाता ।
तेवि तुझी प्रसन्नता । झालिया जीविता स्वयें नाशी ॥५॥
जे जे तुजपें मागों आले । ते ते सर्वस्वें नागवले ।
शेखीं नागवे तुवां केले । निर्लज्ज जाले तिहीं लोकीं ॥६॥
ऐशी तुझी निर्वाणगती । त्या तुझी उदार कीर्ती ।
घडे म्हणशी कैशा रीती । ते अगाध स्थिती अवधारीं ॥७॥
षड्गुणैश्वर्यवैभवेंसीं । आपणियातें दाना देसीं ।
दिधलें तें घेवों नेणसी । कदाकाळेंसीं कल्पांतीं ॥९॥
आपणियां दिधलें दान । यालागीं तूं दासां आधीन ।
मग त्यांचेनि छंदें जाण । सर्वस्वें आपण नाचसी ॥१०॥

भा. ५. ४–१०

गुरूतें पाहतां ब्रह्मदृष्टी । शिष्य ब्रह्मत्वें आला पुष्टी ।
ब्रह्मरूप देखे सृष्टी । निजऐक्यमिठी गुरुचरणीं ॥२८५॥
ऐसें ब्रह्मरूपीं ऐक्य घडे । तैं गुरुसेवा करणें पडे ।
ऐक्य झाल्याही पुढें । सेवा न मोडे अखंडत्वें ॥८६॥
कापूर घातलियां जळीं । स्वयें विरोनि जळीं परिमळीं ।
तेवि अहं जाऊनि सेवा सकळी । सर्वी सर्वकाळीं गुरुचरणीं॥८७॥

ऐशी अवस्था न येतां हातां । केवळ मुंडूनिया माथा ।
संन्यासी म्हणवी पूज्यता । त्याची अनुचितता हरि बोले ॥८८॥
स्वयें संन्यास अंगीकारी । ब्रह्मसाक्षात्कार जो न करी ।
त्यालागीं स्वयें श्रीहरी । अति धिक्कारीं निंदित ॥२८९॥

भा. १८. २८५–२८९.

शिष्य झालियाही ब्रह्मसंपन्न । त्याहीवरी त्यासी गुरु पूज्य जाण ।
सद्गुरु तोचि ब्रह्म पूर्ण । हे पावली खूण सनकादिकां ॥७४४॥
ज्याच्या बोला सरिसेंचि पाहें । अवघें ब्रह्मचि होऊनि ठाये ।
त्या सद्गुरूचे पूज्य पाये । सांगूं काये बोलवरी ॥४५॥
ज्यासी परब्रह्म आलें हातां । तोचि जाणे सद्गुरूची पूज्यता ।
इतरांसी हे न कळे कथा । अनुमानता बोलवरी ॥४६॥
ते सनकादिक समस्त । माझी पूजा करोनि यथोक्त ।
वारंवार स्तवन करीत । चरणा लागत पुनः पुनः ॥७४७॥

भा. १३. ७४४–७४७.

## १११. गुरुसेवा म्हणजेच परमपूजन

मागां सांगितलें भगवद्भजन । आतां सांगसी गुरुसेवन ।
नाहीं एकाविध निरूपण । ऐसा विकल्प जाण न धरावा ॥४९८॥
सद्गुरु तोचि माझी मूर्ती । निश्चयेंसीं जाण निश्चितीं ।
विकल्प न धरावा ये अर्थी । अनन्यभक्ति या नांव ॥९९॥
एकाग्रता जें गुरुभजन । तेंचि माझें परम पूजन ।
गुरूसीं मज वेगळेपण । कल्पांतीं जाण असेना ॥५००॥
गुरु भगवंत दोन्ही एक । येणें भावें निजनिष्टंक ।
भजे तोचि गुरुसेवक । येरु तो देख अनुमानी ॥ १ ॥

नित्य करितां गुरुसेवा । प्रेमपडिभरू नीच नवा ।
सद्भावाचिया हांवा । गुरुचरणीं जीवा विकिलें ॥ ६ ॥
आळसु येवोंचि विसरला । आराणुकेचा ठावो गेला ।
गुरुसेवासंभ्रमें भुलला । घेवों विसरला विषयांतें ॥ ७ ॥
जांभयी यावयापुरती । सवडी उरेना रिती ।
तेथें निद्रेलागीं केउती । राहावया वस्ती मिळेल ॥ ९ ॥
मुखीं सद्गुरूचें नाम । हृदयीं सद्गुरूचें प्रेम ।
देहीं सद्गुरूचें कर्म । अविश्रम अहर्निशीं ॥ ५१० ॥
ऐसाही प्रारब्धमेळा । अवचटें झालिया वेगळा ।
न तुटे प्रेमाचा जिव्हाळा । भजनीं आगळा सद्भावो ॥ १३ ॥
सद्गुरु सूर्य करी चिद्गगनीं । आपण होय सूर्यकांतमणी ।
त्याचेनि तेजें प्रज्वलोनी । स्वभावें मायावनीं होळी करी ॥१७॥
तुझ्या सकळ वृत्तींची सेवा । म्यांचि करावी गा गुरुदेवा ।
ऐसें प्रार्थूनि सद्भावा । हा वरु मज द्यावा कृपानिधी ॥५२१॥
तेथ संतोषोनि गुरुनाथें । वरु दीधला वरदहस्तें ।
हर्षें वोसंडत चित्तें । धन्य मी वरातें लाधलों ॥ २२ ॥
सद्गुरूचें ध्यावया उच्छिष्ट । मजचि मोठा लवलवाट ।
मांजर होऊनियां ताट । चरचराट चाटीन मी ॥५४६ ॥

भा. १२. ४९८–५४६

## ११२. देवास गुरुभक्तांची अतिशय आवड

ज्याचें मुखींचें वचन । ब्रह्मसाक्षात्कारा पाववी जाण ।
त्याचे सेवितां श्रीचरण । शुद्धि कोणकोणा होईना ॥१५२२॥
गुरुनाम घेतां मुखें । कळिकाळ पाहूं न शके ।
त्याची सेवा करितां हरिखें । पायां मोक्षसुखें लागती ॥१५२३॥

ज्यासी सद्गुरूची आवडी चित्तीं । ज्याची गुरुभजनीं अति प्रीती ।
त्यासी भाळली माझी सद्भक्ती । पाठीं लागे निश्चितीं वरावया ॥
सद्भक्ति बापुडी कायसी । अंगें मीही अहर्निशीं ।
तिष्ठतसें स्वानंदेंसीं । गुरुप्रेमासी भुललों ॥ १५२६ ॥
मज माझ्या भक्तांची थोडी गोडी । परी गुरुभक्तांची अति आवडी ।
सत्संगेंवीण रोकडी । सद्भक्ति चोखडी न पविजे ॥ १५२७ ॥

भा. ११. १५२२–१५२७

## ११३. शिष्यानें मत्सरादि दोष त्यागावे.

सज्ञानामाजीं वैर । ज्ञातृत्वाचाचि मत्सर ।
तेथें देहाभिमानें केलें घर । अति दुस्तर जीवासी ॥१६१॥
उद्धवा ज्ञानाभिमान । सर्वां अभिमानामाजीं कठिण ।
वासिष्ठ विश्वामित्र जाण । ज्ञानाभिमानें भांडती ॥१६५॥
एवं ज्ञानाभिमाना भेणें । म्यां घेतलें गोवळपण ।
मज मूर्ख म्हणती याज्ञिक ब्राह्मण । त्यांसी ज्ञानाभिमान कर्माचा ॥
मत्सराची जाती कैशी । अवश्य वसे ज्ञात्यापाशीं ।
मत्सरू थोर पंडितांशीं । यावज्जन्मेंसीं न सांडिती ॥१७२॥
पंडित भेटती समत्सर । श्रवण भजन अति नम्र ।
बोलती अति मधुर । समत्सर छळणोक्तीं ॥१७३॥
मत्सरें पंडित येती क्रोधा । असदारोपणें करिती निंदा ।
एवढी मत्सराची बाधा । नातळे कदा सच्छिष्यु ॥१७४॥
पुढूनि स्वार्थ नेतां । द्वेष उपजों नेदी चित्ता ।
भूतीं भगवंतु भाविता । द्वेपु सर्वथा येवों नेदी ॥१७७॥
निंदेचिया वाग्बाणीं । दारुण विंधिल्या दुर्जनीं ।
द्वेपु उपजों नेदी मनीं । हित मानी निंदेचें ॥१७८॥

जेणें जेणें निजानंदा केली । तो तो मानी हिता माउली ।
पापमळांची क्षाळणता झाली । शुद्ध केली माझी वृत्ति ॥१७९॥

भा. १०. १६१–१७९

## ११४. सच्छिष्यानें नऊ गुण संपादावे.

बोलीं बोलूं नेणे आटु । छळणोक्तीं नव्हे शठु ।
बहु बोलतां मानी वीटु । मौननिष्ठु होऊनि राहे ॥२२७॥
वादविवाद अति वाद । नावडे कोणाचा संवाद ।
न करी बोलाचा विनोद । लौकिक शब्द न बोले ॥२८॥
पोटीं कार्य नाहीं करणें । हो हो म्हणऊनि झकविणें ।
हेंही नाहीं तया बोलणें । सदा पठणें हरिनाम ॥२३०॥
पश्चिम द्वारींचें कवाड । सदा वारेनि करी खडखड ।
तैशी न करी बडबड । वृथा तोंड पिटीना ॥३१॥
न मिरवी शब्दज्ञान । न दाखवी आत्ममौन ।
न धरी वचनाभिमान । सदा स्मरण गुरूचें ॥३३॥
हे नवरत्नमाला गोमटी । जो घाली सद्गुरूच्या कंठीं ।
तो बैसे सायुज्याच्या पटीं । उठाउठीं तत्काळ ॥३८॥
या नवरत्नांचें पदक । ज्या शिष्याचें हृदयीं देख ।
तो सद्गुरूचा आवश्यक । विश्वासिक सर्वार्थी ॥२३९॥

भा. १०. २२७–२३९

## ११५. खरा शिष्य सन्मान टाळतो.

मानु देखोनि सहसा । शिष्यु सांकडों लागे कैसा ।
जेवि गळीं लागला मासा । चरफडी तैसा सन्मानें ॥१४६॥

नांवें ऐकोनि बागुलातें । बाळ सांडूं पाहे प्राणातें ।
तेवि ऐकतांचि सन्मानातें । भयें प्राणातें सांकडें ॥४७॥
प्रचंडवातें जेवि केळी । समूळ कांपे चळचळीं ।
कां लहरींच्या कल्लोळीं । कांपे जळीं रविबिंब ॥४८॥
सन्मानु तेणें पाडें । दृष्टी देखोनि नावडे ।
महत्त्व थोर सांकडें । अंगाकडे येवों नेदी ॥४९॥
आदरें घेतां सन्मान । दृढ होईल देहाभिमान ।
सांडोनि मानाभिमान । हीनदीन होवूनि असे ॥१५०॥
मज कोणीं न देखावें । मज कोणीं न ओळखावें ।
मज कोणीं न लाजावें । ऐसें जीवीं वांछितू ॥ ५३ ॥
ज्यांचें पोटीं दृढ अभिमान । ते सदा वांछिती सन्मान ।
जो सांडूं रिघे अभिमान । तो मानापमान न पाहे ॥ ५७ ॥
जेणें घेतला सन्मान । त्यासी नेघवे अपमान ।
तेथ सहजें आला देहाभिमान । यालागीं सन्मान नावडे ॥१५८॥

भा. १०. १४६-१५८

## ११६. शिष्याच्या स्वानंदानें गुरूस आनंद

जेथें एक ना दुसरें । सन्मुख ना पाठिमोरें ।
जेथ सुखही निजसुखामाजीं विरे । तें स्वरूप निर्धारें निजशिष्य होती
जेवि बाळाचे लळे पाळणें । हे व्यालीचि वेदना जाणे ।
कां शिष्यांसी पूर्ण बोध करणें । तेथील कळवळणें सद्गुरु जाणे ॥
बाळका लेवविल्या लेणें । जेवि माउली निवों जाणे ।
कां शिष्यसुखें सुखावणें । हें सद्गुरु जाणे परिपूर्ण बोधें ॥६०७॥

इंद्रियें नेणतीं ज्याचें घर । जें मना वचना अगोचर ।
बुद्धीसि न कळे ज्याची मेर । ऐशी निर्विकार निजवस्तु ॥८॥
दृष्टीं दाविजे साक्षात । हातीं देइजे पदार्थ ।
तैसा नव्हे गा परमार्थ । तोही सद्गुरुनाथ प्रबोधी शिष्या ॥९॥
शिष्यासि करावया प्रबोध । बोधिता सद्गुरु अगाध ।
यालागीं शिष्यसुखें स्वानंद । भोगी परमानंद गुरुरावो ॥६१०॥
शिष्यासी आकळे परब्रह्म । तंव तंव निरसे त्याचा भ्रम ।
तेणें सद्गुरूसी परम । सुखसंभ्रम उल्हासे ॥११॥
सेवकु परचक्र विभांडी । तंव राजा उभारी यशाची गुढी ।
शिष्य परमानंदीं दे बुडी । तेणें गुरूसी गाढी सुखावस्था ॥१२॥
ऐशी शिष्यकृपेची कळवळ । ज्या सद्गुरूमाजीं प्रबळ ।
तेथें भागवतधर्म हे सकळ । शिकावे अविकळ अनन्यश्रद्धा ॥६१३॥

भा. ३. ६०५–६१३

११७. सद्गुरु हाच गुणसमुच्चयाचें प्रतीक आहे.

(१) पर्वत :

रत्नादि निकर समस्त । पर्वत परार्थाचि वाहत ।
तृण जळ नाना अर्थ । तेंही परार्थ धरीतसे ॥ ३७१ ॥
ग्रीष्माअंतीं सर्व सरे । परी तो देतां मागें न सरे ।
सर्वेंचि भगवंतें कीजे पुरें । वर्षोनि जळधरें समृद्धी ॥३८१॥
जंव जंव उल्हासें दाता देतु । तंव तंव पुरवी जगन्नाथु ।
विकल्प न धरितां मनाआंतु । देता अच्युतु अनिवार ॥३८२॥
एवं पर्वताची जे उत्पत्ती । ते परोपकारार्थ एकांतीं ।
उपकारावांचूनि चित्तीं । दुजी वृत्ति जाणेना ॥ ३८४ ॥

त्या पर्वताऐशी तत्वता । असावी साधकासी उदारता ।
काया वाचा आणि चित्ता । सर्वस्व देतां उल्हासु ॥३८५॥
परमार्थाचिया चाडा । स्वार्थ सांडोनि रोकडा ।
परोपकारार्थ अवघडा । रिघे सांकडां परार्थें ॥ ३८७ ॥
ऊसु जैसा अवधारीं । सर्वांसीं गोडपणें उपकारी ।
तैसाचिं योगिया संसारीं । परोपकारी मधुरत्वें ॥३८९॥
जैसे पर्वतीं निर्झर । तैसे उपकाराचे पाझर ।
सुकों नेणती निरंतर । कृतोपकार जग केलें ॥ ३९० ॥

भा. ७. ३७९–३९०

( २ ) पाणी :

जेवि चंद्रकिरण चकोरांसी । पाखोवा जेवि पिलियांसी ।
जीवन जैसें कां जीवांसी । तेंवि सर्वांसी मृदुत्व ॥४६५॥
जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।
उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ॥४६६॥
उदकाचें सुख तें किती । सवेंचि क्षणें तृषितें होती ।
योगिया दे स्वानंदतृप्ती । सुखासी विकृति पैं नाहीं ॥४६७॥
उदकाची जे मधुरता । ते रसनेशींचि तत्वता ।
योगियांचें गोडपण पाहतां । होय निवविता सर्वेंद्रियां ॥४६८॥
मेघमुखें अधःपतन । उदकाचें देखोनि जाण ।
अधःपातें निवती जन । अन्नदान सकळांसी ॥ ४७३ ॥
तैसें योगियासी खालुतें येणें । जें इहलोकीं जन्म पावणें ।
जन निववी श्रवणकीर्तनें । निजज्ञानें उद्धरी ॥ ४७४ ॥

भा. ७. ४६५–४७४

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

## ( ३ ) समुद्र :

समुद्र सदा सुप्रसन्न । योगी सदा प्रसन्नवदन ।
केव्हांही धुसमुशिलेपण । नव्हे जाण निजबोधें ॥ ४२ ॥

मीनल्या सरितांचें समळ जळ । समुद्र डहुळेना अति निर्मळ ।
तैसीं नाना कर्में करितां सकळ । सदा अविकळ योगिया ॥४३॥

जळें गंभीर सागर । योगिया स्वानुभवें गंभीर ।
वेला नुल्लंघी सागर । नुल्लंघी योगीश्वर गुरुआज्ञा ॥४४॥

मळु न राहे सागरीं । लाटांसरिसा टाकी दुरी ।
तैसाचि मळु योगियाभीतरीं । ध्यानें निर्धारीं न राहे ॥ ४९ ॥

समुद्रीं मीनली ताम्रपर्णी । तेथ जाली मुक्ताफळांची खाणी ।
योगिया मीनली श्रद्धा येउनी । तेथ मुक्तखाणी मुमुक्षां ॥५०॥

जो समुद्रामाजीं रिघोनि राहे । तो नाना परींचीं रत्नें लाहे ।
योगियांमाजीं जो सामाये । त्याचे वंदिती पाये चिद्रत्नें ॥५१॥

ग्रीष्मकाळाचिये प्राप्ती । सरितांचे यावे राहती ।
ते मानूनिया खंती । आपांपती वोहटेना ॥ ६४ ॥

तैसोंचि योगियाच्या ठायीं । नाना समृद्धि आलिया पाहीं ।
अहंता न धरी देहीं । गर्वु कांहीं चढेना ॥ ६५ ॥

संपत्तीमाजीं असतां । मी संपन्नु नाठवे चित्ता ।
दरिद्र आलिया दरिद्रता । नेणे सर्वथा योगिया ॥ ६७ ॥

दरिद्र आणि संपन्नता । दोन्ही समान त्याचिया चित्ता ।
नाहीं प्रपंचाची आसक्तता । नारायणपर तत्वता निजबोधें ॥६८॥

मा. ८. ४२–६८

( ४ ) वारा :

ब्रह्मादिकांचा देह पाळूं । कां सूकरादिकांचा देह टाळूं ।
ऐसा न मनीच विटाळू । प्राणु कृपाळू समभावें ॥४१६॥
आवडीं प्रतिपाळावा रावो । रंकाचा टाळावा देहो ।
ऐसा प्राणासी नाहीं भावो । शुद्ध समभावो सर्वत्र ॥ ४१८ ॥
वायु सर्वांते स्पर्शोनि जाये । परी अडकला कोठें न राहे ।
तैसें विषय सेवितां पाहें । आसक्त नव्हे योगिया ॥४२४॥
असोनि इंद्रियांचेनि मेळें । तो विषयांमाजीं जरी खेळे ।
तरी गुणदोषआसक्तिमेळें । बोधु न मळे तयाचा ॥४२५॥
ज्या तया वायूचे भेटी । सुगंध कोटी घालिती मिठी ।
त्याची आसक्ती नाहीं पोटीं । उठाउठीं सांडितु ॥४२८॥
तैसा आत्मत्वें योगिया पाहीं । प्रवेशलासे सर्वां देहीं ।
देह गुणाश्रयो पाहीं । ठायींच्या ठायीं तोचि तो ॥ ४२९ ॥

भा. ७. ४१६-४२९

( ५ ) आकाश :

सर्व पदार्थी समत्व । यालागीं आकाशासी गुरुत्व ।
असंगत्व अभेदत्व । निर्मळत्व जाणोनी ॥ ४३२ ॥
वैर सर्पामुंगुसासी । आकाश दोहींचें हृदयवासी ।
वैर निर्वैरता आकाशासी । ते स्थिती योगियासी पाहिजे ॥४३४॥
आकाश सर्व पदार्थी असे । परी असे हें सर्वांसी न दिसे ।
तेवि दृश्यद्रष्टाअतीतदर्शे । सर्वत्र असे योगिया ॥४३७॥
जें जें द्वंद्व बाधूं आलें । तें तें स्वरूप देखे आपुलें ।
सहजें द्वंद्वभावा मुकलें । अबाधित उरलें निजरूप ॥४४१॥

आकाशा चिखल माखूं जातां । तें न माखे, माखे लाविता ।
तैसा योगिया दोषी म्हणतां । दोषु सर्वथा म्हणत्यासी ॥४४३॥
गगन असोनिया जनीं । मैळेना जनघसणीं ।
तैसा योगिया सकळ कर्मं करूनी । कर्मठपणीं न मैळे ॥४४४॥
विजू कडकडूनि आकाशीं । तेजें प्रकाशी गगनासी ।
गगन नातळे ते विजूसी । असोनि तिशीं सवाह्य ॥४५४॥
तैसा सत्वगुण प्रकाशी ज्ञान । त्यासी योगिया नातळे जाण ।
ज्ञानस्वरूप निखळ आपण । वृत्तिज्ञान मग नेघे ॥ ४५५ ॥

भा. ७. ४३२–४५५

( ६ ) सूर्य :

सूर्य शोषूनि घे किरणीं । तें शोषितें लक्षण नेणे कोणी ।
देतां मेघमुखें वरुषोनी । निववी अवनी जनेंसी ॥५३४॥
तैसीचि योगियाची परी । अल्प ज्याचें अंगीकारी ।
त्याचे मनोरथ पूर्ण करी । सहस्र प्रकारीं हितत्वें ॥५३५॥
ज्यासी सेविती योगी आत्माराम । त्यांचे पुरती सकळ काम ।
अंतीं करोनियां निष्काम । विश्रामधामा आणिती ॥ ५३६ ॥
एवं योगी आपुले योगबळें । विषयो सेविती इंद्रियमेळें ।
जे देती त्यांसी यथाकाळें । कृपाबळें निवाविती ॥ ५३७ ॥
त्यांसी विषयो देतां कां घेतां । आसक्ति नाहीं सर्वथा ।
रसु चोखूनि घेतां देतां । अलिप्त सविता तैसे ते ॥ ५३८ ॥
सूर्यो थिल्लरामाजीं बिंबला । मूढ म्हणती थिल्लरीं बुडाला ।
त्याचेनि कंपें कंपु मानिला । डहुळें डहुळला म्हणती तो ॥५३९॥

त्या थिल्लरातें नातळतां । गगनीं अलिप्त जेवि सविता ।
तैसीच योगियांची योग्यता । देहातीतता देहकर्मीं ॥५४०॥

भा. ७. ५३४-५४०

(७) वृक्ष :

सर्वांगें सर्वभावेंसीं । सर्व काळ सर्व देशीं ।
पराधीन होआवें सर्वांसी । हें वृक्षापाशीं शिकलों ॥ ३९३ ॥
वृक्ष जेणें प्रतिपाळिला । तो त्या आधीन जाला ।
कां जो छेदावया रिघाला । त्याही झाला स्वाधीनु ॥३९४॥
योगिया पालखीसीं घातला । तेव्हां त्याचिया आधीन झाला ।
एकीं शूळीं द्यावया चालविला । तेव्हां त्याच्याहि बोला आधीनु ॥
सांडूनि देहींची अहंता । योगियासी झाली पराधीनता ।
विश्व माझा आत्मा सर्वथा । सर्वांच्या वर्ततो बोलांत ॥३९६॥
सर्व तें मीचि आहें । यालागीं साधक बाधक न पाहें ।
त्याच्या बोलामाजीं राहे । वर्तता होये संतोषें ॥ ३९७ ॥
सकळ लोकीं निजात्मता । देखतां जाली पराधीनता ।
हें वृक्षापासोनि तत्वता । परात्मता शिकलों ॥ ३९९ ॥
अतिथि आलिया वृक्षापासीं । वंचनार्थु न करी त्यासी ।
पत्रपुष्पफलमूळछायेसीं । त्वचाकाष्ठांसीं देतसे ॥४०१॥
जैसा वृक्ष समूळ सगळा । अर्थियांलागीं सार्थक जाहला ।
तैसा चित्तें वित्तें देहें बोला । साधु संतुष्टला अर्थ्यांसीं ॥४०२

भा. ७. ३९३-४०३

(८) अजगर :

उद्योगेंवीण आहारू । अयाचित सेवी अजगरू ।
डंडळोनि न सांडी धीरू । निधडा निर्धारु पैं त्याचा ॥२५॥

तैशीचि योगियांची गती । सदा भाविती आत्मस्थिती ।
यदृच्छा आलें तें सेविती । रसआसक्ति सांडुनी ॥ २७ ॥
मुख पसरिलिया निर्धारा । स्वभावें रिघालिया वारा ।
तोचि आहारु पैं अजगरा । तेणेंचि शरीरा पोषण ॥ ३० ॥
तैशीचि योगियांची स्थिती । वाताशनें सुखें वर्तती ।
आहारालागुनी पुढिलांप्रती । न ये काकुलती सर्वथा ॥३१॥
अजगरासी बहु काळें । यदृच्छा आहारु न मिळे ।
तरी धारणेसीं न टळे । पडिला लोळे निजस्थानीं ॥ ३२ ॥
तैसें योगियासी अन्न । बहुकाळें न मिळे जाण ।
तरी करूनियां लंघासन । निर्द्रंविण निजतु ॥ ३४ ॥
निद्रा नाहीं तयासी । परी निजे निजीं अहर्निशीं ।
बाह्य न करी उपायासी । भक्ष्य देहासी अदृष्टें ॥ ३५ ॥
अजगरासी बळ उदंड । देहो पराक्रमें प्रचंड ।
परी न करी उद्योगाचें बंड । पसरुनी तोंड पडिलासे ॥३७॥
तैसाचि योगिया केवळ । शरीरीं असे शारीर बळ ।
बुद्धिही असे अति कुशळ । इंद्रियबळ पट्टुतर ॥ ३८ ॥
स्वप्नजागृती मुकला । सुषुप्ती सांडोनि निजेला ।
शून्याचा पासोडा झाडिला । निजीं पहुडला निजरूपें ॥ ४० ॥

भा. ८. २५–४०

## ११८. सद्‌गुरु भवरोग-वैद्य आहेत.

ॐ नमो सद्‌गुरु धन्वंतरी । ज्याची दृष्टीचि निरुज करी ।
त्यावांचूनि संसारीं । भवरोगु दुरी न करवे ॥१॥
ज्या भवरोगानेचि दर्पें । फुंफात तापलीं त्रिविध तापें ।
मी माझें येणें संकल्पें । वाग्जल्पें जल्पतीं ॥२॥

पडलीं द्वैताचिया दुखणा । तोंडाची चवी गेली जाणा ।
मुखा आला कडवटपणा । कटुवचना बोलतु ॥९॥
उभें न राहती ऐक्यवृत्ती । क्षीण जाली ज्ञानशक्ती ।
पडलीं जडत्वें लोळती । पाणी मागती विषयाचें ॥१०॥
अल्प अल्प तें देतां जळ । कडकडूनि झोंबती प्रबळ ।
आम्हासी फार द्या गा जळ । तृषा केवळ बोळेना ॥११॥
कुपथ्य करितां निरंतर । तंव तो झाला जीर्ण ज्वर ।
क्षयो लागला जी थोर । क्षीण शरीर पडियेलें ॥१२॥
नवल रोगाचा पडिपाडु । गोड परमार्थ तो जाला कडू ।
विषप्राय विषय कडू । तोचि गोडु पैं जाला ॥१४॥
ते व्याधीचिया उफाडा । देतां सत्कथा काढा ।
श्रवणमुखींच्या भावार्थदाढा । पाडी पुढां दांतखिळी ॥१५॥
देतां तुलसीमकरंद नसु । वरता जावों नेदी श्वासु ।
मस्तक झाडी मानी त्रासु । रोगें बहुवसू व्यापिला ॥१६॥
ऐसा रोग देखोनिया गाढा । वैद्य आचार्य धडफुडा ।
कृपा पाहे जयां कडा । तो रोकडा वांचवी ॥१७॥
निधडा वैद्य तो सुबुद्धि । जीवु गेलिया मरों नेदी ।
जीवेंविण वांचवी त्रिशुद्धि । अगाध सिद्धि तयाची ॥१८॥
शुद्ध भाग्यें करूनि जाण । तो करी कृपाकूर्मावलोकन ।
तेंचि रोगिया अमृतपान । होय सावधान तत्काळ ॥१९॥
एवं जालिया सावधान । रोगी आपणिया आपण ।
नित्यानित्याचें पाचन । करी सेवन साक्षेपें ॥२०॥

भा. १०. ९-२०

ब्रह्माहमस्मीचीं गोमटीं । पक्वान्नें देखिलीं दिठी ।
तेंही खाऊनि उठाउठी । मायेपाठीं लागला ॥२८॥
ते धाकेंचि निमाली । पाहतां न दिसे नाहीं झाली ।
स्वानंदें पुष्टि आली । झाडी केली भवरोगा ॥२९॥
ऐसा सद्गुरु वैद्य गाढा । जेणें उपचारोनि केलों निधडा ।
शरण रिघावें तुजपुढां । तंव चहूंकडां तूंचि तूं ॥३०॥
तुजवेगळें आपणियातें । देखोनि शरण यावें तूतें ।
तंव मीतूंपण हारपलें तिथें । कैसेनि तूतें भजावें ॥३१॥
ज्यांच्या सुटल्या जीवग्रंथी । जाले आत्माराम निश्चितीं ।
तेही अहेतुक भक्ति करिती । प्राप्तांची स्थिती हे जाणा ॥३२॥

भा. १०. २८-३२

११९. सद्गुरु हे चित्समुद्र व कर्णधार आहेत.

ॐ नमो सद्गुरु चित्समुद्रा । मुक्तमोतियांचा तुजमाजीं थारा ।
ज्ञान वैराग्यशुक्तिद्वारां । सभाग्य नरां तूं देशी ॥१॥
तुझी खोली अमर्याद । माजीं चिद्रत्नें अतिविविध ।
देखोनि निजप्रबोध चांद । भरतें अगाध तुज दाटे ॥२॥
ब्रह्मविद्या महाबंदर । तेथ निजभक्ती हें तारूं थोर ।
त्यासी वागविता तूं कर्णधार । प्रेमाचें साचार शीड चढविशी ॥३॥

भा. २०. १-३.

कैसा गुरु कर्णधार कुशल । आवर्त खळाळ आंदोळ ।
चुकवूनि विकल्पाचे कल्लोळ । साम्यें पाणिढाळ सवेग काढी ॥
लावूनि विवेकाचें आवलें । तोडिती कर्माकर्मांचीं जळें ।
भजनशिडाचेनि बळें । नाव चाले सवेग ॥७८॥

कामक्रोधादि महामासे । तळपती घ्यावया आमिषें ।
त्यां घालूनि शांतीचेनि पाशें । तारूं उल्हासें चालवी ॥७९॥
ठाकतां सारूप्यादि बंदरें । तारुवामाजीं अतिगजरें ।
लागलीं अनुहत तुरें । जयजयकारें गर्जती ॥१८०॥
नेतां सलोकतेचें पेठें । तारूं उलथेल अवचटें ॥
लावितां समीपतेचे वाटे । तारूं दाटे दोहीं सवां ॥८१॥
करावें स्वरूपतेमाजीं स्थिरु । तंव तो दाटणीचा उतारु ।
ऐसें जांणोनियां निर्धारु । लोटिलें तारूं सायुज्यामाजीं ॥१८२॥

भा. २०. १७७-१८२

## १२०. सद्गुरु हे न दिसणाऱ्या चिद्ब्रह्माशीं लग्न लावणारे ज्योतिषी आहेत.

ॐ नमो सद्गुरु तूं ज्योतिषी । एकात्मतेचें घटित पाहसी ।
चिद्ब्रह्मेंसीं लग्न लाविशी । ॐ पुण्येंसीं तत्त्वतां ॥१॥
वधूवरां लग्न लाविती । हें देखिलें असे बहुतीं ।
आपुली आपणा लग्नप्राप्ती । हे अलक्ष्य गती गुरुराया ॥ २ ॥
लग्न लाविती हातवटी । पांचां पंचकांची आटाटी ।
चुकवूनि काळाची काळदृष्टी । घटिका प्रतिष्ठी निजबोधें ॥३॥
चहूं पुरुषार्थांचें तेलवण । लाडू वाइले संपूर्ण ।
अहंभावाचें निंबलोण । केलें जाण सर्वस्वें ॥४॥
साधनचतुष्टयाचा सम्यक । यथोक्त देऊनि मधुपर्क ।
जीवभावाची मूद देख । एकाएक सांडविली ॥५॥
विषयसुख मागें सांडे । तेंचि पायातळीं पायमांडे ।
सावधान म्हणसी दोहींकडे । वचन धडफुडें तें तुझें ॥६॥

व्यवधानाचें विधान तुटे । सहजभावें अंत्रपट्ट फिटे ।
शब्द उपरमोनि खुंटे । मुहूर्त गोमटे पै तुझे ॥७॥
अर्धमात्रा समदृष्टी । निजाबिंबीं पडे गांठी ।
ऐक्यभावाच्या मीनल्या मुष्टी । लग्नकसवटी अनुपम ॥८॥
तेथ काळा ना धवळा । गोरा नव्हे सांवळा ।
नोवरा लक्षेना डोळां । लग्नसोहळा ते ठायीं ॥९॥
परी नवल कैसें कवतिक । दुजेनवीण एकाएक ।
एकपणीं लग्न देख । लाविता तूं निःशेख गुरुराया ॥१०॥
तुज गुरुत्वें नमूं जातां । तंव आत्मा तूंचि आंतौता ।
आंतु कीं बाहेर पाहों जातां । सर्वीं सर्वथा तूंचि तूं ॥११॥
तुझें तूंपण पाहतां । माझें मीपण गेलें तत्वतां ।
ऐसें करूनियां गुरुनाथा । ग्रंथकथा करविसी ॥१२॥

भा. ८. १–१२

## १२१. सद्गुरु सच्चिद्घन आहेत.

ॐ नमो श्रीगुरु सच्चिद्घन । वरुषताहे स्वानंदजीवन ।
मुमुक्षुमयूर आनंदले जाण । हरिखें उड्डाण करिताती ॥ १ ॥
तो सजल देखोनि मेहो । सोहंभावें फोडिती टाहो ।
रोमांचपिसीं पसरूनि पहा हो । सत्वें लवलाहो नृत्याचा ॥ २ ॥
नाचे स्वानंदाचेनि मेळें । तेणें सर्वांगीं निघाले डोळे ।
पिसें देखणीं जाहलीं सकळें । तें शिरीं गोपाळें वाहिलीं ॥ ३ ॥
तो मेघ देखोनि संमुख । आर्त चातक पसरिती मुख ।
बिंदुमात्रें पावले सुख । नित्य निर्दोष ते जाहले ॥ ४ ॥

तेणें वोळलेनि कृपाभरें । शिष्यसरितेसी पूर भरे ।
विकल्पवोसणें एकसरें । महापूरें वाहाविलीं ॥ ७ ॥
तेणें प्रवाहनिर्मळजळें । चिदैक्यसागरीं सरिता मिळे ।
मग समरसोनि तेणें जळें । राहे निश्चळ निजरूपें ॥ ८ ॥

भा. ११. १-८

## १२२. सद्गुरु क्षीराब्धी आहेत.

सद्गुरु क्षीराब्धी अतिगहन । सादरें करितां निरीक्षण ।
वेदांतलहरीमाजीं जाण । शब्दाचिद्रत्नें भासती ॥ ७ ॥
तेथ विश्वासाचा गिरिवर । वैराग्यवासुकी रविदोर ।
निजधैर्याचे सुरासुर । मंथनतत्पर समसाम्यें ॥ ८ ॥
मथनीं प्रथम खळखळाटीं । लयविक्षेप हाळाहळ उठी ।
तें विवेकनीळकंठें कंठीं । निजात्मदृष्टीं गिळिलें ॥ ९ ॥
मग अभ्यास प्रत्यगावृत्ती । क्रियेसी झाली विश्रांती ।
प्रकटली रमा निजशांती । जीस श्रीपती वश्य झाला ॥१०॥
तेथ ब्रह्मरस आणि भ्रमरस । इहीं युक्त अमृतकलश ।
मथनीं निघाला सावकाश । ज्याचा अभिलाष सुरवरां ॥११॥
ते विभागावया लागुनी । माधवाचि झाला मोहिनी ।
अहंराहूचें शिर छेदुनी । अमृतपानीं निववीले ॥ १२ ॥
ते वृत्तिरूप मोहिनी । पालटली तत्क्षणीं ।
ठेली नारायण होउनी । पहिलेपणीं उठेना ॥ १३ ॥
ते क्षीरसागरींचा नारायण । समाधि शेषशयनीं आपण ।
सुखें सुखावला जाण । अद्यापि शयन केलें असे ॥ १४ ॥

भा. १४. ७-१४

### १२३. सद्गुरु अमरपति आहेत.

ॐ नमो सद्गुरु अमरपती । अनुभवु तोचि ऐरावती ।
स्वानंदमदें भद्रजाती । उन्मत्तस्थितीं डुल्लत ॥ १ ॥
उपदेशाचें वज्र तिख । छेदी संकल्पविकल्पपांख ।
जडजीव ते पर्वत देख । निजस्थानीं सम्यक स्थापिसी ॥ २ ॥
विवेकाचे पारिजात । वैराग्यसुमनीं घमघमित ।
मुमुक्षुभ्रमर रिघोनि तेथ । आमोद सेविती चित्सुख ॥ ३ ॥
स्वर्गांगना अष्टमासिद्धी । तुजपुढें नाचती नाना छंदीं ।
त्यांतें दास न पाहती त्रिशुद्धी । मंदबुद्धि भाळले ॥ ७ ॥
समसाम्यें समान । अढळ तुझें सिंहासन ।
सच्चिदानंदाची गादी जाण । तेथें सुखासन पैं तुझें ॥ ८ ॥
त्यांसी निजात्मता देउनी । बैसविसी निजासनीं ।
मरणेंवीण अमर करूनी । अपतनीं स्थापिसी ॥ ११ ॥
इंद्रा अहल्येशीं व्यभिचारू । तुज वृंदेशीं दुराचारू ।
इंद्र जाहला सहस्रनेत्रू । तूं सर्वांगें सर्वत्रु देखणा ॥ १२ ॥
इंद्रासी दैत्य करिती दीन । त्याचें पद घेती हिरोन ।
तुज भक्त करिती प्रसन्न । पद चिद्धन ते घेती ॥ १३ ॥

भा. ९. १–१३

### १२४. सद्गुरु स्वानंद-वैकुंठाचे वैकुंठपति आहेत.

ॐ नमो सद्गुरुवैकुंठनाथा । स्वानंदवैकुंठीं सदा वसता ।
तुझें ऐश्वर्य स्वभावतां । न कळे अनंता अव्यया ॥ १ ॥

तुझ्या निजबोधाचा गरुड । कर जोडूनि उभा दृढ ।
त्याच्या पाखांचा झडाड । उन्मळी सुदृढ भववृक्षा ॥ २ ॥
तुझें स्वानुभवैकचक्र । लखलखित तेजाकार ।
द्वैतदळणीं सतेजधार । अति दुर्धर महामारी ॥ ३ ॥
कैसा पांचजन्य अगाध । निःशब्दीं उठवी महाशब्द ।
वेदानुवादें गर्जे शुद्ध । तोचि प्रसिद्ध शंख तुझा ॥ ४ ॥
झळफळित सर्वदा । निजतेजें मिरवे सदा ।
करी मानाभिमानांचा चेंदा । ते तुझी गदा गंभीर ॥ ५ ॥
तुझे लोकींचे निवासी जाण । अवघे तुजाचि समान ।
तेथ नाहीं मानापमान । देहाभिमान असेना ॥ ९ ॥
तेथ काळाचा रिगमु नाहीं । कर्माचें न चले कांहीं ।
जन्ममरणांचें भय नाहीं । ऐशिया ठायीं तूं स्वामी ॥ १० ॥
जेथ कामक्रोधांचा घात । क्षुधेतृषेचा वोसाड प्रांत ।
निजानंदें नित्यतृप्त । निजभक्त तुझेनि ॥ ११ ॥

भा. २१. १-११

## १२५. गुरु हा ब्रह्मस्वरूप आहे.

तुझिया आधारस्थितीं । नांदती त्रैलोक्यें लोकपंक्ती ।
सकळ भूतांची उत्पत्ति स्थिती । निदान अंतीं तुजमाजीं ॥ ३ ॥
सुरासुर लहानथोर । एक सौम्य एक क्रूर ।
इयें भूतें धरूनि निर्विकार । स्वरूप साचार पैं तुझें ॥ ४ ॥
तेथ विवेकाचें आगर । सच्चिदानंदाचे रत्नाकर ।
तेथील लाधल्या कांकर । नीच ते थोर वेव्हारे होती ॥ ५ ॥

कर्में करितां वाडेंकोडें । कर्मी कर्मठता न चढे ।
कर्मामाजीं मोक्ष आतुडे । हेंचि रोकडें पुसों पां ॥ १५ ॥
स्वयें बोलिला श्रीपती । सात्विकांची जे कर्मस्थिती ।
तें कर्माचि माझी विभूती । हें सोळाव्याअंतीं निरूपिलें ॥१६॥
स्वयें आचरितां स्वकर्म । तें कर्मचि होय ब्रह्म ।
हेंचि कर्मक्रियेचें वर्म । देवासी सुगम पुसों पां ॥ १७ ॥
ऐसा पोटींचा आवांका । तेंचि पुसावया आशंका ।
वर्णाश्रमांची स्वधर्मपीठिका । देवासी देखा पुसत ॥ १८ ॥

भा. १७. ३–१८

## प्रकरण : ७

# देव आणि भक्त

### १२६. आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी हे सर्व ज्ञान्यामध्यें अंतर्भूत होतात.

माझे स्वरूपीं मनाची स्थिती । तैं आर्त जिज्ञासू अर्थार्थी ।
हे तीनही ते काळीं हारपती। माझी भक्ति चौथी उल्हासे ॥२६६॥
माझें भांडवल मज एक भक्ति । तेथ दुजी तिजी आणि चौथी ।
हे साधकांची साधनभ्रांती । बहुता भक्ति मज नाहीं ॥६७॥
निःशेष मावळल्या अहंकृती । भूतें निजात्मरूप दिसती ।
माझ्या स्वरुपाची सहजस्थिती। ते माझी मुख्य भक्ति उद्धवा॥६९॥
ये भक्तीच्या लेशस्थिती । आर्त जिज्ञासू अर्थार्थी ।
प्रकाशले गा वर्तती । निजस्वार्थी साधक ॥२७०॥
रोगिया नांव आर्तता । हें व्याख्यान नव्हे परमार्था ।
भगवत्प्राप्तीची चित्तीं व्यथा । ते आर्तता परमार्थी ॥७२॥
जो भगवंताचे प्राप्तीलागीं । कडां घालूं धांवे वेगीं ।
कां रिघों पाहे जळता आगीं । ते आर्त सवेगीं बोलिजे ॥७३॥
आर्ताची स्थिती ऐसी । जिज्ञासू वारी त्यासी ।
मनुष्यदेह ब्रह्मप्राप्तीसी । तो आत्महत्येसी नको योजूं ॥७४॥
मागील भक्त कोणें रीतीं । जाणोनि पावले भगवद्भक्ति ।
जीवेंभावें त्या विवरी युक्ति । जिज्ञासू निश्चितीं या नांव ॥७५॥
सर्वां अर्थी मीचि अर्थना । शुद्ध अर्थार्थी या नांव जाणा ।
म्हणती अर्थार्थी द्रव्यकामना । ते मंद व्याख्याना प्रवर्तती ॥७८॥

दृष्टी पडे नाना अर्थीं । जो विवंचोनि लावी परमार्थीं ।
त्या नांव बोलिजे अर्थार्थी। त्यातेही निजभक्ति प्रकाशे माझी।।२७१।।

भा. ११. २६६–२७१

### १२७. भक्त आपलीं सर्व इंद्रियें भगवंताच्या भक्तीकडे लावतात.

इंद्रियें कोंडितां न कोंडती । विषय सांडितां न सांडती ।
पुढतपुढती बाधूं येती। यालागीं हरिभक्ति द्योतिली वेदें ।।२९३।।
इंद्रियें कोंडावीं न लगती । सहजें राहे विषयासक्ती ।
एवढें सामर्थ्य हरिभक्ती । जाण निश्चितीं नृपवर्या ।।९४।।
योगी इंद्रियें कोंडिती । तीं भक्त लाविती भगवद्भक्तीं ।
योगी विषय जे त्यागिती । ते भक्त अर्पिती भगवंतीं ।।९५।।
योगी विषय त्यागिती । त्यागितां देह दुःखी होती ।
भक्त भगवंतीं अर्पिती । तेणें होती नित्यमुक्त ।।९६।।
हें नव्हे म्हणती विकल्पक । याचिलागीं येथें देख ।
कायेन वाचा हा श्लोक । अर्पणद्योतक बोलिजेल ।।९७।।
दारा सुत गृह प्राण । करावे भगवंतासी अर्पण ।
हे भागवतधर्म पूर्ण । मुख्यत्वें भजन या नांव ।।९८।।
अकराही इंद्रियवृत्ती । कैशा लावाव्या भगवद्भक्तीं ।
ऐक राया तुजप्रती । संक्षेपस्थिती सांगेन ।।९९।।
मनें करावें हरीचें ध्यान । श्रवणें करावें कीर्तिश्रवण ।
जिव्हेनें करावें नामस्मरण । हरिकीर्तन अहर्निशीं ।।३००।।
करीं करावें हरिपूजन । चरणीं देवालयगमन ।
घ्राणीं तुळसीआमोदग्रहण । जिहीं हरिचरण पूजिले ।।१।।

नित्य निर्माल्य मिरवे शिरीं । चरणतीर्थं अभ्यंतरीं ।
हरिप्रसाद ज्याचें उदरीं । त्या देखोनि दुरी भवभय पळे ॥२॥
वाढतेनि सद्भावें जाण । चढतेनि प्रेमें पूर्ण ।
अखंड ज्यासी श्रीकृष्णभजन । त्यासी भवबंधन असेना ॥३॥
सकल भयांमाजीं थोर । भवभय अतिदुर्धर ।
तेंही हरिभक्तीसमोर । बापुडें किंकर कोवि राहे ॥४॥
करितां रामकृष्णस्मरण । उठोनि पळे जन्ममरण ।
तेथें भवभयाचें तोंड कोण । धैर्यपण धरावया ॥५॥
जेथें हरिचरणभजनप्रीती । तेथें भवभयाची निवृत्ती ।
परम निर्भय भगवद्भक्ती । आमची मती निजनिश्चयो ॥६॥
कृतानिश्चयो आमुचा जाण । येथें साक्षी वेदशास्त्रपुराण ।
सर्वात्मना भगवद्भजन । निर्भयस्थान सर्वांसी ॥७॥
असो वेद शास्त्र पुराण । स्वमुखें बोलिला श्रीकृष्ण ।
मी सर्वथा भक्तिआधीन । भक्तिप्रधान भगवद्वाक्य ॥८॥
उभवूनियां चारी बाह्या । निजात्मप्राप्तीच्या उपाया ।
' भक्त्याहमेकया ग्राह्यो ' । बोलिला लवलाह्यां श्रीकृष्ण ॥३०९॥

भा. २. २९३-३०९

## १२८. उत्तम भक्ताचीं लक्षणें

इंद्रियें विषयांतें सेविती । परी सुखदुःख नुमटे चित्तीं ।
विषय मिथ्यात्वें देखती । ते जाण निश्चितीं उत्तम भक्त ॥६५६॥
मृगजळीं जेणें केलें स्नान । तो नाहतां कोरडाचि जाण ।
तेवीं भोगीं ज्यांसी अभोक्तेपण । ते भक्त पूर्ण उत्तमोत्तम ॥६५७॥
स्वप्नींचें केलें रायभोगें । जागा होऊनि खावों मागे ।
तेणें हातु माखे ना तोंडीं लागे । तेवीं विषयसंगें हरिभक्त ॥६५९

क्षुधा लागलिया दारुण । अन्नआकांक्षे पीडे प्राण ।
भक्तां क्षुधेची नव्हे आठवण। ऐसें अगाध स्मरण हरीचें ।।६६५।
भावें करितां भगवद्भक्ती । क्षुधेतृषेची नव्हे स्फूर्ती ।
एवढी पावले अगाध प्रीती। ते भवभयें निश्चितीं डंडाळती ना ॥
मनामाजीं भवभयभरणी । तें मन रातलें हरिचरणीं ।
आतां भयातें तेथ कोण मानी । मन मनपणीं असेना ।।६६७।।
देहबुद्धीमाजीं जाणा । नानापरी उठती तृष्णा ।
ते बुद्धी निश्चयें हरीच्या स्मरणा। करितां परिपूर्णा विनटली स्वयें
दृष्टीनें घेऊं जातां दर्शन । दृश्यमात्रीं प्रगटे नारायण ।
श्रवणीं शब्द घेतां जाण । शब्दार्थीं पूर्ण विराजे वस्तु ।।६७३।।
घ्राणीं घेतां नाना वासु । वासबोधें प्रगटे परेशु ।
रसना सेवी जो जो रसु । रसीं ब्रह्मरसु निजस्वादें प्रगटे ।।६७४
यालागीं देहींची अहंता । कदा नुपजे भगवद्भक्तां ।
ते भक्तपूर्णतेची कथा । ऐक नृपनाथा सांगेन ।। ६८० ।।
देह धरिला पंचाननें । भक्त न डंडळी जीवें प्राणें।
वंध्यापुत्र सुळीं देणें । देहाचें मरणें तेवि देखे ।। ६८१ ।।
छाया पालखीं बैसावी । ऐसें कोणी चिंतीना जीवीं ।
तैशी देहासी पदवी यावी । हा नुठी स्वभावें लोभ भक्तां ।।६८२
देहासी आलिया नाना विपत्ती । भक्तां खेदु नुमटे चित्तीं ।
जेवीं आकाश शस्त्रघातीं । न ये काकुळती तैसे ते ।। ६८३ ।।
सायंप्रातः सूर्य प्रकाशे । अभ्रीं गंधर्वनगर आभासे ।
देहप्रतिपाळीं अदृष्ट तैसें । म्यां केलें ऐसें स्फुरेना ।।६८५।।
भक्तदेहासी येतां मरण । हेतुरहित हरीचें स्मरण ।
यालागीं देह निमाल्या आपण । न मरतां पूर्ण पूर्णत्वें उरे ।।

थिल्लरा समूळ नाशु जाला । तरी रवि न म्हणे तो निमाला ।
तेवि देही गेलिया भक्त उरला । सद्रूपें संचला हरिस्मरणें ॥
हृदयीं चिंतितां आत्माराम । तद्रूप जाहला हृदयींचा काम ।
त्यासी सर्व कर्मी पुरुषोत्तम । देव देवोत्तम तुष्टोनि प्रगटे ॥६९२॥
ग्रासोग्रासीं रामस्मरण । तें अन्नचि होय पूर्णब्रह्म ।
भक्त भोगी मुक्तपण । या रीतीं जाण विदेहा ॥६९६॥
ऐसा जो निष्कामनिष्ठु । तोचि भागवतांमाजीं श्रेष्ठु ।
त्यासीच प्रधानत्वें पाट्ठु । जाण तो वरिष्ठु उत्तमत्वें ॥६९७॥
निरहंकाराचीं लक्षणें । तो जन्मोनि मी जन्मलों न म्हणे ।
सुवर्णाचीं केलीं शुनें । तरी सोनें श्वान हों नेणें तदाकारें असतां७०३
तेवि जन्मादि अहंभावो । उत्तम भक्ता नाहीं पहा हो ।
कर्मक्रियेचा निर्वाहो । अहंकर्ता स्वयमेवो मानीना ॥७०४॥
तो कर्म करी परी न म्हणे मी कर्ता । जेवि गगनीं असोनि सविता
अग्नि उपजवी सूर्यकांता । तेवि करोनि अकर्ता निजात्मदृष्टीं ॥७०५
सूर्यें सूर्यकांतीं अग्निसंग । तेणें होतु याग कां दाघ ।
तें बाधूं न शके सूर्याचें अंग । तेवि हा चांग करूनि अकर्ता ॥
अचेतन लोहचुंबकें चळे । लोहकर्में चुंबक न मैळे ।
तेवि हा कर्में करूनि सकळें । अनहंकृतिबळें अकर्ता ॥७०७॥
जरी जाहला उत्तम वर्ण । तरी तो म्हणे मी ब्राह्मण ।
स्फटिक कुंकुमें दिसे रक्तवर्ण । मी लोही वा पूर्ण स्फटिक न म्हणे
ज्यासी नाहीं देहाभिमान । तो हातीं न धरी देहाचा वर्ण ।
तैसाचि आश्रमाचा अभिमान । भक्त सज्ञान न धरी कदा॥७११॥
अंगीं बाणला तो संन्यासु । परी तो न म्हणे मी परमहंसु ।
जेवि नटाअंगीं राजविलासु । तो राजउल्हासु नट न मानी ॥७१२॥

तेवि जन्म कर्म वर्णाश्रम जाती । पूर्ण भक्त हातीं न धरिती ।
चहूं देहांची अहंकृती । स्वप्नींही न धरिती हरिभक्त ॥७१५॥
तरी काय वर्णाश्रम जाती । भक्त निःशेष सांडिती ।
त्यांत असोनि नाहीं अहंकृती । ते हे उपपत्ती बोलिलों ॥ ७१६ ॥

भा. २. ६५६–७१६.

## १२९. भक्त राहतात तो देश पावन.

जेथ लागले श्रीरामचरण । पावन देश दंडकारण्य ।
मथुरा गोकुळ वृंदावन । परम पावन ब्रह्मगिरी ॥२४४॥
असो हे पवित्रतेचें महिमान । पावना पावन आहे आन ।
जेथें वसले भक्त सज्जन । तो देश पावन सर्वार्थी ॥२५१॥
जे गांवीं वसती माझे भक्त । तत्संगें तो गांव पुनीत ।
जे देशीं वसले साधुसन्त । तो देश पुनीत त्यांचेनी ॥५२॥
भक्तांचा वारा लागे जिकडे । अतिपवित्रता होय तिकडे ।
ते सत्संगती ज्यासी घडे । पवित्रता जोडे तयांसी ॥५३॥
माझें स्वरूपीं ज्यांचें चित्त । अखंड जडलें भजनयुक्त ।
त्यांसीच बोलिजे मद्‍भक्त । तेचि संत सज्जन ॥५७॥
तोंड करूनि वांकुडे । वांकुली दावावी देवाकडे ।
वर्णावे देवाचे पवाडे । रंगापुढें गर्जत ॥२६५॥
पाहातां निजात्मदृष्टीवरी । मी सर्व भूतांच्या अंतरीं ।
अंतरींच हा निर्धार धरी । तंव भूतांबाहेरीं मज देखे ॥२७६॥
जंव अंधारासी सबळ राती । तंवाचि प्रतिष्ठा दीपस्थिति ।
तेथें उगवल्या गभस्ती । दीपाची दीप्ती असताचि नाहीं ॥२८९॥
तेवि जंववरी दृढ अज्ञान । तंवचि वेदाज्ञा प्रमाण ।
ज्यासी माझें अभेदभजन । तयासी वेद आपण स्वयें वंदी ॥२९०॥

अभेद भक्तीचें महिमान । तिच्या पायां लागे आत्मज्ञान ।
तेथें वंद्य निंद्य समसमान । विषयींही जाण विकारेना ॥९३॥
सुवर्णविष्णु सुवर्णश्वान । एक पूज्य एक हीन ।
विकूं जातां मोल समान । निंद्य वंद्य जाण आत्मत्वीं तैसें ॥९६॥
वृक्षासी जो प्रतिपाळी । कां जो घाव घाली मूळीं ।
दोघांही समान पुष्पींफळीं । तेवि आत्ममेळीं पातक्यां घाली ॥२०७॥

भा. २९. २४४-३०७

## १३०. भक्त देवाचा प्राण.

बहुत बोलीं काय कारण । मी देहो तो आत्मा जाण ।
तो माझा जीवप्राण । हे जाणती खूण निजभक्त ॥२९५॥
नांदतां सहजभक्तिआंत । मी देवो तो माझा भक्त ।
येरवीं मी सगळा त्याआंत । तो समस्त मजमाजीं ॥२९६॥
निजभक्त मजभीतरीं । मी तया आंतबाहेरीं ।
ऐसें सामरस्यें नांदों भारी । वेगळे बाहेरीं नाममात्रें ॥२९७॥
माझिया सायुज्या जे आले । ते मीचि होऊनियां ठेले ।
परी मी होऊनि मज भजले । ते भक्त मानिले म्यां ऐसे ॥२९८॥
सायुज्यापरीस भक्ति गोड । याचि निरूपणाचें कोड ।
उद्धवा तुझी जाणोनि चाड । विशद निवाड सांगीतला ॥२९९॥
भक्तिप्राधान्य भागवतशास्त्र । तें निजभक्तीचें निजसार ।
तुज मीं सांगीतलें साचार । अत्यादरपूर्वक ॥३०१॥
उद्धवा तुझे प्रीतीचेनि व्याजें । मज गुह्याचें निजगुह्य हें जें ।
तें भक्तीचें करूनियां खाजें । तुज म्यां वोजें दीधलें ॥३०२॥

भा. १९. २९५-३०२.

### १३१. भक्ताचें नाम घेतां। तुटती बंधनव्यथा

सांडूनि भगवंताचें कीर्तन। केल्या भक्ताचें नामस्मरण।
केवि तुटेल भवबंधन। ऐसें न म्हणा सर्वथा ॥ ४७८ ॥
देवासी पूर्वी नामचि नाहीं। त्यासी भक्ति प्रतिष्ठूनि पाहीं।
नामरूपादि सर्वेही। नानाविलास अर्पिले ॥ ४७९ ॥
ऐसा भक्तीं देव थोर केला। आणूनि वैकुंठीं बैसविला।
भक्तउपकारें दाटला। मग त्याच्या बोलामाजीं वर्ते ॥ ४८० ॥
देवो भक्तवचनें करी। झाला नर ना केसरी।
प्रगटला खांबामाझारीं। शब्द करी भक्ताचा ॥ ४८१ ॥
आतांही प्रत्यक्ष प्रमाण। दासांचेनि वचनें जाण।
पाषाणप्रतिमे देवो आपण। आनंदघन प्रगटे पैं ॥ ४८२ ॥
भक्त भावें आभारला। देवो उपकारें दाटला।
यालागीं नुलंघवे बोला। पांगें पांगला भक्तांच्या ॥ ४८३ ॥
एवं जेथ भक्तांचें नाम घेणें। तेथ अवश्य देवें धांवणें।
भक्तउपकारा उत्तीर्ण होणें। वेगें पावणें यालागीं ॥४८४॥
यालागीं भक्तांचें नाम घेतां। तुटती भवबंधनव्यथा।
ऐसें सांगतां अवधूता। प्रेम सर्वथा न संडे ॥ ४८५ ॥

भा. ७. ४७८–४८५.

### १३२. "मी सर्वांभूतीं देवाधिदेवो"

उद्धवा जे मूर्ति ज्या पढियंती। तेचि त्यासी पूज्य मूर्ति।
तुवांही अणुमात्र चित्तीं। संदेह ये अर्थी न धरावा ॥३६४॥
विष्णु विरिंचि सविता जाण। शिव शक्ति कां गजवदन।
या मूर्तीमाजीं मी आपण। सर्वी समान सर्वात्मा ॥ ३६५ ॥

सर्व प्रतिमांचें पूजन । करितां मज पूजा समान ।
भक्तांची जेथ प्रीति गहन । तियेअधीन मी परमात्मा ॥३६६॥
जेवि बाळकाचेनि मेळें । माता तदनुकूल खेळे ।
तेवि भक्तप्रेमाचिये लीळें । म्यां चित्कल्लोळें क्रीडिजे ॥३६७॥
या सर्व भूतांच्या ठायीं । आणि अवतारादि लीलादेहीं ।
मी सर्वांसी समान पाहीं । ये अर्थी नाहीं संदेहो ॥३६८॥
उद्धवा मी नाहीं ऐसें । कोणीही ठिकाण रितें न दिसे ।
परी प्राण्यांचें भाग्य कैसें । त्या मज विश्वासें न भजती ॥३६९॥
जो जेथ मज भजों बैसे । त्या मी तेथ तैसाचि असें ।
हें उपासनाकांडविशेषें । गुप्त अनायासें प्रकाशिलें ॥ ३७० ॥
उपासनाकांडींचा निर्वाहो । मी सर्वांभूतीं देवाधिदेवो ।
हा ज्यासी न कळे मुख्य भावो । त्यासी मूर्तिनिर्वाहो द्योतिला ॥
हो कां माझी प्रतिमामूर्ति । तेही मी चिदात्मा निश्चितीं ।
तेथ करितां भावें भक्ती । भक्त उद्धरती उद्धवा ॥ ३७२ ॥

भा. २७. ३६४–३७२.

## १३३. वायुलोकापासून कैलासापर्यंतच्या लोकांचें वर्णन.

वायूपासूनि चक्राकारीं । रविचंद्र तारा लोक कुसरी ।
खेवणोनियां तयावरी । काळ सूत्रधारी भवंडीत ॥१८९॥
त्या काळाहीवरी माझी सत्ता । माझेनि भेणें काळु तत्वता ।
क्षणलवनिमिषावस्था । अधिक न्यूनता होवों नेदी ॥१९०॥
इतुक्यासाठीं ते दिवशीं । जीवें जित्या चंद्रासी ।
नष्टत्व स्थापिती ज्योतिषी । ते या लोकांसी सत्य माने ॥१३॥

रवि चंद्र एकासनीं । सर्वथा नव्हती गमनीं ।
लक्षांतरें वसती दोन्ही । मंडळसमानीं मासांतीं गती ॥९४॥
रविआड गाति ज्या ग्रहासी । त्याचा अस्त सांगे ज्योतिषी ।
सत्य माने या लोकांसी । तो ग्रहो दृष्टीसी दिसेना ॥९५॥
दृष्टिसृष्टीचा जो न्यावो । तो ज्योतिषशास्त्रीं पहा हो ।
न दिसे त्याचा अस्तभावो । दिसे तो पहा हो पूजिती ॥९६॥
अभ्राआड ग्रहण झालें । देखिलें तेथें पर्व फावलें ।
न दिसे ते देशीं नाहींच झालें । येणेंही बोलें वर्तती ॥९७॥
रविचंद्राहूनि आरतीं । राहूकेतूंची असे वसती ।
ते जैं मंडळाआड येती । तैं ग्रासिलें म्हणती रविचंद्रा ॥९८॥
राहु सूर्या गिळितां साचे । तैं तोंड जळतें राहूचें ।
मंडळीं मंडळा आड ये त्याचें । हें सर्व ग्रासाचें संमत ॥१९९॥

भा. २४. १८९–१९९

सूर्य सर्वग्रासाचिया गोठी । जगीं एक बोंब उठी ।
शेखीं रविराहूसी नाहीं भेटी । स्पर्शही शेवटीं असेना ॥२०१॥
ग्रहचक्र वेगें चळतां पाहीं । रविचंद्रादिकां चालणें नाहीं ।
ते निश्चळ निजराज्याच्या ठायीं । न चालतां पाहीं चालती ॥२॥
रविलोकाहूनि वरी । चंद्रलोक लक्षांतरीं ।
चंद्रलोकाहूनि दूरी । लक्षांतरीं तारालोक ॥ ३ ॥
तारालोकाहूनि वरी । बुधलोक दो लक्षांतरीं ।
बुधलोकाहूनि वरी । दो लक्षांतरीं शुक्रलोक ॥ ४ ॥
मिळोनिया दैत्यगण । ज्याच्या चरणा येती शरण ।
नित्य घालिती लोटांगण । तो शुक्राचार्य जाण दैत्यगुरु ॥५॥

शुक्रलोकाहूनि दो लक्षांतरीं । भौमलोक वसे अंबरीं ।
भौमलोकाहूनि दो लक्षांतरीं । देवगुरु करी निजवासु ॥६॥
ज्याचे चरण वंदिती देख । इंद्र चंद्र वरुणादि अर्क ।
नित्य येती आवश्यक । तो बृहस्पतीलोक गुरूचा ॥७॥
त्याहीवरी लक्षीं दोनीं । सूर्यसुत वसे शनि ।
लक्षांतरें तेथुनी । सप्तऋषी जनीं निवासु ॥८॥
सप्तऋषींची ऋषिपंक्ती । तेथेंचि वसे अरुंधती ।
यावरी वसे अमरावती । इंद्रसंपत्तीसमवेत ॥२०९॥

भा. २४. २०१–२०९

आतां त्रैलोक्याबाहेरी । एक लक्ष योजनांवरी ।
भक्त कृपाळू श्रीहरी । ध्रुवमंडळ करी कृपेनें ॥ २१४ ॥
त्रिलोकीं होता प्रलयकाळ । ध्रुवासी कदा नव्हे चळ ।
तो सर्वदा अचळ । यालागीं अढळ ध्रुवपद ॥ १५ ॥
तेथ मूर्तिमंत चारी वेद । मूर्तिमंत धर्म प्रसिद्ध ।
मूर्तिमंत ब्रह्मचर्य शुद्ध । तपही विशद मूर्तिमंत ॥ २२० ॥
गायत्री मूर्तिमंत तेथ । वाचा मूर्तिमंत वर्तत ।
दया मूर्तिमंत नांदत । या मूर्तिमंत ब्रह्मसदनीं ॥ २१ ॥
होतां ब्रह्मांडा घडामोडी । वैकुंठ कैलास न लगे वोढी ।
तेथील वस्तीची अभिनव गोडी । हरिहरभक्त फुडी जाणती ॥
तेथ नाहीं काळाचें गमन । नाहीं कर्माचें कर्मबंधन ।
तेथ नाहीं जन्ममरण । हें भक्त अनन्य पावती ॥ २३१ ॥
वैकुंठकैलासरचना । सांगतां मन मुके मनपणा ।
ते लोकींची लोकलक्षणा । ऐक विचक्षणा सांगेन ॥ ३२ ॥

चरणींची गंगा अति पुनीत । जे जगातें पवित्र करित ।
ते माथां वाहे उमाकांत । निजस्वार्थ देखोनि ॥ २५४ ॥

भा. २४. २१४–२५४

## १३४. देवाची भक्तावर अनन्यप्रीति.

ऋद्धिसिद्धी त्याच्या घरीं । होऊनि राहती कामारी ।
तरी तो सिद्धीची चाड न धरी । माझे भक्तीवरी निश्चयो ॥३५०॥
ऐशी देखोनि निश्चयें भक्ती । मीही करी अनन्य प्रीति ।
भक्त जेउती वास पाहती । तेउता मी श्रीपति स्वयें प्रकटे॥५१॥
भक्त स्वभावें बोलों जाये । त्याचें बोलणें मीचि होयें ।
त्याचें बोलण्या सबाह्यें । मीचि राहें शब्दार्थें ॥ ५२ ॥
तो कौतुकें खेळे खडे । ते खडोचि मज होणें घडे ।
तो कृपाळू आहे जयाकडे । त्याचे छेदीं मी गाढे भवबंध ॥५३॥
तो वास पाहे जेणें मोहरीं । तेउती मी सुखाची दृष्टि करीं ।
तो म्हणे जयातें उद्धरीं । तो मी स्वपदावरी बैसवीं ॥ ५४ ॥
त्यासी अल्पही विचंबु पावे । तो सर्वांगें मी करूं धांवे ।
त्याचें नाम जिहीं स्मरावें । त्यांसी म्यां तारावें सर्वथा ॥३५५॥

भा. २४. ३५०–३५५

## १३५. देव भक्तांचा कैवारी.

यालागीं शरणागतां शरण्य । सत्य जाण हरीचे चरण ।
यापरतें निर्भय स्थान । नाहीं आन निजभक्तां ॥ ३७४॥
भक्तांची अणुमात्र व्यथा । क्षण एक न साहवे भगवंता ।
प्रल्हादाची अति दुःखता । होय निवारितां निजांगें ॥७५॥

दावाग्नि गिळूनि अंतरीं । गोपाळ राखिले वनांतरीं ।
पांडव जळतां जोहरीं । काढिले बाहेरीं विवरद्वारें ॥७६॥
करूनि सर्वांगाचा वोढा । नित्य निवारी भक्तांची पीडा ।
जो कां भक्तांचिया भिडा । रणरंगीं पुढां वागवी रथु ॥७७॥
ते चरण वंदितां साष्टांगीं । भक्तां प्रतिपाळी उत्संगीं ।
ऐसा प्रणतपाळु कृपावोघीं । दुसरा जगीं असेना ॥७८॥
तरावया भवाब्धि प्रबळ । चरणांची नाव अडंडळ ।
अनन्य शरण सकळ । तारी तत्काळ चरणानुरागें ॥३७९॥

भा. ५. ३७४–३७९

मी शुद्ध बुद्ध मुक्त स्वभाव । त्या मज नानात्वें ठेविती नांव ।
उद्धवा ज्यासी जैसा भाव । तैसा मी देवो तयासी ॥६९७॥
नास्तिक्य नसे ज्याचे ठायीं । त्यासी मी सर्वथा कोठें नाहीं ।
आस्तिक्यवंतालागीं पाहीं । मीं सर्वांठायीं तिष्ठतू ॥६९८॥
भावार्थें ज्या मज जेथें पाहे । त्यासी मी तेव्हांचि तेथें आहे ।
मज पावावया उपायें । बहुत पाहे न लगती ॥६९९॥
मी सर्वात्मा सर्वगत एकु । ऐसा जयाचा भाव निष्टंकु ।
तोचि पढियंता मज एकु । ज्ञानतिलकु तो माझा ॥७००॥
तो आत्मा मी त्याचें देह । मी ध्याता तो माझें ध्येय ॥
मी ज्ञाता तो शुद्ध ज्ञेय । ऐसा पढिये तो आम्हां ॥७०१॥
उद्धवा हे एकात्मताभक्ति । सज्ञान ज्ञाते येणें भजती ।
तयां मज अभेदप्रीति । तुवांही या रीतीं भजावें ॥७०२॥
परमात्मा एक नित्य शुद्ध । त्यासी मायामय संसारबंध ।
मिथ्या जाण देहसंबंध । हा निजात्मबोध पैं माझा ॥७०३॥

हा मिथ्यासंबंध पडे जीवासी । आत्मज्ञानें मुक्ति त्यासी ।
हें मागें बोलिलों तुजपाशीं । तेंचि मत निरासीं दृढ केलें ॥७०४॥

भा. १०. ६९७–७०४

१३६. माझ्या भक्ताचे सर्वही व्यापार मदाकार होतात.

भक्त कल्पनेचिया भ्रांती । माझी भक्ति चतुर्धा मानिती ।
ते मिथ्या गा वदंती । माझी निजभक्ति एकली ॥२८१॥
माझिये निजभक्तीचें सार । भक्त पावले जें साचार ।
त्यांचे सर्वही व्यापार । मदाकार होऊनि ठाकती ॥२८३॥
तो जेउती वास पाहे । ते दिशाचि मी होऊनि ठायें ।
ते जेउतें चालती पाये । ते धरा मी होयें धराधर ॥२८४॥
तो करूं बैसल्या भोजन । षड्रस होय मी आपण ।
त्यासी करावया प्राशन । निजजीवन मी होयें ॥२८५॥
त्याचा बैसता अवकाश । अंगें मी होय हृषीकेश ।
तो निजावया सावकाश । समाधि मी त्यास आंथुरीं ॥२८८॥
तो जें कांहीं बोल बोले । तें निःशब्द ब्रह्म शब्दा आलें ।
यालागीं श्रोत्यांसी वहिलें । होय भलें समाधान ॥२८९॥
तो अवलीला बोले वोठीं । शब्दासवें माझी गोठी उठी ।
श्रोत्यांची तेथ पडे मिठी । स्वभावें गोठी ऐकतां ॥२९०॥
चढतां परेचे उपरी । वैकुंठ कैलास पायरी ।
उन्मनी घालोनि बाहेरीं । सुखशेजारीं तो पहुडे ॥२९१॥
अवचटे ये त्याच्या मुखासी । म्हणे ज्यासी तूं उद्धरिलासी ।
तो माथां वाहें मी हृषीकेशी । शब्दें निजधामासी पाठवीं वेगीं॥२९२

जे पावले माझी सहजभक्ति । त्यांचे लळे पाळीं मी या रीतीं ।
त्यांची मज अनन्यप्रीति । सांगों किती उद्धवा ॥२९४॥

भा. १९. २८१–२९४

## १३७. मी भोळ्या भक्तांचें सर्वस्व आहें.

तेवि माझिया भोळ्या भक्तां । मीचि जाण जिवलग माता ।
अर्थ स्वार्थ परमार्थता । जाण तत्त्वता मी त्यांसी ॥ ११५९ ॥
बाळक न मागतां धांवोनी । कळवळोनि माता लावी स्तनीं ।
तेवि भोळ्या भक्तांलागुनी । मी अनुसंधानीं लाविता ॥ ६१ ॥
कर्माकर्म प्रत्यवायता । हे सज्ञानासीच सर्वथा ।
भोळ्या भक्तांसी कर्मबाधकता । मी सर्वथा येऊं नेदी ॥६५॥
भोजनीं बैसतां बापासी । दूरी बैसवी ज्येष्ठ पुत्रासी ।
अंकीं वाऊनि बाळकासी । तृप्ती निजग्रासीं देतुसे ॥ ६६ ॥
वाट चुकल्या भुयाळासी । फेरा पडे चालों जाणत्यासी ।
बाळक बापाचे कडियेसी । श्रमु तयासी येवों न शके ॥११६९॥

भा. ११. ११५९–११६९

## १३८. "देव निजभक्ताच्या पांगें भुलला असे"

ते जें जें मागती कौतुकें । तो देवोचि होय तितुकें ।
त्याचेनि परम संतोषें । देव सुखावे सुखें दोंदिल होये ॥७२२॥
त्यासी झणीं कोणाची दृष्टि लागे । यालागीं देवो त्या पुढें मागें ।
त्या सभोंवतां सर्वांगें । भक्तीच्या पांगें भुलला असे ॥७२४॥
निराभिमानाचेनि नांवें । देव निजांगें करी आघवें ।
जेवि कां तान्हयाचेनि जीवें । जीवेंभावें निजजननी ॥७२५॥

एवं राखतां निजभक्तासी । तरी देव धाके निजमानसीं ।
हा जरी आला निजऐक्यासी । तरी हे प्रीति कोणासी मग करावी ॥
कोणासी पाहों कृपादृष्टि । कोणापें सांगों निजगोष्टी ।
कोणासी क्षेम देवों मिठीं । ऐशी आवडी मोठी प्रेमाची ॥७२७॥
या काकुळती श्रीअनंतु । ऐक्यभावें करी निजभक्तु ।
मग देवो भक्त दोहींआंतु । देवचि नांदतु स्वानंदें ॥७२८॥
एवं आपुली आपण भक्ती । करीतसे अनन्य प्रीती ।
हेंचि निरूपण वेदान्तीं । अद्वैतभक्ति या नांव ॥ ७२९ ॥
ऐसें खेवाचें मिस करी । तेणें भक्त आणी आपणांभीतरीं ।
मग आपण त्या आंतबाहेरीं । अति प्रीतीवरी कोंदाटे ॥७३१॥
नवल आवडीचा निर्वाहो । झणीं यासी लागे काळाचा घावो ।
यालागीं निजभक्तांचा देहो । देवाधिदेवो स्वयें होये ॥७३२॥

भा. २. ७२२–७३२

## १३९. देव भक्ताच्या आधीन आहे.

एवढा विश्वासी ज्याच्या भावो । न धरी भक्तीवेगळा उपावो ।
आम्हां त्याचेनि जीवें जीवो । तो आत्मा पहा हो पैं माझा ॥२६७॥
जो मी ज्ञानियांचा आत्मा । भक्तांचा प्रिय परमात्मा ।
शास्त्रीं प्रतिपादिती पुरुषोत्तमा। तो मी साउमा त्या धांवें ॥२६८॥
मज आवडे अनन्य भक्ति । मी त्यांचा अंकित निश्चितीं ।
त्यांचेनि माझी त्रैलोक्यीं ख्याती । मज महंती त्यांचेनी ॥२६९॥
त्यांचेनि मज खाणें जेवणें । त्यांचेनि मज लेणें नेसणें ।
त्यांचेनि जीवें प्राणें । म्यां वर्तणें सर्वत्र ॥ २७० ॥

ए. व. १०

माझें गांठीं कांहीं नाहीं । भक्तीं सर्वस्वें वेंचूनि पाहीं ।
नाना उपचारउपायीं । महत्त्व तिहीं मज दिधलें ॥२७१॥
मज अचक्षूसी दिधले डोळे । अश्रोत्रा श्रवण दिधले ।
मज अमुखा तिहीं मुख केलें । त्यांचेनि बोलें मी बोलका ॥२७२॥
मज त्यांचेनि गमनागमन । त्यांचेनि अवयव अळंकरण ॥
त्यांचेनि मज नेमस्त स्थान । मज समर्थपण त्यांचेनि ॥२७३॥
मज नामरूप तिहीं करणें । मज पवित्रता त्यांचेनि गुणें ।
मज वैकुंठींचें ठाणें । भक्तीं अचळपणें दीधलें ॥२७४॥
हेंही नाहीं म्यां दिधलें । भजनबळें तिहीं नेलें ।
त्यासीं माझें कांहीं न चले । सर्वस्व लुटिलें निजभक्तीं ॥२८५॥
एवं माझ्या निजपदाची सत्ता । जरी आली भक्तांच्या हाता ।
तरी स्वामित्व ठेवूनि माझे माथां । माझे भक्तिपंथा विनटले ॥२८७

भा. १४. २६७–२८७

१४०. भक्तांची पूजा म्हणजे माझी पूजा होय.

मागां सांडूनि माझी पूजा । जेणें मद्भक्त पूजिले वोजा ।
तेणें मज पूजिलें अधोक्षजा । परिवारसमाजासमवेत ॥३६॥
प्रतिमा माझ्या अचेतन व्यक्ति । भक्त माझ्या सचेतन मूर्ती ।
त्यांसी पूजिल्या मी श्रीपती । यथानिगुतीं संतोषें ॥३७॥
जैसा मद्भाव मद्भक्ति । तोचि भावो सर्वां भूतीं ।
नानाकार भूताकृती । परी आत्मस्थिति अविकार ॥३८॥
दिसे देहाकृती मुंडली । तीतें म्हणती हे रांड जाली ।
परी आत्म्याची रांड नाहीं जाहली । असे संचली आत्मास्थिती ॥३९॥
दीर्घ वक्र आणि वर्तुळ । दिसती भिन्न भिन्न इंगळ ।
परी अग्नि एकचि केवळ । तेंवीं भूतें सकळ मद्रूपें ॥४०॥

मनासी आवडे जें जें कांहीं । तें तें अर्पी मजाचि पाहीं ।
शेखीं आपुलें मन तेंही । माझ्या ठायीं समर्पी ॥४९॥

माझें स्वरूपाचे ठायीं जाण। केवि घडे मनाचें अर्पण ।
तेंचि विषयीं निरूपण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥२५०॥

छत्र चामर हस्ती घोडे । त्यागूनि होतां गा उघडे ।
ऐसें वैराग्य धडफुडें । मज रोकडें पावावया ॥५३॥

माझें पावावया निजसुख । द्रव्य दारा पुत्रादिक ।
त्यागूनि सांडिती निःशेख । यापरी देख अनुतापी ॥५४॥

आवडीं करितां माझें भजन । विसरे भोगांची आठवण ।
माझे प्राप्तीलागीं जाण । रिता क्षण जावों नेदी ॥५५॥

हृदयीं मी स्वतःसिद्ध जाण । त्या माझें करूनि आवाहन ।
आपण करी जें भोजन । तेंही मदर्पण तो करी ॥५९॥

कवळकवळीं हरिस्मरण । तें अन्नचि होय ब्रह्म पूर्ण ।
यापरी माझे भक्त जाण । कर्म मदर्पण स्वयें करिती ॥२६०॥

ऐशीं सर्व कर्में कृष्णार्पण । सर्वदा जो करी जाण ।
त्याचें मन होय मदर्पण । तेंचि निरूपण देवो सांगे ॥६१॥

सर्व कर्में मदर्पण । करितां शुद्ध होय मन ।
जेवि लोह कमावितां जाण । होय दर्पण सोज्वळ ॥२६२॥

भा. १९, २३६–२६२

## १४१. भक्त देवापेक्षां श्रेष्ठ.

कल्पांतीचेनि कडकडाटें । जैं धाकें धाकें विराट आटे ।
ऐसीं वोढवल्या अचाटें । मजवेगळें नेटें न ढळती ॥१५५८॥

तुटोनि पडतां आकाश । आणिकाची ते न पाहती वास ।
यालागीं मी हृषीकेश । त्यांचा दास झालों असें ॥५९॥
नवल भावार्थाचा महिमा । मज विश्वात्म्याचे झाले ते आत्मा ।
ऐसें लाहाणें तयां आम्हां । मज पुरुषोत्तमा वश केलें ॥१५६०॥
संतांसीं मज भिन्नपण । कल्पांतींही नाहीं जाण ।
हे जिव्हारींची ऊणखूण । तुज संपूर्ण सांगीतली ॥६१॥
संत माझे झाले माझ्या भक्तीं । येर लोक मज न भजती ।
ते म्यां दिधले काळाच्या हातीं । अदृष्टगतीं बांधोनी ॥६२॥
माझिया संतापाशीं । यावया प्राप्ती नाहीं काळासी ।
मी सदा संरक्षिता त्यांसी । तें कळिकाळासी नागवती ॥१५६३॥

भा. ११. १५५८–१५६३

हृदयीं हृदय एक जाहलें । ये हृदयींचें तें हृदयीं घातिलें ।
कृष्णें सर्वस्व जें आपुलें । तें हृदयीं सूदलें उद्धवाचें ॥३०६॥
देव अवाप्तकाम निचाड । त्यासीही भक्तीची ऐसी चाड ।
अतिशयें उद्धवा लागली गोड । स्वानंदें कोड पुरवी त्याचें ॥७॥
उद्धव प्रेमाचा लवलाहो । आलिंगन सोडूं विसरे देवो ।
कृष्णहृदया हृदय जडल्या पहा हो । उद्धवा उद्धवो विसरला ॥८॥
ऐसें स्वानंदीं वाडाकोडा । दोघेही मिसळले निचाड चाडा ।
भक्तिसुखाच्या सुरवाडा । उद्धव गाढला मीनला ॥९॥
कृष्णें सर्वस्व आपुलें । उद्धवाचें हृदयीं सूदलें ।
हें उद्धवा कळों नाहीं दीधलें । लाघव केलें गोविंदें ॥३१० ॥
उद्धवा मज वाडेंकोडें । अखंड हेंचि बोलों आवडे ।
परी तैसा श्रोता न जोडे । हें थोर सांकडें मजलागीं ॥१२॥

भक्तिसुखाचा सुरवाड । सांगतां माझें पुरें कोड ।
ऐसा श्रोता कैसा गोड । यालागीं उद्धवाआड प्रेम सूये ॥१३॥
सूर्यापासूनि फांकती किरण । तैसें सुटलें आलिंगन ।
कृष्ण उद्धव जाहले भिन्न । परी अभिन्नपणा मोडेना ॥३१४॥

भा. १९. ३०६–३१४

## १४२. संतसज्जन आपल्या सहज स्थितींत वर्ततात.

ते पाहती जयांकडे । त्यांचें उगवे भवसांकडें ।
परब्रह्म डोळियांपुढें । निजनिवाडें उल्हासे ॥३९॥
तेथें साधनचतुष्टयसायास । न पाहती शास्त्रचातुर्यविलास ।
एक धरिला पुरे विश्वास । स्वयें प्रकाश ते करिती ॥४०॥
ते जगामाजीं सदा असती । जीवमात्रातें दिसती ।
परी विकल्पेंचि ठकिजती । नाहीं म्हणती नास्तिक्यें ॥४१॥
मातियेचा द्रोण केला । तो कौळिका भावो फळला ।
म्हणोनि विश्वासेंवीण नाडला । जगु ठकला विकल्पें ॥४२॥
ते प्रकृतीसी पर । प्रकृतिरूपीं ते अविकार ।
आकार विकार व्यवहार । त्यांचेनि साचार बाधीना ॥४६॥
ते भोगावरी न विटती । त्यागावरी नुठती ।
आपुलिये सहजास्थिती । स्वयें वर्तती सर्वदा ॥४७॥
ते ज्ञातेपणा न मिरविती । पिसेपण न दाविती ।
स्वरूपफुंजाविस्मृती । गिळूनि वर्तती निजांगें ॥४८॥

भा. १. ३९–४८

## १४३. "संतचरणीं जो विनटला । तो निजप्राप्तीसी पावला ॥"

एवं स्वस्वरूप द्यावयासी । उदारत्व तुजपासीं ।
हें न ये गा आणिकांसी । हृषीकेशी कृपाळुवा ॥१४॥

तो तूं परम उदार ऐसा । राया रंका समभावें सरिसा ।
भावो तेथ भरंवसा । तूं आपैसा आतुडसी ॥१५॥

त्या तुझिया प्राप्तीलागीं । कपाटें सदा सेविती योगी ।
एक ते झाले भोगविरागी । एक ते त्यागी सर्वस्वें ॥१६॥

एक हिंडती दशादिशे । एक तुजलागीं झाले पिसे ।
परी तुझी भेटी स्वप्नींही दिसे । ऐसा न दिसे क्षण एक ॥१७॥

ऐशियाही तुझी प्राप्ती । सुलभ असे एके रीतीं ।
जरी संतचरणीं रंगती । अति प्रीति सप्रेम ॥१८॥

संतचरणीं जो विनटला । तो निजप्राप्तीसी पावला ।
संतस्वरूपें अवतरला । स्वयें संचला परमात्मा ॥१९॥

यालागीं जीं जीं संतांचीं रूपें । तीं तीं श्रीहरीचीं स्वरूपें ।
म्हणौनि संतांचिये कृपे । अति साक्षेपें अर्जावें ॥२०॥

ते ज्ञानार्थाचे परम पिसे । यालागीं ग्रंथाचेनि मिसें ।
त्यांचे चरण अनायासें । सावकाशें वंदीन ॥२१॥

संतकरुणावलोकन । तें मज नेत्रींचें अंजन ।
चरणकृपा पाहतां जाण । श्रीजनार्दन प्रकाशे ॥२२॥

भा. ५. १४–२२

## १४४. मुनिवर भवनदीपार उतरवितात.

मायाजळें भवसागरु । भरला असे अति दुस्तरु ।
त्याचा उतरावया पारु । होय तूं तारूं मुनिराया ॥११॥
याचें सकळ जळ क्षार । माजीं सावजें अनिवार ।
एकएकें चराचर । गिळिलें साचार निजशक्तीं ॥१२॥
लाटांवरी अचाट लाटा । मोहाचिया अति दुर्घटा ।
आदळती अविवेकतटा । धैर्याचिया कांठा पाडित ॥१३॥
अहंकुवावो वाजतां थोरु । अवघाचि खवळे सागरु ।
मी माझेनि गजरें घोरु । अति दुर्धरू गर्जत ॥१४॥
नाना वासनांचा वळसा । पाहें पां भंवताहे कैसा ।
येथ तरावया धिंवसा । नव्हे सहसा सुरनरां ॥१५॥
क्रोधाचें प्रबळ भरतें । भरी द्वेषाचिया तरियांतें ।
असूयातिरस्कारांचीं तेथें । चिडाणी उते अनिवार ॥१६॥
कामपर्वताचीं शिखरें । विषमें भासतीं अपारें ।
आशेइच्छेचीं वरी थोरें । झाडें विषयांकुरें वाढलीं ॥१७॥
संकल्पविकल्पांचे मीन । निंदेच्या सुसरी दारुण ।
ब्रह्मद्वेषाचे नक्र पूर्ण । सागरीं जाण तळपती ॥१८॥
एवढाही हा भवसागरु । शोषिता तूं अगस्ती साचारु ।
तुझेनि भवाब्धिपैलपारु । पावोनि हा निर्धारु जाला आम्हां ॥१९॥

भा. २. ११-१९

## १४५. योगी सारग्राहक व निश्चल वृत्तीचे असतात.

भ्रमरु रिघोनि पुष्पामधीं । फूल तरी कुचुंबों नेदी ।
आपुली करी अर्थसिद्धी । चोखट बुद्धि भ्रमराची ॥१२॥

तैसीच योगियांची परी । ग्रासमात्र घरोघरीं ।
भिक्षा करूनि उदर भरी । पीडा न करी गृहस्थां ॥९३॥
प्राणधारणेपुरतें । योगी मागे भिक्षेतें ।
समर्थ दुर्बळ विभागातें । न मनूनि चित्तें सर्वथा ॥९४॥
रिघोनि कमळिणीपाशीं । भ्रमरु लाधला आमोदासी ।
पद्म संकोचे अस्तासीं । तेंचि भ्रमरासीं बंधन ॥९५॥
जो कोरडें काष्ठ भेदोनि जाये । तो कमळदळीं गुंतला ठाये ।
प्रिया दुखवेल म्हणोनि राहे । निर्गमु न पाहे आपुला ॥९६॥
तैसाचि जाण संन्यासी । एके ठायीं राहे लोलुप्यैसीं ।
तेंचि बंधन होये त्यासी । विषयलोभासीं गुंतला ॥९७॥
अति लहान सुमन जें कांहीं । भ्रमरा तेथ उपेक्षा नाहीं ।
रिघोनि त्याच्याही ठायीं । आमोद पाहीं सेवितु ॥९८॥
तैसाचि योगिया नेटकू । शास्त्रदृष्टि अति विवेकू ।
न करी लहान थोर तर्कू । सारग्राहकू होतसे ॥१००॥
सर्वभूतीं भगवद्भावो । हा सारभागु मुख्य पहा हो ।
हे निष्ठा ज्यासी महाबाहो । त्यासी अपावो स्वप्नीं नाहीं ॥१०५॥
भरलेया जगाआंतु । सारभागी तो योगयुक्तु ।
यदूसी अवधूत सांगतु । गुरुवृत्तांतु लक्षण ॥१०६॥

भा. ८. ९२–१०६

यापरी ज्यासी कर्तव्यता । नाहीं नाहीं गा सर्वथा ।
त्याऐसी हे अवस्था । कदा कल्पांता न लभेचि ॥३९२॥
गुरूनें सांगितलें कानीं । स्वरूपावबोध जाला मनीं ।
परी तें न राहेचि निश्चळपणीं । बाह्य दर्शनीं विक्षेपू ॥९३॥

आसनीं बैसल्या स्वरूपस्थितीं । आसन सोडिल्या प्रपंचस्फूर्ती ।
ऐशी एकदेशी स्थिती । नातळती निजयोगी ॥१४॥
देह आसनीं निश्चळ । अथवा कर्मीं हो चंचळ ।
परी वृत्ति सर्वदा निश्चळ । तेचि निर्मळ निजयोगी ॥१५॥
करितां निर्वाणयुद्ध । ज्याची न मोडे समाधी ।
हेंचि साधावया त्रिशुद्धी । चोवीस गुरु विधीं वंदिले म्यां ॥१७॥
देहनिश्चळत्वें वृत्ति निश्चळ । देहचंचळत्वें वृत्ति चंचळ ।
तरी ते देहबुद्धीचि सबळ । नव्हे केवळ निजबोधु ॥१८॥
होतां प्रपंचदर्शन । वृत्तीसी विक्षेप होय जाण ।
तो विक्षेपु करावया छेदन । बहुगुरुसाधन म्यां केलें ॥३१९॥

भा. ९. ३१२–३१९

### १४६. आत्मज्ञ वादविवाद करीत नाहीं.

शुष्कवाद ज्या वृथा गोष्टी । त्यांतही वाग्वाद उठी ।
होय नव्हे कपाळपिटी । मिथ्या चावटी करीना ॥२०९॥
होतां शास्त्रार्थमहावाद । देतां युक्तीचे प्रतिबाध ।
तेथ न करी पक्षपात । जाणे परी शब्द बोलेना ॥२११॥
वाग्वादी बोलतां जाण । दुखवेल पुढिलाचें मन ।
कां क्षोभलें स्वांतःकरण । यालागीं वचन बोलेना ॥१३॥
त्यासी कोण आप्त कोण इतर । कोणासी करावें वैर ।
सर्व भूतीं मीचि साचार । निरंतर निजात्मा ॥२८॥
सहस्र घटीं भरल्या जळ । बिंबे एकचि चंद्रमंडळ ।
तेवि निजात्मा एक केवळ । भूतीं सकळ भूतात्मा ॥२३०॥

आहार न मिळे जिये काळीं । दुःखी नव्हे तिये वेळीं ।
अन्नालागीं न तळमळी । धारणाबळीं बलिष्ठ ॥२३५॥

भा. १८. २०९–२३५

## १४७. साधूंचीं लक्षणें.

प्राप्ताप्राप्त लाभावस्था । बाधूं न शके साधूंच्या चित्ता ।
चित्त रातलें भगवंता । निरपेक्षता या नांव ॥३१७॥
पैल विषयो मज व्हावा । ऐसा आठव नाठवे जीवा ।
हा साधूचा निरपेक्ष ठेवा । जाण उद्धवा गुण पहिला ॥३१८॥
निरपेक्ष व्हावया एथ । जागृतिस्वप्नसुषुप्तीआंत ।
चिन्मात्रीं जडलें चित्त । या नांव मच्चित्त गुण दुजा ॥३२०॥
देह झालिया लक्ष्मीयुक्त । अथवा हो कां आपद्भुक्त ।
चित्त परमानंदीं निश्चित । या नांव मच्चित्त उद्धवा ॥३२१॥
जरी प्राणांत केला अपहार । तरी न म्हणे हा दुष्ट नर ।
अपकाऱ्या करी अति उपकार । प्रशांतिप्रकार या नांव ॥३२३॥
ब्रह्मभावेंचि तत्वता । विश्वासणें सर्व भूतां ।
कदा विकल्प नुपजे चित्ता । हे प्रशांतता गुण तिजा ॥३२५॥
ऐसा हा प्रशांतता गुण । अंगीं बाणावया हेंचि कारण ।
जगीं देखे समदर्शन । ब्रह्म परिपूर्ण समसाम्यें ॥३२६॥
जग पाहतां दिसे विषम । विषमीं देखे सम ब्रह्म ।
तोचि समदर्शी परम । हा गुण निरुपम पैं चौथा ॥३२७॥
धारितां देहाचा अभिमान । ते अहंता वाढवी मीपण ।
मीपणें ममता जाण । वाढे संपूर्ण देहसंबंध्या ॥३२९॥

१५५ ९२८३९ २१.३.१० ९२८ २५५५

ऐसा मीपणें मी परिपूर्ण । तेथ मी म्हणावया म्हणतें कोण ।
निःशेष निमालें मीतूंपण । निरभिमान या नांव ॥३३३॥

भा. २६. ३१७–३३३

## १४८. साधु सर्वांचा सखा व सोयरा.

साधूची मैत्री चोखट । वोळखी सर्वांसी जुनाट ।
सर्वांचा सखा श्रेष्ठ । सर्वांसकट सारिखा ॥१०३५॥
सुहृद सर्वांचा सोयरा । सर्वांचा जिवलगु खरा ।
होऊनि सर्वांही बहिरा । मित्राचारा चालवी ॥१०३६॥
सांगतां आपुली गुह्य गोष्टी । अळोंचावया वेगळा नुठी ।
आत्मभावें देखे सृष्टि । अवंचक पोटीं सर्वांसी ॥१०३७॥
क्षीरनीराची मैत्री जैसी । भेद नाहीं मिळणीपाशीं ।
साधु सर्वजीवसमरसी । अभेदभावेंसीं मित्रत्व ॥१०३८॥
परम मैत्रीचा भावो देख । दुःख हिरोनि द्यावें सुख ।
साधु जीवांचें निरसोनि दुःख । परम सुख देतसे ॥१०३९॥
मनें धनें कर्तव्यता । ज्याची अनन्य अवंचकता ।
त्या नांव परम मित्रता । हे खूण तत्वता जाणावी ॥१०४२॥

भा. ११. १०३५–१०४२

## १४९. अवधूत ब्रह्मानंदांत डुलत राहतो.

कोणी एक अवधूतु । निजतेजें प्रकाशवंतु ।
ब्रह्मानंदें डुलतु । यदूनें येतु देखिला ॥ २५८ ॥
त्या अवधूताचें लक्षण । यदु निरीक्षी आपण ।
देखिलें ब्रह्मसूत्रधारण । होय ब्राह्मण ब्रह्मवेत्ता ॥ ५९ ॥

आंतुला प्राण तत्वता । बाहेर रिघों नेदी सर्वथा ।
स्वभावें प्राणापानसमता । जाली न धरितां धारणा ॥ २६१ ॥
नित्यानित्यहोमद्वारें । ब्रह्माग्नि प्रज्वळला एकसरें ।
जाळूनि आश्रमांचीं चारीं घरें । केलें खरें निराश्रमी ॥ ६६ ॥
त्या आश्रमामाजीं होती । शास्त्रश्रवणविधिवादपोथी ।
ते जळाली जी निश्चितीं । भस्म हातीं न लगेचि ॥ ६७ ॥
विधिनिषेधपैंजा । जळाली पंचायतनदेवपूजा ।
होता संचितक्रियमाणपुंजा । तोही बोजा जळाला ॥ ६८ ॥
यापरी तो अवधूतु । ब्रह्मानंदें जी डुल्लतु ।
निजसुखें वेल्हावतु । देखिला येतु यदुरायें ॥ २६९ ॥

भा. ७. २५८–२६९

## १५०. जीवन्मुक्त हे जडमूक पिशाच्याप्रमाणें वागतात.

परी पूजितां कां गांजितां । त्याची डंडळीना समता ।
जेवि छायेची मानापमानता । न करी व्यथा पुरुषासी ॥४६०॥
देहो व्याघ्रामुखीं सांपडला । दैवें पालखीमाजीं चढला ।
तो हरुषविषादा नाहीं आला । समत्वें झाला निर्द्वंद्व ॥६१॥
देहो घावया नेतां सुळीं । मी मरतों ऐसें न कळवळी ।
कां गजस्कंदीं पूजिला सकळीं । तेणें सुखावली वृत्ति नव्हे ॥६२
देहासी नाना विपत्ति होये । तोही त्या देहाचें कौतुक पाहे ।
देह मी मज व्यथा आहे । हें ठावें नोहे मुक्तासी ॥६५॥
तेथ कोणाची करावी निंदा । कोणाच्या करावे गुणानुवादा ।
मीचि विश्व हें आलें बोधा । स्तुतिनिंदा निमाली ॥४७२॥

त्यासी आत्मसाक्षात्कारीं विश्राम । नित्य निजात्मपदीं आराम ।
साधु असाधु हा फिटला भ्रम । स्वयें आत्माराम तो जाला ॥७३
असाधुत्वें निंदावें ज्यासी । तंव आत्मस्वरूप देखे त्यासीं ।
साधु म्हणौनि वर्णितां गुणासी । देखे त्यासी निजरूपें ॥७४॥
मुक्त मुक्तपणाची पदवी । सर्वथा जगामाजीं लपवी ।
जो आपुली मुक्तता मिरवी । तो लोभस्वभावी दांभिकु ॥ ४८०॥
त्या माझें मुक्तपण । न मानिती याज्ञिक ब्राह्मण ।
इतरांची कथा कोण । विकल्प दारुण लौकिकीं ॥ ८४ ॥
यालागीं मुक्ताचें मुक्तपण । मुक्तचि जाणे आपण ।
इतरांसी न कळे तें लक्षण । अति विचक्षण जऱ्ही जाला ॥८५॥
कायिक वाचिक मानासिक । उद्देशें कर्म न करी एक ।
जें निफजे तें स्वाभाविक । अहेतुक त्या नांव ॥ ८७ ॥
हेतु ठेवूनि गुणागुणीं । स्तुतिनिंदेचीं बोलणीं ।
सांडोनियां जाला मौनी । परी मौनाभिमानीं हेतु नाहीं ॥८८॥
अतद्व्यावृत्तीनें जाण । करावें असंतनिरसन ।
मग सद्वस्तूचें ध्यान । अखंड जाण करावें ॥ ४९० ॥
तंव पावली सद्गुरूची खूण । उडालें ध्येय ध्याता ध्यान ।
बुडालें भेदाचें भेदभान । चैतन्यघन कोंदलें ॥ ४९१ ॥
मेळवूनि शास्त्रसंभारा । बांधला संतासंत बांधारा ।
तो चैतन्याच्या महापुरा-। माजीं खरा विराला ॥ ४९२ ॥
तेव्हां बुडालें संतासंतभान । निबिड दाटलें चैतन्यघन ।
मोडलें मनाचें मनपण । वृत्तिशून्य अवस्था ॥ ४९३ ॥
मनें ध्यावें चैतन्यघन । तंव चैतन्याचि जालें मन ।
सहजेंचि खुंटलें ध्यान । हें मुख्य लक्षण मुक्ताचें ॥ ४९४ ॥

चैतन्यीं हरपलें चित्त । जड-मूक-पिशाचवत ।
लौकिकीं वर्ततां दिसे मुक्त । जाण निश्चित उद्धवा ॥ ४९५ ॥
नवल त्याचें पिसेपण । जगास न करवे जें प्राशन ।
तें वस्तूचें करी अपेयपान । अभक्ष्य जाण भक्षितू ॥५०२॥
जेथ जगासी गमन नव्हे जाण । तेथ हा करी अगम्यागमन ।
जगाचें जेथ न रिघे मन । तेथ सर्वांगें जाण हा वेंधे ॥५०३॥
न धरी विधिनिषेध विभाग । न करी कर्माकर्मांचा पांग ।
स्वानंदें नाचवी सर्वांग । यालागीं जग पिसें म्हणे ॥५०४॥

भा. ११. ४६०–५०४

## १५१. मुक्त स्वतः आत्माराम होऊन जगाचें विश्रामधाम बनतो.

अवशेष प्रारब्धगती । मुक्तांचे देहीं दिसे वस्ती ।
परी जागृतीं स्वप्न सुषुप्तीं । देहस्थिती नातळे ॥२२७॥
छाया पुरुषाचेनि चळे । ते छायेसी पुरुष नातळे ।
तेवि मिथ्या देह मुक्ताजवळें । कल्पांतकाळें येवों न शके॥२२८॥
आपुले छायेसी जाण । जेवि बैसों न शके आपण ।
तेवि मायाही तिन्ही गुण । जवळीं असोन स्पर्शेना ॥२२९॥
इंद्रियद्वारां यथानिगुती । प्राप्त विषयांतें सेविती ।
परी सेविलें ऐसेंही नेणती । विषयस्फूर्ति स्फुरेना ॥२३०॥
गुण पोखिती गुणावस्था । इंद्रियें घेतीं इंद्रियार्थां ।
मी उभयसाक्षी अकर्ता । चिन्मात्रता अलिप्त ॥२३१॥
तो इंद्रियांचेनि खेळेमेळें । सुखें विषयांमाजीं जरी लोळे ।
तरी विकाराचेनि विटाळें । कदाकाळें मैळे ना ॥२३२॥

जेथ कामाची अति प्रीती । तेथ लोभाची दृढ वस्ती ।
अथवा कामाची जेथ अप्राप्ती । तेथ महाख्याति क्रोधाची ॥
मुक्त जाहला नित्य निष्काम । क्रोधलोभेंसीं निमाला काम ।
तो स्वयें जाहला आत्माराम । विश्रामधाम जगाचें ॥२३४॥
एवं मुक्ताच्या ठायीं जाण । उपजों न शके पापपुण्य ।
कामक्रोधादि वृत्तिशून्य । जाहला परिपूर्ण चिद्ब्रह्म ॥२३५॥
मुक्ताची विषयास्थिती । विषयीं स्फुरे ब्रह्मस्फूर्ती ।
यालागीं पापपुण्यें नुपजतीं । नित्यमुक्ति तेणें त्यासी ॥२३६॥

भा. ११. २२७-२३६

## प्रकरण : ८

# अनुभव

### १५२. अ नु भ व-सो पा न.

नित्यमुक्त अव्ययो । स्वरूप जाणावया पाहा हो ।
ज्याचा लागला दृढ भावो । आन आठवो नाठवे ॥६३९॥

ऐशी मज जाणायाची अवस्था । त्या नांव बोलिजे जिज्ञासता ।
माझे प्राप्तीलागीं सर्वथा । पांडित्य मान्यता तो नेघे ॥६४०॥

देहादि अध्यासु आपुल्या ठायीं । श्रवणें मननें केला पाहीं ।
दृढ विश्वासु गुरूच्या पायीं । पूर्ण ब्रह्माच्या ठायीं निर्धारू ॥४१

तेथ पुढारीं चालावया वाट । भगवद्भजनीं अति उद्भट ।
कां सांडोनि कर्मकचाट । ध्याननिष्ठ तो होय ॥ ४२ ॥

ध्येय ध्याता ध्यान । न दिसे त्रिपुटीचें भान ।
कोंदलें चैतन्यघन । वस्तु सनातन तो पावे ॥४३॥

तेथ कैंचा कर्ता क्रिया कर्म । फिटला नानातत्त्वांचा भ्रम ।
सबाह्य कोंदलें परब्रह्म । जाला उपरम गुरुकृपा ॥४४॥

सर्वगत सर्वकाळ । सर्वदेशीं सर्वीं सकळ ।
वस्तु असे जे केवळ । तेथ निश्चल निजबोधू ॥४५॥

ऐशिये वस्तूची धारणा । ज्याचेनि न करवे जाणा ।
तरी सुगम उपाया आना । ऐक विचक्षणा सांगेन ॥६४६॥

भा. ११. ६३९–६४६

### १५३. अनुभवाचे कांहीं प्रकार

ऐसे वैरी पाडूनि रणीं । प्राशिलें सत्रावीचें पाणी ।
तंव अनुहताची सुडावणी । दुर्गामधोनि उठली ॥१२९॥
तेथ जैताची एक घायी । अनुहत निशाण लागलें पाहीं ।
शोधितां पारखें कोणी नाहीं । केलें ठायीं स्ववश ॥१३७॥

भा. ९. १२९, १३७

चंद्रसूर्यतारांच्या ठायीं । जें तेज तें माझें पाहीं ।
अनाहत शब्द तो मीही । जो गगनासी कहीं नातळे ॥२६२॥

भा. १६. २६२

त्या महाबोधाचें बोधांजन । हातेंवीण लेववी जनार्दन ।
तेणें सर्वांगीं निघाले नयन । देखणेंपण सर्वत्र ॥२०॥
परी सर्वत्र देखतां जाण । देखणेनि दिसे जनार्दन ।
ऐशी पूर्ण कृपा करून । दुजेपण सांडाविलें ॥२१॥

भा. २१. २०–२१

एवं पाहतां चहूंकडे । तुझेंचि स्वरूप जिकडे तिकडे ।
मग पूजिती वाडेंकोडें । निजसुखाडें सर्वत्र ॥१३७॥
जें जें देखती जे जे ठायीं । तें तें तुजवांचूनि आन नाहीं ।
ऐसा सर्वत्र चरण पाहीं । ठायीं ठायीं पूजिला ॥१३८॥

भा. ६. १३७–१३८

ज्याचें निमेषार्ध देखिल्या मुख । हारपे कोटि जन्मांचें दुःख ।
त्रिलोकीं न माय हरिख । धन्य श्रीमुख हरीचें ॥२५७॥

जयाची विक्षेपभृकुटी । रची ब्रह्मांडें उठाउटी ।
ज्याचे रोमकूपीं ब्रह्मांडें कोटी । तो हरि वैकुंठीं नांदत ॥५९॥
तें वैकुंठीं पाहतां साचार । अवघे चतुर्भुज नर ।
घनश्याम पीतांबरधर । शंख चक्र अवघ्यांसी ॥२६२॥
अवघ्यांचें एक स्वरूप । अवघें दिसती एकरूप ।
जेथ हरि नांदे स्वयें सद्रूप । तेथ कोणी कुरूप दिसेना ॥२६३॥

भा. २४. २५७–२६३

## १५४. घनश्याम कृष्णाचें वर्णन

मुकुटकुंडलें मेखळा । कासे कासिला सोनसळा ।
आपाद रुळे वनमाळा । घनसांवळा घवघावित ॥५५०॥
ऐशी मूर्ति सुरेख सगुण । कां निरसूनि रूप नाम गुण ।
ध्यानीं ठसावे निजनिर्गुण । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥५५१॥
ऐसें ठसावतां ध्यान । भक्तांची सबाह्य क्रिया पूर्ण ।
तें तें होय कृष्णार्पण । स्त्रीपुत्रादि जाण सर्वस्वें ॥५५२॥

भा. ३. ५५०-५५२

कृष्णरूपाचिया लालसे । डोळ्यां तेणें लाविलें पिसें ।
आवडी जालें मोरपिसें । अति डोळसें हरिअंगीं ॥५५॥
कैसी बरवेपणाची शोभा । पाहतां नयनीं निघती जिभा ।
रसाळपणें तो वालभा । उपनिषद्गाभा साकारला ॥५६॥
कृष्ण पहावया आवडी । होताहे देवांसी वरपडी ।
डोळ्यां थोर लागली गोडी । अर्ध घडी न विसंबती ॥५७॥

कृष्णरूपाचें कवतुक । पाहतां नयनां लागली भूक ।
अंतरीं निविड दाटलें सुख । तरी अधिकाधिक भुकेले ॥५८॥

भा. ६. ५५-५८

## १५५. सर्व कर्मे ईश्वररूप होतात.

दीपु लाविजे गृहाभीतरीं । तोचि प्रकाशे गवाक्षद्वारीं ।
तेवि मनीं प्रगटला श्रीहरी । तोचि इंद्रियांतरीं भजनानंदु ॥३६१
जंव दृष्टि देखे दृश्यातें । तंव देवोचि दिसे तेथें ।
यापरी दृश्यदर्शनातें । अर्पी भजनसत्ते दृष्टीचा विषयो ॥६३॥
वासाचा अवकाश होय आपण । घ्राणीं ग्राहकपणें जाण ।
तो भोगुचि स्वयें संपूर्ण । कृष्णार्पण सहज होतु ॥३७८॥
रसना रस सेवूं जाये । तंव रसास्वादु देवचि होये ।
मग रसनेमाजीं येऊनि राहे । ब्रह्मार्पणें पाहे रसभोगवृत्ति ॥७९॥
द्यावया कांहीं देवो जाये । तंव देतां भजन कैसें होये ।
देतें घेतें दान स्वयें । देवोचि होये निजांगें ॥३८७॥
जेउतें जेउतें चालवी पायें । तो तो मार्गु देवोचि होये ।
मग पाउलांपाउलीं पाहे । निजभजन होये ब्रह्मार्पणेंसीं ॥३८८॥

भा. २. ३६१-३८८

## १५६. श्रीकृष्णस्पर्शानें कर्मेंच निष्काम होतात.

तेणें श्रीकृष्णाचेनि स्पर्शें । सर्वेंद्रियीं कामु नासे ।
तेणें कर्मचि अनायासें । होय आपैसें निष्कर्म ॥५१६॥
सप्रेम भावें संलग्न । देतां श्रीकृष्णासी आलिंगन ।
तेणें देहाचें देहपण । मीतूंस्फुरण हारपे ॥१७॥

शयनाच्या समयरूपीं । जना गाढ मूढ अवस्था व्यापी ।
ते काळीं तुम्हां समीपीं । कृष्ण सद्रूपीं संलग्न ॥५१८॥

भा. ५. ५१६-५१८

## १५७. परम निर्विकल्प समाधि

यालागीं समाधि आणि व्युत्थान । या दोनी अवस्थांसहित जाण ।
बुद्धि होये ब्रह्मार्पण । अखंडत्वें पूर्ण समाधि ॥४३०॥
अर्जुना देऊनि निजसमाधि । सर्वेंचि घातला महायुद्धीं ।
परी तो कृष्ण कृपानिधी । ताटस्थ्य त्रिशुद्धी नेदीच स्पर्शों॥४३१
सकळ कर्मीं समाधि । हे सद्‌गुरूची बोधी बुद्धि ।
तरी युद्धींही त्रिशुद्धी । निजसमाधि न मोडे ॥४३२॥
स्वरूपीं दृष्टि निरवधी । अनवच्छिन्न समानबुद्धि ।
कर्माकर्मी अज्ञान न बाधी । परमसमाधि तिये नांव ॥४३४॥
जेथें शमली मनाची आधि । ते जाणावी परमसमाधी ।
समाधि घेणें ते देहबुद्धि । काष्ठ ते त्रिशुद्धी मूर्च्छितप्राय ॥४३७॥

भा. २. ४३०-४३७

सर्व संकल्पांची अवधी । त्या नांव निर्विकल्प समाधि ।
सकळ शास्त्र हेंचि प्रतिपादी । समाधि त्रिशुद्धी त्या नांव ॥६६९
सापु आल्या शेळीप्रती । तटस्थ होय सकळ वृत्ती ।
तैशी झालिया ताटस्थ्यस्थिती । नव्हे निश्चितीं ते समाधि ॥६७०
अकस्मात अवचितां । दिव्य स्वरूप देखतां ।
आश्चर्यें झाली तटस्थता । तेथ जाणावी तत्वता वृत्ति आहे॥६७१॥
स्वस्वरूप देखतां प्रथम दृष्टी । न संवरतु विस्मयो उठी ।
तोही जिरवूनियां पोटीं । दशा जे उठी ते समाधि ॥६७२॥

निःशेष कल्पना जेथ विरे । तेथ विस्मयो कोठें स्फुरे ।
सूक्ष्म कल्पना थावरे । तेणें वोसरे विस्मयो ॥६७३॥

भा. १३. ६६९-६७३

१५८. ब्रह्मानंद आवरणें शक्य नाहीं.

गातां पदोपदीं निजसुख । कोंदाटे अधिकाधिक ।
वोसंडतां परम हरिख । स्वानंदें अलौकिक नाचों लागे ॥५७५॥
सारूनि दुजेपणाचें काज । निरसोनि लौकिकाची लाज ।
अहंभावेंविण सहज । आनंदाचें भोजें अलौलिक नाचे ॥७६॥
जो मोलें मदिरा खाये । तो मदिरानंदें नाचे गाये ।
जेणें ब्रह्मानंदु सेविलाहे । तो केवि राहे आवरला ॥७७॥
यालागीं तो लोकबाह्यता । स्वयें नाचे ब्रह्मउन्मादता ।
लोक मानिती तया पिशाचता । हा बोधु पंडितां सहसा न कळे ॥
ब्रह्मउन्मादपरमानंदें । जंव जंव पाहे स्वानंदबोधें ।
तंव तंव चराचर पूर्णानंदें । देखे स्वानंदकंदें दुमदुमित ॥५८०॥
जेवि कांतोनियां रंध्रसळें । स्फटिकदीपगृह अंगमेळें ।
चितारिलीं अश्वगजदळें । तीं भासतीं सोज्वळें आंतुलेनि दीपे ॥
तेवि सोमसूर्यादि तेजशक्ति । कां वह्निनक्षत्रें जें लखलखितीं ।
जननयनादि निजदीप्ती । देखे आत्मज्योती सतेज ॥५८४॥

भा. २. ५७५-५८४

ते स्वरूपसुखीं लाधल्या जाण । देहाचें स्फुरेना देहपण ।
अहंकारेंसीं मावळे मन । स्वानंद पूर्ण वोसंडे ॥५६४॥
तेथ संमुख ना पाठिमोरें । एकपण ना दुसरें ।
देवो भक्त हेंही नुरे । सुखें सुखभरें सुखरूप ॥६५॥

मी एक सुखरूप आहें । वेगळेपणें ठावें नोहे ।
येणें आत्मानुभवें राहे । एवढी प्राप्ती होये मद्भक्तां ॥६६॥
म्हणाल काष्ठाच्या परी त्यासी । पडला असेल अहर्निशीं ।
हेंही न घडे गा तयासी । सांडूनि हेतूसी देहीं वर्ते ॥५६७॥

भा. १३. ५६४-५६७

## १५१. ऐक्यानुभव

नित्य सिद्ध सुखदाता । तो हृदयस्थु कांत आश्रितां ।
विकल्प सांडूनि चित्ता । वेगीं हृदयस्था मानली ॥२९७॥
त्यासी देखतां अनुभवाचे दिठीं । ऐक्यभावें घातली मिठी ।
निजसुख पावली गोरटी । उठाउठीं तत्काळ ॥९८॥
बोलु घेऊनि गेला बोलीं । लाज लाजोनियां गेली ।
दृश्य द्रष्टा दशा ठेली । वाट मोडिली विषयांची ॥९९॥
नावद पडालिया उदकांत । विरोनि तया गोड करित ।
तेवि निराशीं पावोनि भगवंत । समरसत स्वानंदें ॥३०१॥

हेतूसी नाहीं ठावो । निमाला भावाभावो ।
वेडावला अनुभवो । दोघां प्रीति पाहो अनिवार ॥२।
सांडूनि मी-तूं-पणासी । खेंव दिधलें समरसीं ।
मग समाधीचिये सेजेशीं । निजकांतेसीं पहुडली ॥३॥
झणें मायेची लागे दिटी । यालागीं स्फूर्तीचिये कोटी ।
निंबलोणा गोरटी । उठाउठी वोवाळी ॥४॥
ऐसी समाधिसेजेशीं । पिंगला रिघे निजसुखेंसीं ।
अवधूत म्हणे यदूसी । वैराग्यें वेश्येसी उपरमु ॥५॥

वैराग्यें छेदिले आशापाश । पिंगला जाली गा निराश ।
निराशेंसीं असमसाहस । सुखसंतोष सर्वदा ॥३०६॥

भा. ८. २१७-३०६

## १६०. देवभक्तांचें ऐक्य

तेणें श्रीकृष्णकराग्रस्पर्शें । उद्धवासी झालें कैसें ।
व्यालें धेनूचेनि वोरसें । वत्स जैसें उल्हासे ॥ ३२३ ॥
जेवि कां लागतां चंद्रकर । सबाह्य निवों लागे चकोर ।
मेघ देखोनि मयूर । नृत्यतत्पर स्वानंदें ॥ २४ ॥
यापरी उद्धव जाण । स्वानंदें झाला परिपूर्ण ।
विसरला देवभक्तपण । कृष्णही कृष्णपण विसरला ॥२५॥
यापरी भक्तिसुखाआंत । दोघेही ऐक्यें झाले उन्मत्त ।
परमानंदाचा तेथ । धेंडा नाचत स्वानंदें ॥ २६ ॥
या भक्तिसुखाची गोडी । भाग्येंवीण न कळे फुडी ।
उद्धवभजनाचे कुळवाडी । जोडला जोडी श्रीकृष्ण ॥३२७॥

भा. १६. ३२३-३२७

## १६१. हास्यवदनांतून हास्याचें, हास्यांतून आनंदाचें, व आनंदांतून परमात्म्याचें ध्यान करावें.

झणीं दृष्टीचा रुपेल न्याहारु । लागतां खुपेल चंद्रकरु ।
तैशी मूर्ति ध्यावी सुकुमारु । अति अरुवारु ध्याननिष्ठा ॥४९८॥
इंद्रियार्थीं अति लोलुप । तें वैराग्यें आवरोनि चित्त ।
माझें ध्यानीं सुनिश्चित । बुद्धिमंत लाविती ॥ ४९९ ॥

चिंतनीं बिचकतां मन । सविवेक बुद्धिबळें जाण ।
निःशंक करितां माझें स्मरण । धारणेविण ध्यान ठसावें ॥५०६॥
ध्याना आलें जें हास्यवदन । त्यांतूनही सांडोनि वदन ।
केवळ हास्याचें करावें ध्यान । हास्यामाजीं मन घालुनी ॥५०७॥
त्याही हास्याचें सांडूनि ध्यान । हास्यामाजीं जो आनंदघन ।
तेथ प्रवेशवावें मन । अति सावधान निजनिष्ठा ॥ ५०८ ॥
ते आनंदीं आनंदयुक्त । जाहलिया आपुलें चित्त ।
आनंदाची उपलब्धि तेथ । होय सुनिश्चित साधकां ॥५०९॥
जाहलिया आनंदपद प्राप्त । चिदाकाशचि दिसे समस्त ।
तें चिदाकाशीं चित्त । अति सावचित्त ठेवावें ॥ ५१० ॥
तेव्हां चिदाकाश चित्त चिंतन । हेंही सांडूनि त्रिविध भेदध्यान ।
जो मी परमानंद परिपूर्ण । भेदशून्य चिदात्मा ॥५११॥
तेथें वृत्ति करूनि निमग्न । सांडावें चिदाकाशाचेंही ज्ञान ।
तेव्हां ज्ञेय ज्ञाता ज्ञान । हेंही स्फुरण स्फुरेना ॥ ५१२ ॥

भा. १४. ४९८–५१२.

## १६२. अष्टसात्विक भाव

त्याचें नामस्मरण करी । सकळ पातकांतें हरि हरी ।
तो स्वयें प्रगटला अंतरीं । पातकां उरी उरे कैंची ॥५८७॥
साधनरूप भक्तींच्या युक्तीं । पूर्ण सप्रेम उपजे भक्ती ।
ते भक्तीची निजस्थिती । ऐक चक्रवर्ती सज्ञाना ॥ ८८ ॥
सद्भावें निजभजन करी । हृदयीं प्रगटतां श्रीहरी ।
तंव देहींचीं चिन्हें बाहेरीं । क्षणामाझारीं पालटती ॥ ८९ ॥
परस्परें निजसंवादु । करितां जाला स्वरूपावबोधु ।
नेत्रीं जळ अंगीं स्वेदु । प्राणस्पंदु पांगुळे ॥ ५९० ॥

चित्तचैतन्यां होतां भेटी । हर्षें बाष्प दाटे कंठीं ।
पुलकांकित रोमांच उठी । उन्मीलित दृष्टि पुंजाळे ॥११॥
करितां अच्युतचिंतन । सप्रेम गाहिंवरे मन ।
अट्टाहासें करी रुदन । अनिवार स्फुंदन उर्ध्वश्वासें ॥१२॥
त्या रुदनासवेंचि हर्ष प्रगटे । त्या हर्षाचेनि नेटेंपाटें ।
हांसों लागे कडकडाटें । सुखोद्भरें गदगदौनी ॥ १३ ॥
मीपणाचेनि अनुरोधें । गिळिलों होतों मोहमदें ।
तो सुटलों गुरुकृपावबोधें । तेणें परमानंदें डुल्लत ॥ १४ ॥
मी-माझेनि भवभावें । मज मी चुकलों मी-पणें ।
मज मी भेटलों सद्गुरुवचनें । आनंदें तेणें उल्हासे ॥१५॥
कैसें सद्गुरुवचन अलौलिक । मीच भोगीं नित्यसुख ।
येणें आश्चर्यें देख । स्वानंदोन्मुख उल्हासे ॥ १६ ॥
संसारबागुलाचें । भय लागलें नेणों कैंचें ।
तें गुरुवाक्यें दवडिलें साचें । म्हणौनि नाचे निर्लज्ज ॥५१७॥

भा. ३. ५८७–५१७

### १६३. अनुभवानें देहाभिमानाचा नाश

संकल्पु निमतांचि पोटीं । विराली लिंगदेहाची गांठी ।
भेदाची हारपली त्रिपुटी । मी परमात्मा दिठीं देखतां ॥२५६॥
ज्यासी नाहीं भेदाचें भान । त्याचें देहाचें भरणपोषण ।
स्नान भोजन शयन । गमनागमन केवि घडे ॥ ५७ ॥
कुलाल दंड भांडें घेऊनि जाये । पूर्वभवंडीं चक्र भंवत राहे ।
तेवि अभिमान गेलिया पाहें । देह वर्तताहे प्रारब्धें ॥२६२॥
त्या देहाचें भरण पोषण । प्रारब्धाचि करितें जाण ।
ज्ञात्यासी प्रपंचाचें भान । सत्यत्वें जाण असेना ॥ ६३ ॥

जैशी मिथ्या छाया देहापाशीं । तैसा देह दिसे सज्ञानासी ।
यालागीं देहबुद्धि त्यासी । सत्यत्वेंसी उपजेना ।। ६४ ।।
छाया सुखासनामाजीं बैसे । कां विष्ठेवरी पडली दिसे ।
त्या छायेचे अभिमानवशें । सुखदुःख नसे पुरुषासी ।। ६५ ।।
तेवि देहाची ख्याति विपत्ती । बाधीना सज्ञानाचे स्थितीं ।
प्रारब्धक्षयाचे अंतीं । पावती विदेहकैवल्य ।। २६६ ।।

भा. १८. २५६–२६६

१६४. अनुभवानंतर प्रपंचादिकाचें भान राहत नाहीं.

जया देहाचेनि मद्भजनें । माझें शुद्ध स्वरूप पावणें ।
त्या देहासी विसरिजे तेणें । मी माझेपणें देखेना ।।५८९।।
जेवि कां भाडियाचें घोडें । जेणें आणिलें निजधामा रोकडें ।
तें आहे कीं गेलें कोणीकडे । हें स्मरेना पुढें तो जैसा ।।५९०।।
कां जो दैवयोगें पालखीं चढे । तो पूर्वील तुटके मोचडे ।
आहेत कीं गेले कोणीकडे । हें स्मरेना पुढें तेणें हरिखें ।।९२।।
त्या दांपत्याचे सुखभेटी । पारकें देखतां लाज उठी ।
तेवि देहाचें भान द्वैतदृष्टीं । मदैक्यपुष्टीं देह कैचें ।।९४।।
मीं शेषशयनावरी । कीं मातंगाच्या घरीं ।
कीं बैसलों शूळावरी । हेंही न स्मरी सहसा तो ।।६०९।।
ऐशी ज्ञात्याची निरभिमानता । माझेनि न सांगवे तत्वता ।
जे पावले माझी सायुज्यता । त्यांची कथा न बोलवे ।।६१०।।
जेथ वेदां मौन पडे । स्वरवर्णेंसीं वाचा बुडे ।
त्या संतांचे पवाडे । माझेनिही निवाडें न सांगवती ।।६११।।

भा. १३. ५८९-६११

## १६५. आत्मज्ञास आपपरभाव नाहीं

प्रकृतिपर चिदात्मा आहे । तोचि सर्वभूतीं भूतात्मा पाहे ।
मजमाजींही तोचि राहे । ऐशी सर्व भूतीं वाहे एकात्मता जो ॥२२७॥
त्यासी कोण आप्त कोण इतर । कोणासी करावें वैर ।
सर्व भूतीं मीचि साचार । निरंतर निजात्मा ॥२८॥
एक आत्मा सर्व भूतांत । येचि अर्थीचा दृष्टांत ।
स्वयें सांगे श्रीकृष्णनाथ । श्रोता सावचित्त उद्धव ॥२९॥
सहस्र घटीं भरल्या जळ । बिंबे एकचि चंद्रमंडळ ।
तेवि निजात्मा एक केवळ । भूतीं सकळ भूतात्मा ॥३०॥
देखसी भूताकृति भिन्ना । त्याही परमकारणीं अभिन्ना ।
जेवि अळंकारीं सुवर्णा । आकारींहि जाणा भिन्नत्व नाहीं ॥
आहार न मिळे जियेकाळीं । दुःखी नव्हे तिये वेळीं ।
अन्नालागीं न तळमळी । धारणाबळीं बलिष्ठ ॥२३५॥

भा. १८. २२७-२३५

## १६६. मुक्तांची स्थिति

तैशी साचार वस्तुप्राप्ती । तो नातळे देहस्थितीं ।
तरी देह वर्ते कोणे रीतीं । तो प्रारब्धगतीचेनि शेषें ॥६८३॥
स्थंडिलीं अग्नि विझोनि जाये । तरी भूमिये उष्णता राहे ।
कर्पूर सरल्याही पाहे । सुवासु आहे ते देशीं ॥८४॥
पाळणा हालवितां वोसरे । तरी तो हाले पूर्वसंस्कारें ।
तेवि अविद्यानाशें प्रारब्ध उरे । तेणें देहो वावरे मुक्तांचा ॥८५॥
त्यासी स्त्री म्हणे माझा भर्ता । पुत्र म्हणे माझा पिता ।
शिष्य म्हणे स्वामी तत्वतां । त्यांहूनि परता त्यामाजीं वर्ते ॥६९६॥

तेवि कर्मास्तव उत्पत्ती । कर्मेचि झाली परब्रह्मप्राप्ती ।
त्या कर्मामाजीं वर्तती । निष्कर्मस्थिति महायोगी ॥९९॥
तो व्यवहारी दिसो जनीं । कीं पिसेपणीं नाचो वनीं ।
अथवा तटस्थ राहो विजनीं । दशा अधिक उणी बोलूं नये ॥
सिंहासनीं राजत्व जोडे । तें वसंत खेळतां न मोडे ।
कीं धांवतां व्याहाळीपुढें । राजपद चोखडें ढळूं नेणे ॥१॥
रावो रानीं वसिन्नला । त्या रानासी राजभोग आला ।
रावो राजत्वा मुकला । मूर्खही या बोला न बोलती ॥२॥
तेवि पावोनि स्वरूपप्राप्ती । योगी प्रारब्धाच्या स्थितीं ।
नाना कर्मे करितां दिसती । परी निजात्मस्थिति भंगेना ॥३॥
यालागीं समाधि आणि व्युत्थान । या दोहीं अवस्थांचें लक्षण ।
अपक्कासीचि घडे जाण । परि पूर्णासी लक्षण तें कैंचें ॥४॥
अर्जुना देवोनि समाधि । सवेंचि घातला महायुद्धीं ।
परी कृष्ण कृपानिधी । तटस्थ त्रिशुद्धी न करीच ॥७०६॥

भा. १३. ६८३–७०६

## १६७. निजबोधाचा आनंद

ऐसा मुमुक्षु अधिकारवंतु । त्यासी शाब्दपरनिष्णातु ।
गुरूनीं माथां ठेविला हातु । निजबोध प्राप्तु तत्काळें ॥३४१॥
तम खाऊनि रजोगुण । अत्यंत उन्मत्त जाला जाण ।
त्याचें देखोनि उन्मत्तपण । सत्वें सत्वगुण खवळला ॥३५१॥
जेव्हां खवळला सत्वगुण । त्यासी न साहे दुजेपण ।
रजोगुणाचें प्राशन । केलें जाण तत्काळ ॥३५२॥
केवळ सत्वाचा स्वभावो । तेणें निजसुखाचा अनुभवो ।
क्षणक्षणां नीचनवा पहा हो । अति नवलावो अनुभवीं ॥३५३॥

तेणें सुखानुभवें देखा । रजतमांच्या बीजकणिका ।
ज्या सृष्टिस्रजनीं उन्मुखा । त्याही निःशेषा जाळिल्या ॥३५४॥
जेव्हां गुणप्रसवती माया । शोधित सत्वें आणिली लया ।
ते सत्ववृत्ति एकलिया । अद्वैततया उरलीसे ॥३५५॥
तेव्हां ब्रह्माहमास्मि लक्षण । तेंही हों लागलें क्षीण ।
सोहंहंसाची बोळवण । ते संधीं जाण होतसे ॥३५६॥
तेथ देहींचें गेलें देहपण । जन्ममरणां आलें मरण ।
विश्वाचें न दिसे भान । आनंद घन कोंदला ॥३५७॥
तेणें सुखस्वरूप जाली दृष्टि । आनंदमय जाली सृष्टि ।
परमानंदें चढली पुष्टी । स्वानंदें मिठी घातली ॥३५८॥
त्या सुखा मर्यादा । कासयानें नव्हे कदा !
जेथ मौन पडिलें वेदां । वृत्ति तत्पदा पावली ॥३५९॥

भा. १०. ३४९–३५९

१६८. निजसुख भोगणाऱ्याची स्थिति.

ऐक अकिंचनाची गोठी । नाहीं मठ मठिका पर्णकुटी ।
पांचापालवीं मोकळ्या गांठी । त्यांसी ये भेटीं निजसुख माझें॥१०३॥
जो दमनशील जगजेठी । अकरांचीही नळी निमटी ।
तो निजसुखाचें साम्राज्यपटीं । बैसे उठाउठीं तत्काळ ॥४॥
देखतां नानाभूतविषमता । ज्यासी साचार दिसे समता ।
तो माझिया निजसुखाचे माथां । क्रीडे सर्वार्थता समसाम्यें ॥५॥
सर्पत्वचा जेवि पापरीं । माथा हालविल्या फडा न करी ।
तेवि धनदारागृहपुत्रीं । छळितां ज्याभीतरीं क्रोध नुमसे ॥६॥
कामक्रोध मावळले देहीं । साचार शांति ज्याच्या ठायीं ।
माझें निजसुख त्याच्या पायीं । लोळत पाहीं सर्वदा ॥७॥

तो जरी तें सुख नेघे । तरी तें सुख तया पुढें मागें ।
जडोनि ठेलें जी सर्वांगें । सांडितां वेगें सांडेना ॥८॥
तो जेउती वास पाहे । तें दिग्मंडळ सुखाचें होये ।
तो जेथ कां उभा राहे । तेथ मुसावलें राहे महासुख ॥९॥
त्याचें पाऊल जेथें पडे । तेथें निजसुखाची खाणी उघडे ।
तो प्रसंगें पाहे जयाकडे । तेथें स्वानंदें वाढे परमानंदू ॥११०॥
तो ज्यासी भेटे अदृष्टें । त्यास सुखाची पहाट फुटे ।
त्यासी पावो लागलिया अवचटें । सुखाचें गोमटें निजसुख लाभे॥११
ज्याचे श्वासोच्छ्वासांचा परिचार। कीं निमेषोनिमेषांचे व्यापार।
माझेनि निजसुखें साचार । तेथेंचि घर बांधलें ॥१२॥
तो सकळ सुखांचा मंडपू । कीं निजसुखाचा कंदर्पू ।
तो सर्वांगें सुखस्वरूपू । सबाह्य सुखरूपु समसुखत्वें ॥११३॥

भा. १४. १०३–११३

भाग २ रा

# स्फुट आध्यात्मिक ग्रंथ

## १६१. जनार्दनस्वामींच्या कृपेनें एकनाथ ग्रंथरचना करतात.

बाप निरूपण सखोल । पेलत स्वानंदाचे पेल ।
येताति सुखाचे डोल । येकेक बोल ऐकतां ॥५२७॥
येणें चतुःश्लोकींचेनि अर्थें । जें सुख जालें आमुतें ।
तें सुख सांगावया येथें । वाचाळपणातें वाचा विसरे ॥५२८॥
चतुःश्लोकींचे गोष्टीसाठीं । वाचे पडिली वळवटी ।
स्वानंद न समाये पोटीं । परमानंदें सृष्टी परिपूर्ण जाली ॥५२९॥
हें ऐकोनि संतवचन । हर्षला एकाजनार्दन ।
जेविं ऐकतां घनगर्जन । स्वानंद पूर्ण मयूरासि उपजे ॥५३०॥
तेणें स्वानंदें पूर्ण । अभिवंदिले श्रोतेसज्जन ।
नमस्करूनियां संतचरण । माझें विनवण अवधारा ॥५३१॥
माझें हेंचि मनोगत । संतुष्ट व्हावे साधुसंत ।
यालागीं श्रीभागवत । आरंभिला ग्रंथ भावार्थेंसीं ॥५३२॥
ऐकोनियां वचनासी । साच देखोनि सद्भावासी ।
अतिसंतोष सज्जनासी । रिझोनि ग्रंथार्थेंसीं बोलते जाले ॥
अगा तुझें एक एक अक्षर । क्षराक्षरातीत पर ।
येणें ग्रंथार्थें साचार । आम्ही अपार सुखी जालों ॥५३४॥
देऊनि पदपदार्थाचा झाडा । करूनि श्लोकार्थ उघडा ।
बाह्यब्रह्मींचा निजनिवाडा । दाऊनि चोखडा रचिला ग्रंथु ॥५३५॥

ग्रंथ स्वानुभवें रसाळ । आनंदरसें घोळिले बोल ।
परमानंदाचे कल्लोळ । ग्रंथार्थी केवळ रूपासि आले ।।५३६।।

चतुःश्लोकी भा. ५२७–५३६

## १७०. भक्ति म्हणजे काय ?

भगवद्भाव सर्वांभूतीं । या नांव मुख्य माझी भक्ति ।
हेंचि भजन ज्यासी अनहंकृति । विज्ञानप्राप्ती तैं त्यासी ।।३९९।।
माझें नाम माझें स्मरण । माझी कथा माझें कीर्तन ।
माझ्या चरित्राचें पठण । गुणवर्णन नित्य माझें ।।
माझा जप माझें ध्यान । माझी पूजा माझें स्तवन ।
नित्य करितां माझें चिंतन । विषयध्यान विसरलें ।।
भक्तांचें विषयसेवन । तेंहि करिती मदर्पण ।
या नांव भक्तीचीं अंगें जाण । स्वयें नारायण विधीसि सांगे ।।
जगाचें गुह्य मी आपण । त्या गुह्याचें गुह्य संपूर्ण ।
पूर्ण गौप्याचें गुप्तधन । तुज मी सांगेन स्वयंभू ।।
मी जेवढा जैसा तैसा । जग न होऊनि जगत्वा ऐसा ।
ऐसा स्वरूपतेचा पूर्ण ठसा । तुज प्राप्त हो हे दशा अनुग्रहें माझ्या ।।
सत्त्वगुणेंविण सत्त्वस्थिति । जेणें करी धरी हरी त्रिजगती ।
परि अंगीं न लागे अहंकृती । हा भाव प्राप्त हो तुज ।।
मी सगुण निर्गुण रूपें धरीं । परि न विकारें रूपाकारीं ।
ये स्वरूपतेची निजथोरी । प्राप्त हो झडकरी विधात्या तुज ।।
रूपीं असोनि अरूपता । गुणीं वर्तोनि गुणातीतता ।
हे मदनुग्रहें पूर्णावस्था । पावसी तत्त्वतां परमेष्ठी तूं ।।४१३।।

चतुःश्लोकी भा. ३९९–४१३

## १७१. तप म्हणजे काय?

तप या नांवाची काय स्थिति । तपें पाविजे कोण प्राप्ती ।
ऐसें विधाता निजचित्तीं । तपाची स्थितिगति विवंचीत ॥१००॥
तप म्हणिजे परमसाधन । येणें साधे निजात्मधन ।
ऐकोनि ऐसें सावधान । स्वहितस्फुरण हृदयीं स्फुरलें ॥१०१॥
तप म्हणिजे माझें हित । तपें एकाग्र होय चित्त ।
तप होइजे आनंदयुक्त । ऐसा निश्चितार्थ पैं केला ॥१०२॥
जंव नाहीं केलें दृढ तप । तंव न ठके तपवक्त्याचें रूप ।
आहाच कष्टतां अमूप । तेणें स्वस्वरूप भेटेना ॥१०३॥
ऐसा दृढ निश्चय मानुनी । विधाता बैसे कमलासनीं ।
जैसा प्रत्यक्ष येऊनि कोण्ही । हितालागोनि बैसवी ॥१०४॥
एकांतीं शिष्यालागोनी । जें गुरु उपदेशित कानीं ।
मग तो प्रवर्ते अनुष्ठानीं । तेवि कमलासनीं विधाता ॥१०५॥
तप म्हणिजे नव्हे स्नान । तप म्हणिजे नव्हे दान ।
तप नव्हे शास्त्रव्याख्यान । वेदाध्ययन नव्हे तप ॥१०६॥
तप म्हणिजे नव्हे योग । तप म्हणिजे नव्हे याग ।
तप म्हणिजे वासनात्याग । जेणें तुटे लाग कामक्रोधांचा ॥१०७॥
शरीरशोषणा नांव तप । तें प्रारब्धभोगानुरूप ।
हरि हृदयीं चिंतणें चिद्रूप । तप सद्रूप त्या नांव पैं ॥१०८॥
जेणें दंभलोभ निःशेष आटे । अहंममता समूळ तुटे ।
यासीच नांव तप गोमटें । मानी नेटेंपाटें विधाता ॥१०९॥
तीर्थां तीर्थांचिया अनुष्ठाना । क्षमा नुपजे सज्ञानघना ।
तेथ कोप येऊनि जाणा । करी उगाणा तपाचा ॥११०॥

कोप तापसांचा वैरी । केल्या तपाची बोहरी करी ।
तो जंव निर्दळेना जिव्हारीं । तों तपाची थोरी मिरविती मूर्ख ॥
जरी जाहला संन्यासी । तरी कामक्रोध ज्यापासीं ।
तो प्रपंचातें दिधला आंदणासी । मा इतरांसी कोण पुसे ॥११२॥
जेथें कामक्रोधाचें निर्दळण । या नांव शुद्ध अनुष्ठान ।
हा निश्चय करूनि चतुरानन । तपासी आपण सरसावला ॥११३॥
एवं तप मानूनियां हित । बुद्धिनिश्चयें निश्चितार्थ ।
ब्रह्मा तपश्चर्या करीत । एकाग्रचित्त भावार्थें ॥११४॥

चतुःश्लोकी भा. १००–११४

## १७२. ब्रह्मदेवानें केलेली तपश्चर्या

ब्रह्मा कमलासनीं तप करी । नवल त्याचें धारिष्टाची थोरी ।
नाना इंद्रियविकारीं । परि झाला अविकारी निजनिष्ठ ॥ ११९ ॥
शमदमांचेनि निजमेळें । जिंतिले मनपवनांचे उह्राळे ।
इंद्रियाचे अपार पाळे । तेणें तपोबळें आक्रमिले ॥१२०॥
मन अमन पाहों आदरिलें । तंव तें चंचलत्व विसरलें ।
चित्त विषयचिंते मुकलें । चित्तीं चिंतलें चैतन्य पैं ॥१२१॥
बुद्धीनें दृढबोध धरिला । तेथें अहंकार कांपिन्नला ।
तेणें सोहंभाव वळकावला । तेव्हां प्राण परतला दचकोनी॥१२२॥
देहीं दशधा धांवत होता । तो एकवटुनी आंतौता ।
धरूनि सोहंचा सांगाता । पश्चिमपंथा चालिला ॥१२३॥
यापरी मनपवनांसी । जिंतिलेंसे निजनिष्ठेसीं ।
तंव बाहेरिंद्रियांसीं । दशा आपैसी बाणली ॥१२४॥
डोळ्यां डोळे देखणें झालें । तेणें दृश्याचें देखणें ठेलें ।
श्रवण अनुहतध्वनीं लागले । तंव शब्दा वारिलें निःशब्दें॥१२५॥

स्पर्शें स्पर्शावें जंव देहीं । तंव देहीं देहत्वस्फुरण नाहीं ।
देहींच प्रगटला विदेही । तेथें स्पर्शें कांइ स्पर्शावें पैं ॥१२६॥
चित्कला वोळली वोरसें । गोडी रसनेमाजीं प्रवेशे ।
रसना लाजे विषयतोषें । सर्वांग तेणें रसें अतिगोड ॥१२७॥
घ्राणीं घेऊं जातां गंधासी । प्राण चालिला पश्चिमेसी ।
मागें कोण सेवी गंधासी । एवं विषयासी विरक्ति स्पष्ट ॥१२८॥
मन इंद्रियद्वारें विषयीं धांवें । त्यासी प्रत्याहार लाविला सर्वें ।
या लागीं तें जीवेंभावें । झालें निजस्वभावें निर्विषय ॥१२९॥
ज्ञानेंद्रियें जिंकिलीं ऐसीं । तें कर्मेंद्रियांची स्थिति कैसी ।
तेंही सांगेन तुजपाशीं । ऐकें राजर्षि नृपवर्या ॥१३०॥
जेवि धुर जिंकिलिया रणीं । कटक जिंकिलें तेचि क्षणीं ।
तेवि मनोजयाची बांधावणी । तेचि करणीं सर्व विजय समजे ॥
विजय बांधावा राजद्वारीं । तंव गुढिया उभविजे घरोघरीं ।
तेवि मनोजयाची थोरी । तेचि इंद्रियद्वारीं नांदत ॥१३२॥
वाचा वदली सत्यासत्य । तिसी रामनामें दिलें प्रायश्चित्त ।
वाच्यवाचक स्फुरेना तेथ । वाचा स्फुरत तच्छक्ती ॥१३३॥
जें भेटों निघे मना मन । तें हात मोकळे संपूर्ण ।
तेव्हां क्रियेमाजीं अकर्तेपण । आपुलें आपण हातावरी ॥१३४॥
क्रिया रतली चिच्छक्ती । तेणें ज्ञानगम्य चरणांची गती ।
तेव्हां गमनप्रत्यावृत्ती । समाधानस्थिति आसनस्थ ॥१३५॥
यापरी जिंतूनि चरण । दिव्य सहस्र वरुषें जाण ।
दृढ घालूनियां आसन । प्राणापान वश्य केले ॥१३६॥
मनीं कामाचा अति साटोप । तेणें खवळला उठी कंदर्प ।
तें मन चिंती जैं चिद्रूप । तैं कामकंदर्प असतांच नाहीं ॥१३७॥

जेथें मन असे इंद्रियें उरलें । तेथें कंदर्पाचें चालों शकलें ।
चित्त चिद्रूपध्यानीं गुंतलें । तैं कांहीं न चले कामकंदर्पाचें ॥
ज्ञानकर्मेंद्रियें दाहीं । अकरावें मन तें ठायीं ।
यापरी उभयेंद्रियें पाहीं । जिंतूनि दृढदेही तो झाला ॥१४२॥
अंतरीं निग्रह दृढ केला । शम शब्दें तो वाखाणिला ।
बाह्येंद्रियां नेम केला । तो दम बोलिला शास्त्रज्ञीं ॥१४३॥
हृदयींचेनि विवेकमेळें । वैराग्याचें अनुतापबळें ।
शमदमाचेनि निखळें । तप प्रांजळ दृढ केलें ॥१४४॥
परी तें तप जाहलें कैसें । लोक प्रकाशे निजप्रकाशें ।
एवढी महिमा आली दशे । त्रैलोक्य भासे त्या तपामाजीं ॥
ऐसा निष्ठेचा निजप्रताप । तेणें तप जाहलें सफळरूप ।
ब्रह्मा जाहला सत्यसंकल्प । तपवक्त्याचें रूप देखोनियां ॥१४६॥
यालागीं सफळ दर्शन । विरिंचीचें तें तपाचरण ।
आचरला निजांगें जाण । ब्रह्मा आपण नेमनिष्ठा ॥१४७॥
तपाचे निजनेमेंसीं कष्ट । साधिलें स्वनिष्ठें चोखट ।
यालागीं तो अतिश्रेष्ठ । जाहला वरिष्ठ तपस्व्यांमाजीं ॥१४८॥

चतुःश्लोकी भा ११९-१३८; १४२-१४८

## १७३. उपाय हेच अपाय!

मज जाणावया लागीं । अभिमानें कष्टले हठयोगी ।
अहंतेनें न पावोनि माझी मार्गीं । वेंचले विभागीं काळवंचनेच्या॥
मज पावावया कारणें । दाटोनि ते देहाभिमानें ।
स्वकर्में शिखासूत्र त्यजणें । तें मज पावणें खुंटलें त्यांचें ॥५६६॥
न जिंकतां कामक्रोधांसी । एकाकी जाला संन्यासी ।
देहाभिमानें ग्रासिलें त्यासी । क्रोधलोभांसी स्वयें विकला ॥५६७॥

संन्यासी स्वप्नीं विषय देखे । तरी विरजाहोम केला हें लटिकें ।
तेणें अधोगती यथासुखें । विषयअभिलाखें आणिली घरां ॥५६८॥
माझा निश्चयो नाहीं मनें । आम्ही सज्ञान ज्ञानाभिमानें ।
देह दंडितां पुरश्चरणें । क्रोधाचें नागवणें नागवी काम ॥५६९॥
मंत्राचीं बीजाक्षरें । चित्स्वरूपज्ञान गंभीरें ।
हें नेणोनि जापक निदसुरे । जपमाळाद्वारें भ्रमणीं पडिले ॥
एकीं शाब्दिकशास्त्रमूढीं । ज्ञातेपणाची उभाविली गुढी ।
पडतां कामक्रोधांची धाडी । स्वयें चरफडी देहलोभें ॥५७१॥
' शब्दादेवाऽपरोक्षधी ' । हे सत्य सच्छास्त्रोक्ती ।
शब्दीं शब्दविद्या नेणती । या लागीं न पवती अपरोक्ष सिद्धि ॥
सत्य कापुसाचीं वस्त्रें होतीं । परी कापूस नेसतां नागवे दिसती।
तेवि शब्दविज्ञानस्थिती । त्यां शाब्दिकां अंतीं अपरोक्ष कैचें ॥
चाटु नाना मधुरस वाढी । परी चाटु खातां नलभे गोडी ।
तेवि शब्दें स्वानंदजोडी । चवी चोखडी शब्दीं नाहीं ॥५७४॥
या रीतीं हें साधनधर्म । आचरतां नाना कर्म ।
माझे प्राप्तीचें निजवर्म । नेणती संभ्रम देहाभिमानी ॥५७५॥
माझी पावावया निजप्राप्ती । अन्वयें करावी माझी भक्ती ।
व्यतिरेकें माझी स्वरूपस्थिती । सांगेन तुजप्रती गुह्य माझें ॥

चतुःश्लोकी भा. ५६५-५७६

## १७४. नीतिमार्गानें मिळणारी चिरंजीवता

चिरंजीवपद पाववायासी । आन उपाय नाहीं साधकासी ।
किंचित बोलों निश्चयेंसीं। कळावयासी साधकां ॥१॥
येथें मुख्य पाहिजे अनुताप । त्या अनुतापाचें कैसें रूप ।
नित्य मृत्यु लागला समीप । न मानी अल्प देहसुख ॥२॥

म्हणे नरदेह किमर्थ निर्मिला । तो मीं विषयस्वार्थीं लाविला ।
थिता परमार्थ हातींचा गेला । करी वहिला विचार हा ॥३॥
ऐसा अनुताप लाहतां । तंव वैराग्य ये तयाच्या हातां ।
त्या वैराग्याची कथा । ऐक आतां सांगेन ॥४॥
तें वैराग्य बहुतांपरी । आहे गा हें अवधारीं ।
सात्त्विक राजस तामस त्रिप्रकारीं । योगीश्वरीं बोलिजे ॥५॥
नाहीं वेदविधि आचार । नेणे सत्कर्म साचार ।
कर्मधर्मीं भ्रष्टकार । तो अपवित्र तामस ॥६॥
त्याग केला पूज्यतेकारणें । सत्संग सोडूनि पूजा घेणें ।
शिष्यममता धरोनि राहणें । तें जाणणें राजस ॥७॥
वैराग्य राजस तामस । तें न मानेच संतास ।
तेणें न भेटे कृष्णपरेश । अनर्थास मूळ तें ॥८॥
आतां वैराग्य शुद्ध सात्त्विक । जें मी जगद्वंद्य मानी यदुनायक ।
तें तूं सविस्तर ऐक । मनीं निष्टंक बैसावया ॥९॥
भोगेच्छाविषयक । तें तों सांडी सकळीक ।
प्रारब्धें प्राप्त होतां देख । तेथोनि निष्टंक अंग काढी ॥१०॥
कां जे विषय पांच आहेती । ते अवश्य साधका नाडिती ।
म्हणोनि लागों नेदी प्रीति । कवणें रीतीं ऐक पां ॥११॥
जेणें धरिला शुद्ध परमार्थ । त्यासी जनमान हा करी अनर्थ ।
तेणें वाढे विषयस्वार्थ । ऐक नेमस्त विचार हा ॥१२॥
वैराग्यपुरुष देखोनी । त्याची स्तुति करिती जनीं ।
एक सन्मानें करूनी । पूजेलागोनि पैं नेती ॥१३॥
त्याचें वैराग्य कोमळकंटक । नेट न धरीच निष्टंक ।
देखोनि मानस्तुति अलोलिक । भुलला देख पैं तेथें ॥१४॥

जनस्तुति लागे मधुर । म्हणती उद्धरावया हा हरीचा अवतार ।
आम्हांलागीं जाहला स्थिर । तेणें धरी फार शब्दगोडी ॥१५॥
हा पांच विषयांमाजीं प्रथम । शब्दविषय-संभ्रम ।
स्पर्श विषय सुगम । उपक्रम तो ऐसा ॥१६॥
नाना मृदु आसनें घालिती । विचित्र पर्यंक निद्रेप्रति ।
नरनारी शुश्रूषा करिती । तेणें धरी प्रीति स्पर्शगोडीं ॥१७॥
रूपविषय कैसा गोंवी । वस्त्रें भूषणें देती बरवीं ।
तेणें सौंदर्य करी जीवीं । देहभावीं श्लाघ्यता ॥१८॥
रूपविषय ऐसा जडला । रसविषय कैसा झोंबला ।
जें जें आवडे तें याला । गोड गोड अर्पिती ॥१९॥
ते रसगोडी करितां । घडी न विसंबे धरी ममता ।
मग गंधविषय ओढिता । होय तत्त्वतां त्या कैसा ॥२०॥
आवडे सुमनचंदन । बुका केशर विलेपन ।
ऐसें पांचहि विषय जाण । जडले संपूर्ण सन्मानें ॥२१॥
मग जे जे जन वंदिती । तेचि त्याची निंदा करिती ।
परि अनुताप नुपजे चित्तीं । ममता निश्चितीं पूजकांची ॥२२॥
म्हणाल विवेकी जो आहे । त्यासी जनमान करील काय ।
हें बोलणें मूर्खांचें पाहे । जया चाड आहे मनाची ॥२३॥
ज्ञात्यासी प्रारब्धगती । मान झाला तरी नेघों म्हणती ।
परी तेथेंचि गुंतोनि न राहती । उदास होती तात्काळ ॥२४॥
यापरी साधकाच्या चित्ता । मानगोडी न संडे सर्वथा ।
जरी कृपा उपजेल भगवंता । तरी होय मागुता विरक्त ॥२५॥
तो विरक्त कैसा म्हणाल । जो मानलें सांडी स्थळ ।
सत्संगीं राहे निश्चळ । न करी तळमळ मानाची ॥२६॥

मांडीना स्वतंत्र फड । अंगा येईल अहंता वाड ।
न धरी जीविकेची चाड । न बोले गोड मनधरणी ॥२७॥
नावडे प्रपंचीं बैसणें । नावडे कोणाशीं बोलणें ।
नावडे योग्यता मिरवणें । वरवें खाणें नावडे ॥२८॥
नावडे लौकिक परवडी । नावडती लेणीं लुगडीं ।
नावडे परान्नगोडी । द्रव्यजोडी नावडे ॥२९॥
नावडे स्त्रियांत बैसणें । नावडे स्त्रियांतें पाहणें ।
नावडे स्त्रियांचें रगडणें । त्यांचें बोलणें नावडे ॥३०॥
नको नको स्त्रियांचा सांगात । नको नको स्त्रियांचा एकांत ।
नको नको स्त्रियांचा परमार्थ । करिती आघात पुरुषांसीं ॥३१॥
म्हणाल गृहस्थ साधकें । स्त्रिया सांडोनि जावें कें ।
येच अर्थीं उत्तरा निकें । ऐका आतां सांगेन ॥३२॥
तरी स्वस्त्रियेवांचोनी । नातळावी अन्य कामिनी ।
कोणे स्त्रियेसंनिधवाणी । आश्रयो झणीं न द्यावा ॥३३॥
स्वस्त्रीसही कार्यापुरतें । पाचारावें स्पर्शावें निरुतें ।
परी आसक्त होऊनियां तेथें । सर्वथा चित्तें नसावें ॥३४॥
नरनारी शुश्रूषा करिती । भक्तिममता उपजविती ।
परी शुद्ध जो परमार्थी । तो स्त्रियांचे संगतीं न बैसे ॥३५॥
अखंड एकांतीं बैसणें । प्रमदासंगें न राहणें ।
तो निःसंग निरभिमानें । त्याचें बैसणें सर्वदा ॥३६॥
कुटुंबआहाराकारणें । अकल्पित न मिळे तरी कोरान्न करणें ।
ऐसे स्थिति जें वर्तणें । तें जाणणें शुद्ध वैराग्य ॥३७॥
ऐसी स्थिति नाहीं ज्यासी । तंव कृष्णप्राप्ती कैंची त्यासी ।
यालागीं कृष्णभक्तीसी । ऐसी स्थिति असावी ॥३८॥

या स्थितीवेगळा जाण । कृष्णीं मिळे तो अज्ञान ।
तो सकळ मूर्खांचें अधिष्ठान । लटिकें तरी आण देवाची ।।३९।।
हे बोल माझिये मतीचे । नव्हेती गा साचे ।
कृष्णें सांगितलें उद्धवहिताचे । मी साच तें बोलिलों ।।४०।।
साच न मानी ज्याचें मन ! तो विकल्पी न पवे कृष्णचरण ।
माझें काय जाईल जाण । मी बोलोन उतराई ।।४१।।
साधावया वैराग्य ज्ञान । मनुष्यदेहीं करावा प्रयत्न ।
सांगे एका जनार्दन । आणिक प्रयत्न असेना ।।४२।

चिरंजीवपद, १–४२

## १७५. परमार्थाविषयीं चाड असेल तर भावार्थ मळूं देऊं नये.

येथ भावार्थ, तैं निजस्वार्थू । भावार्थ तैं कृतकृत्यार्थू ।
भावार्थ, तैं परमार्थू । पाषाणीं पविजे ।।४३२।।
येथ भावार्थ, तैं भ्रांति फिटे । भावार्थ, तैं विकल्प तुटे ।
भावार्थ तैं देव भेटे । भाविला ठायीं ।।४३३।।
भावार्थ तरी सत्यवादु । भावार्थ तरी सत्य साधु ।
भावार्थ तरी सत्य बोधु । चिन्मात्रें ।।४३४।।
भावार्थ तैं संकल्प तुटे । भावार्थ तैं देव भेटे ।
भावार्थ नाहीं तैं कष्टे । दैवहता ।।४३५।।
भावार्थ तरी तीर्थ फळे । भावार्थ तैं तत्त्व कळे ।
वैकुंठींचे भावबळें । पाहुणे येती ।।४३६।।
भावों तैं भज्य भजना । भावें तुटे विकल्प कल्पना ।
भाव तैं भावना । तत्काळ फळे ।।४३७।।

भावो तैं श्रेष्ठ भाग्य । भावो तैं वरिष्ठ वैराग्य ।
भावो तैं आरोग्य । भवरोगाचें ॥४३८॥
भक्त भावार्थी निजाचा । तैं देव सेवकु होय सेलेचा ।
बोल बोले जे वाचा । ते तत्काळ करी ॥४३९॥
द्रौपदीचे भावासाठीं । अंबर अंबराच्या पोटीं ।
करूनियां जगजेठीं । राखिली लाज ॥४४०॥
प्रल्हाद पुत्र शत्रूचा । परी भाव फळला त्यासि त्याचा ।
द्वंद्व निरासी सर्वांगाचा । वोळगणा देवो ॥४४१॥
यालागीं भावो तैंचि जयवृत्ती । भावो तैं परमप्राप्ती ।
भावो तैं ख्याती । परमार्थाची ॥४४२॥
भावार्थी सत्य गुरु । भावार्थें निजनिर्धारु ।
भावो नाहीं तैं भूमिभारु । जन्म होये ॥४४३॥
गुरुशिष्यांचिया बोला । भावार्थचि मोला आला ।
तो भाव जैं पालटला । तैं बुडाला परमार्थू ॥४४४॥
यालागीं चाड जैं परमार्था । तैं मळों न द्यावें भावार्था ।
भावेंवीण सर्वथा । परमार्थ न घडे ॥४४५॥
जरी मळका होय भावार्थ । तैं मळकाचि मिळे परमार्थ ।
मग भावानुसार स्वार्थ । सकळ लाभे ॥४४६॥
दृढ भावें भावना । जैं उद्भट उपजे मना ।
तैं जनीं जनार्दना । देखिजे साचें ॥४४७॥

स्वात्मसुख ४३२–४४७

### १७६. गुरुभक्तीवांचून परमार्थाचा मार्ग नाहीं.

भावें सद्गुरूते भजतां । स्रष्टा पावला स्वस्वरूपता ।
यालागीं गुरुभक्तीपरता । मार्ग परमार्था असेना ॥६८९॥

जरी साच चाड परमार्थी । तरी भावें भजावें गुरुनाथा ।
सकल साधनांच्या माथां । जाण तत्वतां गुरुभक्ति ॥६९०॥
ज्याचें मुखीं गुरूचें नाम । ज्यासि गुरुसेवा नित्यकर्म ।
तो देहासहित परब्रह्म । त्यासि कर्माकर्म बाधीना ॥६९१॥
ज्यासि स्वानंदें गुरुभक्ति । त्याच्या चरणतीर्था तीर्थें येती ।
वेद बंदीजन होती । सुरनर वंदिती पदरज त्याचें ॥६९२॥
गुरुभक्ति नांदे ज्याचें घरीं । यम त्याची तराळकी करी ।
काळ आज्ञा वाहे शिरीं । तो पूजिजे हरि परमात्मभावें ॥६९३
गुरुभक्तीचे पवाडे । वर्णितां वेदांसि मौन पडे ।
गुरुभक्तीवरतें चढे । ऐसें चोखडें साधन नाहीं ॥६९४॥
शिष्यें करावें माझें भजन । ऐसें वांछी जरी गुरूचें मन ।
तो गुरुत्वा मुकला जाण । अभिमानें पूर्ण नागवला ॥६९५॥
जगीं दाटुगा ज्ञानाभिमान । धनालागीं विकती ज्ञान ।
ते जाण शिश्नोदरपरायण । तेथ अर्ध क्षण ज्ञान न थारे ॥६९६
मुख्यत्वें गुरूचें लक्षण । ज्ञान असोनि निरभिमान ।
सर्वांगीं शांतीचें भूषण । तो सद्‌गुरु पूर्ण परब्रह्म ॥६९७॥

चतु:श्लोकी भा. ६८९-६९७

## १७७. सद्‌गुरूचे चरण हे सकळ साधनांमध्यें साधन होय.

म्यां नाहीं केलें उग्र तप । नाहीं जपिन्नलों मंत्रजप ।
योगयाग खटाटोप । नाहीं तीर्थादि भ्रमण ॥४५१॥
आम्हां सकळ साधनांचें साधन । हे सद्‌गुरूचे श्रीचरण ।
तेणें दाविली हे खूण । जग गुरुत्वें नांदे ॥४५२॥

आम्हां गुरु तोही गुरू। शिष्य तोही सद्‌गुरु ।
निरपराध तो परमगुरु । याचेनि पायें ॥४५३॥
ऐशियाचे सांडूनि पाये । कोण कोणा तीर्था जाये ।
जाऊनि काय प्राप्ती लाहे । हें नकळे मज ॥४५४॥
एका एकपणाची नाथिली दिठी । या एकपणाची सोडिली पेटी ।
मुक्त मुक्ताफळाची मोकळी गांठी । मिरवे जनार्दनचरणीं ॥
आतां सज्जनीं उपसहावें । हेंही नलगे प्रार्थावें ।
तेही सद्‌गुरुचि स्वभावें । झाले आम्हां ॥४५६॥
ऐशिया जी गुरुनाथा । एका एकत्व चरणीं माथा ।
ह्मणे वरद जी या ग्रंथा । द्यावा मज ॥४५७॥

स्वात्मसुख, ४५१-४५७

१७८. त्रैलोक्यव्यापिनी वस्तूची गुरुकृपेनें प्राप्ति.

परी त्रैलोक्यव्यापिनी वस्तु पाहीं । दाखवावया कांहींच नाहीं ।
कोण्हे तरी कांहीं । दाखविता कां ॥१११॥
जें सर्वत्र सदा असे । ते कोण्हेही तरी काळीं दिसे ।
ऐसें न करवेचि प्रकाशें । जयाचेनि ॥११२॥
ऐशी वस्तु सूर्यं न प्रकाशे । ते सद्‌गुरुकृपालेशें ।
आपणासगट भासे । तद्रूप जग ॥११३॥
जयाचिये कृपेपोटीं । हारपती सूर्यांच्या कोटी ।
न दिसे तें दावी दिठी । कृपाळू जो ॥११४॥
वेदविहिताचेनि बोलें । वेदवचनें जग धरिलें ।
वर्णाश्रमांचे वहिले । मार्ग वेदें ॥११५॥
वेदें द्योतिलें कर्म । वेदें प्रतिष्ठिला धर्म ।
वेदवचनें नेम । जगातें नेमी ॥११६॥

वेदशब्द सृष्टीचा अर्कू । वेदें तिखट केला तर्कू ।
वेदबळें लोकू । तोंडाळ जाला ॥११७॥
प्रपंच परमार्थ जाण । वेदेंचि केलें अभिधान ।
वेदास्तव अज्ञान । सज्ञान जाले ॥११८॥
येवढी जाणिवेची हांव । धरून घेवों गेला वस्तूचें नांव ।
तंव उलथोनि टाकिली शींव । अविद्येची ॥११९॥
आत्मा सच्चिदानंद । हाही अविद्यक बोध ।
आत्मा नामाचा अनुवाद । करितां वेद थोटावला ॥१२०॥
नित्यानित्याची खटपटा। करितां नामाची प्रतिष्ठा ।
नव्होचि मग उफराटा । लाजला वेदु ॥१२१॥
म्हणोनि वस्तूचिया पाठा । न चलवी वेदवचन वाटा ।
यालागीं 'नेति नेति' या निष्ठा । परतला तो ॥१२२॥
ऐसें वेदा न बोलवेचि शब्दें । तें सद्गुरुपादप्रसादें ।
निःशब्दाचि वाचा वदे । मौनेंवीण ॥१२३॥
नवल गुरुकृपेची करणी । मौनवी बोलवी वचनीं ।
जें आदिमध्यअवसानीं । तेणेंसीं शब्दू ॥१२४॥
वस्तूवांचूनि कहीं । वोस तंव उरलें नाहीं ।
मागुता शब्दु कवणें ठायीं । उपजेल सांगा ॥१२५॥
सागरु अवघाचि परता सारी । मग काशावरी चाले लहरी ।
तैसी वस्तूवीण शब्दकुसरी । शोभती कोठें ॥१२६॥
प्राण निःशेष जाये । तेथ निमिषोन्निमिष कोठें राहे ।
तैसी वस्तूवाण केवि होये । शब्दशोभा ॥१२७॥
यालागीं वेदासि जें कानडें । तें सद्गुरुकृपाउजियेडें ।
वाचेसि ये गांठीं पडे । वस्तु सबळ ॥१२८॥

स्वात्मसुख, १११–१२८

## १७९. गुरुसेवनानें सर्वार्थसिद्धि.

जेथ सद्‌गुरुकृपा पाहे । तेथ माया ममता कैची राहे ।
यालागीं गुरुसेवनें होये । सर्वार्थसिद्धि ॥१९६॥

जया स्वरूपाची गोडी । इंद्रियें नेणतीं बापुडीं ।
जें विषयकर्दमीं बुडीं । देऊनि ठाती ॥१९७॥

जें स्वरूपसुख कहीं । इंद्रियीं चाखिलें नाहीं ।
तें गुरुसेवनीं पाहीं । स्वसुख सेविती ॥१९८॥

जेथ इंद्रियां रिघतां सांकडें । तें इंद्रियद्वारां सुख जोडे ।
ऐसा सद्‌गुरुकृपा उजियेडें । अलभ्य लाभु ॥१९९॥

तरी पृथक पृथक इंद्रियवृत्ति । प्रवर्ततां आपुलाल्या अर्थीं ।
आत्मसुखाची प्राप्ती । अखंड लाभे ॥२००॥

दृष्टि स्वभावें घे रूप । तंव रूपचि होय स्वरूप ।
जैं सद्‌गुरुकृपेचा दीप । दृष्टीतें वरी ॥२०१॥

दृश्य देखों जाय दृष्टि । तंव दृश्य लोपे द्रष्टाचि उठी ।
ऐशी निर्विशेष त्रिपुटी । मिळूनि वाहे ॥२०२॥

श्रोत्रावधानीं शब्दू । तंव शब्दा सर्वांगीं निःशब्दू ।
यापरी परमानंदू । श्रवणार्थसिद्धि ॥२०३॥

सुमना न येता जो वासु । परममकरंद सुवासु ।
तो घ्राणद्वारें निर्विशेषु । भोगमिसें भोगवी ॥२०४॥

रसना रातली आवडी । ते मिथ्या विषयत्वाची त्वचा काढी ।
मग अभ्यंतरील गोडी । स्वसुखें सेवी ॥२०५॥

ताटभोक्ता परवडी । अवघें निर्विशेष वाढी ।
मग जिव्हें चोरूनि गोडी । रसना सेवी ॥२०६॥

जें जें आडळे आंगीं । तें आंगाचि होय वेगीं ।
ऐसेनि स्पर्श सर्वांगीं । सदानंद दाटे ॥२०७॥
वाचा उठोनि चौकटे । परी मौनाची मिठी न सुटे ।
शब्दचपळतेसवें प्रकटे । निःशब्द वस्तु ॥२०८॥
जैं सद्गुरुकृपा घडफुडी । तैं अतींद्रिय जे गोडी ।
ते इंद्रियकर्मीं उघडी । उदास रहाटे ॥२१७॥
या कारणें सद्गुरूची कृपा पाहे । तरी असाध्य तेंचि साध्य होये ।
यालागीं धरावे त्याचे पाये । निजात्मभावें ॥२१८॥

स्वात्मसुख, १९६-२१८

## १८०. जनार्दनकृपेनें एकनाथांत उठलेल्या आनंदलहरी

मूर्खासि सद्गुरुभजन । हें सर्वथा न घडे जाण ।
जन्ममरणाचें अधिष्ठान । संचितस्थान पापाचें ॥८८॥
मुके शब्दाची चातुर्यता । म्हैसा होईल पुराणवक्ता ।
किंवा पांगुळ जाईल तीर्था । हें सर्वथा न घडेचि ॥
श्रोतीं न मानावा खेद । म्यां आपुल्या मनासि केला बोध ।
भावें भजावा आनंदकंद । मोक्षाचें पद पावावया ॥
प्रपंचीं जरी सुख जोडे । तरी कां सेविती गिरिकडे ।
राज्य टाकूनि गेले थोडे । ते काय वेडे म्हणावे ? ॥
भर्तृहरीनें राज्य टाकिलें । तेणें श्रीगोरखातें पुसिलें ।
राज्य टाकूनि मुंडित जाले । कितेक गेले भूपती ॥
न लगे योगायागसाधन । न लगे व्रततीर्थ अनुष्ठान ।
न लगे वैराग्य तपदान । एक सद्गुरुभजन करावें ॥

जेणें मृत्यूचें मूळ तुटे । जन्ममरणाचें खत फाटे ।
पापपुण्याची वाढी खुंटे । धरणें उठे काळाचें ॥
ऐसा होवावया एक उपावो । भावें भजावा सद्गुरुरावो ।
जन्ममरणा पुसी ठावो । स्वस्वरूपीं जीव मेळवी ॥
बहुत बोलोनिया काय । ज्याचे पदरीं पुण्य होय ।
तोचि सद्गुरूसि शरण जाय । मुक्ति लाहे येचि देहीं ॥
याचि देहीं याचि डोळां । भोगिजे मुक्तीचा सोहळा ।
ऐसा कोणीएक विरळा । तोचि जिव्हाळा स्वरूपाचा ॥
तो म्यां देखिला जनार्दन । देखतांच गेला भवभ्रम ।
सुख जालें अनुपम्य घन । पावलों सदन मोक्षाचें ॥
मस्तकीं लागतां तयाचा करु । न मोडतां सृष्टीचा वेव्हारु ।
सर्व जालें शून्याकारु । तेजें अंबर दाटलें ॥
तया तेजाचा पारु । नेणती ब्रह्माहरिहरु ।
वेद राहिले मौन्यकारु । श्रुतीसी विचारु पडिलासे ॥
तयाते काय वाणावें । कवणा उपमेतें आणावें ।
त्याविण दुजें देखावें । तरी सांगावें साक्षित्वें ॥
जरी म्हणाल स्वरूप निराकार । तरी कोठूनि जाला विस्तार ।
या शब्दाचा विचार । श्रोतीं सादर परिसावा ॥
निर्गुण स्वरूपामाझारीं । अनंत ब्रह्मांडांची भरोवरी ।
स्वरूपाकार असतां अंतरीं । तोंचि बाहेरीं निघालें ॥
बीजें व्यापिलें वृक्षासि । तैसें निर्गुणें व्यापिलें सगुणासि ।
शब्दें आणिलें भिन्नपणासि । जैसें कनकासि अलंकारनामें ॥
ऐसा स्वरूपाचा विस्तारु । होऊनि उरला अपारु ।
तया स्वरूपाचा विस्तारु । ब्रह्मादिहरिहरु वेडावले ॥

त्यातें मौन्येंचि पाहिजे । रसनेविण गोडी घेइजे ।
भोग्येविण सुख भोगिजे । पद पाविजे गुरुखुणे ॥
सद्‌गुरूचे निजदास । तेचि पावती ये खुणेस ॥
परिसतां नावडे येरांस । जैसे पक्षियांसि नारळे ॥
सकळां साष्टांगनमन । तुम्हीं जावें सद्‌गुरूसि शरण ।
चुकवावें जन्ममरण । पावावें सुख मोक्षाचें ॥
मन असतां आनंदाभीतरीं । उठती सुखाचिया लहरी ।
म्हणोनि वदली वैखरी । प्रेमआनंदलहरी या नांव ॥
एकाजनार्दनीं एकनाथ । एक म्हणती विश्वंभरित ।
तो होऊनि कृपावंत । प्रेमआनंदलहरी वदविली ॥१५४॥

आनंदलहरी, ८८–१५४

## १८१. "गुरु ब्रह्म अभिन्नत्वें पूर्ण । तेथें शिष्यासि नुरे भिन्नपण"

माझे वाकुडेतिकुडे आर्ष बोल । त्यामाजीं ब्रह्मज्ञान सखोल ।
नित्य नवी प्रेमाची वोल । हे कृपा केवळ त्या संतांची ॥१८४॥
श्रीभागवत आणि भाषे मराठे । हें बोलणें नवल वाटे ।
पूर्वी नाहीं ऐकिलें कोठें । अभिनव मोठें धिटावा केला ॥
मुख्य संस्कृताचि मी नेणे । यावरी प्राकृत ग्रंथ करणें ।
जें कांहीं बोलिलें धीटपणें । तें क्षमा करणें जनकत्वें संतीं ॥
बालकाची सरे वडबड । तेणें माउलीची निवे चाड ।
मज आपुल्याचें तुम्हां कोड । प्राकृतहि गोड मानिला ग्रंथ ॥
माझें आरुषवाणें बोलणें । कळाकुसरी कौतुक नेणे ।
जें बोलविलें जनार्दनें । तेंचि ग्रंथकथनें कथिलें म्यां ॥

तो करवी तैसा मी कर्ता । हें बोलणें अतिमूर्खता ।
वाच्यवाचक जनार्दन वक्ता । ग्रंथग्रंथार्थ निजरूप दावी ॥
यालागीं पदपदार्थ खोडी । प्रेमरहस्य ज्ञानगोडी ।
हे माझ्या अंगीं नलगे वोढी । ग्रंथार्थ धडगोडी जनार्दन जाणे ॥
घाणां ऊस गाळिल्या जाणा । गुळाचा स्वामी नव्हे घाणा ।
तेवि मज मुर्खा गुह्यज्ञाना । वदला ज्ञातेपणा मीपण नलगे ॥
ऐसें सद्गुरूंनीं नवल केलें । माझें मीपण निःशेष नेलें ।
शेखीं माझें नांवें ग्रंथ बोलिले । प्रेम आणिलें ज्ञानार्थरसें ॥
गुरुब्रह्महि एकचि घडे । परि गुरुदास्यें ब्रह्म आतुडे ।
गुरुवाक्यें निजनिवाडें । ब्रह्मासि जोडे प्रतिष्ठा पैं ॥
गुरुब्रह्म अभिन्नत्वें पूर्ण । तेथें शिष्यासि नुरे भिन्नपण ।
तेव्हां जन तोचि जनार्दन । जनार्दनीं जन अभिन्नत्वें नांदे ॥
ऐसा निजात्मा श्रीजनार्दन । अनुभवितां न होय आन ।
कायावाचामनबुद्धिप्राण । इंद्रियेंहि जाण जनार्दन जाला ॥
यालागीं वाचा जें वावडे । तें जनार्दना अंगीं जडे ।
सैर करतांहि बडबडे । समाधीची न मोडे मौनमुद्रा ॥१००१॥

चतुःश्लोकी भा. ९८४–१००१

## १८२. "एका आणि जनार्दन । नांवें भिन्न, स्वरूपें अभिन्न"

सैराट धांवतां पाय । श्रीजनार्दन निजमाय ।
पदोपदीं कडिये घेत जाय । रितें पाऊल पाहे पडों नेदी ॥१००२॥
झणीं कोणाची दृष्टी लागे । यालागीं मज पुढेंमागें ।
सर्वदा तिष्ठे सर्वांगें । मीचि आचार्यसंगें निर्भय सदा ॥

जनार्दनजननी-अंगसंगें । भय तेंचि निर्भय होऊं लागे ।
कळिकाळ नित्य निजांगें । येऊनि पायीं लागे अहर्निशीं ॥
जनार्दनजननीचा स्नेह मोठा । चित्प्रकाश केला दिवटा ।
मोडेल अविद्येचा कांटा । म्हणूनि बोधखराटा भूमिका झाडी ॥
ऋद्धिसिद्धींची कुरवंडी । वोवाळूनि दूरी सांडी ।
निजानुभवाचें ताट मांडी । स्वानंदाचें तोंडीं ग्रास देत ॥
समाधीचे पालखीं सुये । अनुहताचा हल्लर गाये ।
यापरी जनार्दन निजमाये । निजीं निजविती होय निजदासा ॥
पुत्र शिष्य आणि सेवक । जनार्दनासी समान देख ।
परि पुत्रापरिस विशेष देख । शिष्यासि निजसुख स्वानंद दिला॥
त्या सुखाची निजगोडी । चतुःश्लोकींच्या पदमोडीं ।
श्रीसंतांलागीं घोंगडी । मराठी परवडी भावें केली ॥
नवल माउलीचें कोड । बाळक नासी तें लागे गोड ।
तेवि मी संतांचें लडिवाळ बोबड।माझें मराठीचें कोड चौगुण धरिती।
चतुःश्लोकी भागवता । व्यासें काढिलें मथितार्था ।
तो शोधूनि म्यां आइता । वोपिला संतां निजबाळकभावें ॥
तें माझी मध्यमावस्था । नेणे संस्कृत पदपदार्था ।
बाप आज्ञेची सामर्थ्यता । वचनें यथार्था प्रबोध जाला ॥
गुरुआज्ञा अत्यंत लाठी । ग्रंथार्थ खेळे माझे दृष्टीं ।
आज्ञेनें पुरविली पाठी । फाकट गोष्टींमाजींहि ज्ञान ॥
नित्यकर्म करितां जाण । ग्रंथींचें दिसे गुह्यज्ञान ।
मागें घालूनियां संध्यास्नान । ग्रंथार्थ पूर्ण प्रकटे पुढां ॥
जागृतीं दिसे ग्रंथार्थज्ञान । ग्रंथार्थमय जाहलें स्वप्न ।
सुषुप्तीमाजीं दुजेनविण । हें गुह्यज्ञान कोंदाटे पैं ॥

शब्दापुढें ज्ञान धांवे । ओवीपुढें अर्थ पावे ।
जें जें जीवीं विवंचावें । तें तें आघवें ग्रंथार्थ होय ॥
एवं भागवतींच्या मथितार्था । एकला एका नव्हे कर्ता ।
ग्रंथग्रंथार्थ अर्थविता । अंगें तत्वतां जनार्दन जाला ॥
एका आणि जनार्दन । नांवें भिन्न स्वरूपें अभिन्न ।
यालागीं ग्रंथाचें निरूपण । पूर्णत्वें पूर्ण संपूर्ण जालें ॥१०३६॥

चतुःश्लोकी भा. १००२-१०३६

## १८३. गुरुकृपेचे परिणाम.

श्रीगुरु श्रीहरि तुष्टमान । देखोनि उठावले ते नयन ।
श्रवणापूर्वीं आपण । दृश्यभेदाविण निजज्ञान सेवूं ॥३७६॥
श्रवणीं ऐसें तें शुभाक्षर । आम्हीच सेऊं साचार ।
ऐसा दृष्टीचा चमत्कार । देखणेपणें द्वार श्रवणाचें व्यापी ॥३७७
घ्राण म्हणे मी सवेगें । सुगंधवृत्तीसीं धांवेन वेगें ।
श्रवण नयनापुढें लगबगें । उभें स्वानंदयोगें सुखेंसीं पैं ॥३७८॥
ऐकोनि सद्गुरूच्या गुह्यज्ञाना । रसना विसरे विषयवासना ।
न चाखतां सद्गुरुगुह्यज्ञाना । ब्रह्मरस रसना सेवूं धावे ॥३७९॥
स्पर्श पांगला शरीरपांगें । देहबुद्धीसी घालूनि मागें ।
स्पर्शावया लागे वेगें । मी रिघेन सर्वांगें श्रीरंगसंगीं ॥३८०॥
धन्य धन्य श्रीगुरु सप्रेमज्ञान । बाह्यांसी येतसे स्फुरण ।
खेंव द्यावया आपण । भुजाहि सच्चिद्धन आलिंगूं पाहती ॥३८१॥
ऐसा इंद्रियांचा विवाद । ऐकोनि शब्द जाहला निःशब्द ।
मौनें सेवावया परमानंद । हरिनामाचा छंद सर्वांगीं गर्जे ॥३८२

चतुःश्लोकी भा. ३७६-३८२

## १८४. कळातीत आत्मकळेचें वर्णन

आतां संतांच्या मनोगतीं । तोंचि बोलावें प्रस्तुतीं ।
तरी सांगों स्वरूपस्थिती । सुनिश्चित ॥१२॥

तरी कठिणांशु करूनि वेगळ । पहातां जैसी स्फटिकशीळ ।
तैसें जाण सकळ । स्वरूप असे ॥१३॥

सांडूनि आर्द्रतेचा रोहो । नाडळत भरला डोहो ।
तैसी ते वस्तु पहा हो । सर्वत्र असे ॥१४॥

जडत्व सांडूनि निश्चळ । वसुधा जैसी पुष्कळ ।
तैसें ज्ञेय सकळ । सकळिक असे ॥१५॥

गगन सर्वांसी स्पर्शे । परी स्पर्शिलें हें न दिसे ।
आत्मा तैसा सन्निध असे । आडळेविण ॥१६॥

शून्यत्व सांडूनि गगनें । सर्वत्र जेवि असणें ।
आत्मा तैसा पूर्णपणें । सर्वदा सर्वीं ॥१७॥

जें नाडळें स्पर्शनीं । घसवटेना जनघसणीं ।
शून्या शून्यत्व करोनी । संविती असे ॥१८॥

जेवि वर्ततांही जगीं । नाडळत आडळे आंगीं ।
अंगा अंगत्वसंयोगीं । नुरऊनि असे ॥१९॥

सद्रूपाची निजात्मगति । सांगितली स्वरूपस्थिति ।
आतां चिद्रूपाची उपपत्ति । सहज दृष्टांतें सांगेन ॥२०॥

सांडूनि ज्वाळा काजळा । दीपप्रकाश उमाळा ।
असे, तैसी आत्मकळा । कळातीत ॥२१॥

कां रविबिंब अस्ता जाये । आणि प्रभा तैसीचि राहे ।
तैसी आत्मप्रभा पाहे । उष्णातीत ॥२२॥

ना तरी आंधारें सूनि पोटीं । उष्ण चांदणें दोन्ही घोटी ।
तयावरी जे दशा उठी । ते आत्मप्रभा ॥२३॥
कां डोळा सांडोनि मागें । दिसतें दवडूनि वेगें ।
माजीं देखणेपण सर्वांगें । सर्वत्र वस्तु ॥२४॥
अक्षर घालूनि माघारीं । शब्द न निघतां बाहेरी ।
माजीं अर्थु असे जयापरी । तैसी ते वस्तु ॥२५॥
आडळ सांडोनि आरसा । सन्मुख गगनाएवढा जैसा ।
तो असताचि नाहीं होय जैसा । आत्मा तैसा पैं असे ॥२६॥

स्वात्मसुख, १२–२६

## १८५. "परमात्मा परेश । जोडलियां कां डोळस । डोळे झांकी ?"

आकाशाचा दर्पण । सन्मुख जोडला संपूर्ण ।
तरी स्वरूपा कवण । पाहों विसरे ॥६२॥
तेथें पाहातां स्वरूप भासे । विस्मरणामाजीं तेंचि दिसे ।
कर्मक्रियेही सरिसें । लागलें सदा ॥६३॥
तें सांडितां सांडिले न जाये । डोळे झांकितां अधिक होये ।
देहाचा भ्रम निःशेष जाये । सहजान्वयें स्वभावें ॥६४॥
कां मुक्ताफळाचा परिसू । जोडलिया स्वप्रकाशू ।
तरी मुकुटीं बाणितां उल्हासू । न करी कवण ॥६५॥
कां कल्पतरूचें झाड । सुवास सुंदर आणि गोड ।
मीनलिया इंद्रियांचें कोड । न पुरवी कवण ॥६६॥
तैसा परमात्मा परेश । सर्वरूपें रूपस ।
जोडलियां कां डोळस । डोळे झांकी ॥६७॥

यापरी जे जे प्रतिमा । तेथें प्रगटे परमात्मा ।
हे गोडी आत्मयारामा । निर्मेनें रमवी ॥६८॥
जैसें सूर्याचीं किरणें । सूर्यापुढें धांवती जाण ।
तेणें प्रकाशें सूर्यपण । अधिकाधिक ॥६९॥
कां रत्नाची कीळ । रत्नावरी वाढे प्रबळ ।
तेणें रत्नासीचि केवळ । प्रबळता आणी ॥७०॥
कां चंदनाचा वासु । चंदनाहुनी चौपसु ।
धावे तेणें अति सुवासु । चंदना आणी ॥७१॥
कां अग्नीच्या ज्वाळा । अग्नीवरी वाढती प्रबळा ।
तिनें अतिरूप अनळा । आणिलें जैसें ॥७२॥
तैसें विश्वप्रकाशितया गभस्ती । त्याचें किरणें नाना व्यक्ती ।
तेथें नास्तिकता जे देखती । ते मूर्ख मृगतृष्णिका ॥७३॥
हो कां चिद्रत्नाची कळा । तें हें चराचर सकळा ।
ऐसी कळा न दिसे ते समळा । पडळ दृष्टी ॥७४॥

स्वात्मसुख, ६२–७४

### १८६. वस्तुप्राप्तीमुळें निष्कर्मता

तैसी साचार वस्तुप्राप्ती । जो नातळे देहस्थिति ।
तरी देहो वर्ते कवणें रीतीं । तें प्रारब्धशेषें ॥२८०॥
वारा वाजोनि सरे । रुखीं हेलावा थावरे ।
कां लक्ष्य भेदोनि तीरें । चालिजे पुढें ॥२८१॥
निशाणा घावो वाजोनि जाये । परी ध्वनि शेष उरला राहे ।
अर्क तपोनि अस्ता जाये । तरी उबारा उरे ॥२८२॥
जळ वोळोनि वोसरे । जळ अवघेंचि जिरे ।
परी भूमीं वोल थावरे । तेणें पिकती शेतें ॥२८३॥

तैशी अविद्या नासोनि जाये । परी प्रारब्धभोग शेष राहे ।
तेणें शेषें देह वर्तताहे । ज्ञानियांचा ॥२८४॥
जेवि कां पूर्वसंस्कारीं । मद्यप वस्त्र खांद्यावरी ।
आहे नाहीं आठवो न धरी । तैसें देह मुक्तासी ॥२८५॥
सर्प कांचोळी सोडोनि जाये । ते वारेन हालों लाहे ।
मुक्तांचें देह तैसें पाहे । कर्मी वर्ते ॥२८६॥
जैसें गळित पत्र वारेनि चळे । तैसें देह वर्ते प्राचीन मेळें ।
परी संकल्पाचेनि विटाळें । नातळे मन ॥२८७॥
अविद्या जेथ नासोनि जाये । देह तेंही अविद्याकार्यें ।
कारण नासलिया कार्य राहे । हें केवि घडे ॥२८८॥
वृक्ष मुळीं छेदिला जाये । आर्द्रता तत्काळ न जाये ।
तेवि अविद्यानाशें देह राहे । प्रारब्धअवधी ॥२८९॥
तया प्रारब्धाच्या पोटीं । सांगे सकळ जगांसी गोष्टी ।
अथवा दरेदरकुटीं- । माजीं पडो ॥२९०॥
कां आचरो सकळ कर्मे । कां तटस्थ राहो निभ्रमें ।
तें प्राचीनाचि परिणमे । तदनुरूपें ॥२९१॥
जेथ बाध्यबाधकता फिटली । समूळ अविद्या तुटली ।
तेथेंचि निर्विकल्प जाली । समाधि सैरा ॥२९२॥
ऐशी ज्यास समाधिअवस्था । भोग भोगुनी अभोक्ता ।
सकळ कर्मी अकर्ता । तोचि होय ॥२९३॥
तो इंद्रियांचेनि योगें । दिसे विषयावरी लोटे निजांगें ।
परी निःसंगता संयोगें । भोगा नेदी ॥२९४॥
पाहातां जळामाजीं झाली । आणि जळावरी वेलि गेली ।
परी जळेंसीं अलिप्त ठेली । पद्मिणीपत्रें ॥२९५॥

कां फुंकितां लखलखिला । जो फुंकास्तव प्रकटला ।
तो फुंक न साहतां ठेला । दीप जैसा ॥२९६॥
तैसी कर्मास्तव उत्पत्ती । आणि कर्मीचि जाली परमप्राप्ती ।
त्या कर्मामाजीं वर्तती । निष्कर्म होवोनी ॥२९७॥

स्वात्मसुख, २८०–२९७

## १८७. अभिमान समूळ तुटून चिन्मात्रपहाट फुटणें हीच समाधि

जेथ अभिमान समूळ तुटे । तेथ चिन्मात्रपहाट फुटे ।
समाधि नेटेंपाटें । म्हणती त्यातें ॥२६२॥
निरभिमान निरवधी । तेंचि अखंड समाधी ।
पराकाष्ठा ते समाधी । नव्हे जाण ॥२६३॥
ताटस्थ्या समाधि साचें । मानितां त्या स्वरूपाचें ।
ज्ञान नाहीं निश्चयाचें । अनुमानसिद्धी ॥२६४॥
आघातें मूर्च्छा आली । तेणें काया पडोनि ठेली ।
तरी काय तेथ झाली । समाधि साच ॥२६५॥
बहुरूपी सोंग संपादितां । वायु स्तब्धला अवचिता ।
तेणें सर्वांगीं ताटस्थ्यता । बहुकाळ झाली ॥२६६॥
परी वासना जेथ न तुटे । तेथ समाधि कैंची भेटे ।
सावध होतांचि प्रगटे । उचित जी राया ॥२६७॥
सर्व संकल्पा अवधी । ते निर्विकल्प समाधी ।
सकळ शास्त्र प्रतिपादी । समाधि तेंचि ॥२६८॥
स्वरूप देखोनि तत्वता । आश्चर्यें जाली तटस्थता ।
तरी जाण तेथ सर्वथा । वृत्ति आहे ॥२६९॥

स्वरूप देखोनि विस्मयो उठी । तोही जिरवूनि पोटीं ।
तयावरी जे दशा उठी । ते समाधि साचार ॥२७०॥

स्वात्मसुख, २६२–२७०

### १८८. "सर्वत्र समबुद्धि । या नांव परमसमाधि"

विवेकाचे निजनेटीं । धडधडीत वैराग्य उठी ।
विषयाची काढूनि कांटी । समाधि दृष्टीं समसाम्य प्रकटे ॥१०५१॥
ऐशी सर्वत्र समबुद्धि । या नांव परमसमाधी ॥
ते समाधीवरी त्रिशुद्धि । माझ्या मताची सिद्धि गुरुकृपा लाभे ॥
सर्वत्र जे समसाम्यता । या नांव समाधि तत्वतां ।
परि तटस्थादि काष्ठावस्था । समाधि सर्वथा नव्हे ब्रह्म ॥
समाधिमाजीं जो तटस्थ । तो जाणावा वृत्तियुक्त ।
वृत्ति असतां समाधिस्थ । तें मी अनंत सत्य न मनीं ॥
मूर्छित वृत्ति असतां पोटीं । समाधि म्हणणें गोष्टी खोटी ।
जेथ अहं सोहं विराल्या गांठी । ते समाधि गोमटी मी मस्तकीं वंदीं
ज्वर असतां नाडीआंत । आरोग्यस्नान तोचि घाता ।
तेंवि वृत्ति असतां, समाधिस्थ । तो जाण निश्चित आत्मघाती ।
सर्वभूतीं निजात्मता । होवोनि जाली सर्वत्र समता ।
ते बोलतीचालती समाधिअवस्था । मजही सर्वथा मानिली ॥
हें मी तुज सांगों काये । अनुभव तूंचि पाहे ।
जें तुज पूर्णत्व प्रकाशिलें आहे । तेथें होय नव्हे रिघेना ॥
'निजानुभव पाहें पूर्ण' । ऐसें ऐकतां सद्गुरुवचन ।
चमत्कारला चतुरानन । देहीं देहपण विदेहत्वा आलें ॥
जीवदशा वोवांडितां । निजात्मता पावों जातां ।
ते संधीं सत्वावस्था । अतिसप्रेमता वोसंडे ॥

निजात्मरूपीं पडतां दृष्टि । सुखाचा पूर लोटे पोटीं ।
हर्षें बाष्प दाटे कंठीं । परेसीं गोष्टी सद्गदित वाचा ॥
नेत्रीं आनंदाश्रूंचिया धारा । सुखोर्मी कांपे थरथरां ।
हर्षें उचलल्या रोममुद्रा । स्वेदामृतपुरा सार्द्रत्व ॥
अहं सोहं जालें लीन । मनें मन जालें उन्मन ।
चित्त जालें चैतन्यघन । जीव परिपूर्ण ब्रह्म जाला ॥
जेथें एक ना दुसरें । सन्मुख ना पाठिमोरें ।
जें जें जागें ना निदसुरें । जें सहजान्वयें खरें सदोदित ॥
जें केलें ना झालें । जें गेलें ना आलें ।
जें होतें ना हारपलें । संपूर्णत्वें संचलें परिपूर्ण ॥
जेथें न साहे रूपनाम । जेथें न साहे क्रियाकर्म ।
जेथें न रिघे धर्माधर्म । तें पूर्णब्रह्म परमेष्ठी जाला ॥१०८४॥

चतुःश्लोकी भा. १०५९-१०८४

## १८९. मुक्ताच्या आत्मस्थितीचें वर्णन

समाधिसुख जें नेटेंपाटें । जें योगमुद्रा योग्या भेटे ।
एका जनार्दनीं हाटेवाटें । तेणें सुखेंसीं सहज राहाटे ॥३१०॥
तो देखे तेंचि परब्रह्म । तो करी तेंचि सत्कर्म ।
त्याची लीला तो परमधर्म । धार्मिकांचा ॥३११॥
तो जल्पे तें वेदशास्त्र । तो वोसणाये तो महामंत्र ।
तो अनादींचें आदिसूत्र । अव्यक्तत्वें ॥३१२॥
तो पुरुषोत्तमा पुरुषोत्तम । तें विश्रांतीचें विश्रामधाम ।
तो निष्कामाचा काम । कामनाशून्य ॥३१३॥
त्याच्या श्वासोछ्वासांचे परिचार । तें आनंदाचें माहेर ।
त्याच्या निमिषोन्मिषांमाजीं घर । निजसुखें केलें ॥३१४॥

जो निर्गुण निःशब्दाचा । तो बोले आपुलिया वाचा ।
हा चाले तेथें समाधीचा । संतोष तोषे ॥३१५॥
तो बैसला दिसे एकदेशीं । परी तो सर्वदेशनिवासी ।
देह हिंडतां दिगंतासी । चलन त्यासी असेना ॥३१६॥
तो असे वसे जिये देशीं । तेथ चारी मुक्ती होती दासी ।
तो साचार भेटे त्यासी । परब्रह्मचि भेटलें ॥३१७॥
ईश्वर जो जगाचा । तो आज्ञाधारकु तयाचा ।
आनंद बोळगणा अंगाचा । आठे प्रहर ॥३१८॥
शम त्याचेनि समत्वा आला । संतोषु त्याचेनि संतोषला ।
अनुभवा अनभवु जाला । याचेनि अंगें ॥३१९॥
त्याचिये निद्रेपाशीं । समाधि ये विश्रांतीसी ।
शिणली माहेरा जैसी । विसावा धांवे ॥३२०॥
ज्ञान ज्ञातेपणें संतापलें । तें याचिये दृष्टीं जिवों आलें ।
वेद वोसंगा निवाले । वाचेचिये ॥३२१॥
हरिविरंच्यादि देव आले । ते याचेनि देवत्वा मुकले ।
शून्य शून्यपणा उबगलें । याचिये भेटीं ॥३२२॥
वैकुंठींचे मुक्तवासी । नवस नवसिती अहर्निशीं ।
ऐशियाची भेटी आम्हासी । होईल केव्हां ॥३२३॥
जे जगा वंद्य महामाये । जे हरिहरां वश नोहे ।
तें याचिये पायीं सामाये । नाहींपणें ॥३२४॥
जग जगपणें संतापलें । तें याचिये छायें निवों आलें ।
कीं छायेमायेसीं मुकलें । जगत्वा जग ॥३२५॥
अधिष्ठान परदेशी जालें । तें याचिया वोसंगा विसांवों आलें ।
कीं खेंव देऊनि सुखावलें । न सुटेचि मिठी ॥३२६॥

येवढिये प्रतीतीच्या अंगीं । निष्ठा काष्ठा गेली भंगीं ।
मग गुरुशिष्य दोन्ही भागीं । आपणपें स्वयें ॥३२७॥

स्वात्मसुख, ३१०–३२७

### १९०. निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः

ऐसिया ब्रह्मयुक्ता । कार्याकार्यकर्तव्यता ।
करणें नाहीं सर्वथा । कवणे काळीं ॥२९७॥
सर्व कर्में देहीं । निजपति परी कर्ता नाहीं ।
कर्मी ब्रह्म पाहीं । स्फुरत प्रतीति ॥२९८॥
त्या स्वात्मप्रतीतिप्रमाणें । तेणें जें जें कर्म करणें ।
तें कर्मचि ब्रह्मपणें । उभें ठाके ॥२९९॥
जळावरी लहरी । चंचळ निश्चळ कर्म करी ।
तेथें कर्मकर्त्यामाझारीं । जळचि जैसें ॥३००॥
एवं आत्मप्रतीती– । वेगळे नुरेचि कर्मस्थिती ।
यालागीं करूनि अकर्तृत्वीं । बैसणें नित्य ॥३०१॥
उगवलिया रजनीवर । भरितें उलथे सागर ।
अमृत सेविती चकोर । सोमकांत द्रवती ॥३०२॥
कुमुदें विकसती । संतप्ता विश्रांती ।
इतुकें करूनि रजनीपती । अकर्ता स्वयें ॥३०३॥
तेवि सकळइंद्रियवृत्ती । आत्मसत्ता प्रवर्तती ।
तऱ्ही कर्तृत्वमास्ति । आत्म्यांप्रती असेना ॥३०४॥
ऐसिया पूर्ण प्रतीती । ठेली कर्माकर्मगती ।
म्हणोनि कर्तृत्वमास्ति । नाहीं तया ॥३०५॥
दिसे एकदेशी देहीं । परी तो व्यापकु सर्व पाहीं ।
जो कूटस्थाच्या ठाईं । सनातनु जाला ॥३०६॥

घटीं दिसे घटाकाश । परी तेंचि सर्व दिवशीं सावकाश ।
तेवि एकदेशीं दिसे वास । परी तोचि सर्व देशीं निवासी ॥३०७

यालागीं तो जीवन्मुक्तु । देहीं असोनि देहातीतु ।
देखण्यामाजीं दिसतु । राहे देहीं ॥३०८॥

प्रदीपवस्त्रांची घडी । दिसे परी आगी रोकडी ।
तया देह हे गोष्टी कुडी । देखे मिथ्या ॥३०९॥

तैसा ब्रह्मावेगळा न होतां । वर्ते ब्रह्माचिया सत्ता ।
म्हणोनि जीवन्मुक्तता । बोलाची आख्या ॥३१०॥

जैसा खैराचा खुंट्ट । जळोनि दिसे लखलखित नीट्ट ।
परी पूर्वींच्या ऐसा हळुवट्ट । न धरवे हातीं ॥३११॥

यापरी देहातीतु । होऊनि देहीं तिष्ठंतु ।
तोचि जीवन्मुक्तु । मुक्तीवरील कळसु ॥३१२॥

त्या त्रिगुणमोहनी । जो जाळितु स्नेह सुरालागुनी ।
विधिनिषेध धूम करूनि । धरठल्या बुद्धी ॥३१३॥

ज्या ज्वाळाच्या शिखा । करपविती सत्यलोकनायका ।
मा इंद्रादि जीवांचा लेखा । कवण पां ॥३१४॥

ऐसिया त्रिगुणअनिळा । देहात्मकाष्ठाचा जिव्हाळा ।
तो तोडूनि जाळावया ज्वाळा । पुढें इंधन नाहीं ॥३१५॥

मग तो जेथील तेथें । नासिला कूटस्थवातें ।
तयावरी अवचितें । स्वानंदमेघ वरुषे ॥३१६॥

तेव्हां त्रिगुणताप जाये । विधिनिषेधधूम्र राहे ।
मग सुशीतळ प्रकट होये । चिदानंद वोलावा ॥३१७॥

ज्याचेनि उल्हासें । मनबुद्धी उल्हासे ।
तो उल्हासुचि दिसतुसे । बुद्धी आणि दृष्टी ॥ ३१८ ॥

उल्हासु जाणिजे स्पर्शें । त्रिगुण गेलिया दृष्टी दिसे ।
त्यावेगळा भासे ऐसें । नुरेचि उरी ।।३१९।।
ऐसिया उर्वरिता । चित्त नाहीं मा कैची चिंता ।
स्वदेहीं परिपूर्णता । विश्वंभर जाला ।।३२०।।
तेथ इष्ट ना अनिष्ट । नीच ना श्रेष्ठ ।
गुप्त ना प्रकट । स्वतःसिद्ध जाला ।।३२१।।
तया भेद ना अभेद । मंत्र ना छंद ।
स्वदेहीं गोविंद । सदोदित जाला ।।३२२।।
सांडूनि त्रिगुणबुद्धी । तया कैंची निषेधविधि ।
ब्रह्मराणिवेच्या राजबिदीं । विचरतु जो ।।३२३।।
तया अपपर दोन्ही । वक्ताळ गेली मावळोनी ।
मीचि कोण हें जनीं वनीं । नाठवे वेगळें ।।३२४।।

शुकाष्टक, २९७–३२४

# रुक्मिणीस्वयंवर

## १९१. रुक्मिणीचें कृष्णास पत्र

पत्रिका पहावी सावधान । विलंब न करावा व्यवधान ।
प्रातःकाळीं आहे लग्न । ऐसिया समयीं पावावें ॥ २६ ॥
देखोनि लिखिताची तांतडी । एकला येऊनि घालिशी उडी ।
तेव्हां मज म्हणशील कुडी । बुद्धि धडफुडी ऐकावी ॥ २७ ॥
तुझिया निजबोधाची सेना । प्रत्यावृत्ति पाहोनि नयना ।
स्वानुभवाचेनि भारें जाणा । सावधान होऊनि यावें ॥ २८ ॥
स्वरूपतेचिया मदगजा । गुढार घालावें जी ओजा ।
प्राणापान जिणती पैजा । तैसे वारू पालाणी ॥ २९ ॥
जाणोनि जाती मनोरथ । तैसे संजोगावे रथ ।
चक्रवाटातळीं पर्वत । पीठ होती कर्माचे ॥ ३० ॥
तुझिया निजबोधाचे गाढे । द्वैतदलनीं जे वेगाढे ।
तेचि यादव करूनि पुढें । सबळ बळेंशीं त्वां यावें ॥ ३१ ॥
बाह्यदृष्टीं जरी तूं येशी । तरी तर्क पडेल लोकांसी ।
कळों न देतां दुजियासी । गुप्तरूपें प्रगटावें ॥ ३२ ॥
कृष्णासी शिकविते बुद्धी । म्हणाल चतुर तुम्ही अनादी ।
हृदयशून्य कृष्ण त्रिशुद्धी । वर्तणें बुद्धी माझेनी ॥ ३३ ॥
प्रबळ बळेंशीं सबळ । म्हणाल कां बोलाविते बरळ ।
माया माहेरीं प्रबळ । स्थूळास्थूळ अरिवर्ग ॥ ३४ ॥
सखा जिवलग बंधु सबळ । मागध अद्धा प्रबळ ।
मंथोनि चैद्यादि खळ । मज केवळ पर्णावें ॥ ३५ ॥

म्हणशील ढालगजा मोठी । गोड बोलाची प्रकृति खोटी ।
येवढी कां सोसूं आटाआटी । म्हणोनि गोष्टी नुपेक्षावी ॥३६॥
तूं तंव अजिंक्य गा धडफुडा । तुझेनि नांवें वाटीव भेडा ।
मज पर्णावया आळसदवडा । होईं गाढा वीरवृत्ती ॥ ३७ ॥
म्हणशील युद्ध मांडेल कडाडी । मी उठेन काढाकाढी ।
नाहीं लौकिक परवडी । कैंची घडी घडवटे ॥ ३८ ॥
कैंचा अंत:पट जाण । कवण म्हणेल सावधान ।
मींतूंपणा नाहीं व्यवधान । म्हणशील लग्न कैसेनि लागे ॥३९॥
ऐसेनि लग्न लागलियापुढां । रणीं नाचेल मरणधेंडा ।
वोवाळणी बाण प्रचंडा । परस्परें पडतील ॥ ४० ॥
पाणिग्रहण ब्राह्मणांसीं । खड्गलग्न क्षत्रियांसी ।
रणीं जिंकोनि महाशूरांशीं । राक्षसविधी मज पर्णी ॥ ४३ ॥
जागृतीं स्वप्नीं सुपुप्तिकाळां । तुजविण आन न देखें डोळां ।
ग्लांति लिहितां वेळोवेळां । उबग गोपाळा न मानावा ॥४४॥

रुक्मिणी–स्वयंवर, ४. २६–४४

## १९२. श्रीकृष्ण–वरपूजा

समाधिसुख तेंचि आसन । मुक्तचौके मंडप जाण ।
बैसावया श्रीकृष्ण । भीमकें विंदान मांडिलें ॥७९॥
चारी पुरुषार्थाची चवाई । तेंचि आसन त्यावरी पाही ।
पूजावया निजजांवई । भीमक ठायीं तिष्ठत ॥८०॥
म्हणती आचार्य सावधान । शब्द सांडून धरा मौन ।
वर वरिष्ठ श्रीकृष्ण । फल संपूर्ण त्या हातीं ॥८१॥

पाहतां श्रीकृष्णाचें रूपडें । अरूपें कृष्ण चहूंकडे ।
विस्मयें भीमक झालें वेडें । मागें पुढें हरि देखे ॥८२॥
अनंत रूपें यादवपती । कैसेनि मी पूजूं श्रीपती ।
पूज्यपूजकतावृत्ती । हेही स्थिति नाठवे ॥८३॥
केवळ प्रपंच तें वऱ्हाड । परि भीमकाचें भाग्य वाड ।
पुरत परमार्थाचें कोड । वऱ्हाड गोड त्या झालें ॥८४॥
उदक घाली शुद्धमती । चरण प्रक्षाळी नृपती ।
तीर्थें चरणतीर्थ मागती । कृष्णपदप्राप्ति दुर्लभ ॥८५॥
कृष्णकपाळा पावे कोण । तेथेंही सप्रेम चंदन ।
भीमकें अर्पिलें शुद्ध सुमन । कृष्णभजन निजभावें ॥ ८६ ॥
शुद्धसत्त्वाचें विरजांबर । चिद्रत्नाचे अलंकार ।
भीमकें अर्पूनिया अपार । कृष्ण वर पूजियेला ॥८७॥
भीमक गौरवी व्याहियांसी । व्याहीरूपें देखे कृष्णासी ।
भूतमात्रीं हृषीकेशी । निजवृत्तीसीं ठसावला ॥८८॥
वृद्धपरंपरा ऐसी आहे । वरचरण उटी वधूमाये ।
शुद्धमती येऊनि लवलाहें । वदन पाहे कृष्णाचें ॥८९॥
मुगुट कुंडलें कौस्तुभमाळा । झळकत पीतांबर मेखळा ।
देखोनियां घनसांवळा । दोहीं डोळां निवाली ॥९०॥
झणीं लागेल बाह्यदृष्टी । म्हणोनि घेतली इटीमिटी ।
निंबलोण उठाउठीं । करी गोरटी निजभावें ॥९१॥
कृष्णचरणीं लावितां हळदी । अहंभावेंसीं ठकली बुद्धी ।
लाज विसरली त्रिशुद्धी । मीं-तूं उपाधी नाठवे ॥९२॥
ज्याचे चरणींचे रजःकण । शिवविरंची आपण ।
वंदिताती सांडूनि गुण । ते कृष्णचरण पावली ॥९३॥

अक्षवाणें करी आरती । कृष्णप्रभादीपदीप्ती ।
कृष्णीं लागलियां परमप्रीती । चित्तवृत्ती तद्रूप ॥९४॥

रुक्मिणी–स्वयंवर, १४. ७९–९४

## १९३. जीवशिवांचा लग्नसोहळा

अंतःपट आहे ज्यासी । वेगें सावध करा त्यासी ।
पळ अक्षर निमिषोनिमिषीं । हरिचरणासी चिंतावें ॥१॥
सद्गुरु म्हणती सावधान । घटिका होऊं आली पूर्ण ।
वचनीं नेदावें प्रतिवचन । सावधान परिसावें ॥२॥
सांडा चौघींची कळकळ । महामौनेंसीं रहा निश्चळ ।
लग्नघटिका भरे चपळ । अति सबळ वेगेंसीं ॥३॥
अंगीं धरूनि जाणपण । वचना देती प्रतिवचन ।
तेणेंचि वचनें त्यांसी दूषण । सावधानपण त्यां नाहीं ॥४॥
अतिसमयो वर्ते लग्न । दोहीं पक्षीं सावधान ।
अच्युतचिंतनीं राखा मन । सावधान निजबोधें ॥५॥
ओं पुण्याहं पडली मिठी । द्वैतभावाची सुटली गांठी ।
सुटला अंतःपट दृष्टी । उठाउठी हरीवरी ॥६॥
भीमकीमाथां एकाएक । कृष्ण अक्षता घाली देख ।
तोंचि मस्तकीं हस्तक । परम सुख पावली ॥७॥
भीमकी कृष्णाचिया माथां । घालूं जाय जंव अक्षता ।
कृष्णचि देखे सभोंवता । सबाह्यता परिपूर्ण ॥८॥
कृष्ण देखे जिकडे तिकडे । अक्षता घाली चहूंकडे ।
पुरोहित म्हणती लागलें वेडें । कृष्ण निवाडें नोळखसी ॥९॥

रुक्मिणी–स्वयंवर, १६. १–९

## ११४. रुक्मिणीस समचरणदर्शन

हरिखें नमूं पाहे गोरटी । तंव पूर्वील सख्या वक्रदृष्टी ।
देखतां लाजली पोटीं । भेद उठी शंकेचा ॥१०४॥
तेणें चुकविले समचरण । वृथा गेलें जी नमन ।
मायेसकट हांसती जन । येरीं अभिमान धरियेला ॥५॥
थोर अभिमानली बाळी । धरी अंगुष्ठ करतळीं ।
नमन चुकों नेदीच ये वेळीं । तंव वनमाळी हांसत ॥६॥
येरी मस्तक जंव लोटी । तंव समचरणां पडली तुटी ।
अभिमानें केली हिंपुटी ! पाय ललाटीं न लागती ॥७॥
नमस्कारालागीं भले । येरीं मागुतें अंगुष्ठ धरिलें ।
तंव समसाम्य पाउलें । कांहीं केल्या नातुडती ॥८॥
जितुकें अभिमानाचें बळ । तितुकें निजदृष्टी पडळ ।
तेणें चुकाविलें चरणकमळ । वेगें वेल्हाळ गडबडली ॥९॥
वियोग न साहवे पोटीं । ऊर्ध्व श्वासें स्फुंदे गोरटी ।
चरण न लागती ललाटीं । कपाळें पिटी निजकरीं ॥११०॥
दुःखें म्हणतसें कटकटा । मर मर दुष्टा अदृष्टा ।
कृष्णपावलें या गोष्टी फुकटा । चरण ललाटा न लागती ॥११॥
लोक म्हणती सकळ । धन्य भीमकीचें कपाळ ।
तें हें आजि झालें निष्फळ । श्रीकृष्णचरण नातळती ॥१२॥
मनीं होती ऐसी आस । करूनि उटणियाचें मिष ।
कृष्ण नमीन सावकाश । तेंही उदास भाग्य झालें ॥१३॥
चरणां न पवेचि कपाळ । जीवीं लागली तळमळ ।
गात्रें जाताती विकळ । परम विव्हळ होतसे ॥१४॥

चंडवातें जैशी कर्दळी । उलथूं पाहे भूमंडळीं ।
त्याहून अधिक भीमकबाळी । गात्रें सकळीं कांपती ॥१५॥
नेत्रीं अश्रूंचिया धारा । अंग कांपे थरथरां ।
चरणवियोगें सुंदरा । शरीरभारा उबगली ॥१६॥
गळती अलंकार भूषणें । करमुद्रिका आणि कंकणें ।
पडली अवशेषित प्राणें । सत्त्वगुणें मूर्च्छित ॥१७॥
जीवनावेगळी मासोळी । तेंवि तळमळे भीमकबाळी ।
उद्धव कळवळिला तये वेळीं । आनंदजळीं वर्षत ॥१८॥
उद्धव म्हणे कृष्णनाथा । तुझी अवस्था शोधितां चित्तां ।
विनोद करिसी भक्तहिता । चरणीं माथा ठेवूं दे ॥१९॥
मग धांवोनियां लवलाहें । धरून भीमकीची बाहे ।
म्हणे उठीं उठीं वो माये । वंदी पाय कृष्णाचे ॥१२०॥
सांडी सांडी लज्जाभिमान । निर्विकल्प राखी मन ।
वृत्ती करूनि सावधान । हरिचरण वंदावे ॥२१॥
उद्धवाचिया वचनीं । दृढ विश्वासली रुक्मिणी ।
लाज सांडिली निपटूनी । कृष्णचरणीं निर्लज्जा ॥२२॥
समचरणांचिये भेटी । सुटल्या अहंसोहं गांठी ।
उठूं विसरली गोरटी । घाली मिठी हरिचरणीं ॥२३॥
वृत्तीसी झालें समाधान । खुंटला शब्द तुटलें मौन ।
भोगिताहे चैतन्यघन । समचरण वंदितां ॥२४॥
उपरमली विषयदृष्टी । निजानंदें कोंदली सृष्टि ।
तेथें हारपली त्रिपुटी । उठाउठीं निजलाभ ॥२५॥
कृष्णचरणीं जडली कैसी । देह विदेह नाठवे तिसी ।
विसरली विवाहसोहळ्यासी । कृष्णसाम्यतेसी समरस ॥२६॥

नोवरा नोवरी नाठवे हेतु । आण वाहूनि गेला दृष्टांतु ।
अर्थ स्वार्थ आणि परमार्थु । झाला अंतु अनंतीं ॥१२७॥

रुक्मिणी-स्वयंवर, १६. १०४–१२७

## १९५. ग्रंथसमाप्ति व फलश्रुति

जैसें वटबीज अल्पप्राय । परी विस्तारें गगना जाय ।
तैसीच हे कथा होय । थोडें न बहु विस्तार ॥ ६८ ॥
मूळ सांडूनि सर्वथा । नाहीं वाढविलें ग्रंथा ।
पाहात मूळींच्या पदार्था । अर्थकथा चालिली ॥ ६९ ॥
नाहीं ग्रंथारंभ संकल्प । नव्हता श्रोतयांचा साक्षेप ।
ग्रंथीं उजळला कृष्णदीप । सुरूपरूप हरिकथा ॥ ७० ॥
जेणें हा ग्रंथ कराविला । तो आरंभींच उपरमला ।
पुढें ग्रंथ कैसा चालिला । बोलतां बोला न बोलवे ॥ ७१ ॥
नेणों काय कृष्णनाथा । हे आवडली ग्रंथकथा ।
तोचि होऊनि श्रोता वक्ता । अर्थ परमार्थीं आणिला ॥ ७२ ॥
ये ग्रंथींचें निरूपण । जीवशिवा होतसे लग्न ।
अर्थ पाहतां सावधान । समाधान सात्त्विकां ॥ ७३ ॥
येथें विवेकी व्हावा वक्ता । सावधान पाहिजे श्रोता ।
त्याचेनि संवादें हरिकथा । सुख समस्तां होईल ॥ ७४ ॥
होऊनि अनुभवकसवटी । कथा चालली मऱ्हाटी ।
वोवी न चले फुकासाठीं । श्रद्धा पोटीं धरिलिया ॥ ७५ ॥
हे कृष्णकथा अलौकिक । महादोषांसी दाहक ।
भवरोगासी छेदक । अर्धमात्रा सेविलिया ॥ ७६ ॥
हे मुमुक्षूंची कुळदेवता । मुक्तांची तरी नित्य मुक्तता ।
येरां संसारियां सर्वथा । नवरसें निववीत ॥ ७७ ॥

येऱ्हवीं कोणी जरी स्वभावें पढे । तरी उघडती कानींचीं कवाडें ।
अर्थ ऐकतां निवाडें । पुढें पुढें अति गोड ॥ ७८ ॥
गोडपणा पडतां मिठी । सुटती जीवशिवांच्या गांठी ।
कृष्णकथा हे गोमटी । उठाउठी निजलाभु ॥ ७९ ॥
माझे पुरवावे मनोरथ । तों मनाचि झाले कृष्णनाथ ।
एका जनार्दनीं नित्य तृप्त । पारंगत हरिचरणीं ॥ ८१ ॥
एका जनार्दना शरण । म्हणतां केलें एकपण ।
सहज खुंटलें निरूपण । महामौन कथेचें ॥ ८२ ॥
मुखीं जनार्दनाचि वक्ता । जनार्दनाचि झाला श्रोता ।
जनार्दनाचि ग्रंथ लिहिता । सत्य सर्वथा हे वाणी ॥ ८३ ॥
वाराणसी महापुरीं । मनकर्णिकेच्या तीरीं ।
रामजयंतीमाझारीं । ग्रंथ निर्धारीं संपविला ॥८४॥
शके चवदाशें त्र्याणव । प्रजापति संवत्सराचें नांव ।
चैत्रमासाचें वैभव । पर्व अभिनव रामनवमी ॥८५॥
ते दिवशीं सार्थक अर्थीं । रुक्मिणीस्वयंवर समाप्ती ।
एकाजनार्दन कृपास्थिती । ग्रंथ वाराणसीप्रति संपविला ॥८६॥

रुक्मिणी–स्वयंवर, १८. ६८–८६.

भाग : ४ था

# भावार्थरामायण

## ११६. राम हाच भावार्थरामायणाचा कर्ता

मी नेणें मुळींच्या संस्कृतासी । मूर्खपण माझी मिरासी ।
त्या मूर्खाच्या मुखासीं । श्रीराम ऐसी कथा वदवी ॥९॥
माझें अंगीं मूर्खपण । माझें मी जाणे संपूर्ण ।
न करीं म्हणतां रामायण । श्रीराम आपण कथा प्रेरी ॥१०॥
प्रेरितांहि मी न करीं जाण । तंव स्वप्नामाजीं रामायण ।
श्रीराम विस्तारी संपूर्ण । ऊणखूण ग्रंथाची ॥११॥
जागृतीमाजीं वर्ततां । पुढें प्रकाशे रामकथा ।
दुश्चितपणें ठेवों जातां । राम तत्वता रामायण दावी ॥१२॥
करूं जातां फुकट गोष्टी । त्यांमाजीं रामकथा उठी ।
रामें पुरविली पाठी । खिळिली दृष्टी रामायणीं ॥१३॥
ऐसियांत न करीं म्हणतां । राम चढे मीपणाचे माथां ।
मग तो आपुलिया निजसत्ता । वदवी कथा बलात्कारें ॥१४॥
मज निजलों असतां जाण । राम थापटी आपण ।
म्हणे उठीं करीं रामायण । तेथें मी कोण न करावया ॥१५॥
यालागीं कथादूषणभूषण । माझें अंगीं न लगे जाण ।
कर्ता श्रीराम आपण । माझें मीपण तो जाला ॥१६॥
ग्रंथ निंदिती अथवा वंदिती । ते दोघे आम्हां ब्रह्ममूर्ति ।
हे श्रीजनार्दनाची युक्ती । उपदेश एकांतीं निजगुह्यार्थ ॥१७॥

भा. रा. बालकांड, ४. ९–१७

## १९७. एकनाथकालीन लोकस्थितीचें दर्शन

ऐसी शोधितां ब्रह्मपुरी । ब्राह्मण गोंविले दोरीं ।
कर्माभिमान त्यावरी शिरीं । सीता सुंदरी तेथें नाहीं ॥६२॥

सर्वांभूतीं असे भगवंत । ऐसी दया नाहीं जेथ ।
कैंचा राम कैंची सीता तेथ । मुद्रामंत्र ते दीक्षा ॥

पाहतां क्षत्रियांच्या थाटा । वाढिवेचा गर्व ताठा ।
लागतां हनुमंताचा चपेटा । स्वयें पटपटा पडतील ॥

मरणभय पोटाआंत । ते तंव क्षत्रिय अति अशक्त ।
तयासी नपुंसक म्हणत । सीता निश्चित तेथें नाहीं ॥

वैश्यांचें उदिमीं चित्त । अति लोलुप वांच्छिती वित्त ।
शीघ्र प्रवेशोनि पाहत । सीताशुद्ध्यर्थ न लभेचि ॥

आतां शोधूं शूद्र जाती । तीमाजीं अठरापगड जाती ।
तीं घरें धुंडाळित मारुती । सीतासतीशुद्ध्यर्थ ॥

चाटे असत्यवादी ऐका । अंगळुमंगळु बोलती देखा ।
हनुमंत जाणे आगळिका । लावील सीका पुरदहनीं ॥

सोनारांचा परिपाक । अवघे करिती ठकठक ।
देहाचा चोर एकएक । नाडिती लोक विश्वासें ॥

सोनारकामाचा विवेकु । समूळीं विश्वासघातकु ।
लटिकीं तुकें देती तुकतुकूं । घेती जोखजोखूं दों हातीं ॥

साडेपंधरा घेऊनि हातीं । देतां नागवले किती ।
सोनारकामाची हे ख्याती । सीता सती तेथें नाहीं ॥

व्यवहारियांची ऐसी दशा । कळांतराची बहु आशा ।
मुदला घालूनि फांसा । लाविती आशा अति लोभें ॥

लक्ष्मी देऊनि पुढिलां हातीं । काळा कागद लिहूनि घेती ।
तेणेंचि काळमुखें होती । खंती करिती जीवासीं ॥
देहींच्या खता देहींच व्यथा । त्याहूनि थोर कागदाच्या खता ।
त्याची व्यथा जीवाचे माथां । तिन्ही अवस्था अति दुःखी ॥
व्यवहारियांची ऐसी गति । धरण्याकारितां न लभे मुक्ती ।
धनलोभ्या कैंची मुक्ती । सीता सती तेथें नाहीं ॥

पाहतां तेलियाचें घर । नित्य करिती करकर ।
अवघे म्हणती पहारोपहार ! भेटा रामचंद्र उठलिया ॥
तेलियाची निजजाती । नित्य नवे फेरे खाती ।
तेथें कैंची सीता सती । निघे मारुती पुढारां ॥

मुळींचा तंतु तुटतां सांग । साळी विसरले मागें माग ।
पांजणी परवणीचा उद्वेग । अति लगबग खळीलागीं ॥
अहर्निशीं धोटे हाणितां । स्वरूप नुतरेचि सर्वथा ।
साऊट बारूट गेले वृथा । तेथें सीता न लभेचि ॥

तांबोळी सन्मान पारभरें । देंठझडी जाले एकसरें ।
म्हणती फेरारे फेरारे । अभ्यंतरें मुरकुटले ॥
रुसण्याफुगण्याचें कारण । पानापाशीं अति सन्मान ।
तेणें अंतरीं सडलीं जाण । पडिलें खान निजलोभा ॥

शिंपियाची अति कुसरी । घेवोनि लोभाची कातरी ।
अखंड खंडी नानापरी । गुप्तत्वें चोरी त्यामाजीं ॥
पहिलें अखंड खांडिलें । शिविल्या म्हणती त्या दंडिलें ।
शिंपियें ऐसें कर्म केलें । बाधक जालें त्याचें त्यासी ॥

रंगशाळा अलौलिक । काळें करिती शुद्ध सात्त्विक ।
काळे हात काळें मुख । अतिरंगित रंगारे ॥

नामरूपाच्या ठशावरी । काळेंबेरें पालव घरी ।
ऐसिया रंगारियाच्या घरीं । सीता सुंदरी लाभेना ॥
वेदपाठका नवलपरी । अनाध्याय स्वाध्याय घरीं ।
उदात्त अनुदात्त स्वरीं । वर्णोच्चारीं अभिमान ॥
ऐसी करितां वेदपठण । कोरडी शब्दांची खणखण ।
न वचती मानाभिमान । सीता चिद्रत्न तेथें कैंचें ॥
पाहतां विद्वांसाचें व्याख्यान । शास्त्रव्युत्पत्ति अति सज्ञान ।
ज्ञातेंपणें गर्वाभिमान । जडला तो जाण सोडीना ॥
जंव जंव शास्त्राची व्युत्पत्ति । तंव तंव अभिमानाची वसती ।
तेणेंचि गर्वाची होय स्फूर्ति । सीता सती तेथें नाहीं ॥
पाहतां ज्योतिष्यांची स्थिति । ते गोंविले अवघ्या ग्रहगतीं ।
ग्रह गती लाविती । सीता सती तेथें नाहीं ॥१०९॥

भा. रा. सुंदरकांड, १. ६२-१०९

११८. "श्रोत्री स्वयंपाकी संन्यासी ।
हे निजमाहेर विटाळासी"

श्रीराम जातां निजनगरीं । पाहों न येती अग्निहोत्री ।
पाहतां विटाळ होईल भारी । तंव राम दुरीं अंतरला ॥३९॥
ऐशिया विटाळाची परी । श्रीराम अंतरला दुरीच्या दुरीं ।
धुपधुपित पाकाभीतरीं । कर्मअहंकारीं गुंतले ॥४१॥
आम्ही उत्तम आश्रमवासी । श्रीराम जातो जनप्रदेशीं ।
पाहतां स्पर्श होईल आम्हांसी । दुरून संन्यासी पाहूं म्हणती ॥
विटाळाभेणें दुरूनि पाहतां । श्रीराम न दिसे सर्वथा ।
आश्रमाभिमानें पाहूं जातां । राम तत्वता लक्षेना ॥४३॥

अनुलक्षोनि श्रीरामासी । पिंगळा वेश्या धांवे उल्लासीं ।
मार्गीं झगटली संन्याशासी । हें लक्ष तिसी असेना ॥४४॥
मज कां झगटली हे रांड । रागें संन्यासी ठोकी दंड ।
येरी पाहतां श्रीरामाचें तोंड । दंडें उदंड सुखी जाली ॥४५॥
स्वामी तुमच्या दंडाचा घाव । तेणें दंडिला माझा अहंभाव ।
तो दंडीना तुम्हांसी पहा वो । पाहतां रामराव विटाळे देखा ॥
श्रीराम पाहतां विटाळ उडे । तो विटाळ संन्याशामाजीं दडे ।
म्हणोनि विटाळाचें सांकडें । संन्याशाकडे सर्वदा ॥४७॥
मी आत्मा सर्वांभूतीं परिपूर्ण । ऐसें भूतां देवोनि अभयदान ।
स्वयें केलें संन्यासग्रहण । तोचि आपण विटाळ देखे ॥४९॥
श्रोत्री स्वयंपाकी संन्यासी । हे निजमाहेर विटाळासी ।
त्यांमाजीं तो सदा मुसमुसी । देखती जगासि अपवित्र ॥५०॥
ऐसी विवादितां वेश्या संन्याशासीं । श्रीराम गेला स्वाश्रमासी ।
संन्यासी करितां मृत्तिकास्नानासी । आली हातासि मृत्तिका ॥५१॥
मी पवित्र, जग अपवित्र । हें स्वयंपाकाचें मुख्य सूत्र ।
तेणें विटाळें श्रीरामचंद्र । दुरीं दूरतर अंतरला ॥५२॥
वर्णाभिमान स्वाश्रमाभिमान । कर्माभिमान धर्माभिमान ।
न वंचितां सर्वाभिमान । रघुनंदन भेटेना ॥५३॥

भा. रा. बालकांड, २७. ३९-५३

## १९९ आंधळे हे जन!

जो स्त्रीसवें निरत झाला । मद्यप्राशनीं मातला ।
जो धनलोभें भुलला । त्याचा गेला विवेक ॥१०८॥
वेश्यागमनीं जे रत । ते सर्वदा अतिउन्मत्त ।
नाठवे स्वार्थ परमार्थ । स्वेच्छा विचरत खर जैसा ॥१०९॥

खर नेणे मर्यादा । दिवसां देखतां जनपदा ।
वेश्याद्वारीं विचरे सदा । न सरे कदा माघारा ॥११०॥
लाता हाणितां उरावरी । प्रीतीं धांवे संमुख खरी ।
पदांभिघात मुखावरी । आवडीं करी झेलित ॥१११॥
तैसा पुरुष कामाचारी । सुखचि मानी निरंतरीं ।
पाऊल जाऊं नेदी दुरी । हृदयावरी झेलित ॥११२॥
स्त्रीकामाची ऐसी रीती । ऐक मद्यप्याची स्थिती ।
वेंचून पदरची संपत्ती । स्वयें होती जगनिंद्य ॥११३॥
जेणें द्रव्यें ऐहिक भोग जोडे । सकाम कर्में स्वर्ग आतुडे ।
निष्कामें तरी डोळयांपुढें । तिष्ठे रोकडें मोक्षसुख ॥११४॥
वेंचूनियां ऐसें धन । करिताती मद्यपान ।
ते निजात्मघाती संपूर्ण । नरकसेवन आकल्प ॥११५॥
धनलोभी जे लुब्धक । स्वप्नीं न देखती सुख ।
जन्मादारभ्य देख । भोगिती नरक अनिवार ॥११६॥
मरणान्त झटें घेतां । रुका न मिळे सर्वथा ।
तथापि सायास करितां । आळस चित्ता उपजेना ॥११७॥
ऐसें ऐशा कष्टें मिळे । तें वाढवी उपायबळें ।
निजशरीर कष्टविलें । जेणें फळे निजमोक्ष ॥११८॥
जेणें भोगिजे इहभोग । जेणें भोगिजे स्वर्गभोग ।
जेणें साधे महायोग । जीवशिवविभाग जेथ लाहे ॥११९॥
एवढिये प्राप्तीचे दाते । ते कष्टती ज्ञानार्जनातें ।
इतरांसी कोण पुसे तेथें । दुःखी समस्तें संगतीचीं ॥१२०॥
देवधर्म नेणती कांहीं । पर्वकाळ ठाउका नाहीं ।
श्राद्धाची संभावना नाहीं । निराश पाहीं सदा पितर ॥१२१॥

जैं धनाचा वेंच होय । तैं प्राणाचि जाऊं पाहे ।
सणावाराची नेणे सोय । अतिथि येथें काय करील ॥१२२॥
कष्टें जोडिली संपत्ती । ते ठेविती अति निगुतीं ।
तोंडीं दगडमाती घालिती । आपण मरती धुळी खात ॥१२३॥
ऐसी एकएकाची जाती । अधःपाता स्वयें नेती ।
तिन्ही एकत्र जेथें मिळती । तें दुःख किती सांगावें ॥१२४॥

भा. रा. युद्धकांड, ४६. १०८–१२४

## २००. कृषीवल मढें झाकून पेरणी करतो, त्याप्रमाणें मनुष्यानें हातोहातीं परमार्थ साधावा.

मनुष्यदेहाची निजप्राप्ती । शिणतां न पवे लक्षांतीं ।
येथेंही विकल्प चित्तीं । तोंडीं माती पडली तीं ॥५८॥
एक नरदेह नेणोनि गेले । एकीं लटकें म्हणोनि उपेक्षिलें ।
एक ते गर्वें गिळिले । जें आम्ही जाणते सज्ञान ॥५९॥
एक ते साधनीं ठकले । आपमती सैरा भरले ।
एक करूं करूं म्हणतां गेले । करणें राहिलें तैसेंचि ॥६०॥
पोटीं अनिवार विषयस्थिती । ज्ञान मिरविती लोकांप्रती ।
जीविका त्यावरी करिती । घात निश्चितीं स्वयेंचि केला ॥६१॥
जेणें व्हावी निजप्राप्ती । तें वेंचलें विषयासक्ती ।
स्वयेंचि नागवले निश्चितीं । भांडवल हातीं असेना ॥६२॥
स्वप्नीं जोडिली जे संपत्ती । ते वेचितां नये जागृतीं ।
विषयी आणि ब्रह्मनिष्ठ म्हणविती । भ्रम निश्चितीं या नांव ॥
जरी धांवणें नागवी आपण । तरी कोण करील सोडवण ।
अभिमानें यापरी जाण । सकळ जन नागविले ॥६४॥

जे ज्ञानगर्वें नागविले । ते काळातें न देखती वहिले ।
सिद्ध आयुष्य वायां गेलें । जें जोडितां न मिळे पुण्यकोटी ॥
झालिया नरदेहप्राप्ती । परमार्थ साधावा हातोहातीं ।
जेंवि कृषीवलाची स्थिती । मढें झांकिती पेरणीसीं ॥६६॥
आजि हें राहो करीन पाहें । म्हणतां काळ कृपाळु नोहे ।
क्षणक्षणां जात आहे । उत्तम आयुष्य घेवोनियां ॥६७॥

भा. रा. युद्धकांड, ५५. ५८-६७

## २०१. "राजभवना"चे सात दरवाजे ओलांडून रामदर्शन घेणें हाच परमार्थ.

श्रीराममंदिर देखतां देख । सुमंतासी परम हरिख ।
मागील विसरला दुःख । परम सुख पावला ॥४७॥
रथ सांडोनि पहिलें द्वारीं । छत्रचामरें दुसरें द्वारीं ।
पादत्राणादि सामोग्री । तिसरें द्वारीं पैं राहे ॥४८॥
चौथें द्वारीं सांडित अर्थ । पांचवे द्वारीं निःशेष स्वार्थ ।
सहावे द्वारीं साधनें समस्त । स्वयें राहती सर्वही ॥४९॥
सांडोनि मीतूंपणाचा सांगात । रिघावें द्वाराआंत ।
तैंचि भेटे श्रीरघुनाथ । मुख्य परमार्थ या नांव ॥५०॥
भावार्थ तें राजभवन । प्रथम दारवंटा तें श्रवण ।
दुसरें द्वारीं तें साधन । नित्यानित्यज्ञान तें तिजें ॥५१॥
चौथा दारवंटा तें मनन । पांचवा तो निदिध्यासन ।
सहावा तो वैराग्य पूर्ण । सातवा तो जाण साक्षात्कार ॥५२॥
याचि मार्गाचे परिपाटीं । श्रीरामासीं होय भेटी ।
भरलिया जीवां अव्हाटीं । वाजती पाठीं यमदंड ॥५३॥

भा. रा. अयोध्याकांड, ५. ४७-५३

## २०२. रामप्राप्तीच्या मार्गांतील विघ्नें

जितुकी विषयांची आसक्ति । तितुकीं विघ्नें श्रीरामप्राप्ती ।
विषय तेचि भवबंधनप्राप्ती । नरकगती निजविषयें ॥४६॥
विष विषय समानस्थिती । परंतु विषया अधिक शक्ती ।
विष भक्षिल्या एकदां मरती । जन्ममरणपंक्ती विषयोंचि ॥४७॥
विषयांचे जे विषयभोग । तोचि इंद्रादिकां पदभंग ।
विषय तोचि मुख्य क्षयरोग । नित्य आघात तो विषय ॥४८॥
असो इतरांची इतर गती । मीच ठाकलों विषयासक्तीं ।
राम अंतरला हातोहातीं । मायामातुळस्थितीं विषयत्वें ॥४९॥
मायामातुळ विषयास्थिती । श्रीरामें त्यजिली निश्चितीं ।
जेथवरी विषयप्रीती । त्या रामप्राप्ती कदा न घडे ॥५०॥
जेथवरी मानाभिमान । जयासी ज्ञानगर्व गहन ।
त्यासी न भेटती श्रीरामचरण । प्रत्यक्ष प्रमाण मज घडलें ॥

भा. रा. अयोध्याकांड, ११. ४६–५१

## २०३. नरदेह भोगूंहि नये व त्यागूंहि नये; तो भगवन्मार्गीं लावावा.

नरदेहा ऐसें गोमटें । शोधितां त्रैलोक्यीं न भेटे ।
आणि देहा ऐसें वोखटें । अत्यंत खोटें आन नाहीं ॥६६॥
वोखटें म्हणोनि त्यागावें । तरी मोक्षसुखा नागवावें ।
गोमटें म्हणोनि भोगावें । तें अवश्य जावें अधःपाता ॥६७॥
हें भोगवे ना त्यागवे । निजपुरुषार्थलाघवें ।
भगवन्मार्गीं लावावें । तरीच पावावें परमसुख ॥६८॥
त्या पुरुषार्थाचें लक्षण । अशुभ वासना त्यागून ।
परमार्थीं दृढ राखावें मन । हें मुख्य लक्षण परमार्थाचें ॥६९॥

बाळक लाविजे अभ्यासीं । शनैः शनैः योग्यता होय त्यासी ।
तेवि आत्मअनुसंधानें चित्तासी । सावकासीं राखावें ॥७२॥
अनुसंधान सांडितां चित्ता । वळवून लावावें परमार्था ।
येविषयीं करावें पुरुषार्था । चित्तजयार्था साटोप ॥७३॥
दांत खावोनियां नेहटीं । लागावें मनोजयाच्या पाठीं ।
हात चुरोनियां उठाउठीं । मनोजय दृष्टीं लक्षावा ॥७४॥
अंगें आवरोनिया अंग । मनोजय करावा सांग ।
हाचि परमार्थाचा मार्ग । अति अव्यंग रघुनाथा ॥७५॥
सावधान अहोरात्र । चित्तें लक्षावें चिन्मात्र ।
हेंचि परमार्थाचें सूत्र । अति पवित्र निजनिष्ठा ॥७६॥
मनें मना सावधान । मनें मना निर्दाळण ।
मनें मना अनुसंधान । या नांव पूर्ण पुरुषार्थ ॥७८॥

भा. रा. बालकांड, ११. ६६–७८

## २०४. भक्तियुक्त काम हीच निष्कामता.

श्रीरामभक्त नित्य निष्काम । त्यांसी अनुसरोनि काम ।
सेवावया रघूत्तम । भजनधर्म वाढवित ॥ ११५ ॥
विषयकर्दमीं शिणला । तृप्ति न पवेचि वहिला ।
श्रीरामभक्तांसी विनटला । सुख पावला श्रीरामें ॥११६॥
श्रीराम नित्यानंदें निर्दोष । क्रियामात्र न रिघे देख ।
भक्त झाले तदात्मक । रघुकुळटिळकनिजभजनें ॥११७॥
तेथें कामें नवलपरी । रिघोनि भक्तांचें अंतरीं ।
भजन करीत नानापरी । निजनिर्धारीं परियेसीं ॥११८॥

अनावरा आवरित । अमूर्तांची मूर्ति घडित ।
अगोचरातें पाहत । संभावित असंभाव्या ॥ ११९ ॥
अचिंत्याचें नित्य चिंतन । अध्येयाचें नित्य ध्यान ।
अनाम्याचें नामकीर्तन । गुणवर्णन अगुणाचें ॥१२०॥
अनर्च्यातें नित्य आर्चित । चिदंबरा पांघरावित ।
सर्वालंकारा अलंकारित । संभावित असंभाव्या ॥१२१॥
चित्सचिदासी ओवाळणी । सर्वमंगळा मंगलश्रेणी ।
विचित्र पूजांचिया भरणीं । प्रीति करोनि अर्पित ॥१२२॥
संतोषावया श्रीराघव । ऐसा कामें योजिला भाव ।
तंव वर्तलें अपूर्व । निजलाघव रामाचें ॥ १२३ ॥
सेवा करितां पैं हरिखे । म्हणे उतराई कवतुकें ।
कांहीं झालों यथासुखें । तंव आपुलें देखे मूर्खत्व ॥१२४॥
जेथें मनाची नखी नलगे । चित्त चिंतितां दाटी उबगें ।
बुद्धि बोधामागें रिघे । अहं उगें थोटावें ॥ १२५ ॥
रिघतां इंद्रियां सांकडें । तेथेंही म्यां निजानंदमूढें ।
अखंडाचीं करोनि खंडें । पूजावंडें वाढविलीं ॥ १२६ ॥
ऐसी निजकर्माची खंती । कामें मानोनियां चित्तीं ।
स्वयें पावोनियां उपरती । विरे रघुपतीमाझारीं ॥१२७॥

भा. रा. युद्धकांड, ८६. ११९-१२७.

## २०५. रामदर्शन केव्हां होईल ?

प्रेमा म्हणिजे सत्वावस्था । राम तिहीं गुणांपरता ।
गुणीं पाहतां तत्वतां । राम सर्वथा भेटेना ॥ ४ ॥
म्हणोनियां अति सावधान । निःशेष रजतम त्यागून ।
सत्वावस्था उठली जाण । तीही आपण जिरवावी ॥५॥

प्रेमावस्थामूर्च्छितवृत्ती । येथें श्रवण कोणाप्रती ।
कोण पावे अर्थप्राप्ती । श्रोते निश्चितीं तटस्थ ॥ ६ ॥
जेथें गुणांचें आवरण । तेथें कैचें रामदर्शन ।
म्हणोनि साधकें आपण । सर्वथा गुण जिंकावे ॥ ७ ॥
निःशेष गुणांचा निरास । तैं मोक्षपुरीसीं होय वास ।
तुम्ही तरी तेथींचे क्षितीश । आणि अनुज रामाचे ॥ ८ ॥
म्हणोन तुम्ही तत्वतां । गिळोनियां सत्वावस्था ।
चला भेटूं रघुनाथा । अति सत्वरता निघावें ॥ ९ ॥
पाक जरी आला निगुतीं । तरी वाफ जिरों देती ।
बाहेर निघाल्या शीघ्रगतीं । राहे निश्चितीं अपक्क ॥१०॥
तेंवि रजतमांचे निरास । सत्व वाढलें असमसाहस ।
तेंही जिरतां सावकाश । राघवेश तैं भेटे ॥ ११ ॥

भा. रा. युद्धकांड, ७९. ४–११.

## २०६. रामकृपा होण्यास अनन्यभक्ति किंवा दृढवैरहि चालेल.

धन्य श्रीरामाची निजबुद्धि । वैरिया दे सायुज्यसिद्धि ।
वोखटें करूं नेणे त्रिशुद्धि । बुद्धीची सुबुद्धी श्रीराम ॥१०९॥
श्रीराम शांतीची नवलपरी । अपकार साहोनि अंगावरी ।
अपकारिया होय उपकारी । अगाध थोरी शांतीची ॥
श्रीरामस्वरूपदर्शन । सहसा पावों शके कोण ।
तेही विषयींचें निरूपण । सावधान अवधारीं ॥
ज्यासी राम सुप्रसन्न । त्यासीच भेटे रघुनंदन ।
इतराचें ज्ञानध्यान । तृणासमान श्रेष्ठत्व ॥

हृदयीं वैराग्य संपूर्ण । त्यांना राम सुप्रसन्न ।
वैराग्यावीण ज्ञानध्यान । तृणासमान श्रेष्ठत्व ॥

यज्ञदानतपःसंपत्ती । याची योग्य सामर्थ्यशक्ति ।
श्रीरामाची नव्हे प्राप्ती । जाण निश्चितीं लंकेशा ॥

पावावया श्रीरामप्राप्ती । दृढ वैर कां अनन्यभक्ति ।
येणें पाविजे रघुपति । जाण निश्चितीं लंकेशा ॥११५॥

भा. रा. युद्धकांड, २४. १०९–११५

## २०७. साधूंची संगति हेंच साधन !

हरिदासाचें आलिंगन । ऐसें सबाह्य करी पावन ।
अभागी देखती दोषगुण । सभाग्य पूर्ण सद्भावें ॥८९॥

साधूचें जें दर्शन । तेंचि परम अनुष्ठान ।
साधूचें जें भाषण । तपश्चर्या पूर्ण पूर्णत्वें ॥ ९० ॥

साधूचें चरणस्पर्शन । कैवल्य त्यापुढें तृण ।
अगाध साधूचे चरण । जेणें पावन महादोषी ॥९१॥

सज्जनासी आलिंगन । तेणें सर्वांग पावन ।
देहचि होय चैतन्यघन । कृपा सज्जन जैं करिती ॥९२॥

साधुसज्जनसंगती । सभाग्य भाग्यातें पावती ।
सत्संगें भवनिर्मुक्ती । वेदशास्त्रासी संमत ॥ ९३ ॥

सज्जनांचे पादस्पर्शें । तेणें कर्माकर्म निरसे ।
जन्ममरण सकळ नासे । त्या रहिवास परब्रह्मीं ॥९४॥

भा. रा. सुंदरकांड, २५. ८९–९४.

### २०८. "तुझे संगतीहूनि जाण। संगति गहन दासांची"

श्रीरामस्वामी सावधान। परिसावें माझें विज्ञापन।
तुझे संगतीहूनि जाण। संगति गहन दासांची ॥८७॥
तुझ्या आलिंगनीं देख। देसी जें निजात्मसुख।
तें देणें अलोलिक। वचनमात्रें निजभक्तीं ॥८८॥
वेदशास्त्रां नेणवसी। साधकासी नातुडसी।
तो कैंवि येरां आतुडसी। दर्शनासी धांडोळितां ॥८९॥
तीर्थीतीर्थी फिरों जातां। सर्वथा न लभे तुझी वार्ता।
अधोमुखें धूम्र घेतां। तूं सर्वथा नातुडसी ॥९०॥
पात करितां पर्वतीं। देह देतां कर्वतीं।
सर्वथा नव्हे तुझी प्राप्ती। सत्संगतीवांचूनी ॥९१॥
उग्र तपीं जो नातुडसी। तो श्रवणकीर्तनापासीं।
सत्संगतीसीं पैं तिष्ठसी। अहर्निशीं श्रीरामा ॥९२॥
सत्संगतीं कथाश्रवण। सद्भावें करितां संपूर्ण।
साकल्यें सांपडसी पूर्ण। श्रवणें जाण अनायासें ॥९३॥
अथवा कां हरिकीर्तन। विलज्ज करितां जाण।
नामें ओसरला येसी आपण। वत्सालागून धेनु जैसी ॥९४॥
सत्संगें नामकीर्तन। निःशंक करितां संपूर्ण।
न पाचारितां येसी धांवोन। समाधान कीर्तनीं ॥९५॥
भक्त विरक्त जरी चित्तीं। तरी ओळंगती चारी मुक्ती।
जरी भक्त न धरी हातीं। दाटोनि निघती घर त्याचें ॥९६॥
मुक्त होवोनि अंकिता। नित्य वोळंगती तुझिया भक्ता।
कृपेनें हात ठेवितां माथां। स्वयें रघुनाथा भेटसी ॥९७॥

विषमबुद्धी तुजपाशीं । सर्वस्वें भजती अहर्निशीं ।
त्यासीच तूं प्रसन्न होसी । बुद्धि ऐसी लाचुगी ॥९८॥
परी अभक्ताच्या घरासी । विसरोनियांही न वचसी ।
तैसें नाहीं तुझ्या भक्तासी । नाहीं मानसीं अरिमित्र ॥९९॥
निजहितीं चाड ज्यांसी । तिहीं सांडोनि इतर संगासी ।
दृढ धरितां सत्संगासी । निजसुखासी पाविजे ॥१००॥

भा. रा. युद्धकांड, ७१. ८७–१००

## २०९. "गुरुवाक्यें वीण जें ज्ञान । तें क्षयरोगी जन्मलें जाण"

स्वयंबुद्धीचें विवेकज्ञान । विकल्पमात्रें होय क्षीण ।
गुरुवाक्यें अति निपुण । तें ज्ञान पूर्ण निश्चयें ॥४१॥
जो ज्ञानानुभव गुरूचे ठायीं । तें ज्ञान अति अक्षयी ।
विकल्प न रिघे ते ठायीं । अति अनपायी गुरुज्ञान ॥४२॥
गुरुवाक्येंवीण जें ज्ञान । तें क्षयरोगी जन्मलें जाण ।
विकल्पमात्रें सांडी प्राण । अति क्षीण अपायी ॥४३॥
आचार्यवान् पुरुषो वेद । हें वेदवाक्य प्रसिद्ध ।
गुरुवाक्यें ज्ञान विशुद्ध । प्रजा प्रबुद्ध गुरुवाक्यें ॥४४॥

भा. रा. बालकांड, १०. ४१–४४

## २१०. सद्गुरु कोणास म्हणावें ?

कोण तो संत म्हणसी । जेणें भेट होय श्रीरामासी ।
ऐक त्याच्या चिन्हांसी । यथामतीसीं सांगेन ॥१०५॥
स्वस्वरूपीं अवधान । करी तो मुख्य साधु पूर्ण ।
त्या सद्गुरूपरता जाण । साधु आन असेना ॥१०६॥

मुख्य साधुत्व सद्‌गुरूसी । स्वयें सेवितां तयासी ।
लात देवोनि संसारासी । ब्रह्मत्व अंगासीं स्वयें घडे ॥१०७॥
सकळ साधनां श्रेष्ठ पूर्ण । मुख्यत्वें गुरुसेवन ।
गुरुदास्यापरतें जाण । साधन आन असेना ॥१०८॥
निष्काम पुण्याचिये जोडी । केल्या होती जन्मकोडी ।
तें लाहिजे रोकडी । निजआवडी गुरुचरणीं ॥१०९॥
नाना साधनीं बहुत । कदाकाळें नव्हे प्राप्त ।
तो गुरुदास्यास्तव येथ । होय प्राप्त निजात्मा ॥११०॥
तीर्थातीर्थांचिया प्रदक्षिणा । क्षम नुपजे ज्ञानध्याना ।
तेणें गुरुवचनासाठीं जाणा । आत्मदर्शन लाहिजे ॥१११॥
योगयागादि नानाव्रतें । स्वतां सामर्थ्य नाहीं त्यांतें ।
देखिलिया सद्‌गुरूतें । मुरडती समस्तें लाजोनी ॥११२॥
याकारणें भलतेणें । उठावया संसारधरणें ।
दृढ गुरुदास्य करणें । येर साधणें काज नाहीं ॥११३॥
मुखीं सद्‌गुरुनामस्मरण । मनीं गुरुमूर्तीचें ध्यान ।
श्रवणीं गुरुचरित्रश्रवण । करीं पूजन पादसेवा ॥११४॥
पायीं नित्य प्रदक्षिण । अथवा कां दर्शनागमन ।
बुद्धीचा निश्चयो पूर्ण । आज्ञा प्रमाण संप्रदायें ॥११५॥

भा. रा. युद्धकांड, ७१. १०५–११५

## २११. भक्तलक्षणें व भक्तिमहिमा

हरिभक्त ब्रह्मसंपन्न । ज्याच्या कुळीं होय उत्पन्न ।
तेणें सकळ कुळ पावन । ब्रह्मसंपन्न पैं होत ॥९२॥
हरिभक्त जन्मे जिचे कुसीं । अवघें त्रैलोक्य वंदी तिसी ।
तें प्रत्यक्ष घडलें कयाधूसीं । झाली जगासी अति वंद्य ॥९३॥

प्रल्हाद नुपजतांचि पूर्वीं । नारद मानी सर्वभावीं ।
बंदिमोचन इंद्रादि देवीं । प्रसूति भावी ऐकतां ॥९४॥
जेथें राहती भगवद्भक्त । तें भूमंडळ होय पुनीत ।
कीर्तनसुखें डुल्लत । जग उद्धरत ज्यांचेनी ॥९५॥
ज्याचेनि भूमंडळ पावन । ऐक त्या भक्ताचें लक्षण ।
स्वयें बोलिला भगवान । जड उद्धरण ज्याचेनि ॥९६॥
आनंदें करिती हरिकीर्तन । नामें सर्व गर्जे गगन ।
श्रोतियावक्तयाचें अंतरक्षाळण । न लागतां क्षण पैं होय ॥९७॥
क्षाळलेनि अंतरें । परमानंद अंतरीं भरे ।
चित्त चित्तपणा विसरे । न देखे दुसरें जगामाजीं ॥९८॥
जगाचे ठायीं विषमता । चित्तपणें भासे चित्ता ।
तेथें श्रवणकीर्तन करितां । स्वयें भगवंता रातले ॥९९॥
तेणें अंतर सुखावे तत्वतां । विषम जगामाजीं पाहतां ।
बुडाली विषयाची वार्ता । चिदाभासता सर्वत्र ॥१००॥
जेथें दुजेपणाचें भान । तेंचि लाजेसीं आयतन ।
हारपलें द्वैतभान । लज्जा पूर्ण निमाली ॥१०१॥
उन्मत्ताचे परी जाण । निर्लज्ज करी कीर्तन ।
तेणें कीर्तनें सदा आपण । करी नर्तन तालच्छंदें ॥१०२॥
जो मोलें घेऊनि मद्यासी । स्वयें होय विषयविलासी ।
तो विसरे देहभावासी । द्वैत त्यासी भासेना ॥१०३॥
उन्मादरस विचित्र । मेळवूनि केलें एकत्र ।
त्याचा एवढा बडिवार । क्षणें संसार विसरवी ॥ १०४॥
सकळ रसांचें रसपान । जे गोडियेमाजीं होती निमग्न ।
तो ब्रह्मरस सेविलिया जाण । संसारभाव केंवि उरे ॥१०५॥

ऐसे ब्रह्मरसमहायोगें । जगीं मद्भक्त दाट्टगे ।
कळिकाळातें जिणोनि वेगें । नामबळें जग उद्धरती ॥१०६॥

भा. रा. युद्धकांड, ७२. ९२–१०६

## २१२. भागवत संप्रदायाचा साधनमार्ग

अमंगळा करी मंगळ । ऐसी हरिकीर्ति निर्मळ ।
नाम मंगळा मंगळ । सुमंगळ हरिकीर्ति ॥५८॥
रामनामाचे परिपाटीं । दोष जळती आकल्पकोटी ।
भुक्ति मुक्ति लागे पाठीं । पावन सृष्टि रामनामें ॥५९॥
पुत्र अथवा भ्रातृपुत्र । दुहिता अथवा दौहित्र ।
करितां एकादशी जागर । यमप्रहार पैं चुके ॥६१॥
कलियुगाची थोर ख्याति । नामासाठीं लाभे मुक्ती ।
स्त्रियादि अंत्यज उद्धरती । नामकीर्तिं दाट्टगी ॥६३॥
नामासि नाहीं स्नानबंधन । नामासि नाहीं विधिविधान ।
आसनीं भोजनीं शयनीं जाण । नाम पावन हरीचें ॥६४॥
निदसुरा निजशेजेंसीं । नामस्मरण जयापाशीं ।
ब्रह्मादिक वंदिती त्यासी । चहूं मुक्तींसी माहेर ॥६५॥
नामासरसीं वाजे टाळी । आशापाश होती होळी ।
तये कीर्तनसमेळीं । रंगीं वनमाळी डुल्लत ॥६६॥
हरिकीर्तनीं भक्ताआंत । हरिखें नाचे भगवंत ।
चरणरजें धूळि भूषित । असे डुल्लत स्वानंदें ॥६७॥
संकीर्तनसुखाचेनि उद्भटें । मज वैकुंठीं न कंठे ।
रविबिंबाहि आतुटें । सुख न वाटे मज तैसें ॥६८॥
मुरडोनि योगियांचें मानसीं । धांवोनि जाय कीर्तनासी ।
तेथेंचि तिष्ठे अहर्निशीं । स्वानंदेंसीं डुल्लत ॥६९॥

माझिया भक्तांचे आवडीं । हरिकीर्तनीं घाली उडी ।
कीर्तनसुखाची मज गोडी । कडोविकडीं नाचत ॥७०॥
नामगजरेंचि निर्मुक्त । वही पाहे चित्रगुप्त ।
कोरीं पानें अवघीं तेथ । कर्मनिर्मुक्त हरिनामें ॥७३॥
रामनामाची प्रभा गाढी । वहीचीं पानें खोडी ना मोडी ।
अवघी वहीच उघडी । केली रोकडी हरिनामें ॥७४॥
ऐसें करितां कीर्तन । श्रोते वक्ते दोघेजण ।
होती आनंदीं निमग्न । आनंदघन श्रीरामनामें ॥७५॥

भा. रा. सुंदरकांड, २२. ५८–७५

## २१३. नामस्मरणाची महति

जें त्या विषयाचरणारहित । तें पापाचें खाणोनि खत ।
कामक्रोधांचा निजघात । कर्तें निश्चित नाम तुझें ॥१६॥
म्हणसी पाहिजे अधिकार । ऐक तयाचा विचार ।
नलगे शास्त्रांचा संभार । श्रुतिउपचार पैं नलगे ॥१७॥
नलगे काव्यनाटकव्युत्पत्ती । पुरश्चरणाची कायसी स्थिती ।
तीर्थाची कायसी गती । योगवृत्ति जे नव्हे ॥१८॥
त्या कल्मषाचा महाकंद । खाणावया अति अगाध ।
द्विअक्षर मंत्र प्रसिद्ध । द्वेषद्वंद्वदाहक ॥ १९ ॥
राम ऐसें वर्णद्वयें । रसनेसी स्पर्श होतां पाहें ।
मुक्ति वोळंगती स्वयें । दास्यत्वेंसीं तत्वतां ॥ २० ॥
न लगे दीक्षा न लगे दान । योगयाग पुरश्चरण ।
मंत्रतंत्र तीर्थाटण । व्रतादि जाण कांहीं न लगे ॥२१॥
रामनामाक्षरद्वयासी । भेटी होतांचि रसनेसीं ।
जाळोनि कल्मषांच्या राशी । मोक्षश्रियेसी वरी स्वयें ॥२२॥

हें तुझ्या नामाचें महिमान । सांगितलें अत्यंत गौण ।
त्याहूनि नाममहिमान । सांगतां वचन सरेना ॥ २३ ॥
तथापि कांहीं संकेताकारें । नाममहिमा प्रेमभरें ।
सांगेल तेथें रघुवीरें । अत्यादरें कृपा करणें ॥ २४ ॥
तेचि विषयींचा श्लोकार्थ । स्वामी परिसा सावचित्त ।
नाममहिमा अत्यद्भुत । श्रोते परिसोत अत्यादरें ॥२५॥
तुझिया नामाची आवडी । जीवीं उपजतां रोकडी ।
कोणकोणां पडे सांकडी । ऐक निरवडीं श्रीरामा ॥२६॥
तुझे नामोच्चारीं आदर । ऐक तयांचा बडिवार ।
महापातकांचा संभार । कांपे थरथर निजधाकें ॥२७॥
वाचे उच्चारावया तुझें नाम । जीवीं धरिलें असे प्रेम ।
क्षणें आमुचें करील भस्म । भय दुर्गम नामाचें ॥२८॥
नाम उच्चारिलें नाहीं येणें । तंव तें स्थळ टाकोनि जाणें ।
अन्यथा नुरिजे जीवें प्राणें । निश्चय करणें महापापी ॥२९॥
जेणें भ्रमें उपजे पातक । तो भ्रमाचि भ्रमातें पावे देख ।
नामोच्चारीं आवडी चोख । करी निःशेष निर्मोह ॥३०॥
पाप लिहिती चित्रविचित्र । त्यांसी अलोट पडे विचार ।
हा करूं पाहे नामोच्चार । पापाचार कोंवि राहे ॥३१॥
म्हणोनि खुंटलें लेखन । लेखनी सर्वथा न चाले जाण ।
वर्णाक्षरउच्चारण । निश्चयें पूर्ण नाठवे ॥ ३२ ॥

भा. रा. युद्धकांड, ८९. १६–३२.

श्रीरामनामाच्या उच्चारें । जडमूढ तरती भवसागर ।
राममुद्रांकित वानर । तेणें परपार पावलों ॥ ४ ॥

रामनामाचा कडकडाट । भवसमुद्रीं पायवाट ।
पायरी करोनि वैकुंठ । होती प्रविष्ट परब्रह्मीं ॥ ५ ॥
जे रामनामांकित नर । त्यांतें बुडवूं न शके सागर ।
श्रीराममुद्रांकित वानर । परपार पावलों ॥ ६ ॥
श्रीरामें मुद्रा दिधली हातीं । तेव्हांचि मजला विजयवृत्ती ।
श्रीराममुद्रेची ख्याती । श्रुति बोलती पुराणें ॥ ७ ॥
श्रीराममुद्रा समुद्रतरण । श्रीराममुद्रा सीतादर्शन ।
श्रीराममुद्रा रणकंदन । लंकादहन श्रीराममुद्रा ॥ ८ ॥
श्रीराममुद्रा विजयप्राप्ती । लंकाभुवनीं केली ख्याती ।
आडनांव मी मारुती । अगाध करणी मुद्रेची ॥ ९ ॥
नित्य श्रीरामनामस्मरण । तेथें वीर्य धैर्य कीर्ति कल्याण ।
ब्रह्म पावती सनातन । तें महिमान स्मरणाचें ॥१०॥
जेथें नाहीं श्रीरामस्मरण । अकीर्ति अपयश अकल्याण ।
नित्य निंद्यत्व पापी पूर्ण । अधःपतन महानरकीं ॥११॥
यालागीं साक्षेपें आपण । समूळ सांडावें विस्मरण ।
नित्य करितां श्रीरामस्मरण । कीर्ति कल्याण निजविजयी ॥१२॥

भा. रा. सुंदरकांड, २६. ४–१२.

हृदयीं अमृत मुखीं रामनाम । त्यासी कोण करी संग्राम ।
खुंटला शिवाचा पराक्रम । श्रीरामनाम परिसोनि ॥२८॥
ऐकतां श्रीरामाचें नाम । सदाशिवासी आलें प्रेम ।
मूर्च्छित पावला विश्राम । युद्धसंग्राम विसरला ॥२९॥
गरुडें कश्यपाच्या उपदेशीं । नामें जिंतिलें सदाशिवासी ।
कळिकाळाची गति कायसी । हरिभक्तांसी बाधावया ॥३०॥

निजभक्तासी द्यावया भेटी । विष्णु पावला उठाउठीं ।
चक्र हातवसूनिया मुष्टीं । कृपादृष्टि पैं आला ॥३१॥
लौकिकीं दावी युद्धक्रम । परी भक्ताचें आवडे प्रेम ।
गरुड स्मरे नित्य नाम । पुरुषोत्तम तुष्टला ॥३२॥
जो सप्रेम स्मरे नाम । त्या अधीन पुरुषोत्तम ।
नामें संतुष्ट आत्माराम । भक्तकाम कृपाळु ॥३३॥
श्रद्धे हेलया जो स्मरे नाम । त्याचें मी हृदयीं वाहे नाम ।
नामनिष्ठाचे पुरवी काम । नामें सुगम मत्प्राप्ति ॥३४॥
अमृत सोडवावया बळी । चक्र मोकली वनमाळी ।
गरुड चक्रातेंहि गिळी । विस्मय सकळीं मानिजे ॥३५॥
दैत्यदानवमंडळीं । विष्णुचक्र सगळें गिळी ।
ऐसा कोणी नाहीं बळीं । अतुर्बळी हा गरुड ॥३६॥
विष्णुचक्राचा महामार । घायें निर्दाळीत असुर ।
चक्र त्रैलोक्यीं दुर्धर । गरुडें तें चक्र गट्ट केलें ॥३७॥
स्मरतां रामहरिगोविंद । नामापासीं परमानंद ।
त्यासी बाधूं न शके द्वंद्व । द्वंद्व निर्द्वंद्व हरिनामें ॥३८॥
नित्य नामाचा निजगजर । त्याअधीन चक्रधर ।
भक्तां बाधूं न शके चक्र । हरि साचार त्यांपासीं ॥३९॥
नाम स्मरतां निरंतर । तयापासीं अहोरात्र ।
घरटी करी विष्णुचक्र । विघ्न दुर्धर निवटावया ॥४०॥
देवा भक्ता नाहीं अंतर । त्यापासीं तो निरंतर ।
यालागीं बाधूं न शके चक्र । चक्र दुर्धर अभक्तां ॥४१॥

भा. रा. अरण्यकांड, ७. २८–४१

रामनामाच्या गदारोळें । स्मरत्या शरण रिघिजे काळें ।
भवभय समूळ पळे । सुखसोहळे श्रीरामें ॥ ५६ ॥
श्रीरामनामगजरें । ब्रह्म स्वानंदें हुंबरे ।
जेवि धेनु वत्सा अनुसरे । तेवि नामोच्चारें श्रीराम ॥५७॥
श्रीराम हें नामाक्षर । क्षराक्षरातीत पर ।
नाम परब्रह्म परात्पर । नाममंत्र शिवसेव्य ॥ ५८ ॥
नामापासीं सद्यःमुक्ती । पंडित बोलती पुराणोक्तीं ।
मी बोलिलों ते माझी प्रतीती । नाम निश्चितीं तारक ॥५९॥
नामें भुक्ति नामें मुक्ती । नामापासीं ब्रह्मप्राप्ती ।
रामनाम जे जपती । वंद्य त्रिजगतीं तेचि पैं ॥६०॥
रामनाम परम जप । रामनाम परम तप ।
रामनाम निरसी पुण्यपाप । नाम निर्विकल्प समाधि ॥६१॥
नामीं नाहीं अनध्याय । नामीं सर्वदा स्वाध्याय ।
नाम प्रत्यक्ष परब्रह्म पाहें । अभाग्या भाव उपजेना ॥६२॥
नामीं नाहीं अनध्ययन । नामीं नाहीं विधिविधान ।
नामीं नाहीं कर्मबंधन । नामें पावन महापापी ॥ ६३ ॥
जरी जाला दुराचारी । तो जैं भरे अनुतापभरीं ।
रामनामें जपे जिव्हारीं । तो साधु संसारीं भगवद्वाक्यें ॥६४॥

भा. रा. बालकांड, १४. ५६-६४.

## २१४. रामनाम हेंच खरें औषध

जेणें चिकित्सा पाहाळीं गेली । जेणें शास्त्रें बुझाविलीं ।
पुराणें वर्त्तों लागलीं । ज्याची चाली जाणोनी ॥ १३४ ॥
त्या विसरोनि रघुनाथा । स्वबुद्धी वैद्यक करितां ।
क्षीण पावलासी वृथा । कार्यही न साधेचि ॥१३५॥

उगवतां दिनमणी । हरपे तत्काळ रजनी ।
नक्षत्रेंसह चंद्र गगनीं । ठाकती होवोनी खद्योत ॥१३६॥
तेंवि देखतां रघुनाथ । ओषधिभार समस्त ।
शक्ति झाली प्रतिहत । तुझें तेथ काय चाले ॥१३७॥
ऐसें न करावें आपण । प्रार्थोनियां रघुनंदन ।
घ्यावें चरणतीर्थ मागोन । वांचेल लक्ष्मण तें करीं ॥१३८॥
ओषधिरसामाजीं देख । वेगीं घालोनि चरणोदक ।
रस देतां एकाएक । सकळ दुःख निरसेल ॥ १३९ ॥
कोणासी न कळे जनीं । नाम अमृतसंजीविनी ।
तो प्रत्यक्ष असतां अनुदिनीं । निजाभिमानीं कष्टती ॥१४०॥
आम्ही वैद्य चिकित्सक । क्षणमात्रें प्रतीति ते देख ।
दावूं लागतांचि निमेख । तेणेंचि देख नाडिले ॥१४१॥
सिद्धासीं सिद्धिलाभ होतां । अभिमान उठला अवचितां ।
तरी अवघेंचि गेलें तत्वतां । कष्ट वृथाचि सोसिले ॥१४२॥
सर्व दुःखांच्या आपदा । प्राप्त झाल्या प्रल्हादा ।
नाम स्मरतां सर्वदा । दुःखबाधा छेदिली ॥१४३॥
तो श्रीराम प्रत्यक्ष असतां । तुझा अभिमान झाला वृथा ।
चरणीं ठेवोनियां माथा । चरणतीर्था मागावें ॥१४४॥

भा. रा. युद्धकांड, ४९. १३४–१४४.

## २१५. " स्त्रियांसि गळसरी कृष्णमणी । पुरुषां गळसरी नामस्मरणी "

वरिवरी सीता दिसे समळ । अंतरीं रामध्यानें निर्मळ ।
बाह्य अतिचिंतें व्याकुळ । अंतरीं निश्चळ चिन्मय राम ॥४६॥

बाह्य उपवासें आक्षिप्त । अंतरीं परमानंदें तृप्त !
बाह्य दिसे बंदीं प्राप्त । आंत निर्मुक्त चहूं देहीं ॥
बाह्य दिसे हीनदीन । अंतरीं दिसे सुप्रसन्न ।
बाह्य दिसे अति खिन्न । अंतरीं चैतन्य चिन्मात्रज्योति ॥
बाह्य दिसे लंके नेली । परि ते रामापासोनि नाहीं ढळली ।
बाह्य दिसे कोमाइली । अंतरीं टवटवित श्रीरामें ॥
दिसे रामावेगळी । परि ते सबाह्य रामें रचिली ।
ऐसी देखोनि जनकबाळी । पिटिली टाळी हनुमतें ॥
देखतां राक्षसी क्रूरदर्शन । सीता श्रीराम देखे संपूर्ण ।
वृक्ष वल्ली तृण पाषाण । देखे परिपूर्ण श्रीराम ॥
भय पावलें भयाप्रति । सुख पावलें सुखावतीं ।
ऐसिया निष्ठे सीतासती । देखे मारुति आनंदें ॥
हृदयीं श्रीरामप्रतीति । श्रीराम देखे सर्वांभूतीं ।
भयामाजीं निर्भयप्राप्ति । सीता सती स्वयें भोगी ॥
ऐसिया अनुभवेंसीं जाण । श्रीरामनाम मुख्य साधन ।
नामें निरसे जन्ममरण । नाम परिपूर्ण परब्रह्म ॥
नामें दूषण होय भूषण । नामें पापी अति पावन ।
नाम स्मरतां यम शरण । नाम परिपूर्ण परब्रह्म ॥
नामीं नाहीं अनध्यावो । नामापासीं नित्य स्वाध्यावो ।
नाम परब्रह्म स्वयमेवो । नामानिर्वाहो सभाग्य ॥
नाम चैतन्याचा मुडा । नाम परब्रह्माचा हुडा ।
ब्रह्म नामाचिया पुढां । नाचे घडघडां स्वानंदें ॥
स्त्रियांसि रामनामस्मरण । तें भूषणाचें निजभूषण ।
अहेवपणा अहेवपण । नामें पावन स्त्रीशूद्र ॥

स्त्रियांसी गळसरी कृष्णमणी । पुरुषां गळसरी नामस्मरणी ।
ते तुटलियां रांडपणीं । काळकर्मणी करावी ॥७६॥

भा. रा. सुंदरकांड, ७. ४६–७६

२१६. जानकी हीच रामसेवकांमध्यें आचार्य होय.

इतर जे रामसेवक । श्रीरामभजनीं अति दक्ष ।
जानकी त्यांचा आचार्य देख । निष्ठा अलौलिक दाखविली ॥११३॥
श्रीराममहिमा अगाध । तैसीच जानकी अवोधबोध ।
निष्ठा अति विशुद्ध । सामर्थ्य शुद्ध जानकीचें ॥११४॥
ऐसें करोनिया स्तवन । विनविते जाले सकळहि जन ।
जैसें तुझें मनोज्ञ । तैसें निर्गमन करीं माते ॥ ११५ ॥
कायसी आमुची युक्ती । जे विनंति करूं तुजप्रती ।
जैसी तुझी मनोवृत्ती । तैसिये स्थिती भेट रामा ॥११६॥
म्हणोनि राहिलों निवांत । तंव बिभीषण शरणागत ।
शिबिकेसहित आला तेथ । आरोहण येथें करीं माते ॥११७॥
देखोनि त्याच्या आदरासी । जानकी बोले प्रतीतीसीं ।
तूं जाणता भजनधर्मासी । व्रत पाहसी तूं माझें ॥११८॥
पारका पायीं राम सांपडे । तरी साधक कां शिणती बापुडे ।
ऐसे सर्वथा न घडे । जें राम सांपडे परके पायीं ॥११९॥
प्रवहणावरी यात्रा करित । यात्राश्रेय तें पैं नेत ।
कर्ता लटिकाचि वल्गत । अभिमान वसत लौकिकीं ॥१२०॥
श्रीरामाची निजप्राप्ती । प्रवहणाची नलगे गती ।
परपायीं रघुपति । न भेटे निश्चितीं कोणाही ॥१२१॥

पुढिलाचेनि भोजनें । तृप्ति न पवे निजप्राणें ।
तेवि जाण परचरणें । रघुनंदन भेटेना ॥ १२२॥
श्रीरामाची अंतरस्थिति । तो केवि गावे प्रवहणगती ।
म्हणोनियां मुनिपंक्ती । नातळती यानासी ॥१२३॥
ऐसें बोलोनियां सती । मस्तकांजली विनयवृत्ती ।
उठोनियां अति प्रीती । सहजस्थिती चालिली ॥१२४॥

भा. रा. युद्धकांड, ६७. ११३–१२४.

## २१७. हनुमंताची रामभक्ति

न म्हणे वेळ अवेळ । दिवस रात्र अक्षर पळ ।
घटिका मुहूर्त काळवेळ । अचळ रामभजनीं ॥६॥
सर्वशरीर सर्वसंपत्ती । अंतर्बाह्य श्रीरामभक्ती ।
वेंचिली असे मारुतीं । साक्षेपस्थितीं अवधारा ॥७॥
एकलें मन श्रीरामभक्तीं । लावितांचि बाह्यवृत्ती ।
सहज अर्पिलें रघुपतीं । इंद्रियस्थिति श्रीराम ॥८॥
मनें वचनें कर्मस्थितीं । राखिता झाला रघुपती ।
श्रोतीं अवधान द्यावें चित्तीं । कथासंगती सांगेन ॥९॥
मनें कवळोनियां ध्याना । मोकलूं न जाणे रघुनंदना ।
संकल्पविकल्प गमनागमना । रघुनंदनासरिसेंचि ॥१०॥
बुद्धिनिश्चयें जाण । सावधान रघुनंदन ।
राखिते झाले अनुदिन । क्षणें क्षण न विसंबे ॥११॥
चित्तचिंतनसमवेत । धरोनि राहिले रघुनाथ ।
अहर्निशीं राम राखित । सावचित्त सर्वदा ॥१२॥
निजाभिमानीं कपिपती । राममोहमास्मि निजवृत्ती ।
धरोनि राहिला रघुपती । अहोरात्रीं सावध ॥१३॥

अंतःकरण व्यापक पाहीं । राम राखे सर्वां ठायीं ।
वालाग्रमात्र सवडी नाहीं । राखण पाहीं हनुमंत ॥१४॥
अंतरीं ऐसा हनुमंत । सर्वभावीं रघुनाथ ।
क्षणक्षणां सांभाळित । वाह्यवत अवधारा ॥१५॥
दृष्टिविषय रघुनंदन । दृश्यमात्रीं भरला जाण ।
राखता झाला अनुदिन । अनुसंधान अखंड ॥१६॥
श्रवणद्वारीं शब्दविषयो । अर्थावबोधें रामरावो ।
राखितसे महाबाहो । भक्तरावो हनुमंत ॥१७॥
घ्राणद्वारें गंधावबोध । श्रीराम परममकरंद ।
श्वासोच्छ्वासीं परमानंद । अगाध बोध कपीचा ॥१८॥
रसनारसें विषयस्थिती । श्रीराम स्वयें चिच्छक्ती ।
गोडियेमाजीं रघुपती । वीर मारुति न विसंबे ॥१९॥
त्वचा आलिंगितां स्पर्शीं । उडवूनि शून्यत्व आकाशीं ।
मिठी घालोनि श्रीरामासी । चिदाकाशीं राखित ॥ २० ॥
वाचेनें शब्दव्युत्पत्ती । गांठ घातली रघुपती ।
बोलतां व्यवहारवदंती । राम मारुति न विसंबे ॥२१॥
हस्ताची क्रियाशक्ती । क्रियामात्र रघुपती ।
घेतांदेतां अर्थजाती । राम मारुति न विसंबे ॥२२॥
चरणांचें गमनागमन । आचरणेंचि राम जाण ।
पाऊलही न पडे शून्य । रघुनंदनावांचोनी ॥२३॥
लिंगाची स्वानंदरती । तंव उर्ध्वरेता मारुती ।
अखंडानंद रघुपती । सहजस्थितीं राखित ॥२४॥
गुदाचा स्वभाव क्षर । क्षरीं अक्षर रघुवीर ।
उडवोनि क्षराक्षर । राम कपींद्र राखित ॥२५॥

राम प्राणाचा पाळक । कपि रामाचाहि रक्षक ।
होवोनियां एकाएक । रघुकुळटिळक राखित ॥२६॥

भा. रा. युद्धकांड, ५२. ६–२६

## २१८. "स्वामित्व विसरे रघुनाथ। दासत्व विसरे हनुमंत"

स्वामित्व विसरे रघुनाथ । दासत्व विसरे हनुमंत ।
परमानंदें सदोदित । जगाआंत कोंदले ॥३७॥
अहंकोहंसोहंज्ञान । तें समरस गेलें विसरोन ।
हारपलें मीतूंपण । सुखसंपन्न स्वानंदें ॥३८॥
दोघे होतां सुखसंपन्न । विरोन गेलें ज्ञानाज्ञान ।
खुंटला बोल तुटलें मौन । चैतन्यघन कोंदलें ॥३९॥
दृश्य द्रष्टा आणि दर्शन । ज्ञेय ज्ञाता आणि ज्ञान ।
ध्येय ध्याता आणि ध्यान । गेले विरोन स्वानंदीं ॥४०॥
देव देवपणें दाटला । भक्त भावार्थें आटला ।
परमानंद प्रकटला । तटका तुटला आशेचा ॥४१॥
भजनआवडीं भावार्थ । भक्तें गिळिला रघुनाथ ।
नामें गिळिले देवभक्त । मुख्य परमार्थ या नांव ॥४२॥
ऐसा पावोन परमार्थ । श्रीरामीं भजे हनुमंत ।
भजनें सदा यशवंत । द्वंद्वनिर्मुक्त हरिभजनें ॥४३॥
पावोनियां स्वरूपप्राप्ती । ज्यासी अखंड सद्गुरुभक्ती ।
देव वानिती त्याची कीर्ति । त्यासी वंदिती शिवादि श्रेष्ठ ॥४४॥
ऐसी दाटुगी भगवद्भक्ती । भक्तीच्या दासी चारी मुक्ती ।
भगवद्भजन सर्वांभूतीं । ब्रह्मप्राप्ती हरिनामें ॥४५॥

ऐसी हनुमंताची स्थिती । भक्ति कीर्ति विजयवृत्ती ।
तिहीं लोकीं विजयख्याती । सूक्ष्मशांति श्रीरामें ॥४६॥
सूक्ष्मशांतीचें लक्षण । मारितां कोटयानुकोटि रण ।
शांति न मोडे अणुप्रमाण । दुर्जनविणें संग्राम ॥४७॥
बुद्धिबळाचे खेळाकडे । तेथें मारितां हस्ती घोडे ।
मारित्यासी हिंसा न घडे । तेणें पाडें संग्राम ॥४८॥
ऐसी हनुमंताची गती । साधुजन अनुलक्षिती ।
येरां भासे वानरवृत्ती । दुर्धरशक्ति श्रीरामें ॥४९॥
हनुमान आणि रघुनंदन । अनन्य भावें पडलें आलिंगन ।
पूर्ण पावोनि समाधान । जाले अभिन्न देवभक्त ॥५०॥

भा. रा. सुंदरकांड, २५. ३७–५०

## २१९. खरें पूजन

श्रीरामाचें वचन । भक्तांप्रति सनातन ।
भरता, ऐकें सावधान । अति गहन निजनिष्ठा ॥१७॥
माझ्या ठायीं ठेऊनि मन । सर्वकर्मी वर्ततां जाण ।
माझें स्वरूप सनातन । न लागतां क्षण तेथें पावे ॥१८॥
स्वधर्माच्या चोखाळीं । सर्वात्मक मूर्ति भली ।
निजप्रीतीच्या कल्लोळीं । सर्व काळीं पूजित ॥१९॥
जेवढी माझी व्याप्ती । तेवढी करूनि चित्तवृत्ती ।
नित्य नवी चढती प्रीती । मातें भजती मी होउनी ॥२०॥
माझा आश्रयो मी होऊन । ऐक तयाचें लक्षण ।
सांडोनियां आपुलेंपण । आश्रय लवण जळा जेंवि ॥२१॥
कां सर्वज्ञ प्रभंजन । गगनीं विचरे आपण ।
भागोनि जेथें होये लीन । गगनीं गगन होवोनियां ॥२२॥

तैसा कायें मनें वाचा। माझ्या निजात्मस्वरूपाचा।
निश्चयो करोनि साचा। मद्भजनाचा आदर ॥२३॥
तो मज आंतबाहेरीं। मी तया सबाह्याभ्यंतरीं।
त्यासीहि गत्यंतराची परी। बोलतां निर्धारीं जीभ तुटे ॥२४॥
त्यासी बाध्यबाधकसंबंध। कैंचा विधि कैंचा निषेध।
सबाह्य सच्चिदानंद। स्वरूप शुद्ध स्वयें होती ॥२५॥
ऐसे मी होवोनि मातें भजती। ते देहांतीं मातें पावती।
इतका विलंब कोणाप्रती। मुळींच असती मद्रूप ॥२६॥
तो आमुचें देवतार्चन। आम्ही त्याचें करूं पूजन।
तो आमुचें ध्येय पूर्ण। करूं ध्यान आम्ही त्याचें ॥२७॥

भा. रा. युद्धकांड, ८६. १७–२७

## २२०. खरा भक्त

आम्ही तुमचे अनुचर। केवळ श्रीरामाचे किंकर।
श्रीरामभजनें चराचर। नाहीं दुस्तर हरिभक्तां ॥१३५॥
श्रीरामाचें ध्यान करितां। ब्रह्मादिकां दुस्तर चिंता।
आमचें पद घ्यावया तत्वतां। ध्यान रघुनाथाचें करितात ॥१३६
म्हणोनि ब्रह्मादि अमरकोडी। विघ्नें उडविती कडाडी।
दावोनि नाना विषयगोडी। पाडिती मुरकुंडी मनाच्या ॥१३७॥
तथापि निश्चयाचे भक्त। सर्वथा न होती ध्यानच्युत।
ते विषयींचा श्लोकार्थ। सावचित्त परियेसी ॥१३८॥
सुरासुरांचिया पंक्ती। ज्यालागीं नाना साधनें करिती।
तरी ज्यांसी नव्हे प्राप्ती। दुष्प्राप्य निश्चितीं त्रिलोकीं ॥१३९॥
तेंवि त्रिलोकींचें राज्य सर्वही। महासिद्धींसमवेत पाहीं।
हात जोडोनि भक्ताच्या ठायीं। तिष्ठत लवलाहीं दासत्वें ॥१४०

भगवच्चरणारविंदाहून । जरी क्षण एक काढी मग ।
तरी तितुकेंही त्यासी देऊन । म्हणवोनि जाण तिष्ठती ॥१४१॥
परी हा निष्टंक दादुला । दुस्तर धैर्याथिला ।
चरणध्याना वहिला । क्षणही मनाला काढीना ॥१४२॥
चरणध्यानाचा तो क्षण । त्रिभुवनविभव त्यावरून ।
सिद्धींसहित ओंवाळून । निंबलोण सांडित ॥१४३॥
भक्त जिज्ञासु साधक ज्ञानी । तयामाजीं अग्रगणी ।
लवनिमिषार्धेही चरणींहूनी । लोभें मन काढीना ॥१४४॥
कोणते म्हणसी चरण । ऐक त्यांचेंही लक्षण ।
आदिकरोनि त्रिनयन । करिती ध्यान जयांचें ॥१४५॥
ब्रह्मा जो कां सृष्टिकर्ता । त्रैलोक्यासीं सर्जन करिता ।
सत्यलोकराज्यभोक्ता । वेद मूर्तिमंत तये स्थानीं ॥१४६॥
जेथें सत्य मूर्तिमंत । तप मूर्तिमंत तेथ ।
महासिद्धि होवोनि मूर्त । नित्य नांदत जये स्थानीं ॥१४७॥
ऐसिया भोगांची विश्रांती । ब्रह्मयासी न मनेचि सर्वार्थी ।
मग बैसोनि एकांतीं । चरण चिंती हरीचे ॥१४८॥
तरी सहसा नव्हे प्राप्ती । मग लाजोनि प्रजापती ।
पोटा आला लक्ष्मीपती । चरणप्राप्ती तरी नव्हे ॥१४९॥
तैसाच जाण शूळपाणी । त्रिनयन कैलासभुवनीं ।
उमेसारिखी कामिनी । अनुदिनीं भोगासी ॥१५०॥
नंदी भृंगी आदि महागण । विद्यानिधि हृदयरत्न ।
तेणें न पवेचि समाधान । मग त्यागून निघाला ॥१५१॥
सर्वस्वें त्यागोनि शूळपाणी । हातीं पायीं राख लावोनी ।
ध्यानस्थ बैसला स्मशानीं । चरणचिंतनीं रामाच्या ॥१५२॥

हृदयीं ध्यान चरणांचें । मुखीं नाम श्रीरामाचें ।
मुकुटीं भूषण निष्कर्माचें । तीर्थ रामाचें परिकर ॥१५३॥
तोही ठकिला हरिमाया । सांडोनि श्रीरामाच्या पाया ।
आला मोहिनी पुसावया । द्रवोनि वीर्या पडिला तो ॥१५४
तेथें इंद्र वरुण कुबेर जाण । यांची गणना करी कोण ।
पावावया हरिचरण । सामर्थ्य जाण तयां नाहीं ॥१५५॥
ऐसे दुष्प्राप्य श्रीरामचरण । ते भक्तां लाधले संपूर्ण ।
ते सांडूनि इच्छी आन । ऐसा अभागी कोण त्रिजगतीं ॥१५६॥
तूं सूर्यवंशी नृपती । आणि अनुज रघुपती ।
याचकें याचितां तुजप्रती । स्वयें त्रिजगती अर्पिसी ॥१५७॥
मी किंकर तुझें साचार । हेंचि मागें उत्तरोत्तर ।
श्रीरामचरणांहूनि अन्यत्र । वांछा कोठें न वचावी ॥१५८॥
म्हणोनि घातलें लोटांगण । तेणें भरत सुखायमान ।
श्रीरामाचें यथार्थ ज्ञान । तुजसीं जाण कळलेंसे ॥१५९॥
श्रीराम सांडोनि आन । जो जो कां वांछी धनमान ।
त्यासीं श्रीरामाचें ज्ञान । सर्वथा जाण दुर्लभ ॥१६०॥

भा. रा. युद्धकांड, ७९. १३५-१६०

## २२१. खरी समाधि

केवळ निष्कर्म राहणें । तें जीवसमाधीचें लक्षण ।
तेंही केवळ अपक्वपणें । परिपक्व चिन्ह तें ऐक ॥२३४॥
सर्वभूतांचे गुणागुण । जगाचें दोषदर्शन ।
दिसतां न मोडे ब्रह्मपण । ते समाधि पूर्ण पूर्णत्वें ॥२३५॥
भूतांचें विकर्माचरण । भासतां भासे चैतन्यघन ।
त्या नांव शुद्ध समाधान । समाधि संपूर्ण त्या नांव ॥२३६

ऐसें न होतां समाधान । केवळ जें तटस्थपण ।
तें मुग्धावस्थेचें लक्षण । समाधि संपूर्ण ते नव्हे ॥२३७॥
भूतांचे सकळ मळ । ज्याचे दृष्टी होती निर्मळ ।
ते समाधिसुखकल्लोळ । येर समूळ भूतादिभाव ॥२३८॥
आशंका,म्हणती संसार मिथ्याभूत । तुवांचि करून दिधला येथ ।
तेथें कैंचा देव कैंचा भक्त । अवतारचरित्र तें कैंचें ॥२३९॥
जेथें नाहीं मीतूंपण । तेथें नाहीं कर्मक्रियाचरण ।
समूळ लौकिक नाहीं जाण । लोकसंरक्षण म्हणसी कैंचें ॥२४०॥
अवधारीं गा रघुनाथा । ब्रह्मअवतारींची निजसत्ता ।
नये जीवांचिये हातां । जरी यथार्थता मुक्त जाले ॥२४१॥
जयां त्रिगुणमेळें जीवपण । भ्रमें भुलोनि आपण ।
ब्रह्म म्हणती कैंचें कोण । तयां उद्धरण तुझेनी ॥२४२॥
अवताराचें सामर्थ्य पूर्ण । प्रपंचपरमार्थी सावधान ।
उभयतां दिसों नेदी न्यून । तें निजचिन्ह अवधारीं ॥२४३॥

भा॰ रा॰ बालकांड, ११. २३४–२४३

## २२२. " सर्वभूतीं श्रीभगवंत । हाचि मुख्यत्वें परमार्थ "

ते तंव निराभिमानी भक्त । भक्तभावार्थी मी रघुनाथ ।
प्रीतीनें भक्त गिंवसीत । स्वयें धांवत वनोवन ॥९४॥
भक्त उद्धरावया कारणें । रडणें पडणें अडखळणें ।
पर्वतोपर्वतीं धावणें । आणि आलिंगनें वृक्षांसी ॥९५॥
उमे जाण तूं निश्चित । माझें पाऊल न पडे व्यर्थ ।
जाणे सदाशिव समर्थ । तुझा भावार्थ तो नाहीं ॥९६॥

गाळींव भावाचा भावार्थ । सर्वभूतीं श्रीभगवंत ।
हाचि मुख्यत्वें परमार्थ । निजस्वार्थ परमार्थ ॥९७॥
गुळाचें कारलें केलें । तें सकंटक कडू नाहीं जालें ।
तेंवि ब्रह्मवृत्तीं कर्म केलें । तें मुकलें बंधत्वा ॥९८॥
साकरेचें वृंदावनफळ केलें । कडू म्हणतां ते स्वयें ठकले ।
तेंवि साधूंचें कर्म निंदोनि बोले । ते ते गेले अधःपाता ॥९९॥
साधूंची सच्चिद्‌गरिमा । अतर्क्य त्यांचें कर्मप्रेमा ।
ते नाकळिती मोहभ्रमा । अगाध महिमा साधूंचा ॥१००॥

भा. रा. अरण्यकांड, २०. ९४–१००

## २२३. अविनाशी वस्तूचें स्वरूप

स्वरूप लक्षितां साचार । मिथ्या ब्रह्मा विष्णु शिव शक्र ।
तेथें कैंचें गा चराचर । वस्तु चिन्मात्र सदोदित ॥६८॥
नाहीं आकार विकार विलास । नाहीं आयुष्य मग कैंचा पाश ।
यालागीं अव्यय अविनाश । म्हणती परेश परमात्मा ॥६९॥
तेथें नाहीं अहोरात्र । नाहीं नक्षत्रें रवि चंद्र ।
नाहीं वरुणादि यम कुवेर । काळ दुर्धर तेथें मिथ्या ॥७०॥
ऐसी वस्तु जे अविनाशी । तेचि कोंदलीसे जगासीं ।
तिचेनि गति इंद्रियांसी । तिचेनि प्राणांसी प्राणत्व ॥७१॥
तिचेनि प्रकाशें अहोरात्र । तिचेनि तपती रविचंद्र ।
तिचेनि पंचभूतें साचार । चराचर तिणें अतिव्याप्त ॥७२॥
तिचेनि ओंकार आपण । तिचेनि सत्या सत्यपण ।
तिचेनि गायत्री पावन । वंद्य ब्राह्मण तेणें तेजें ॥७३॥
ब्रह्मा विष्णु शंकर । हेही वस्तूचे गुणावतार ।
वस्तु निर्गुण निर्विकार । चराचर व्यापूनि ॥७४॥

अनुक्रम २५१ ९८४३८ विभाग ११-०६-१०२ ९२८ २५६५१ शा. दि.

उभें आडवें विणून सूत । त्या नांव पैं वस्त्र म्हणत ।
तेंवि व्यापक भगवंत । त्यासीच म्हणत प्रपंच ॥७५॥

भा. रा. युद्धकांड, २४. ६८-७५.

## २२४. मारुतीनें मागितलेलें वरदान

कृपा वोळली रघुनाथा । तरी ऐसें करावें स्वामिनाथा ।
जंव पृथ्वीवरी रामकथा । तंववरी असावे तत्वतां प्राण माझे ॥८॥
जेथें जेथें रामकथन । तेथें तेथें मस्तकांजली पूर्ण ।
असावें माझें अधिष्ठान । हेंचि वरदान मज द्यावें ॥९॥
जिणयाचें फळ तत्वतां । नित्य श्रवणीं रामकथा ।
वाचेसीं रामगुण वर्णितां । उसंत चित्ता नसावी ॥१०॥
यालागीं स्वामी रघुपती । जेथें जेथें तुझी नामकीर्ति ।
निमेष असेल होती । तेथें मारुतीनें असावें ॥३७॥
जेथें श्रीरामसंकीर्तन । तेथें म्यां मस्तकांजलि संपूर्ण ।
तिष्ठत असावें अनवच्छिन्न । हें वरदान मज द्यावें ॥३८॥
श्रवणीं श्रवणाची आवडी । वाचेसी हेचि नित्य गोडी ।
नाम गर्जतां अति प्रौढीं । उद्धरी कोडी पतितांच्या ॥३९॥
तुझ्या निजनामेंकरून । महापापांचें करोनि कंदन ।
प्रायश्चित्ता बोळवण । जगउद्धरण श्रीरामें ॥४०॥
केवळ नव्हे माझी अवस्था । ज्यासी नामीं आवड चित्ता ।
त्याचेनि जगासी पावनता । नित्य मुक्तता श्रीरामें ॥४१॥
माझें मागणें हेंचि परम । उत्तममध्यमादि अधम ।
सकळीं स्मरावा श्रीराम । मरणजन्मच्छेदक ॥४२॥
वेदशास्त्रीं अधिकारता । ज्यासी नाहीं तत्वतां ।
त्यासी नाम द्यावें रघुनाथा । उद्धारता श्रीरामें ॥४३॥

जे एकवार जपती नाम । ते करावे नित्य निष्काम ।
जे नाम ऐकती सप्रेम । सर्वोत्तम करावे ते ॥४५॥

श्रोत्यांवक्त्यांतें देखोन । संतोष पावे ज्यांचें मन ।
त्यांहीं पावावें कल्याण । रघुनंदननिजकृपा ॥४६॥

नामधारकांतें निर्भत्सिती । द्वेषिती त्रासिती उपहासिती ।
नानापवाद घालिती । उपद्रविती दुष्टत्वें ॥४७॥

त्यांची जावोनि दुष्टवृत्ती । शुद्ध निर्विकल्प स्थिती ।
पावोनियां निश्चितीं । श्रीरघुपति उद्धरावें ॥४८॥

विकल्पाचा विकल्प तोडीं । अधर्माचें दौरात्म्य मोडीं ।
संदेहाचा संदेह फेडीं । निजप्रौढी श्रीरामा ॥४९॥

सकळ जन स्वानंदमग्न । सकळ जन संकल्प निरसोन ।
नामें करावे सुखसंपन्न । हेंचि वरदान मज द्यावें ॥५०॥

जे जपहीन तपोहीन । व्रतपुरश्चरणदानविहीन ।
योगयाग तीर्थाटन । कांहीं साधन जाणती ना ॥५१॥

सत्संगाचें नेणती सुख । वैराग्याचा गंध निःशेख ।
श्रवणाचें न देखती मुख । ते सकळिक उद्धरावे ॥५२॥

संसाररोग अति दुर्धर । पापभोगांची यातना क्रूर ।
पीडिजेती जीवमात्र । भोगिती अघोर नीचयोनी ॥५३॥

त्यांसी रामनामरससार । देवोनि उपचारावें सत्वर ।
मोडोनि भवरोगाचा थार । नित्य अक्षर करावें ॥५४॥

निरसोनियां द्वेषद्वंद्व । करावे निर्विकल्प शुद्ध ।
भोगावया परमानंद । सदानंद श्रीरामें ॥५५॥

विश्व अवघें सुखसंपन्न । सदा असावें स्वानंदमग्न ।
हेंचि द्यावें वरदान । म्हणोनि लोटांगण घातलें ॥५६॥

भा. रा. युद्धकांड, ८९. ८–१०; ३७–५६.

## २२५.–आणि रामानें दिलेलें वरदान

तुझेनि नामें साचार । म्यां उद्धरावें चराचर ।
हनुम्यानें मागतां ऐसा वर । पूर्ण चराचर सुखमय ॥६१॥
बहुकाळ प्राण वांचणें । म्यां मागितलें याचिकारणें ।
ऐसा मागतां वायुनंदनें । श्रीरघुनंदनें अंगिकारिलें ॥६२॥
जग उद्धरावया साचें । अचाट मागणें हनुमंताचें ।
अचाट देणें श्रीरामाचें । प्रेम भक्ताचें अति गहन ॥६३॥
हनुम्याच्या प्रेमावेशीं । राम बोळला प्रीतीसीं ।
स्वयें देतां वरदानासी । कृपा मानसीं अनिवार ॥६४॥
तुझेनि सनाथ रामकथा । तुझेनि श्रवणें उद्धरे श्रोता ।
तुझेनि संगें नाम पढतां । उद्धरे वक्ता तत्काळ ॥८१॥
असो श्रोतयांवक्तयांची कथा । तुझेनि भजनीं आदर धरितां ।
निष्काम होवोनि तत्वतां । नित्य मुक्तता तो पावे ॥८२॥
जंव पृथ्वी वाहे सकळभूतें । जीवन जीववी जगातें ।
वायु चाळवी विश्वातें । चंद्रार्क असती निश्चितें गगनीं ॥८३॥
सुस्थिर बैसका कुळाचळां । तंववरी तुझें आयुष्य गोलांगुळा ।
चिरंजीवियांमाजीं आगळा । प्रताप सोज्ज्वळ पैं तुझा ॥८४॥
त्रुटि लव निमेष पळ । घटिका मुहूर्त काळ ।
श्रीरामभजनें अचंचळ । लोक सकळ उद्धरसी ॥८५॥
तुझेनि स्मरणें मारुती । भयभीता प्रतापशक्ती ।
अविरक्तासी विरक्ती । होय निश्चितीं सर्वथा ॥८६॥

संदेहपणाचा संदेह । तुझेनि होय निःसंदेह ।
विकल्प निर्विकल्पभाव । नामनिर्वाह करी तुझा ॥८७॥
कुतर्क्यांचे कुतर्क, मारुती । तुझेनि नामें भस्म होती ।
शठकपटियांच्या वृत्ती । निष्कपट होती तुझेनि ॥८८॥
नास्तिकांचे शून्यवाद । दांभिकाचे दंभभेद ।
तुझेनि नामें निर्द्वंद्व । महाबोध पावती ॥८९॥
कामक्रोधलोभादिक । महापिशाच दुर्जय देख ।
तुझेनि नामें एकाएक । भस्म निःशेख पैं होती ॥९०॥
इतर पिशाच्चांच्या कोण कथा । भस्म होती क्षणार्धता ।
तुझेनि नामें वायुसुता । निर्मुक्तता जगासी ॥९१॥
वरद वदतां रघुनाथा । येरें चरणीं ठेविला माथा ।
म्यां प्रार्थिलें कोण्या अर्था । कोण कथा येथें झाली ॥९२॥
तुझेनि नामें रघुपती । चराचरा व्हावी मुक्ती ।
ऐसें मागतां स्वामीप्रती । झाली वरदोक्ती विपरीत ॥९३॥
सांडोनि स्वामीचें नाम । आड घालणें प्लवंगम ।
ऐसा नव्हे भजनधर्म । लोकही विषम मानिती ॥९४।
ऐसें न करावें स्वामिनाथा । म्हणोनि लोटांगण घालितां ।
तंव हास्यवदनें तत्त्वतां । झाला वदता श्रीराम ॥९५॥
श्रीराम आणि हनुमान जाण । स्वरूप एक नामें भिन्न ।
भेद नाहीं अणुप्रमाण । ऐक विवंचन सांगेन ॥९६॥
विचारितां वस्तुविचारें । मज रूप नाहीं निर्धारें ।
नाम तेथें कोठें सरे । भ्रममोहिरें नामरूप ॥९७॥
ऐसिया नामरूपातीतासीं । भक्तीं आणोनियां रूपासी ।
स्वामित्व देवोनि प्रीतीसीं । वैकुंठवासी मज केलें ॥९८॥

लक्ष्मीऐसी अनुचर । कौस्तुभादि अलंकार ।
भक्तीं देवोनि अपार । राज्यधर मज केलें ॥९९॥
हृषीकेशादिक नांवें । भक्तीं अर्पिलीं निजगौरवें ।
नामें विश्व उद्धरावें । हेंही करावें निजभक्ती ॥१००॥
एवढा तुझा कृतोपकारी । हेंही सांगितलें संक्षेपाकारीं ।
याहूनि तुझी अगाध थोरी । केंवि वैखरी बोलों शके ॥११०॥
सत्यत्व मानीं माझिया बोला । मी श्रीराम तुझा केला ।
तुझेनि जगद्वंद्य झाला । प्रताप वाखाणिला तुझेनि ॥१११॥
तुझेनि माझी शौर्यशक्ती । तुझेनि माझी प्रतापख्याती ।
नामें महापापी उद्धरती । हेही वरदोक्ती तुझेनि ॥११२॥
यालागीं निजनिर्धारीं । मी तुझ्या सबाह्याभ्यंतरीं ।
तुझ्या इंद्रियांचे व्यापारीं । निरंतरीं मी वर्ते ॥११३॥
याचें नवल नव्हे मारुती । जे तुझें नाम स्मरती ।
त्यांपासीं मी रघुपती । तिष्ठें निश्चितीं सर्वदा ॥११४॥
मजपरीस हनुमंता । सर्वस्वें भजतां माझ्या भक्ता ।
अति आल्हाद मज रघुनाथा । तें सुख सर्वथा न बोलवे ॥११५॥
जेंवि पूजिल्या निजबाळक । माता सुखावे आत्यंतिक ।
तेंवि मद्भक्त पूजिल्या देख । सुख अलोलिक मज तेणें ॥११६॥
मद्भक्तांचे झालिया भक्त । त्यांचे सकळ मनोरथ ।
म्यां पुरवोनियां कृतकृत्य । नित्य निर्मुक्त करी त्यांसीं ॥११७॥
माझी आवडी ज्यांचे चित्तीं । तिहीं सांडोनि इतर संगाप्रती ।
करितां भगवद्भक्तसंगती । चारी मुक्ती वोळंगण्या ॥११८॥

भा. रा. युद्धकांड, ८९, ६१–६४; [illegible] ११०–११८.

# कठिण शब्दांचा कोश

**अंगळुमंगळु**–कापडविक्यांची सांकेतिक भाषा.
**अचुंबित**–विस्मयजनक; विपरीत.
**अटक**-अगम्य; दुष्प्राप्य.
**अट्टाहास**–मोठा आवाज; आक्रोश.
**अडंडळ**–स्थिर; निश्चल.
**अडवी**–अरण्य; रान.
**अंत्रपट्ट**–अंतरपाट.
**अपधाक**–आकस्मिक भीति.
**अंबर**–१.धान्याचें कोठार; २.वस्त्र.
**अरणी**–यज्ञांतील अग्नि उत्पन्न करण्याचीं लांकडें.
**अरुवार**–कोमल; मृदु.
**अर्जणें**–प्रार्थना करणें.
**अर्जिणें**-मिळविणें.
**अर्थी–अर्थिया**–याचक.
**अलोलिक**–अलौकिक; अपूर्व.
**अवचटें–टां–टी**–आकास्मिक; दैववशात्.
**अवदान**–आहुति.
**अवधी**–शेवट; मर्यादा; सीमा.
**अवधूत**–विरक्त अवस्थेंत फिरणारा गोसावी.
**अवलीळा**–सहज; लीलेनें.
**अवसान**–शेवट; अन्त; अखेर.
**अवस्था**-तळमळ; उत्कंठा.
**अव्हाशंख**–उजव्या मुखाचा शंख.
**अशेख**–सर्व.
**असमसाहस**–अमर्याद; पुष्कळ.
**आइतें**–मूळचेंच; स्वयंसिद्ध.
**आख्या**–भाषा; वर्णन.
**आगळा**–अधिक; तीव्रतर.
**आगिठी**–शेकोटी; शेगडी.
**आट्ट**–हट्ट.
**आण**–शपथ.
**आतळणें**–स्पर्श करणें.
**आतुडणें**–सांपडणें; प्राप्त होणें.
**आंतौता**–अंतस्थ; आंतील.
**आन**–दुसरा; अन्य.
**आनआनें**-निरनिराळीं; भिन्न भिन्न.
**आपैसें**–आपोआप; सहज.
**आभारणें**–दाटून, भरून येणें.
**आरतीं**–अलीकडे.
**आराणुक**–विश्रांति; समाधान.
**आरांटी**–कांटेरी झुडुप.
**आरुषवाणें**–प्राकृत; कंटाळवाणें.
**आलोडणें**–अवलोकन करणें.
**आवलें**–वल्हें.
**आवर्त**–पाण्यांतील भोंवरा.
**आवांका**–विचार; भाव; मतलब.
**आवृत्ति**–पुनः पुनः म्हणणें.
**आवो**–प्रतिष्ठा; डौल.

**आव्हाट**—आडमार्ग; आडरस्ता.
**आस**—आशा.
**आहाच**—वरवरचें; लटकें.
**इंगळ—ळी**—विस्तव; निखारा.
**इटीमिठी**—दृष्ट लागूं नये म्हणून ओंवाळून टाकण्याची क्रिया; निंबलोण; इडापिडा.
**उखर**—माळरान जमीन.
**उखिता**—वाटसरू; पांथिक.
**उगवणें**—उलगडणें; सुटणें.
**उगाणा**—मुक्तता; सोडवणूक.
**उंछवृत्ति**—शेत कापून नेल्यावर राहिलेले दाणे टिपून त्यावर निर्वाह करणें; एक व्रत.
**उठाउठीं**—लगोलग; तात्काळ.
**उतणें**—उसळणें; समृद्ध होणें.
**उद्भट**—शूर; प्रचंड; श्रेष्ठ.
**उपरमणें**—शांत होणें; विसांवणें.
**उपराउपरीं**—तांतडीनें.
**उपेग**—उपयोग; फायदा; लाभ.
**उफाडा**—जोर; आवेग.
**उरी**—बाकी; शिल्लक.
**उलथणें**—उचंबळणें.
**उल्लाळा**—ऊर्मी; उत्साह.
**उल्हासणें**—प्रकाशणें.
**उसंत**—विश्रांति; विसांवा.
**ऊणखूण**—वर्म; रहस्य.
**एकसरें**—एकदम.
**एकाकी**—एकाएकीं; अकस्मात्.
**ओसंडणें**—सोडून देणें; त्याग करणें.
**कटकटा**—हाय; अरेरे.
**कणिंग**—धान्याची कणगी.
**कमाविणें**—घासून चकचकीत करणें.
**कस**—सामर्थ्य; वळ.
**कळांतर**—व्याज.
**कांकर**—खडा; कंकर.
**कांचणी**—घर्षण.
**कांचोळी**—त्वचा; सापाची कात.
**कांटाळें**—तोलण्याचा कांटा; तराजू.
**कांटी**—कांटेरी कुंपण.
**काढाकाढी**—आवराआवर.
**कानडें**—अवघड; दुर्गम.
**कामारी**—दासी.
**कीळ**—तेज; प्रभा.
**कुकडी**—कोंबडी.
**कुंकात**—जोरानें; आवेगानें.
**कुरवंडी**—ओंवाळून टाकणें.
**कुवावो**—वादळी वारा.
**कुसरीं**—कौशल्यानें.
**कुहिजक**—कुजकें.
**कुळवाडी**—शेती.
**कृच्छ्र**—जेवणांतील घांस चंद्रकले-प्रमाणें कमीजास्त करण्याचें एक व्रत.
**कोड**—इच्छा; आवड; कौतुक.
**कोमाइणें**—निस्तेज होणें.
**कोरान्न**—कोरडी भिक्षा.

**कौळिक**—कोळ्यापासून जन्मलेला.
**खत**—१. क्षत; व्रण. २. कागदपत्र.
**खदळी**—तुडवातुडव; खंदळ.
**खस्तावेस्त**-ओढाताणीचें;व्राष्कळ.
**खळाळ**—पाण्याचा जोर, वेग, खळखळाट.
**खाजें**—खाद्य.
**खांबसूत्र**—कळसूत्री वाहुलें.
**खेंव**—मिठी; आलिंगन.
**खेवणणें**—जडविणें; जडावाचें काम करणें.
**खेवणी**—जडण; जडावाचें काम.
**गडगजें**—मोठी गर्जना.
**गदारोळ**—प्रचंड उद्योग.
**गोठी**—गोष्ट; वार्ता.
**गोरटी**—सुकुमार स्त्री; गर्भवती.
**गोवळपण**-गवळीपण; गवळ्याची जात.
**ग्राहिक**—गिऱ्हाइक.
**घटित**—ग्रहयोगांची जुळणी.
**घडामोडी**—घडणें व मोडणें.
**घरभंग**—घराचा नाश; कुलनाश.
**घसणी**—घर्षण; गर्दी.
**घुमारा**—अंगांत संचार होणें; पंचाक्षरी; मांत्रिक.
**चक्रवात**—सोसाट्याचा वारा; वावटळ.
**चंडवात**—वादळ; प्रचंड सोसाट्याचा वारा.
**चढवोहट**—भरती ओहोटी.
**चढोवडी**—चढतीवाढती.
**चपेटा**—चपराक; मार.
**चवाई**—चौरंग; चौपायी.
**चाटु**—पळी.
**चाटे**—कापडविक्ये.
**चाड**—उत्कट इच्छा; आवड.
**चिडाणी**—कांटेर.
**चोखट, चोखडें**—शुद्ध; पवित्र; निर्मळ.
**चोहटा**—चव्हाटा.
**चौगुण, चौपस**—चौपट.
**छायामंडप**—छायाचित्राचा खेळ.
**जनपद**—लोकांनीं गजबजलेलें स्थान.
**जलपणें**—व्यर्थ बडबड करणें.
**जावळीं**—जुळीं; जोडीचीं.
**जिव्हार**—अंतःकरण.
**जोहर**—लाक्षागृह.
**झकाविणें**—फसविणें.
**झगी**—तेज; झळाळ.
**झटें**—धडक; झुंज.
**झणीं**—नकारार्थी अव्यय.
**झणें**—चुकून; कदाचित्.
**झळफाळित**—लखलखीत; सतेज.
**झाडा**—( देणें ) हिशेब चुकता करणें.
**ठाकठोक**—रोखठोक.
**ठेवाठेवी**—उठाठेव.

**डंडळणें**–घाबरणें;डळमळित होणें.
**डिरु**–कोंभ.
**डहुळ**–गढूळ.
**ढाळेढाळां**–थोडेथोडें; हळूं हळूं.
**तटका**–संबंध.
**तरळ**–हलक्या अंगाचा; चलाख.
**तराळकी**–वेठबिगारी; हमाली.
**तरी**–समुद्राची खाडी.
**तांबोळी**–विड्याचीं पानें विकणारी जात.
**तिख**–तीक्ष्ण.
**तिवणी**–त्रिदलयुक्त; तिहेरी.
**तुक**–पासंग; वजन.
**तुकणें**–तोलणें; जोखणें.
**तुरे**–भेरी; वाद्यें.
**त्रिशुद्धी**–खात्रीनें; निश्चयेंकरून.
**थाट**–समूह; समुदाय.
**थार**–जागा; आधार.
**थारवणें**–टिकून राहणें.
**थितें**–अस्तित्वांत असलेलें; हातचें.
**थिल्लर**–पाण्याचें डबकें.
**थोटावणें**–पांगळें होणें; पांगुळणें.
**दांग**–अरण्य.
**दाघ**–दाह; दहन; जळणें.
**दाटणी**–गर्दी; लयलूट.
**दाटुगी**–बालिष्ठ.
**दोंदिल**–पुष्ट; तुष्ट.
**दांडागोंडा**–स्त्रियांच्या वेणींतील अलंकार.
**दादुला**–समर्थ; बालिष्ठ पुरुष.
**दायाद**–आप्त; संबंधी.
**दारवंटा**–उंबरा; दरवाजा.
**दारुकासन**–लाकडाचें आसन; पाट.
**दिठी**–दृष्टि.
**दिवी**–दिवटी; मशाल.
**दुश्चित**–मनास चंचल करणारें, फाटें फोडणारें.
**देखणें**–पाहूं शकणारें; सनेत्र.
**दोलायमान**–चंचळ.
**द्योतिणें**–सांगणें; गौरविणें.
**धडफुडा**–निश्चयात्मक; धडधडीत.
**धवळार**–चुनेगची घर; प्रासाद.
**धाकणें**–भीति वाटणें.
**धिंवसा**–धैर्य; बळ.
**धुपधुपित**–धगधगीत.
**धुर**–श्रेष्ठ; प्रमुख.
**धुसमुशिळेपणा**–त्रागा; जळफळाट.
**धेंडा**–विवाहोत्तर नृत्य.
**नखी**–नख.
**नवायी**–नवलपण; नवलाव.
**नागवण**–बुडवणूक; फसवणूक.
**नाबद**–खडीसाखर.
**निकण**–कण्या नसलेलें.
**निकें**–योग्य; बरोबर.
**निगुती**–रीति; पद्धति; युक्ति.

**निचाड**–निरिच्छ.
**निडारणें**–परिपक्व होणें.
**निदसुरें**–निद्रिस्त.
**निपराध**–दुष्ट; नीच.
**निमणें**–मरणें; नाहींसें होणें.
**निरसणें**–नाहींसें करणें.
**निरुज**–निरोगी; आरोग्ययुक्त.
**निरुतें**–खरोखर.
**निर्दळणें**–नाश करणें; मोडून काढणें.
**निवाडें** (तृ.)–निश्चयानें; हटातटानें.
**निशाण**–नगारा; नौबत.
**निष्टंक**–निश्चयानें.
**निष्ठाकाष्ठा**–निश्चय; निष्ठा.
**नीचनवें**–नित्यनवें.
**नीड**–पक्ष्यांचें घरटें.
**नेटें**–निश्चयानें.
**नेटेंपाटें**–निश्चयानें; अचुकपणें.
**नेमस्त**–नियमित; नेमकें; निश्चित.
**न्याहारु**–दृष्टि; पाहणें; कटाक्ष.
**पंगिस्त**–वश; अनुकूल.
**पडिपाड-डी**–युक्ति; सामर्थ्य;
**पडिभर**–आवेग; जोर.
**पढियंतें**–प्रिय; आवडतें.
**पदपदार्थ**–शब्दरचना.
**परवडी**–प्रकार; तऱ्हा.
**परवणी**–विणकामांत वस्त्राचीं सुतें कुंच्यानें सारखीं करण्याची क्रिया.
**पराकाष्ठा**–काष्ठवत्, निश्चेष्ट अवस्था.
**पर्णणें**–वरणें; विवाह करणें.
**पवाडा**–प्रताप; कीर्ति.
**पव्हे**–पाणपोई.
**पाखोवा**–पक्षिणीच्या पंखांची ऊब.
**पांगणें**–अधीन, स्वाधीन होणें.
**पागोरा**–गोफण.
**पांजणी**–विणकामांत सुतास खळ लावण्याची क्रिया.
**पाटु**–मानाचें आसन.
**पाठा**–गजर; पाठांतर.
**पाणिढाळ**–पाण्याचे लोट.
**पातेजणें**–विश्वास ठेवणें.
**पांपर**–लाथ.
**पायमांडे**–पायघड्या.
**पायवणी**–पायांचें तीर्थ.
**पारावत**–पारवा.
**पालख**–पाळणा.
**पालव**–पदर.
**पालाणणें**–घोगीर घालून सज्ज करणें.
**पाहे**–उद्यां.
**पाळी-ळे**–समूह.
**पुंजाळणें**–चकाकणें.
**पुढतपुढती**–पुनःपुनः
**पुढारीं**–पुढें.
**पुढिल**–दुसरा.
**पुंश्चली**–स्वैरिणी स्त्री.

**पुंसाटी**–पुच्छान्त.
**पैस**–अवसर; अवकाश; जागा.
**फाकट**–अर्थशून्य; व्यर्थ.
**फाडोवाडें**–अनेक फाडीं मांडून.
**फुंज**–उन्माद.
**फुडें**–स्पष्ट.
**फुंफात**–कोलाहल करीत.
**बडिशा**–आमिष; गळास लावलेलें मांस.
**बंदीजन**–भाट.
**बरवें**–चांगलें; सुंदर.
**बागुल**–मुलांना भीति दाखविण्यासाठीं कल्पिलेला भयंकर प्राणी; काल्पनिक भीति.
**बासटा**–विष भिनणें; लहर.
**बिढार**–बिऱ्हाड; वसातिस्थान.
**बिरडें**–गांठ.
**बुंथड**–गोंधळ; गुंता.
**बोरांटी**–बोरीचे कांटे.
**बोहरी**–नाश.
**बोळवण**–हकालपट्टी.
**भडसें**–मोठेपणानें; भरानें.
**भंडिमा**–दंभ.
**भरणी**–अलंकृत करणें.
**भरोवरी**–सामुग्री; आवड; गर्दी.
**भवंडणें**–चक्राकार फिरविणें.
**भंवणें**–गरगर फिरणें.
**भाळेभोळे**–भोळेभाबडे; अज्ञजन.
**भिंगुरटी**–भ्रमरी; भुंगी.
**भीतरीं**–आंत.
**भुयाळ**–भोयी; वाटाड्या.
**भेणें**–भयानें; भीतीनें.
**भोज**–आवड; प्रेम.
**भोये**–वाट; रस्ता.
**मऱ्हाटी**–सोपें; सुलभ.
**महावंत**–हत्तीवरील माहुत.
**मा**–आणि; मग; तर.
**मार्गी–गु**–वाट; मार्ग.
**मागुतेन**–पुनः
**माझारीं**–मध्यें; आंत.
**मात**–गोष्ट; कथा; वार्ता.
**मातंग**–मांग.
**मायपूत**–मायलेकरें.
**माषमात्र**–उडीद बुडेल इतकें पाणी.
**मिरासीकर**–मिरासदार.
**मुखबंध**–मौन; उपास.
**मुंड–डें**–डोकें.
**मुसलवत्** ( स्नान )–मुसळाप्रमाणें नुसती बुडी मारून बाहेर निघणें.
**मुसावणें**–साकार होणें; मुर्शीत येणें.
**मेर**–सीमा; मर्यादा.
**मैंद**–लुच्चा, लबाड माणूस.
**मोचडे**–जोडे.
**मोतड**–नटाविण्याचा खटाटोप.
**मोहरीं**–पुढें.
**म्हैसा**–रेडा.
**यथानिगुती**–नेमकें; अचूक; युक्तीनें.

**यावा**–हल्ला.
**येरयेर**–एकमेक; परस्पर.
**रांगोळी**–भीतियुक्त थरकांप; धैर्य खचणें.
**राजबिदी**–राजरस्ता.
**रांडवडा**–हत्त्या; कुलनाश.
**रातणें**–रंगून जाणें; जडणें.
**रांड**–विधवा.
**राणिव**–राज्यपद.
**रानभरी**–रानोमाळ.
**रिगमु**–शिरकाव; प्रवेश.
**रिघणें**–प्रवेश करणें.
**रिझणें**–संतुष्ट होणें.
**रिस**–अस्वल.
**रुका**–पैसा; द्रव्य.
**रुख**–वृक्ष.
**लवलवाट**–हाव; लोभ.
**लवलाह्या**–हां हां म्हणतां.
**लवलाहीं**–तात्काळ.
**लाचुगी**–लोभी; हांवरी.
**लाठी**–समर्थ; बलवान्.
**लिंग**–चिन्ह; लक्षण; डौल.
**लिगटणें**–चिकटणें.
**लेखा**–किंमत; हिशेब; पर्वा.
**लेप**–कळसूत्री बाहुली.
**लोधणें**–लुब्ध होणें; मोहून जाणें.
**लोही**–आरक्त; तांबडा.
**वचणें**–जाणें.
**वंचिणें**–सोडणें; त्याग करणें.
**वदंती**–भाषा; ख्याति.
**वळवटी**–बोबडी; मौन.
**वळसा**–पाण्यांतील भोंवरा.
**वाजणें**–वाहणें.
**वाड**–मोठें; पुष्कळ.
**वाडेंकोडें**–वाढत्या आवडीनें.
**वाणणें**–वर्णन करणें.
**वानी**–तेज; झळाळी.
**वायस**–व्यर्थ; फुकट.
**वालभ**–प्रेम; प्रीति; आवड.
**वास**–(पाहणें) विशिष्ट दिशेनें पाहणें.
**विखार**–विषारी प्राणी; सर्प.
**विचंबु**–नड, जरुरी.
**विंदान**–कौशल्य.
**विनटणें**–शोभून दिसणें; शोभणें.
**विभांडणें**–लढून पराभूत करणें.
**विरजाहोम**–संन्यास घेण्यापूर्वी करतात तो होम.
**विवंचणें**–विचार करणें.
**विवळणें**–समजणें; ज्ञान होणें.
**वेंचणें**–फुकट व्यर्थ जाणें.
**वेंच**–खर्च.
**वेंधणें**–झेंप घेणें; वर चढणें.
**वेल्हाळी**–सुंदरी.
**वेव्हारा**–सावकार; श्रेष्ठी.
**वोखटें**–वाईट.
**वोडवणें**–पुढें करणें; देणें.
**वोपणें**–अर्पण करणें.
**वोरस**–पान्हा.

**वोवांडणें**–ओलांडून पलीकडे जाणें.
**वोस**–व्यर्थ; लटका; फोल.
**वोसंग**–मांडी.
**वोसंडणें**–पूर्ण भरून वाहणें.
**वोसणणें**–बडबडणें.
**वोसेगांव**–उजाड झालेला गांव.
**वोळखण**–लक्षण; खूण; चिन्ह.
**वोळगणा**–सेवक; चाकर.
**वोळणें**–शमणें; वर्षाव होणें.
**व्याख्यान**–वर्णन; व्याख्या.
**व्याली**–जननी; आई.
**व्याहाळी**–क्रीडा; शिकार.
**शबळ**–अशुद्ध; समळ.
**शेखीं**–शेवटीं.
**शेजार**–शय्यागृह.
**संजोगणें**–जोडणें.
**सधर**–समर्थ; अधिकारी; श्रेष्ठ.
**सपाई**–सर्वस्वीं; यच्चयावत्.
**सरिसें**–बरोबर; सह.
**सवंगण**–पीक काढणें; गोळा करणें.
**सवा**–बाजूला–नें.
**संवाद**–मैत्री; सलोखा; स्नेहभाव.
**सवेंचि**–लगेंच.
**साउमा**–सामोरा, सन्मुख.
**सांकडें**–संकट.
**सांकडणें**–( क्रि. )–संकटांत पडणें.
**साचार**–सत्य; खरें; खरोखर.
**साटोप**–प्रयत्न.
**साडेपंधरें**–सोनें (उत्तम प्रकारचें)
**सांपें**–सांप्रत; सध्यां.
**सीक**–शिक्षा.
**सुणें**-कुत्रें.
**सुपाणी**–सुढाळ मोत्याचा दाणा.
**सुभट**–शूर; वीर.
**सुभरणें**–भरून येणें, राहणें.
**सुरवाड**–सुख.
**सूणें**–घडणें; ठेवणें.
**सूदणें**–घालणें.
**सेल ( सेलेचा )** – निवडक; शेलका.
**सैरा**–स्वैर; स्वैरपणें.
**सोंकारा**–पिकाचा राखणदार.
**सोनसळा**–पीतांबर.
**सोरू**–डुक्कर.
**स्वयंपाकी**–स्वतःच्या हातानें अन्न शिजवून खाणारा.
**हडबडणें**–आंदोळणें.
**हरिख**–हर्ष; आनंद.
**हल्लर**–अंगाईगीत.
**हाटवाटीं**–बाजारपेठेंत.
**हिंपुटी**–दुःखीकष्टी.
**हेंड**–गुंता.
**हेलया**–तात्काळ; सहज.
**हेळसणें**–उपेक्षा करणें.

REFBK 0008731

REFBK-0008731